ISSN 2278-5655

नोव्हेंबर- डिसेंबर,2025

खंड-XIV, विशेष अंक- III(b)

# AMIERJ

# अर्हत मल्टीडिसिप्लिनरी इंटरनॅशनल एज्युकेशन रिसर्च जर्नल

DOI Indexed Journal

SJIF Impact Factor: 8.343

2025

doi OPEN ACCESS

संपादक

प्रो.(डॉ.) पांडुरंग ईश्वरा भोसले

प्रा.संग्राम सीताराम गोसावी

ISSN-२२७८-५६५५

# AMIERJ

## अर्हत मल्टीडिसिप्लिनरी इंटरनॅशनल एज्युकेशन रिसर्च जर्नल्स

एक बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय द्वि-मासिक संदर्भित जर्नल
प्रिंट/ऑनलाइन पीअर रिव्ह्यू जर्नल
*SJIF Impact Factor: 8.343* *DOI Indexed Journal*

संपादक
प्रो.(डॉ.) पांडुरंग ईश्वरा भोसले
प्रा.संग्राम सीताराम गोसावी

*अर्हत मल्टीडिसिप्लिनरी इंटरनॅशनल एज्युकेशन रिसर्च जर्नल्स*

***एक बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय द्वि-मासिक संदर्भित जर्नल***

***प्रिंट/ऑनलाइन पीअर रिव्ह्यू जर्नल***

***SJIF Impact Factor: 8.343***

***DOI Indexed Journal***

***ISSN-२२७८-५६५५***

***नोव्हेंबर- डिसेंबर,2025***

***खंड-XIV, विशेष अंक- III(b)***

**कॉपीराइट:**

© सर्व हक्क राखीव. या प्रकाशनाचा कोणताही भाग प्रकाशकाच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय पुनरुत्पादित, पुनर्प्राप्ती प्रणालीमध्ये संग्रहित किंवा कोणत्याही स्वरूपात किंवा कोणत्याही प्रकारे प्रसारित केला जाऊ शकत नाही, इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग आणि/किंवा अन्यथा.

**अस्वीकरण:**

जर्नलमध्ये व्यक्त केलेली सर्व मते वैयक्तिक योगदानकर्त्यांची आहेत. लेखकांनी केलेल्या विधानांसाठी किंवा व्यक्त केलेल्या मतांसाठी संपादक आणि प्रकाशक जबाबदार नाहीत.

**व्यवस्थापकीय संपादक आणि प्रकाशक:** प्रमिला डी.ठोकळे (८८५००६९२८१)
(**ईमेल आयडी:** amierj64@gmail.com)

***प्रकाशन:***

**अर्हत प्रकाशन आणि अर्हत जर्नल्स**
158, हस्तपुष्पम बिल्डिंग, बोरा बाजार सेंट,
बोराबाजार परिसर, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र 400001
ईमेल आयडी: aarhatpublication@gmail.com
M-8850069281

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues– III(b) Nov– Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# Index


| Sr. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | भाषांतरप्रक्रियेचे बौद्धिक विकासात योगदान<br>***डॉ. सौ. उज्वला सुनिल लांडगे***<br>***https://zenodo.org/records/18013218***<br>***10.5281/zenodo.18013218*** | 1 |
| 2 | भाषांतरातील आव्हाने<br>***प्रो. डॉ. प्रभंजन चव्हाण***<br>***https://zenodo.org/records/18013246***<br>***10.5281/zenodo.18013246*** | 5 |
| 3 | भाषांतरातील आव्हाने<br>***डॉ. सुमित बबन साळुंखे***<br>***https://zenodo.org/records/18013277***<br>***10.5281/zenodo.18013277*** | 12 |
| 4 | भाषांतर आणि जाहिरातलेखन<br>***डॉ. अतुल नारायण चौरे***<br>***https://zenodo.org/records/18013291***<br>***10.5281/zenodo.18013291*** | 18 |
| 5 | भाषांतर स्वरूप : तत्वे आणि प्रक्रिया<br>***डॉ. अमोगसिद्ध शिवाजी चेंडके***<br>***https://zenodo.org/records/18013302***<br>***10.5281/zenodo.18013302*** | 26 |
| 6 | भाषांतरित कादंबऱ्यांमधील स्त्रीजीवन<br>***डॉ. अमोल सुभाष कवडे***<br>***https://zenodo.org/records/18013321***<br>***10.5281/zenodo.18013321*** | 30 |
| 7 | **भाषांतराचे महत्त्व**<br>***डॉ. आरती विजयकुमार भोसले***<br>***https://zenodo.org/records/18013339***<br>***10.5281/zenodo.18013339*** | 35 |
| 8 | अनुवादाचे महत्त्व आणि रोजगाराच्या नव्या संधी<br>***डॉ. कांचन विजय नलावडे***<br>***https://zenodo.org/records/18013348***<br>***10.5281/zenodo.18013348*** | 38 |
| 9 | भाषांतरातील आव्हाने<br>***डॉ. क्रांती हरेश पैठणकर***<br>***https://zenodo.org/records/18013364***<br>***10.5281/zenodo.18013364*** | 42 |
| 10 | आधुनिक कालखंडात तौलनिक साहित्याचे स्वरूप व महत्त्व<br>***डॉ. गजानन विठ्ठल भोसले***<br>***https://zenodo.org/records/18013377***<br>***10.5281/zenodo.18013377*** | 50 |

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues– III(b) Nov– Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article


| | | |
|---|---|---|
| 11 | डिजिटल युगातील भाषांतराचे महत्त्व<br>***डॉ. गणेश निवृत्ती चौधरी***<br>**https://zenodo.org/records/18013392**<br>**10.5281/zenodo.18013392** | 58 |
| 12 | गुजरातीमधून मराठीत भाषांतरित झालेल्या दलित कथा<br>***प्रो. डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे***<br>**https://zenodo.org/records/18013410**<br>**10.5281/zenodo.18013410** | 62 |
| 13 | भाषांतर आव्हाने, मर्यादा, अडचणी आणि त्यावरील उपाय<br>***प्रा. डॉ. सौ. जयश्री कृष्णा शहाणे***<br>**https://zenodo.org/records/18013430**<br>**10.5281/zenodo.18013430** | 67 |
| 14 | डिजिटल युगात इंग्रजी भाषांतराचा प्रभाव<br>***डॉ. दीपक गायकवाड***<br>**https://zenodo.org/records/18013467**<br>**10.5281/zenodo.18013467** | 72 |
| 15 | भाषांतर आणि अभिजात साहित्य<br>***डॉ. नूतन लोणकर – नेवसे***<br>**https://zenodo.org/records/18013478**<br>**10.5281/zenodo.18013478** | 77 |
| 16 | भाषांतर : एक कौशल्य<br>***डॉ. पुरुषोत्तम प्रल्हाद महाजन***<br>**https://zenodo.org/records/18013489**<br>**10.5281/zenodo.18013489** | 81 |
| 17 | भाषांतरातील भाषिक आव्हाने<br>***डॉ. प्राजक्ता प्रल्हादराव निकम***<br>**https://zenodo.org/records/18052469**<br>**10.5281/zenodo.18052469** | 87 |
| 18 | भाषांतराच्या दृष्टीने सुभाषिताचे महत्त्व<br>***प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक***<br>**https://zenodo.org/records/18052502**<br>**10.5281/zenodo.18052502** | 93 |
| 19 | भाषांतरातील आव्हाने<br>***प्रा. डॉ. युवराज देवबा भामरे***<br>**https://zenodo.org/records/18052545**<br>**10.5281/zenodo.18052545** | 98 |
| 20 | भाषांतर साहित्य सिद्धांत व प्रकार<br>***प्रा. डॉ. रेश्मा रमेश दिवेकर***<br>**https://zenodo.org/records/18052579**<br>**10.5281/zenodo.18052579** | 103 |
| 21 | भाषांतर आणि सांस्कृतिक समस्या<br>***प्रा. डॉ. लांडे एस. डी.***<br>**https://zenodo.org/records/18052607**<br>**10.5281/zenodo.18052607** | 108 |

| | | |
|---|---|---|
| 22 | डिजिटल युगातील भाषांतराचे महत्त्व<br>***डॉ. वसंत यशवंत गावडे***<br>***https://zenodo.org/records/18052699***<br>***10.5281/zenodo.18052699*** | 114 |
| 23 | डिजिटल भाषांतर प्रणालीचा मराठी भाषेवरील परिणाम : अनुकूलता, मर्यादा आणि भाषिक संवेदनशीलतेचा अभ्यास<br>***डॉ. विक्रम जाधव व डॉ. माळी बी. बी.***<br>***https://zenodo.org/records/18052752***<br>***10.5281/zenodo.18052752*** | 120 |
| 24 | भाषांतर व अनुवाद: स्वरूप व वैशिष्ट्ये<br>***डॉ. शामराव ला. गायकवाड***<br>***https://zenodo.org/records/18052846***<br>***10.5281/zenodo.18052846*** | 128 |
| 25 | कविता – भाषांतर<br>***प्रा. डॉ. संगीता पैकेकरी***<br>***https://zenodo.org/records/18052889***<br>***10.5281/zenodo.18052889*** | 133 |
| 26 | भारतीयांच्या मनात महासत्तेचे बीज पेरणारी डॉ. अब्दुल कलाम यांची अनुवादित ग्रंथसंपदा<br>***प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात***<br>***https://zenodo.org/records/18052916***<br>***10.5281/zenodo.18052916*** | 138 |
| 27 | मध्ययुगीन मराठी तौलनिक साहित्याचे स्वरूप<br>***डॉ. संतोष काशीद***<br>***https://zenodo.org/records/18052946***<br>***10.5281/zenodo.18052946*** | 146 |
| 28 | संत साहित्य आणि भाषांतर<br>***प्रा. (डॉ.) सविता अशोक माळी***<br>***https://zenodo.org/records/18053059***<br>***10.5281/zenodo.18053059*** | 150 |
| 29 | भाषांतर-अनुवाद-रूपांतराने जागतिक साहित्यप्रसारास चालना<br>***डॉ. सायली आचार्य***<br>***https://zenodo.org/records/18052995***<br>***10.5281/zenodo.18052995*** | 155 |
| 30 | भाषांतरकार: आवश्यक गुण आणि आव्हाने<br>***प्रो. डॉ. सुभाष दिनकर आहेर***<br>***https://zenodo.org/records/18053088***<br>***10.5281/zenodo.18053088*** | 162 |

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# भाषांतरप्रक्रियेचे बौद्धिक विकासात योगदान

*** डॉ. सौ. उज्वला सुनिल लांडगे**

** सहा. प्राध्यापक, एस.एम.आर.के.बी.के.ए.के.महिला महाविद्यालय नाशिक.*

**सारांश :**

*भाषा ही विचार व्यक्त करण्यासाठी महत्त्वाचे माध्यम आहे आणि जगात सुमारे तीन हजार पेक्षा जास्त भाषा बोलल्या जात आहेत. अशा परिस्थितीत विचारांची देवाणघेवाण होते, ज्ञानाचा प्रसार होतो तसेच विविध भाषांमधील संवाद सुलभ होण्यासही मदत होते. प्रत्येक देशातील संस्कृती भिन्न आहे. भाषांतरामुळे ज्ञान आणि संस्कृतीचेही आदान प्रदान होते म्हणून जागतिक पातळीवर सहकार्याची भावना वाढीस लागते. शास्त्रीय लेखन, कथा, कादंबरी, चरित्रे अशा विविध साहित्य प्रकारांचे भाषांतर केले जाते तसेच तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी देखील भाषांतराची गरज असते.*

***महत्त्वाचे शब्द** – आदानप्रदान, बहुभाषिक, मूलनिष्ठ, लक्षनिष्ठ, बौद्धिक विकास, छाया*

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रास्ताविक :**

भाषा ही विचार व्यक्त होण्यासाठी महत्त्वाचे माध्यम आहे तर भाषांतर म्हणजे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत आशयाचे परिवर्तन घडवून आणणे. वेगळ्या भाषांमधून मजकूराचा अर्थ नेमका आणि स्पष्टपणे दुसऱ्या भाषेत रूपांतर करणे हेच भाषांतर आहे. यामध्ये शब्दांचे, वाक्यरचनेचे आणि सांस्कृतिक संदर्भांचे योग्य सुसंगत रूपांतरण केले जाते. "जगात सुमारे तीन हजार भाषा आहेत. असे भाषा वैज्ञानिक मानतात. विविध भाषांमध्ये वेगवेगळ्या कारणांसाठी संपर्क असणे आवश्यक ठरलेले आहे. प्रत्येक व्यक्तीला या सर्व किंवा यांच्यापैकी अनेक भाषा शिकणे ही गोष्ट अशक्यच म्हणायला हवी तेव्हा, ज्या व्यक्तींना एकापेक्षा अधिक भाषा अवगत झालेल्या आहेत त्यांनी भाषांतर करून हा संपर्क इतरांसाठी साधून देणे आवश्यक आहे. साहित्याच्या क्षेत्रात भाषांतर ही गोष्ट नवीन नाही प्रशासन आणि व्यापार उद्दीम या क्षेत्रामध्ये ही भाषांतराची आवश्यकता बहुभाषिक समाजांमध्ये विशेष भासते."[१]

भाषांतर करताना फक्त शब्दांची समानता न ठेवता, त्यामागील अर्थ, भाव, आणि सांस्कृतिक संदर्भ देखील जपले जातात. त्यामुळे मूळ मजकूराचा अर्थ आणि भाव कायम राहतो. भाषांतरात अनेक पद्धती, शैली, आणि तंत्रांचा उपयोग केला जातो, जेणेकरून मूळ संदेश योग्य रीतीने दुसऱ्या भाषेत पोहोचतो.

**भाषांतर :**

मराठीत अनेक भाषांमधून भाषांतराच्या मार्गाने आलेले वांड्.मय मोठ्या प्रमाणात पहावयास मिळते. हिंदी, इंग्रजी,

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

बंगाली, कानडी यासारख्या भाषांमधून आलेल्या कादंबऱ्या, कथा, कविता, शास्त्रीय तसेच ललित वांड्.मय मोठ्या प्रमाणात दिसून येते भाषांतर हे ज्ञानाच्या कक्षा रुंदवण्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण कार्य करत असताना दिसून येते. भाषांतराचे फायदे म्हणजे विविध भाषा-भाषांमधील संवाद सुलभ होतो, ज्ञान आणि संस्कृतींचे आदान-प्रदान होते तसेच जागतिक पातळीवर सहकार्यात वाढ होते. भाषांतरामुळे लोकांना नवीन विचार, माहिती, आणि अनुभव सहजपणे मिळू शकतात. "भाषांतर शब्दाचा अर्थ सांगायचा तर दुसरी भाषा एवढाच आहे. अन्य भाषा इतिहास तरम म्हणजे एका भाषेचा आशयाला अन्य भाषेत आणणे एवढाच अर्थ सांगावा लागतो. संस्कृत भाषेमध्ये भाषांतराला 'छाया' असे म्हणतात. छाया म्हणजे सावली, प्रतिबिंब, प्रतिमा इत्यादी होय जशी मूळ कृती तशीच तिची छाया असणार हे उघडच आहे. भाषांतर म्हणजे मूळ कृतीची उभेउभ प्रतिकृती असावी अशी अपेक्षा असते. आरशातील आपले प्रतिबिंब म्हणजे आपणच असतो तीच भूमिका चांगल्या दर्जाच्या भाषांतराबद्दल केली जाते" [२]. भाषांतर करायला दोन्ही भाषांचे ज्ञान व उपयोजन हेही आवश्यक आहे. तसेच मूळ उताऱ्याचे पूर्णतः आकलन असणेही आवश्यक असते. अन्यथा भाषांतरात अडथळे येतात म्हणजे शब्दांची अचूकता, सांस्कृतिक तफावत, वाक्यरचनेची जुळवाजुळव, आणि मूळ मजकूराचा भाव जपणे. याशिवाय, भाषाच्या विशेष वैशिष्ट्यांचा विचार करणे आणि भाषांतर करताना होणारे संदर्भ बदल यांमुळे अडचणी येऊ शकतात.

**भाषांतराचे प्रकार :** भाषांतराचे दोन प्रकार आहेत. मूलनिष्ठ भाषांतर व लक्ष्यनिष्ठ भाषांतर. मूलनिष्ठ भाषांतरात एखाद्या कलाकृतीचे भाषांतर करताना मूळ भाषेतील शब्द त्यांची रचना तसेच वाक्यरचना, म्हणी, वाक्प्रचार यांचा अर्थ न बदलता शब्दशः भाषांतर करण्यावर विशेष कटाक्ष असतो. शब्दाला प्रतिशब्द, वाक्याला प्रति वाक्य दिसून येते मात्र अशा भाषांतरातून मूळ लेखनातील विचारांच्या आकलनास अडथळा निर्माण होतो. मूळ भाषा समजून घेणे हा भाषांतराचा उद्देश नसतो तर, त्या कलाकृतीमध्ये आशय समजून घेणे हा मुख्य उद्देश असल्यामुळे मूलनिष्ठ भाषांतर हे विशेष वापरले जात नाही. मात्र लक्ष्यनिष्ठ भाषांतरामध्ये आशय किंवा अर्थ यांना विशेष महत्त्व दिले जाते किंबहुना हेच मुख्य लक्ष्य असते. भाषेकडे फक्त विचारांचे साधन म्हणून पाहिल्याने लेखनातील विचार अन्य भाषेत चपखलपणे परावर्तित करून मुख्य आशय व्यक्त केलेला असतो. विचाराला, ज्ञानाला, माहितीला महत्त्व असणाऱ्या व्यवहारिक व तांत्रिक, शास्त्रीय क्षेत्रातही लक्ष्यनिष्ठ भाषांतराने ज्ञानाचा प्रसार होणे शक्य होते. तसेच मूळ लेखनातील सहजता, खेळकरपणा, प्रसन्नता, मिश्किलता हे सर्व भाषांतरामध्ये जपलेले दिसून येणे अपेक्षित असते. ललित लेखन, कथा, कविता, यांच्या भाषांतरामध्ये लक्ष्यनिष्ठ भाषांतर प्रकाराचा विशेष उपयोग दिसून येतो. लक्ष्यनिष्ठ भाषांतरामध्ये सामान्यतः दोन प्रकार दिसून येतात.

**१.शास्त्रीय लेखनाचे भाषांतर :**

यात "भाषा विज्ञानासारख्या क्षेत्रातील भाषाविषयक नवा दृष्टिकोन भाषांतर- रूपांतर- अनुवाद इत्यादी प्रकाराने मराठीत आणला गेला. मराठीच्या संदर्भात त्या विचाराला चालना मिळाली आणि मराठीचे भाषा वैज्ञानिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न मराठी भाषेतज्ज्ञ करू लागला. मराठी भाषिकाला जसा याचा फायदा झाला तसाच मराठी भाषेलाही ज्ञान कक्षा

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

रुंदावण्याच्या संदर्भात त्याचा उपयोग झाला. मराठी संस्कृत मधील भाषा विषयक विचार तौलनिक पातळीवर नव्याने करण्याची गरज भागविली गेली. भाषांतराच्या प्रत्येक क्षेत्रात असा तौलनिक विचार त्या त्या अन्य भाषेत सुरू करून देण्याचे कार्य भाषांतराने गतिमान केले. त्या दृष्टीने वाणिज्य व शास्त्र या क्षेत्रातील परिभाषा घडायला ही प्रोत्साहन मिळाले".[३]

**२. कथा कादंबरी इत्यादी साहित्य प्रकारांचे भाषांतर** - उदा. कन्नड साहित्यातील काही काव्ये किंवा कथा मराठीत अनुवादित केलेल्या आहेत, जसे की, कन्नड कवींच्या रचनांचे मराठी रूपांतर. त्याचप्रमाणे, तेलुगु साहित्यातील काही कथा किंवा कादंबऱ्या मराठीत आणलेल्या आहेत. अशा प्रकारे, विविध भाषांमधून आलेली ज्ञान ही मराठीत सहज उपलब्ध होते. कोणताही साहित्यप्रकार जेव्हा भाषांतरित केला जातो तेव्हा त्याचे काही नियम कटाक्षाने बाळावे लागतात जसे "भाषांतरित लेखनाचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे ते भाषांतरित असूनही भाषांतरीत आहे असे वाटता कामा नये. हा होय ज्या भाषेतून ते लेखन आलेले असते त्या भाषेचा पुसट सुद्धा ठसा न उरू देता ज्या भाषेत ते लेखन भाषांतरीत होत आहे त्या भाषेतील ते स्वतंत्र लेखन आहे असे वाटणे हा भाषांतराच्या कौशल्यातील प्रमुख विशेष म्हणून सांगावा लागेल"[४]

अनेक लोकप्रिय आत्मकथन, चरित्रे, कथा, नाटक, कादंबऱ्या यांचे भाषांतर सातत्याने करणे सुरू असते. उदा. महात्मा गांधींच्या आत्मकथेला इंग्रजीत रूपांतर करणे, किंवा शेक्सपियरच्या नाटकांचे मराठी अनुवाद, किंवा पाश्चात्य काव्याचा भारतीय भाषांमध्ये रूपांतर, हे सर्व प्रत्यक्ष उदाहरणे आहेत.स्वामी विवेकानंदांच्या अनेक ग्रंथांचा मराठीत अनुवाद झाला आहे. उदा. त्यांचे 'राजयोग', 'ज्ञानयोग', 'भक्तियोग' या पुस्तकांचे मराठी रूपांतर उपलब्ध आहे. तसेच, त्यांच्या विविध व्याख्यानांचाही मराठी अनुवाद अनेक वेळा केलेला आहे. यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार मराठीत सहज होतो. तसेच विनोबा भावेंच्या अनेक वैचारिक लेखनाचा अनुवाद अनेक भाषांमध्ये झाला आहे. उदा. त्यांचे 'भूदान आंदोलन'वरील लेखन, 'अहिंसा आणि सत्य' या विषयांवरील विचार, तसेच त्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा अनुवाद इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलुगु आणि इतर अनेक भाषांमध्ये झाला आहे. यामुळे त्यांचे विचार व्यापक प्रमाणावर पोहोचले आहेत.विनोबा भावेंच्या 'गीताई' हा ग्रंथ खूपच प्रसिद्ध आहे आणि तो अनेक भाषांमध्ये अनुवादित झाला आहे. उदा. इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलुगु, बंगाली, गुजराती आणि इतर अनेक भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये 'गीताई' चा अनुवाद झाला आहे. त्यामुळे त्याचे विचार आणि तत्त्वज्ञान जगभर पोहोचले आहे.

"फक्त भाषेचा विकासच नाही तर एखाद्या प्रदेशाच्या बौद्धिक विकासातही भाषांतराची विशेष भूमिका असू शकते. पूर्वी लॅटिन ग्रीक अशा अनेक भाषातील ग्रंथांची अरबी भाषेच्या माध्यमातून युरोपीय भाषेत अनेक भाषांतरे झाली त्यामुळे युरोपाच्या मध्ययुगातील अज्ञानरूपी अंधकार होता तो या भाषांतरीत झालेल्या ग्रंथातून नष्ट झाला आणि नवीन पहाट उदयास आली आपल्याकडे देखील मध्ययुगात इंग्रजी व संस्कृत मधून अनेक भाषांतरे झाली त्यालाच आधुनिक युगाची नांदी असे देखील म्हटले जाते. 'भाषांतराचे महत्त्व ओळखल्यामुळेच वेळोवेळी भाषांतरांना उत्तेजन देण्याचे

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

योजना पूर्वक भाषांतरे करून घेऊन ती प्रकाशित करण्याचे प्रयत्न झाले दीडशे वर्षांपूर्वीची ‘दक्षिणा प्राइस कमिटी’ आणि महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर ‘साहित्य संस्कृती मंडळा’चा भाषांतर विभाग याची उदाहरणे आपल्याला माहीत आहेतच. सोवियत रशियानेही आपल्या संघराज्यातील कमी विकसित भाषांचा विकास व्हावा म्हणून व अन्य राजकीय उद्दिष्टांसाठी भारतातील व अन्य आशियाई व आफ्रिका राष्ट्रातील भाषातून सुमारे १५ संघराज्य भाषांतर करून घेऊन प्रकाशित केली होती”[५]

**समारोप :**

स्वभाषांतरामुळे विकसनशील देशात ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात परिणामी साहित्य क्षेत्रातील प्रगतीस वाव मिळतो. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतर करीत असताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते तर कधी अतिशय सुलभ रीतीने भाषांतर करणे शक्य होते. जसे“मराठीमध्ये शब्दांना विकार मोठ्या प्रमाणात होतात तसे इंग्लिशमध्ये होत नाही एका अर्थाने विकारी शब्दांची भाषा ती वापरणाऱ्यांना जास्त स्वातंत्र्य देते कारण विशिष्ट वाक्याच्या शब्दांचा क्रम बदलल्याने व्याकरणीकरचनेची बहुदा आणि होत नाही”६ भाषांतर म्हणजे भाषांतरकाराच्या प्रतिभेला आव्हान असते आणि तो त्याच्या कुशलतेने ती पेलतो.

**निष्कर्ष :**

१. भाषांतर ही श्रेष्ठ कला आहे.

२. भाषांतर हे विशेष शास्त्र आहे.

३. भाषांतर ही काळाची,ज्ञानाची गरज आहे.

४. भाषांतरित कलाकृती संस्कृती, भाषा,ज्ञान,साहित्याचे प्रतिनिधित्व करते.

५. भाषांतर म्हणजे भाषांतरकाराच्या प्रतिभेला आव्हान असते.

**संदर्भ:**

१. *आधुनिक भाषा विज्ञान सिद्धांत आणि उपयोजन, मालशे, मिलिंद, लोकवाङ्मय गृह, सहावी आवृत्ती, सप्टेंबर २०१९, पृष्ठ क्र. ११८*

२. *व्यावहारिक मराठी, गोविलकर, लीला व इतर, स्नेहवर्धन, १ मार्च २००४, पृष्ठ १३०*

३. *तत्रैव, पृष्ठ १३१*

४. *तत्रैव, पृष्ठ १३२*

५. *भाषेतून भाषेकडे आणि भाषांतराकडे, प्र. ना. परांजपे प्रकाशन, ३० सप्टेंबर २०१७, पृष्ठ ५५*

६. *भाषांतर आणि भाषा, विलास सारंग, मौज प्रकाशन, १ फेब्रुवारी २०११, पृष्ठ १*

*Cite This Article:*

***डॉ. सौ. लांडगे उ. सु.* (2025).** *भाषांतरप्रक्रियेचे बौद्धिक विकासात योगदान.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 1–4).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# भाषांतरातील आव्हाने

*** प्रो. डॉ. प्रभंजन चव्हाण**

** प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, रयत शिक्षण संस्थेचे, डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध , पुणे -६७*

**सारांश :**

*भाषांतर ही केवळ भाषिक देवाणघेवाण नसून ती दोन संस्कृती, विचारसरणी आणि जीवनदृष्टी यांच्यातील संवादाची प्रक्रिया आहे. एका भाषेतील अर्थ, भाव आणि संदेश दुसऱ्या भाषेत अचूक व प्रभावीपणे व्यक्त करणे हे अत्यंत जटिल कार्य आहे. या प्रक्रियेत भाषांतरकाराला अनेक प्रकारची आव्हाने येतात. भाषिक, सांस्कृतिक, भावनिक, तांत्रिक, कायदेशीर, तसेच नैतिक स्वरूपाची ही आव्हाने असतात.*

*भाषिक पातळीवर, शब्दशः भाषांतरामुळे अर्थाचा विपर्यास होण्याचा धोका असतो; वाक्यरचना, बहुअर्थी शब्द आणि व्याकरणातील फरक या गोष्टी भाषांतराची गुंतागुंत वाढवतात. सांस्कृतिक आव्हानांत, प्रत्येक भाषेतील परंपरा, प्रथा, म्हणी आणि संस्कृतिवाचक संज्ञा यांचे समतुल्य शब्द शोधणे कठीण ठरते.*

*साहित्यिक भाषांतरात शब्दांचा अर्थच नव्हे तर सौंदर्य, लय आणि अनुभव जपावा लागतो. "एखादी साहित्यकृती ही भाषांतरामुळे अनेकजणांपर्यंत पोहोचणार असते आणि कायमची उपलब्ध राहणार असते. याशिवाय, भाषांतरामुळे पुनर्निर्मितीचा आनंद मिळतो तो वेगळाच! माहितीपर किंवा विज्ञानक्षेत्रातील भाषांतरे करणे व साहित्यकृतीची भाषांतरे करणे, यात फार मोठा फरक आहे. माहितीपर भाषांतरामध्ये वस्तुनिष्ठ आणि सुबोध असे भाषांतर करण्याला महत्त्व आहे. मात्र साहित्यकृतीचे भाषांतर करताना भाषांतरकाराला परक्या संस्कृतीचा, सामाजिक परिस्थितीचा, ऐतिहासिक काळाचा, परकीय भाषेचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक ठरते. ज्या भाषेत भाषांतर करायचे आहे, त्या भाषेची उपजत समज आणि अभ्यासपूर्ण ज्ञान असावे लागते."१ विज्ञान-तंत्रज्ञान आणि कायदा यांसारख्या क्षेत्रांत अचूकता, पारिभाषिक सुसंगती आणि स्पष्टता आवश्यक असते.*

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## भाषांतर म्हणजे काय?

एका भाषेतील (मूळ भाषा) अर्थ, भावार्थ आणि संदेश दुसऱ्या भाषेत (लक्ष्य भाषा) अचूकपणे व योग्य पद्धतीने व्यक्त करणे म्हणजे भाषांतर. एका भाषेतील (मूळ भाषा) अर्थ, भावार्थ आणि संदेश दुसऱ्या भाषेत (लक्ष्य भाषा) अचूक आणि योग्य पद्धतीने व्यक्त करणे म्हणजे भाषांतर होय. यामध्ये केवळ शब्दांतर होत नाही, तर त्या शब्दांच्या मागील अर्थ, संदर्भ, संस्कृती आणि भावना या सर्व गोष्टींचा समतोल राखला जातो.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

**भाषांतरातील प्रमुख आव्हाने :**

भाषांतर म्हणजे फक्त एका भाषेतील शब्द दुसऱ्या भाषेत टाकणे नव्हे, तर तो एक सर्जनशील आणि सांस्कृतिक संवादाचा प्रकार आहे. “भाषांतरातील भाषिक समस्यांच्या तुलनेने सांस्कृतिक समस्या अधिक खोलवर रुजलेल्या असतात. त्यामुळे भाषिक समस्याचे विश्लेषण करून त्यांवरील उपाययोजना ज्याप्रमाणे काही ठाम प्रमाणावर करता येते, तसे सांस्कृतिक समस्यांच्या बाबतीत करणे शक्य होत नाही. सर्जनशील लेखनामध्ये भाषिक समस्यांपेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक समस्या उपस्थित होतात. 'कुंकू', 'माहेर', 'उष्टा' अशा ठिकाणी मराठी शब्दांचे इंग्रजी भाषांतर, वा 'रोमँटिक', 'हनिमून' अशा इंग्रजी शब्दांचे मराठी भाषांतर करण्याचा प्रयत्न करून पाहिल्यास सांस्कृतिक समस्यांच्या खोल मुळांची कल्पना येईल. अशा वेळी हे शब्द लिप्यंतर करून लक्ष्यभाषेत वापरणे व त्यांच्यावर स्पष्टीकरणात्मक टीपा देणे, किंवा एखादा कामचलाऊ प्रतिशब्द योजणे आणि त्याचा सांस्कृतिक आशय, संदर्भ व पुनरुक्ती ह्यांच्यामुळे तो यात जाईल असा प्रयत्न करणे, असे काही पर्याय भाषांतरकर्त्यापुढे असतात.”[२]

भाषांतरकाराला दोन्ही भाषांचे व्याकरण, शब्दसंपदा, संस्कृती आणि भाषाभान यांचा सखोल अभ्यास आवश्यक असतो. याच प्रक्रियेत अनेक भाषिक आणि शाब्दिक अडचणी येतात.

**१.भाषिक आणि शाब्दिक आव्हाने :**

**(अ) शब्दशः भाषांतराचा धोका**

भाषांतर करताना जर प्रत्येक शब्दाचा तसाच अर्थ दुसऱ्या भाषेत टाकला, तर वाक्याचा खरा भावार्थ हरवतो आणि ते हास्यास्पद, कृत्रिम किंवा अगम्य वाटू शकते. शब्दशः भाषांतर टाळून, वाक्याचा संदर्भानुरूप अर्थ शोधणे आवश्यक आहे.

**(आ) बहुअर्थी शब्द**

एका भाषेतील एखाद्या शब्दाला अनेक अर्थ असू शकतात. भाषांतर करताना योग्य अर्थ निवडणे ही मोठी अडचण असते, कारण तो अर्थ वाक्याच्या संदर्भानुसार बदलतो. म्हणूनच भाषांतरकाराने शब्दाचा अर्थ निवडताना संदर्भ, भावार्थ, आणि वापराचा प्रसंग ओळखणे आवश्यक आहे.

**(इ) वाक्यरचना**

प्रत्येक भाषेची स्वतःची व्याकरणरचना आणि वाक्यबंध असतो. मूळ भाषेतील वाक्य जसाच्या तसा लक्ष्य भाषेत वापरल्यास तो कृत्रिम, गुंतागुंतीचा किंवा व्याकरणदृष्ट्या चुकीचा वाटू शकतो.म्हणूनच भाषांतरात व्याकरणिक सुसंगती आणि भाषेचा नैसर्गिक प्रवाह अत्यंत आवश्यक आहे.

**(ई) वाक्प्रचार आणि लोकोक्तींचे भाषांतर**

भाषांतर ही केवळ शब्दांची देवाणघेवाण नसून ती दोन भिन्न संस्कृती, विचारपद्धती आणि भावविश्व यांमधील संवाद प्रक्रिया आहे. एखाद्या भाषेतील वाक्प्रचार आणि लोकोक्ती हे त्या समाजाच्या जीवनानुभवातून, संस्कृतीतून आणि भाषिक परंपरेतून निर्माण झालेले असतात.

वाक्प्रचार आणि लोकोक्तींचे भाषांतर हे भाषांतरकारासाठी सर्वात मोठे आव्हान आहे. हे फक्त भाषेचे नव्हे तर संस्कृतीचे, भावविश्वाचे आणि विचारपद्धतीचे भाषांतर आहे. “भाषांतर म्हणजे एका भाषेतील संदेश दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे. या प्रक्रियेमध्ये

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

भाषांतरकाराला किमान दोन भाषा येणे आवश्यक असते; एक मूळ भाषा, म्हणजे मुळात ज्या भाषेत संदेश चिन्हित झालेला आहे ती भाषा, आणि आणि दुसरी लक्ष्य भाषा, म्हणजे ज्या भाषेत संदेश पुनर्चिन्हित करायचा आहे ती भाषा. दोन भाषांच्या ज्ञानाबरोबरच भाषांतरकाराला संदेशाचे स्वरूप नीट समजणे आवश्यक असते. मूळ भाषेतील संदेश नेमका कशाविषयी आहे, याचे आकलन त्याला होणे आवश्यक असते.”[३] त्यामुळे अशा भाषांतरात केवळ भाषिक ज्ञान पुरेसे नसून, सांस्कृतिक संवेदनशीलता, सर्जनशीलता आणि संदर्भाची जाणीव आवश्यक असते.

**(उ) संस्कृतीनिहाय फरक**

भाषेतील अनेक शब्द, प्रतीक, रूढी, आणि संदर्भ हे त्या संस्कृतीशी निगडित असतात. दुसऱ्या भाषेत त्यांचे तंतोतंत रूप नसते. भाषांतर करताना भाषेचा अर्थ, भावार्थ आणि सांस्कृतिक संदर्भ यांचा समन्वय साधणे हेच सर्वात मोठे कौशल्य आहे. “मूळ लेखकाचे म्हणणे सर्व बाजूंनी नीट समजावून घेऊन आपल्यासाठी, आपल्या वाचकांसाठी त्याचा एक निश्चित अर्थ लावून तो सुसंगतपणे भाषांतरातून व्यक्त होण्यावर भाषांतराचे यश अवलंबून असते. इंग्रजीतून मराठीत भाषांतर करायचे असेल, तर भाषांतरित मराठी हे मराठी वाटले पाहिजे. म्हणजे आपण मुळातून मराठीतूनच वाचतो आहोत, असे वाचकाला वाटले पाहिजे. अर्थातच, असे भाषांतर हे आदर्श भाषांतर होय. मूळ अनुभवाशी पूर्ण प्रामाणिक राहणे आणि मराठी भाषेचे मराठीपण अबाधित ठेवणे, या दोन्ही गोष्टी एकत्र जुळवून आणणे, हे भाषांतरकाराच्या कौशल्यावर अवलंबून असते. कारण प्रत्येक भाषेला त्या प्रदेशाच्या मातीचा गंध असतो, तिथल्या समाजजीवनाशी त्या भाषेचे घट्ट नाते असते, ती भाषा तिथल्या शतकानुशतकांच्या संस्कृतीतून उमललेली असते.”[४] भाषांतरकाराने केवळ भाषेतील शब्द नव्हे तर त्या शब्दांच्या भावनांचा, संदर्भांचा आणि संस्कृतीचा अर्थ समजून घेऊन लक्ष्य भाषेत नवा, सजीव अनुभव निर्माण करणे आवश्यक असते.

**२. सांस्कृतिक आव्हाने**

भाषांतर हा फक्त भाषेचा नव्हे तर संस्कृतींचा संवाद आहे. प्रत्येक भाषा तिच्या समाजाच्या परंपरा, इतिहास, श्रद्धा आणि जीवनपद्धतीने घडते. त्यामुळे काही शब्द, प्रतिमा आणि संकल्पना त्या संस्कृतीपुरतेच मर्यादित असतात. “भाषांतरकाराला मूळ भाषेतील अर्थ वा आशय समजून घ्यावा लागतो आणि लक्ष्य भाषेत तोच अर्थ वा आशय आणावा लागतो.”[५]

**(अ) संस्कृतिवाचक शब्द**

काही संकल्पना एका संस्कृतीत सहज समजतात, परंतु दुसऱ्या भाषेत त्यांचे तंतोतंत रूप नसते.

**(आ) स्थळ-काळ संदर्भ**

(i) **ऐतिहासिक संदर्भ** -काही शब्द विशिष्ट ऐतिहासिक काळाशी जोडलेले असतात.

(ii) **सामाजिक संदर्भ**-काही संज्ञा सामाजिक पद्धतींशी संबंधित असतात.

(iii)**स्थानिक संदर्भ**- प्रदेश, भूगोल किंवा लोकसाहित्याशी निगडित शब्दांचे भाषांतर करताना स्पष्टीकरण आवश्यक असते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

**(इ) संदर्भासह भाषांतराचे महत्त्व**

सांस्कृतिक आव्हानांवर मात करण्यासाठी पुढील तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. शब्दाचा अर्थ त्याच्या प्रसंगानुसार समजून घ्यावा. लक्ष्य भाषेत सर्वात जवळचा सांस्कृतिक अर्थ निवडावा. आवश्यक असल्यास थोडक्यात स्पष्टीकरण जोडावे. भाषांतरातील भाषिक आणि सांस्कृतिक आव्हाने हे परस्परावलंबी आहेत. भाषा ही संस्कृतीची अभिव्यक्ती असल्याने, भाषांतर करताना केवळ शब्दांतर न करता भाव, अर्थ, संदर्भ आणि संस्कृतीचा आत्मा जपणे अत्यावश्यक आहे.

**३. भावात्मक आणि वैचारिक आव्हाने :**

भाषांतर हे केवळ शब्दांचे रूपांतर नसून भाव, विचार, आणि दृष्टिकोनाचा सुसंवाद आहे. त्यामुळे भाषांतर करताना भावनिक व वैचारिक आव्हानांना सामोरे जाणे हे अनिवार्य ठरते. मूळ लेखकाचा हेतू, त्याची भाषाशैली आणि त्या भाषेतील सांस्कृतिक व मानसिक छटा हे सर्व लक्ष्य भाषेत तंतोतंत उतरवणे अत्यंत कठीण कार्य असते.

**१. अचूक भावाभिव्यक्तीचे आव्हान**

भाषांतरातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे भावांच्या अचूक अभिव्यक्तीचे जतन करणे. काव्य, कादंबरी, आत्मकथा किंवा ललित लेखनात लेखकाचा भावनात्मक आविष्कार सूक्ष्म शब्द, लय, आणि अलंकारांद्वारे प्रकट होतो. मूळ भाषेतील तो भावार्थ, ती नजाकत आणि ती सौंदर्यपूर्ण लय दुसऱ्या भाषेत पुनरुत्पादित करणे हे अत्यंत अवघड असते. अशा वेळी भाषांतरकाराने फक्त शब्द नव्हे, तर त्या शब्दांच्या मागे दडलेले भावविश्व समजून घेणे आणि ते लक्ष्य भाषेच्या सांस्कृतिक व भावनिक चौकटीत पुन्हा उभे करणे आवश्यक ठरते.

**२. वैचारिक ग्रंथांतील क्लिष्टतेचे आव्हान**

वैचारिक, तात्त्विक किंवा वैज्ञानिक ग्रंथांचे भाषांतर करताना संकल्पनात्मक अचूकता आणि वैचारिक प्रामाणिकता हे दोन मोठे प्रश्न निर्माण होतात. अशा ग्रंथांमध्ये वापरलेली संज्ञा, तात्त्विक चौकट आणि तर्कशुद्ध मांडणी अत्यंत विशिष्ट आणि सूक्ष्म असते. भाषांतरकाराने संदर्भ, तत्त्वज्ञानाची परंपरा, आणि दोन्ही भाषांची अभिव्यक्तीसंवेदना लक्षात घेऊन शब्दांची निवड करणे आवश्यक ठरते.

**४. विशिष्ट प्रकारच्या साहित्याच्या भाषांतरात येणारी काही प्रमुख आणि विशेष आव्हाने:**

**१.साहित्याचे भाषांतर**

काव्य, विनोद आणि नाटकातील आव्हाने साहित्याचे भाषांतर हे भाषांतरकलेतील सर्वांत गुंतागुंतीचे आणि संवेदनशील क्षेत्र मानले जाते. कारण साहित्य म्हणजे केवळ शब्दांचा संग्रह नसून भाव, लय, संस्कृती आणि कल्पनाशक्तीचे सर्जनशील विश्व आहे. त्यामुळे गद्य, काव्य, विनोदी साहित्य किंवा नाट्यरूप साहित्याचे भाषांतर करताना भाषांतरकाराने केवळ अर्थ नव्हे, तर मूळ सर्जनातील आत्मा, लय, आणि सौंदर्य जपणे आवश्यक ठरते. या संदर्भात खालील आव्हाने अत्यंत महत्त्वाची आहेत.

**१. काव्याचे भाषांतर आणि त्यातील लय-सौंदर्याचे आव्हान** :काव्याचे भाषांतर हे सर्व प्रकारच्या भाषांतरांपेक्षा सर्वाधिक सूक्ष्म आणि कठीण मानले

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

जाते. कारण काव्य हे भाव, लय, छंद, आणि शब्दसौंदर्याचे सर्जनशील मिश्रण असते.

**(अ) लय आणि छंद**

प्रत्येक भाषेची स्वतःची उच्चारपद्धती, मात्रा, आणि संगीतात्मक रचना असते. मूळ कवितेतील छंद आणि ताल जपताना अनेकदा अर्थाचा थोडा फेरबदल करावा लागतो, अन्यथा कविता कृत्रिम वाटते.

**(आ) यमक आणि अनुप्रास**

कवितेतील यमक आणि अनुप्रास जपणे म्हणजे दोन्ही भाषांच्या ध्वनिसंवेदनांमध्ये संतुलन साधणे.

भाषांतरकाराला कधी शब्दांची लय जपावी लागते, तर कधी भावार्थाला प्राधान्य द्यावे लागते.

**२. विनोद आणि उपहासातील सांस्कृतिक आव्हाने**

विनोद, उपहास आणि व्यंग ही साहित्याची ती रूपे आहेत जी सांस्कृतिक संदर्भांशी घट्ट जोडलेली असतात. एका संस्कृतीतील विनोद दुसऱ्या संस्कृतीत तितकाच अर्थपूर्ण किंवा मनोरंजक वाटेलच असे नाही. विनोद आणि उपरोधातील सूक्ष्म भावार्थ जपण्यासाठी भाषांतरकाराने सांस्कृतिक पार्श्वभूमी, सामाजिक मानसिकता आणि संदर्भांचा अर्थपूर्ण अनुवाद करणे आवश्यक असते. काही वेळा थेट भाषांतर न करता स्थानिक अनुकूल रूपांतरण करावे लागते.

**३. नाटकांचे भाषांतर आणि अभिनयात्मक रूपांतर**

नाटकाचे भाषांतर हे इतर कोणत्याही साहित्यप्रकारापेक्षा वेगळे असते. कारण नाटक हे वाचण्यासाठी नव्हे, तर सादर करण्यासाठी लिहिलेले असते. त्यामुळे त्याचे भाषांतर करताना फक्त शब्दार्थ जपणे पुरेसे नसून, ते संवाद बोलताना नैसर्गिक वाटतील याची काळजी घ्यावी लागते.

**(अ) संवादांचे रूपांतर:**

मूळ भाषेतील संवाद अनेकदा त्या समाजाच्या वक्तृत्वशैली, बोलीभाषा, आणि सामाजिक संदर्भांशी निगडित असतात. ते तंतोतंत दुसऱ्या भाषेत उतरवले, तर ते कृत्रिम वाटतात.

**(आ) अभिनय आणि रंगमंचीय मांडणी:**

नाटकाचे भाषांतर करताना मंचावरच्या अभिनयशैली, देहबोली, आणि प्रेक्षकांचा सांस्कृतिक संदर्भ लक्षात घ्यावा लागतो. इंग्रजी नाटकातील औपचारिक संभाषण मराठी रंगमंचावर विनोदी वाटू शकते; म्हणून संवादांचे स्थानिकीकरण आवश्यक ठरते.

**साहित्यिक भाषांतराचे महत्त्व :**

साहित्यिक भाषांतर हे केवळ भाषिक काम नसून ते संस्कृती, विचार आणि अनुभवांच्या देवाणघेवाणीचे साधन आहे. यामुळे एका समाजातील अनुभव दुसऱ्या समाजापर्यंत पोहोचतात आणि मानवतेचा सामूहिक सांस्कृतिक वारसा निर्माण होतो. "एखादी साहित्यकृती ही भाषांतरामुळे अनेकजणांपर्यंत पोहोचणार असते आणि कायमची उपलब्ध

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

राहणार असते. याशिवाय, भाषांतरामुळे पुनर्निर्मितीचा आनंद मिळतो तो वेगळाच! माहितीपर किंवा विज्ञानक्षेत्रातील भाषांतरे करणे व साहित्यकृतीची भाषांतरे करणे, यात फार मोठा फरक आहे. माहितीपर भाषांतरामध्ये वस्तुनिष्ठ आणि सुबोध असे भाषांतर करण्याला महत्त्व आहे. मात्र साहित्यकृतीचे भाषांतर करताना भाषांतरकाराला परक्या संस्कृतीचा, सामाजिक परिस्थितीचा, ऐतिहासिक काळाचा, परकीय भाषेचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक ठरते. ज्या भाषेत भाषांतर करायचे आहे, त्या भाषेची उपजत समज आणि अभ्यासपूर्ण ज्ञान असावे लागते."[६] साहित्यिक भाषांतराचे महत्त्वाचे पैलू पुढील प्रमाणे आहेत.

**१.संस्कृतींची देवाणघेवाण :** भाषांतरामुळे विविध समाज, धर्म, प्रांत आणि संस्कृती यांमधील समज वाढते. उदा. रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली'चे इंग्रजी भाषांतर केल्यावर त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला आणि भारतीय साहित्य जागतिक पातळीवर पोहोचले.

**२.विचारांची देवाणघेवाण :** टॉल्स्टॉय, दोस्तोएव्हस्की, गटे, शेक्सपियर, होमर यांचे साहित्य भाषांतरामुळे जगभर पोहोचले आणि त्यातून मानवी विचारविश्व समृद्ध झाले.

**३.सांस्कृतिक समृद्धी :** भाषांतरामुळे नवीन शब्द, शैली आणि साहित्यिक पद्धती आपल्या भाषेत येतात. उदा. इंग्रजी आणि फ्रेंच साहित्याच्या प्रभावामुळे मराठी कादंबरी आणि नाट्यप्रकार अधिक विकसित झाले.

**४.सामाजिक आणि बौद्धिक संवाद :** साहित्यिक भाषांतरामुळे जगभरातील लेखक आणि वाचक मानवी अनुभवांच्या सामायिक मंचावर येतात.

**५.राष्ट्रीय आणि प्रादेशिक साहित्याची ओळख:** भारतीय भाषांतील साहित्य जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी भाषांतर अत्यंत आवश्यक आहे. उदा. दलित साहित्य, स्त्री साहित्य आणि लोकसाहित्य हे भाषांतरामुळे जागतिक वाचकांपर्यंत पोहोचले आहे.

**भाषांतरकाराचे कार्य आणि जबाबदारी :**

साहित्यिक भाषांतरकार हा लेखकाचा सहनिर्माता असतो. त्याला दोन्ही भाषांचा गाढा अभ्यास, सांस्कृतिक संवेदनशीलता आणि साहित्यिक दृष्टिकोन आवश्यक असतो. "भाषांतराच्या मूल्यमापनाची प्रक्रिया ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. मजकूर कोणत्या प्रकारचा आहे व तो कशासाठी भाषांतरित केला जात आहे, यावर भाषांतराच्या मूल्यमापनाचे निकष अवलंबून राहतील. गद्य मजकुराच्या बाबतीत वा नेहमीच्या व्यावहारिक भाषिक उपयोजनाच्या बाबतीत भाषांतरामध्ये वाच्यार्थाला प्राधान्य असेल व त्याच्याशी इमान राखणे हे तत्त्व भाषांतरकाराला डोळ्यासमोर ठेवावे लागेल."[७] मूळ लेखकाच्या आशयाशी निष्ठावान राहणे, परंतु शब्दशः भाषांतर न करता भावार्थ आणि लय जपणे आणि लक्ष्य भाषेतील वाचकाच्या संवेदनांना अनुरूप स्वरूप देणे. ही त्याची जबाबदारी असते. म्हणजेच प्रत्येक भाषांतर हे दोन संस्कृतींमधील संवादाचे रूप असते.

साहित्याचे भाषांतर म्हणजे भाषेच्या सीमांना ओलांडून संस्कृती, विचार आणि भावनांना एकत्र आणणारा पूल. "एका भाषेत व्यक्त केलेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करण्याची प्रक्रिया म्हणजे भाषांतर"[८] होय. हे कार्य अत्यंत जबाबदारीचे आणि सर्जनशीलतेची कसोटी पाहणारे असते. भाषांतरकाराने

केवळ शब्द नव्हे तर मानवी अनुभवाचा आत्मा एका भाषेतून दुसऱ्या भाषेत नेला, तरच ते भाषांतर यशस्वी ठरते.

**संदर्भ टीपा:**


*१. सुगम मराठी व्याकरण व लेखन , मो रा वाळिंबे , नितीन, पुणे (पंच्चावनावी सु आ ), २०२० पृ . ३९६*

*२. मराठी वाङ्मय कोश खंड -४ समीक्षा संज्ञा, संपा. विजया राजाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती , मुंबई, २००२, पृ २४६*

*३. आधुनिक भाषा विज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, मिलिंद मालशे , लोकवाङ्मय गृह, मुंबई, (तृ आ )पृ. ११९*

*४. सुगम मराठी व्याकरण व लेखन, उ. नि . पृ ३९६*

*५. आधुनिक भाषा विज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, उ नि पृ. १२०*

*६. सुगम मराठी व्याकरण व लेखन, उ. नि . , पृ ३९६*

*७. आधुनिक भाषा विज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, उ. नि., पृ . पृ.१२५*

*८. भाषांतर, सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पृ. १*



*Cite This Article:*

**प्रो. डॉ. चव्हाण प्र.** *(2025). भाषांतरातील आव्हाने.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 5–11).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# भाषांतरातील आव्हाने

*** डॉ. सुमित बबन साळुंखे**

** संशोधक विद्यार्थी.*

**सारांश :**

*भाषांतराच्या संदर्भात विचार करता करताना भाषांतर ही संकल्पाना वेगवेगळ्या क्षेत्रात वापरली जाते. मराठी साहित्यात भाषांतराची परंपरा संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही भाषेतील साहित्याद्वारे निर्माण झाली. आधुनिकीकरणाच्या काळामध्ये भाषांतर हे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रानुसार भाषांतरात बदल होत असतो. त्याचबरोबर मूळ संहिता एका भाषेतून दुसऱ्या भाषेत घेऊन जाणे म्हणजे भाषांतर होय. त्या संहितेचा आशय, अभिव्यक्ती, भावनिकता, सामाजिकीकरणात होणारा अर्थ, तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिपेक्ष्य भाषांतरकारला तपासावे लागते. नुसते वरवरचे भाषांतर करून तो घटक दुसऱ्या भाषेत घेऊन जाणे म्हणजे भाषांतर नव्हे. त्यासाठी वरील घटकाचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. असे असले तरी ते काम आव्हानात्मक आहे.*

*साहित्य क्षेत्रात भाषांतर संकल्पना खूप व्यापक स्वरूपाची मानली जाते. साहित्याच्या भाषांतरामुळे वेगवेगळ्या भाषेतील संस्कृती, सामाजिक, राजकीय व भौगोलिक परिस्थिती आढावा घेता येतो. तसेच संस्कृती आणि विचारांची देवाणघेवाण होण्यासाठी भाषांतर महत्त्वाचे ठरते. भाषांतरामुळे साहित्याला एक राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय दर्जा मिळण्यास मदत होते. त्याची व्यापकता त्या भाषेपूर्ती मर्यादित न राहता इतर भाषेतून ती साहित्यकृती भाषांतराच्या स्वरूपात प्रकाशित होणे म्हणजेच त्या साहित्यकृतीचे राष्ट्रीयकरण होणे. मात्र भाषांतर करताना त्या साहित्यकृतीचे सत्त्व हरवता कामा नये, याचे भान भाषंतरकारला ठेवावे लागते.*

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**भाषांतर संकल्पना :**

भाषांतर संकल्पना समजून घेत असताना, भाषांतर म्हणजे नेमकं काय? भाषांतराचा अर्थ पहाताना भाषांतराला इंग्रजीतील 'ट्रान्स्लेशन' शब्दाचा पर्याय आहे. आणि इंग्रजी शब्दाचे मूळ लॅटिनमध्ये आहे. 'ट्रान्स' म्हणजे पलीकडे अथवा दुसरीकडे आणि 'लेटम्' म्हणजे घेऊन जाणे मूलतः या शब्दाचा अर्थ स्थलांतर असा आहे. आणि 'दुसरीकडे घेऊन जाणे' या वाच्यार्थाचा कालांतराने लाक्षणिक अर्थ रूढ झाला आणि 'एका भाषेत व्यक्त झालेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करण्याच्या प्रक्रिये'साठी त्याचे उपयोजन होऊ लागले. 'ट्रान्स्लेशन' संज्ञा वापरली जाते. या संदर्भात अनेक अभ्यासकांनी आपली मते मांडली आहेत. या संदर्भात सदा कऱ्हाडे म्हणतात, "भाषांतर म्हणजे एका भाषेत व्यक्त केलेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे."१ एका भाषेतील व्यक्त

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

केलेले विचार भाषेत व्यक्त करणे अशी त्यांनी केलेली व्याख्या समर्पक आहे. या संदर्भात टॉमस् बेस्ट् जर्विसच्या म्हणतो, "but then everyone has his particular style both of composition and translation, and it is natural that we should all prefer our own."[२] मूळ रचनेत लेखकाची स्वतःची शैली असते तशी भाषांतरात भाषांतरकाराचीही स्वतःची शैली असते. पुढे सदा कऱ्हाडे म्हणतात, "एका भाषेच्या अंतर्गत व्यवस्थेच्या जागी दुसऱ्या भाषेच्या अंतर्गत व्यवस्थेची प्रस्थापना करणे म्हणजे भाषांतर. संक्षिप्त रूपात सांगायचे तर, भाषांतर म्हणजे चिन्हांतर अथवा प्रतीकांतर"[३] अशी भाषेच्या अंतर्गत व्यास्थेच्या संदर्भात व्याख्या केली आहे. मराठी विश्वकोशात भाषांतरा संदर्भात अनघा भट- बेहरे म्हणतात, "ज्यामध्ये एका भाषेमध्ये निर्मिलेल्या संहितेचा ग्रहणकर्ता दुसऱ्या भाषेमध्ये त्याच आशयाच्या संहितेची पुनर्निर्मिती करतो व संप्रेषण पूर्ण करतो. थोडक्यात, म्हणजे एका भाषेच्या सहाय्याने निर्माण झालेल्या आशयाची पुनरावृत्ती दुसऱ्या भाषेत करणे याला भाषांतर म्हणता येईल. संप्रेषण ज्या भाषेमध्ये होते. त्यातील भाषिक द्रव्य, जसे शब्द, रूप, वाक्यरचना इत्यादी, यांच्या साहाय्याने संप्रेषणाचे प्रयोजन व अर्थ निश्चित करणे व ज्या भाषेत संप्रेषणाची पुनरावृत्ती करायची असेल तिच्यातील समकक्ष पर्यायांचे उपयोजन करून तोच आशय पुनरावृत्त करणे असे भाषांतराचे स्वरूप असते. मूळ संहिता बाजूला काढून भाषांतराचा विचार करता येत नाही. मूळ संहितेचा आशय थोडक्यात कथन करणे म्हणजे भाषांतर नव्हे. भाषांतरालाच मराठीमध्ये 'अनुवाद' ही पर्यायी संज्ञा वापरण्यात येते. भाषांतराचे स्वरूप लिखित किंवा मौखिक अशा दोनही प्रकारचे असू शकते."[४] पुढे कऱ्हाडे म्हणतात, "एका भाषेतील अभिव्यक्त अर्थ ज्या प्रतीक व्यवस्थेतून म्हणजे शब्दचिन्ह व्यवस्थेतून व्यक्त झाला, त्या प्रतीक व्यवस्थेऐवजी दुसऱ्या भाषेतील तोच अर्थ व्यक्त करणारी प्रतीक व्यवस्था योजणे म्हणजे भाषांतर करणे"[५] अशा प्रकारे भाषांतरासा अनुवाद ही पर्यायी संज्ञा वापरली जाते या संदर्भात संबंध में डुबॉयस (1972) के विचारों को देखा जा सकता है "अनुवाद किसी दूसरी भाषा (लक्ष्य भाषा) में की गई वह अभिव्यक्ति है जो पहले ही किसी भाषा (स्रोत भाषा) में की जा चुकी है और जिसमें मूल के अर्थ और शैली की समतुल्यता को सुरक्षित रखा जाता है।"[६] अशी व्याख्या डुबॉयस यांनी केले केली आहे.

असे असले तरी भाषांतराचे विवेध प्रकार आढळतात. आशय, शब्दशः भाषांतर, मुक्त भाषांतर, साहित्यिक भाषांतर, प्रमाणित भाषांतर, तांत्रिक भाषांतर, यांत्रिक भाषांतर असे त्याचे एकून प्रकार सांगता येतील. तसेच भाषांतर विविध क्षेत्रे सांगता येतील या मध्ये राजकीय पक्षाचे कार्याचा, कार्यालयीन व्यवहार, प्रसारमाध्यमे, सिनेमे, साहित्य, विज्ञान तंत्रज्ञान, कायदे, वाणिज्य व्यवहार, वैद्यक क्षेत्र, ध्वनिचित्रफीत भाषांतरण इ. क्षेत्रे सांगता येतील. भाषांतर करताना भाषांतरातील आव्हाने कोणती ते पाहुत.

**भाषांतरातील आव्हाने :**

भाषांतर खूप व्यापक आणि अभ्यासपूर्ण प्रक्रिया आहे. ज्यामध्ये दोन भाषांचा सखोल अभ्यास असणे महत्त्वाचे आहे. आपण एखादी साहित्यकृती ज्या भाषेमध्ये भाषांतर करणार आहे, त्या भाषेचे सखोल ज्ञान असणे महत्त्वाचे आहे. त्या भाषेबरोबरच त्या भाषेतील सांस्कृतिक, सामाजिक,

भौगोलिक संदर्भ, तसेच म्हणी उखाणे वाक्यप्रचार आणि व्याकरण यांचाही भाषांतरकाराचा अभ्यास असणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा त्या भाषांतराचा आशयाचा अर्थ, अभिव्यक्तीचा अर्थ बदलण्याची शक्यता असते. त्यामुळे भाषांतर करत असताना भाषांतरकराला वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये काही सांस्कृतिक आव्हाने व भाषिक आव्हाने असे दोन विभाग करता येतील. सांस्कृतिक आव्हानामध्ये भाषेची सांस्कृतिक विशिष्टता, वाक्यप्रचार व म्हणी यांचे सांस्कृतिक संदर्भ, विनोद व उपासनेचे सांस्कृतिक संदर्भ, सामाजिक व ऐतिहासिक संदर्भ, प्रादेशिक भौगोलिक, धार्मिक व नैतिक मूल्यांचे संदर्भ, जात, वर्ण लिंग या संदर्भातील संदर्भ , त्याचबरोबर भाषिक आव्हाने शब्दसंग्रहाची मर्यादा, वाक्प्रचार व म्हणी, अनेकार्थता, शैली, व्याकरण, बोलीभाषा इत्यादी आव्हाने सांगता येतील. या आव्हानांच्या संदर्भातील विस्तृत विवेचन. भाषांतर प्रक्रियेमध्ये सांस्कृतिक आव्हाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात, कारण भाषा आणि संस्कृती एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आहेत. केवळ शब्दांचे भाषांतर पुरेसे नसते, तर त्या शब्दांमागे असलेले सांस्कृतिक संदर्भ, भावना, आशय आणि सूक्ष्म अर्थ अचूकपणे पोहोचवणे हे खरे आव्हान असते.

१. **संस्कृती आणि संज्ञा :** भाषांतरकाने केवळ दोन्ही भाषांवर प्रभुत्व मिळवून चालणार नाही, तर दोन्ही संस्कृतींची सखोल माहिती असणे आवश्यक आहे. प्रेक्षकांच्या स्थानिक चालीरीती, परंपरा आणि समजुतींनुसार मजकूर अनुकूलित करणे महत्त्वाचे आहे. भाषांतरातील सर्वात मोठे आव्हान आहे. काही वस्तू, संकल्पना किंवा प्रथा केवळ एका विशिष्ट संस्कृतीत आढळतात. त्यांना भाषांतर करणाऱ्या भाषेत थेट प्रतिशब्द नसतो. उदा: भारतीय संस्कृतीतील ‘आरती’, ‘प्रसाद’ किंवा ‘रक्षाबंधन’ यांसारख्या शब्दांना इंग्रजी किंवा इतर युरोपीय भाषांमध्ये थेट भाषिक समकक्ष शब्द नाहीत. अशा वेळी, अनुवादकाला वर्णनात्मक भाषांतर किंवा स्थानिक संज्ञा तशीच ठेवून तळटीपेत स्पष्टीकरण द्यावे लागते.

२. **वाक्प्रचार व म्हणी :** वाक्प्रचार हे भाषेचे सौंदर्य असतात, परंतु ते अनेकदा संस्कृतीवर आधारित असतात. त्यांचा शब्दशः अर्थ घेतल्यास मूळ अर्थ पूर्णपणे बदलून जातो. सामाजिक भाषेत त्यांचा अर्थ वेगळा होतो, याकडे भाषांतरकाराला लक्ष द्यावे लागते. उदा: मराठीतील वाक्प्रचार ‘हातभार लावणे’, ‘रस असणे’ आणि “करावे तसे भरावे” किंवा “ अंगात नाही बळ आणि चिमटा घेऊन पळ” या म्हणींचा उद्देश आणि प्रभाव टिकवण्यासाठी लक्ष्यित भाषेत त्याच अर्थाचा एखादा स्थानिक वाक्प्रचार शोधावा लागतो. त्यामुळे भाषंतरकारापुढे हे आव्हान आहे.

३. **सामाजिक,धार्मिक मूल्ये :** प्रत्येक समाजाची स्वतःची मूल्ये आणि श्रद्धा असतात. भाषांतर करताना या मुद्द्यांवर संवेदनशील असणे गरजेचे आहे. धार्मिक आणि पौराणिक संदर्भांनी भरलेल्या संज्ञांचे भाषांतर करताना त्यांची मूळ अर्थपूर्ण खोली जपण्याचे आव्हान असते. काहीवेळा, एका संस्कृतीतील सामान्य शब्द दुसऱ्या संस्कृतीत अपमानास्पद किंवा निषिद्ध मानला

जाऊ शकतो. त्यामुळे त्याला सामजिक आणि धार्मिक मुद्यावर भाषांतर करणे हे आव्हान आहे.

४. **औपचारिकता- आदर :** जपानी किंवा कोरियन संभाषणात औपचारिकता आणि आदर दर्शवण्यासाठी वेगवेगळे शब्द किंवा व्याकरणिक रचना असतात, ज्या इतर भाषांमध्ये उदा. इंग्रजी तशाच पद्धतीने व्यक्त करणे कठीण असते. दैवी नावे आणि धार्मिक संज्ञा: धार्मिक आणि पौराणिक संदर्भांनी भरलेल्या संज्ञांचे भाषांतर करताना त्यांची मूळ अर्थपूर्ण खोली आणि प्रतीकात्मकता जपण्याचे आव्हान असते काही भाषांमध्ये उदा. हिंदी, मराठी - 'तू', 'तुम्ही', 'आपण' आदर व्यक्त करण्यासाठी वेगवेगळे सर्वनाम किंवा क्रियापदाची रूपे वापरली जातात. इंग्रजीसारख्या भाषांमध्ये 'You' हा एकच शब्द असल्याने, भाषांतरात योग्य औपचारिकता आणि आदरभाव टिकवणे आव्हानात्मक असते.

५. **विनोद-भावना :** विनोदाचे स्वरूप अनेकदा सांस्कृतिक असते. एका संस्कृतीतील विनोद दुसऱ्या संस्कृतीतील लोकांना समजेलच असे नाही, कारण तो विशिष्ट सामाजिक किंवा राजकीय संदर्भांवर आधारित असू शकतो. तसेच, भावना व्यक्त करण्याच्या पद्धतीही संस्कृतीनुसार बदलतात. हे आव्हानात्मक आहे.

६. **भाषिक सापेक्षतावाद :** हा सिद्धांत सांगतो की, आपण ज्या भाषेत विचार करतो, ती भाषा आपल्या जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर परिणाम करते. इंग्रजीमध्ये 'Time' वेळ हा मोजता येण्याजोगा किंवा खर्च करता येण्याजोगा Spend time, Waste time मानला जातो, तर इतर काही संस्कृतींमध्ये वेळ ही एक चक्रीय संकल्पना Cyclical Concept असू शकते. भाषांतर करताना वेळेबद्दलचा हा मूलभूत दृष्टिकोन बदलल्यास अर्थाचा अनर्थ होऊ शकतो.

७. **सांकेतिक संवाद :** संवाद केवळ शब्दांनीच होत नाही. शरीराची हालचालीची भाषा, हावभाव, नजरेचा संपर्क आणि अगदी शांतता बाळगणे हे प्रत्येक संस्कृतीत वेगळे अर्थ दर्शवते. काही संस्कृतींमध्ये थेट नजरेला नजर देऊन बोलणे हे प्रामाणिकपणाचे लक्षण मानले जाते, तर आशियाई संस्कृतीतील काही भागांमध्ये तो अनादर समजला जाऊ शकतो. चित्रपट किंवा नाट्यमय साहित्याचे भाषांतर करताना हे सांकेतिक संदर्भ जपणे महत्त्वाचे ठरते.

८. **राजकीय, ऐतिहासिक संदर्भ:** काही शब्द किंवा वाक्ये विशिष्ट ऐतिहासिक किंवा राजकीय घटनांशी जोडलेली असतात. त्यांचा योग्य संदर्भ लावणे महत्त्वाचे असते.उदा: एखादा शब्द एका देशासाठी अभिमानास्पद असू शकतो, तर दुसऱ्या देशासाठी वेदनादायक किंवा अपमानास्पद असू शकतो उदा. वसाहतवादाशी संबंधित शब्द भाषांतर करताना या संवेदनशीलतेचा विचार करणे गरजेचे असते, अन्यथा राजकीय वाद निर्माण होऊ शकतात.

९. **भाषिक आणि गैर-भाषिक चिन्हे :** भाषेमध्ये केवळ शब्दच नव्हे, इतर गैर-भाषिक चिन्हे उदा. रंगांचे महत्त्व यांचाही समावेश होतो. उदा: पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये 'पांढरा' रंग शांततेचे प्रतीक मानला जातो, तर भारतीय संस्कृतीमध्ये तो अनेकदा दुःखाचे किंवा वैराग्याचे

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

प्रतीक मानला जातो. भाषांतर करताना मजकुराच्या मूळ उद्देशानुसार या चिन्हांचा योग्य अर्थ लावणे आवश्यक असते.

१०. **खाद्यपदार्थ, भौगोलिक संदर्भ** : हे घटक विशिष्ट प्रदेशाशी आणि काळाशी जोडलेले असतात.उदा: 'मिसळ' किंवा 'पुरणपोळी' सारख्या खाद्यपदार्थांचे भाषांतर करताना, केवळ शब्दाचा अनुवाद पुरेसा नसतो, तर त्या पदार्थाचे स्वरूप आणि महत्त्व स्पष्ट करावे लागते. ऐतिहासिक घटना किंवा भौगोलिक ठिकाणांचे संदर्भ वाचकाला समजण्यासाठी तळटीपा किंवा स्पष्टीकरणात्मक भाषांतर वापरावे लागते.

११. **बोलीभाषा आणि प्रादेशिक विविधता :** एकाच भाषेच्या वेगवेगळ्या बोलीभाषांमध्ये सांस्कृतिक बारकावे असतात. उदा: मराठी भाषेतील वऱ्हाडी, अहिराणी किंवा कोकणी बोलींचे भाषांतर करताना, मूळ भाषेतील प्रादेशिक रंगत आणि विशिष्ट संदर्भ टिकवणे हे एक मोठे आव्हान असते.

१२. **व्याकरणिक आणि वाक्यरचनेतील फरक** : प्रत्येक भाषेचे स्वतःचे नियम आणि वाक्यरचना असते. एका भाषेतील रचना दुसऱ्या भाषेत थेट वापरता येत नाही. शब्दक्रम इंग्रजीसारख्या भाषांमध्ये सामान्यतः 'कर्ता-क्रियापद-कर्म' Subject-Verb-Object – SVO हा क्रम असतो. मराठीमध्ये 'कर्ता-कर्म-क्रियापद' Subject-Object-Verb - SOV हा क्रम असतो. उदा. "मी आंबा खातो" (I mango eat) याचे इंग्रजी भाषांतर "I eat mango" असे होते. हा क्रम बदलणे आवश्यक असते.

१३. **लिंग- वचन :** अनेक भाषांमध्ये व्याकरणात लिंगभेद पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग महत्त्वाचे असतात, जे इतर भाषांमध्ये इंग्रजी तसे नसतात. मराठीत वस्तूंचे लिंग बदलते, जे भाषांतर करताना अचूकपणे वापरणे आव्हानात्मक असते. काळाचे स्वरूप काही भाषांमध्ये काळाचे आणि कार्याचे स्वरूप दर्शवण्यासाठी अत्यंत गुंतागुंतीच्या क्रियापद रचना असतात, ज्या इतर भाषांमध्ये एकाच शब्दात व्यक्त केल्या जाऊ शकतात.

१४. **शब्दसंग्रह आणि अर्थविषयक समस्या** : शब्दांचे अर्थ संदर्भानुसार आणि वापरानुसार बदलतात, ज्यामुळे भाषांतरात गुंतागुंत निर्माण होते. बहुअर्थी शब्द एकाच शब्दाचे अनेक अर्थ असू शकतात. संदर्भानुसार योग्य अर्थ निवडणे अनुवादकासाठी आव्हानात्मक असते. इंग्रजीतील "bank" नदीकाठ किंवा बँक या शब्दाचा अर्थ वाक्यातील संदर्भानुसार ठरवावा लागतो. समानार्थी शब्दांचा अभाव काही शब्दांसाठी लक्ष्यित भाषेत थेट प्रतिशब्द नसतात. उदा. काही विशिष्ट तांत्रिक संज्ञा किंवा भावनिक छटा दर्शवणारे शब्द. अशा वेळी, अनुवादकाला वर्णनात्मक भाषांतर करावे लागते किंवा मूळ शब्द तसाच ठेवून स्पष्टीकरण द्यावे लागते.मिश्र शब्द दोन किंवा अधिक शब्दांपासून बनलेल्या मिश्र शब्दांचे भाषांतर करताना योग्य अर्थ लावणे कठीण असते.

१५. **शैली- टोन** : मजकुराची शैली औपचारिक, अनौपचारिक, तांत्रिक, साहित्यिक आणि टोन विनोदी, गंभीर, उपहासात्मक भाषांतरात टिकवून ठेवणे महत्त्वाचे असते. नोंदणी तांत्रिक किंवा कायदेशीर कागदपत्रांची

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

भाषा अत्यंत औपचारिक आणि अचूक असणे आवश्यक असते, तर साहित्याचे भाषांतर अधिक सर्जनशील असू शकते. शैलीतील हा फरक ओळखणे आणि त्यानुसार भाषांतर करणे आवश्यक असते. हे आव्हान आजकालच्या भाषांतरकारला पेलून भाषांतर करावे लागते.

भाषांतर करत असताना भाषांतरकाराला भाषा, साहित्य, संस्कृती, व्याकरण, शब्दांचा अर्थ, शब्दसंग्रह, म्हणी. वाक्प्रचार, त्याच्या प्रदेशानुसार वापरणारे भाषिक शब्द, बोलीभाषेतील शब्द यांचा सखोल अभ्यास असावा लागतो. या सर्व घटकाचा वापर भाषांतर करताना भाषांतरकाराला अचूकपणे करावा लागतो. ऐतिहासिक, सामाजिक घटनांचे भाषांतर करत असताना काळजीपूर्वक करावा लागतो. त्या काळातील घटनांचा उल्लेख त्या आशयानुसार भाषांतरकाराला करावा लागतो. भाषांतर ही प्रक्रिया वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कशापद्धतीने उपयोगात येते, त्यातले बारकावे अचूकता आपण पाहिली आहे. तसेच डिजिटल युगामध्ये भाषांतराची वेगवेगळी साधने उपलब्ध आहेत. असे असले तरीही भाषांतर करताना भाषांतरकारासमोर वरील आव्हाने आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

*१) कऱ्हाडे सदा , 'भाषांतर', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, प्र.आ वर्ष २००७, पृ. ४*

*२) कुलकर्णी. कृ. भि., 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती', स्व प्रकाशन, पृ. २५*

*३) उनि, 'भाषांतर' पृ. ७*

*४) https://marathivishwakosh.org/26845/*

*५ ) उनि, 'भाषांतर' पृ . ९*

*६) सिंह दिलीप, 'अनुवाद की व्यापक संकल्पाना', वाणी प्रकाशन, दिल्ली, प्र.आ. वर्ष २०१३, पृ.२*

*Cite This Article:*

***डॉ. साळुंखे सु. ब.* (2025).** *भाषांतरातील आव्हाने.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 12–17).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# भाषांतर आणि जाहिरातलेखन

* डॉ. अतुल नारायण चौरे

* सहाय्यक प्राध्यापक , एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे-२८

**प्रास्ताविकः**

१९९० नंतरच्या जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या युगात जग जवळ येत चालले आहे. अनेक लोक नोकरी, व्यावसायानिमित्ताने एकमेकांच्या देशात जात असल्याने त्यांना त्या देशाची भाषा शिकणे जरुरी झाले आहे. यामुळे भाषा-भाषांमधील देवाण-घेवाण वाढली आहे. परकीय भाषेमधील वाड्.मयाची देवाण-घेवाण होत आहे. उदा. कथा, कादंबरी, कविता, निबंध इ. साहित्य आपल्या भाषेत आणण्याची गरज वाटू लागली आहे. यामधून भाषांतरीत साहित्य निर्माण झाले आहे. जर्मन, फ्रेंच, रशियन, इंग्रजी, हिंदी इत्यादी भाषांना महत्व प्राप्त झाले आहे. प्रत्येक भाषेची संस्कृती वेगळया स्वरुपाची असल्याने त्याचा परिचय भाषांतरामुळे होतो. ब्रिटिश कालखंडात म्हणजे इ.स.१८१८ ते १८७४ या कालावधीत भाषांतरीत साहित्याची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झाली. मराठीमधील सुरुवातीचे शालेय वाइ. मय हे इंग्रजीमधून भाषांतरीत झाले आहे. भाषांतर करणे म्हणजे एका भाषेतील मजकुराचा आशय दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे. सध्याच्या काळात भाषांतराला महत्व आले आहे. विविध भाषा बोलणाऱ्या व्यक्तींना एकत्र आणणे. त्यांच्यात संवाद घडविणारे भाषांतर हे एक उत्तम माध्यम झाले आह. वृत्तपत्रांना चांगल्या भाषांतरकारांची मोठी गरज असते. त्यासाठी भाषांतरकाराचे दोन भाषांवर प्रभुत्व असायला हवे. भाषांतरासंदर्भात डॉ. रमेश बरखेडे यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. “प्रादेशिक भाषांतून शिक्षणाची क्षेत्रे विस्तारली तसतशी प्रांतीय भाषांतून भाषांतरे होऊ लागली. भाषांतराची साधनेही विकसित झाली. उच्च शिक्षणाच्या कोणत्याही संस्थेत भाषांतरविद्येची पारंगतता असलेल्या व्यक्तिंची गरज भासते. व्यापार-उद्यांगात, वृत्तपत्रे जाहिरातींच्या क्षेत्रांत प्रशासनात आणि पर्यटन उद्योगात भाषांतरकर्त्यांची निकड असते. त्यामुळे भाषांतरव्यवहाराची व्याप्ती दैनंदिन व्यवहारापासून अमूर्त अशा ज्ञानात्मक साहित्यापर्यंत विस्तारली आहे.’’[१]

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**भाषांतराचे स्वरूप :**

आज इतर भाषेतील साहित्य मराठी भाषेत मोठ्या प्रमाणावर येत असल्यामुळे आजच्या कालखंडाला 'भाषांतर युग' असे म्हणतात. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भाषा, साहित्य, संस्कृती, विज्ञान तंत्रज्ञान, शास्त्रीय संशोधन, प्रशासन, न्यायव्यवहार इतर ज्ञानात्मक लेखन मराठी, हिंदी, इंग्रजी, कानडी, बंगाली इतर भारतीय भाषांमधून भाषांतरीत होत आहे. ही प्रक्रिया केवळ देशांतर्गतच नव्हे तर परदेशातील

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

अनेक ग्रंथांचे भाषांतर करणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. साहित्य, विज्ञान, कला, समाजकारण, राजकारण अशा विविध क्षेत्रांचा केंद्रबिंदू हा माणूस आहे. त्यामुळे या वैविध्यपूर्ण क्षेत्रातील विचार, त्यांवे ज्ञान, देश, काल व भाषा यांच्या सीमा ओलांडून त्यांच्यापर्यंत पोहचविण्याचे महत्वाचे कार्य भाषांतरामुळेच घडत आहे. भाषांतरामुळे मूळ भाषा व भाषांतरित भाषा संस्कृती समृध्द व सक्षम होण्यास मदत होत आहे. या संदर्भात डॉ. रमेश बरखेडे म्हणतात "भाषांतराला मानवी स्वातायाचे मूल्य आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये. आपला देश, आपली भाषा, आपली संस्कृती यांच्या बंधनात अडकून राहण्यापेक्षा अन्य देश-भाषा-संस्कृतीशी आपले नात जोडून, बंधमुक्त होण्याच्या प्रवासात भाषांतरीत साहित्याची एक सुसंस्कारित सोचत होत असते. प्रादेशिक साहित्याकडून राष्ट्रीय साहित्याकडे आणि राष्ट्रीय साहित्याकडून विश्वात्म साहित्याकडे जाण्यासाठी भाषांतरित साहित्यासारखे दुसरे कोणतेही विश्वासार्ह माध्यम नाही."2 भाषांतर ही संकल्पना पाश्चात्य देशात लॅटिन भाषांतर ही संकल्पना संस्कृतमधून आली परंतु भाषांतर हे एक 'शास्त्र' म्हणून या संकल्पनेचा विचार ब्रिटिश कालखंडात सुरु झालेला दिसतो. या अगोदर बाराव्या-तेराव्या शतकात महानुभावीय कवींनी पौराणिक कथांची मुक्तपणे (स्वैर) भाषांतरे व रुपांतरे केली होती. मराठी वाइ. मयामधील पंचतंत्र, हितोपदेश, वैद्यक आणि ज्योतिष ही गद्यस्वरुपाची पुस्तके भाषांतराच्या माध्यमातूनच आली आहेत. भाषांतराची संकल्पना पाहण्याअगोदर भाषांतरासंदर्भात काही अभ्यासकांनी आपली मते व्याख्या सांगितल्या आहेत त्या पाहूया.

**भाषांतराच्या व्याख्या :**

१. विष्णूशास्त्री चिपळूणकर : 'भाषांतरीत वस्तूचे मुळचे सर्व गुण भाषांतरात असायला हवेत.'

२. श्री.म. माटे : 'मूल वस्तूतील सर्वच्या सर्व अभिप्राय प्रसादयुक्त वाणीने अन्य भाषेत सांगणे हे भाषांतरकारचे मुख्य लक्षण होय.'

३. भालचंद्र नेमाडे : 'एका संहितेचे एका भाषिक-सांस्कृतिक आवरणातून दुसऱ्या भाषिक सांस्कृतिक आचरणात स्थानांतरण करणारी दैभाषिक प्रक्रिया आहे.'

४. कल्याण काळे : 'भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत प्रतिनिर्माण करणे.'

५. विश्वनाथ खैरे: 'एका भाषेतील पाठाच्या दुसऱ्या भाषेत केलेला अर्थ म्हणजे भाषांतर होय.'

६. अनिकेत जावरे : 'भाषांतर म्हणजे इतर भाषेतून केलेली कृती याचा आशय आणि अभिव्यक्तजन्य अनुभव यांसह दुसऱ्या भाषेत उतरविण्याची प्रक्रिया भाषांतर.'

७. मिलिंद मालशे : 'लिखित मजकूर एका भाषेतून दुसऱ्या भाषेत आणणे याला भाषांतर अशी संज्ञा दिली जाते.'

८. सिसेरो : 'भाषांतर करत असताना भाषांतरकत्यनि मूळ भाषेचे अनुकरण करावे.'

९. पूर्व्हे : 'शब्दांशी फारसे बांधील न राहता एका भाषेतून अर्थ दुसऱ्या भाषेत आणणे.'

१०. सी रेबीन : 'भाषांतर ही ऐ अशी प्रक्रिया आहे की एखाद्या लिखित किंवा मौखिक वचनाला एका भाषेतून दुसऱ्या भाषेत नेत असताना मूळ भाषेतील अर्थ जसाच्या तसा उतरवणे होय.'

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

११. एच. एच. स्मिथ : "भाषांतर म्हणजे एका भाषेतील अर्थ दुसऱ्या भाषेत नेत असताना मूळ अर्थ कायम ठेवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करणे होय."[३]

**भाषांतर संकल्पना :**

भाषांतर म्हणजे एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत प्रतिनिर्माण करणे होय. चांगल्या भाषांतरामध्ये फक्त आशयाची प्रतिनिर्मिती नसते, तर सौंदर्यानुभवाची प्रतिनिर्मिती असते. त्यात ध्वनीयोजना, शब्दयोजना, वाक्यरचना, वाक्प्रचार, म्हणी, सांस्कृतीक छंदप्रकार इ. गोष्टींचा समावेश होतो. जागतिकीकरणात जग खूप जवळ येत वालले आहे. त्यामुळे एकमेकांशी संपर्क करण्यासाठी अनेक भाषा शिकणे गरजेचे झाले आहे. भाषेमुळे मानवाला कुटुंब, टोळया, गाव, जमात, समाज, राज्य इत्यादी संस्था स्थापन करता आल्या आहेत. संदेशनवहनामुळे माणसाला आपापसात आर्थिक, सामाजिक, धार्मिक व्यवहार करता येतात. त्यामुळे समाजातील धर्म, जात, परंपरा, संस्कृती ही मूल्ये मानवाला जोपासता येतात. तसेच भाषांतरामुळे दोन संस्कृतींचा परस्परांशी संबंध आल्यामुळे त्यांचे परस्परांशी आदान-प्रदान होते. यामुळे समाजविकासाला सुरुवात होते. यासंदर्भात मीना वांगीकर म्हणतात, "आधुनिक मराठी साहित्यात अनुवादाची परंपरा जुनी आहे. प्रथम संस्कृत, इंग्रजी व बंगाली भाषेतून साहित्य मराठीत आले."[४] यावरून आपल्या असे लक्षात येईल की, ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांची इंग्रजी भाषा आपण आत्मसात केली. एकप्रकारे आपण त्यांची संस्कृती आत्मसात केली. इंग्रजी साहित्य, इंग्रजांचे ज्ञानसुध्दा आपण भाषांतरीत करुन घेतले आहे. त्यामुळे इंग्रजी साहित्याचे मराठीत भाषांतर करण्याची लाट आली. यालाच भाषांतर युग म्हणतात. पाश्चात्य देशातील शेक्सपियरचे साहित्य मराठी भाषेत मोठ्या प्रमाणावर भाषांतरीत झाले. ते साहित्य अनेकांना आवडले. त्यामुळे नंतरच्या काळात इसपनीती, अरबी भाषेतील सूरस गोष्टीची मराठीत भाषांतरे झाली. जयाप्रमाणे युरोपीयन संस्कृती अंतर्गत इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालीयन अशी भाषा साहित्य आहेत त्याचप्रमाणे भारतीय संस्कृती अंतर्गत भारतीय भाषा साहित्य आहेत. युरोपीय साहित्याची परंपरा आहे. तशीच भारतीय साहित्याचीही भाषांतराची परंपरा आहे. मात्र पाश्चात्य देशात भाषांतराच्या स्वरुपाची भाषांतर विषयक प्रश्नांच्या गुंतागुंतीची दखल जाणिवपूर्वक घेतली जात होती. रोमन कालखंडापासून म्हणजे ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकापासून पाश्चात्य देशांत भाषांतर मीमांसेवा विचार सुरु झाला. तेव्हापासून आजपर्यंत भाषांतर मीमांसेचा अभ्यास झालेला दिसून येतो.

'एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत आणण्याची प्रक्रिया म्हणजे भाषांतर होय.' अशा प्रकारे अभ्यासकांनी भाषांतराची व्याख्या केलेली आहे. ज्या भाषेतील मूळ मजकूर असतो तिला मूळ भाषा आणि ज्या भाषेत त्या मजकुरावे भाषांतर केले जाते तिला 'लक्ष्यभाषा' म्हणतात. भाषांतर ही एक अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. ती एक व्यक्तिनिष्ठ कला आहे. भाषंतराच्या प्रवासात मूळ भाषेतील आशय, त्याचे विश्लेषण आणि त्या अनुभवावरून शेवटी स्वभाषेत केलेली त्याची पुनर्निमीती असा प्रवास असतो. भाषांतराची व्याप्ती व्यापक स्वरुपाची असते. त्यामध्ये भाषानुवाद, मुक्त अनुवाद, रुपांतर ही भाषांतराची वेगवेगळी रूपे आहेत. मूळ भाषेतील भाषांतर करताना विविध अंगांचा अभ्यास करावा लागतो. मूळ भाषेतील आशय, त्याचे रूप, स्वभाव व कृती इत्यादी

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

सर्व गोष्टींचा विचार करून भाषांतर केले जाते. भाषांतर लेखन करणे ही एक प्रकारे पुनर्निमितीच असते. मूळ लेखनाचा गाभा, आशय तोच ठेवून त्याची पुनर्निमिती करणे म्हणजे भाषांतर होय.

**जाहिरातीचे स्वरूप आणि संकल्पना :**

जगतिकीकरणाच्या युगाला जाहिरातींचे युग असेही म्हणतात. आज मुद्रित माध्यमांना जाहिरातींमुळे आर्थिक बळ मिळाले आहे. त्यामुळे 'जाहिरात' हा मुदित माध्यमांना व्यापणारा घटक आहे. जाहिरात मोजक्या शब्दात ग्राहकांना, वाचकांना आकर्षित करत असते. जागतिकीकरणात इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरातींची भाषा वेगळ्या स्वरुपाची आहे. आज जाहिरात ही फार महत्वाची कला मानली जाते. कारण आजच्या व्यापारीकरणाच्या युगात प्रत्येक व्यावसायिक आपले अस्तित्व टिकवण्यासाठी, वाढवण्यासाठी जाहिरातींचा अपयोग करीत आहेत. जाहिरात म्हणजे लोकांना प्रभावीपणे माहिती देऊन आपली वस्तू विकण्याचे अथवा घेण्याचे प्रभावी माध्यम होय. वर्तमानपत्रातील जाहिरातीला यामुळे विशेष महत्व प्राप्त होते. ठळक जागा, वेगळी, आकर्षक शब्दरचना, वाक्यरचना यामुळे जाहिरात वाचकांच्या पसंतीला उतरते. अलिकडच्या काळात वर्तमानपत्रे रंगीबेरंगी झाली आहेत. त्यामुळे जाहिरातींच्या रंगरुपात आकर्षकता वाढली आहे. दूरचित्रवाणीवरील विविध वाहिन्यांनी जाहिरातींचे क्षेत्र कमालीचे आकर्षक झालेले आहे. जाहिरात वर्तमानपत्रामधून दूरचित्रवाणीवरून एकाचवेळी लाखो वावकांपर्यंत आणि प्रेक्षकांपर्यंत पोहचत असते. अलिकडच्या काळात अनेक जाहिरातीमध्ये इंग्रजी, हिंदी भाषांचा वापर केला जातो. त्यामुळे अनेक जाहिराती वाचनीय आणि आकर्षक झाल्या आहेत.

उदा.

शीतपेयाच्या एका जाहिरातीमध्ये एक अभिनेता आपल्या हातात शीतपेयांची बाटली घेऊन प्रेक्षकांकडे वळून पाहतो व म्हणतो, 'स्पमीव जवं पेप' (जीवन असावे तर असे!) अशाप्रकारे इंग्रजी भाषेचा वापर करून जाहिरात सांगण्याची ही प्रक्रिया भाषांतराप्रमाणेच आहे. या जाहिराती स्थळ-काळ-वेळेचे भान ठेवून सांगितल्या जातात. त्यामुळे त्या वाचकांच्या पसंतीला उतरतात. १८ व्या शतकात वृत्तपत्रांबरोबर जाहिराती सुरु झाल्या होत्या. त्यानंतर जाहिरातींनी मजल-दरमजल करत आज जीवनाव्या सर्व क्षेत्रात आपला प्रभाव स्पष्ट केला आहे. 'आपली वस्तू अथवा पदार्थ विकण्यासाठी, लोकांपर्यंत माहिती अथवा विचार, संदेश पोहचविण्यासाठी स्वखचनि वापरल्या जाणाऱ्या माध्यमास जाहिरात असे म्हणतात. जाहिरात म्हणजे वस्तूच्या दर्जाची, गुणवत्तेची आणि उपयुक्ततेची माहिती देणारी एक सुविधा आहे.

**जाहिरातीची माध्यमे :**

जहिरात ही वेगवेगळ्या माध्यमांदारे ग्राहकांपर्यंत पोहचवली जाते. आजच्या 'खाऊ जा' युगात जाहिरातीची माध्यमे वेगवेगळ्या स्वरूपावी आणि नाविन्यपूर्ण आहेत. या माध्यमांतील प्रमुख माध्यम वृत्तपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, व दूरदर्शन ही प्रभावी अशा स्वरुपाची माध्यमे आहेत. यासोबतच डॉ. कल्याण काळे यांनी इतर माध्यमे पुढीलप्रमाणे सांगितलेली आहेत. “भिंती, बसस्टॉप इ. ठिकाणी लावली जाणारी विविध आकारांची पोस्टर्स किंवा फलक, चित्रपटगृहात दावल्या जाणाऱ्या स्लाइड्स, छापील पत्रके, फोल्डर्स, पुस्तिका, स्टिकर्स इ. माध्यमांतूनही जाहिरती

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

प्रसारित केल्या जात असतात.''[५] यावरून आपणास असे लक्षात येईल की, जाहिरात करण्यासाठी आता नवनवीन माध्यमे बाजारात निर्माण झाली आहेत. ही सर्व माध्यमे एकमेकांपासून वेग-वेगळी असल्याने प्रत्येक माध्यमानुसार जाहिरात-मसुदा लेखनाचे स्वरूप बदलत असते. जाहिरातीची मुलभूत द्रव्ये लिखित मजकूर, चित्रे (स्थिरे किंवा हलती) आणि कानावर पडणारे ध्वनी असतात. या द्रव्यांचा उपयोग जाहिरातीमध्ये सुट्या सुट्या स्वरुपात किंवा संमिश्र स्वरुपातही केला जातो. उदा. वर्तमानपत्रामधील जाहिराती केवळ लिखित मजकुराच्या किंवा सचित्र लिखित मजकुराच्या असतात. आकाशवाणी वरून प्रसारित होणाऱ्या जाहिराती श्राव्य स्वरुपाच्या असतात. दूरचित्रवाणीवरील जाहिराती या संमिश्र स्वरुपाच्या असतात. जाहिरातील वापरला जाणारा लिखित किंवा श्राव्य मजकूर म्हणजे जाहिरातीचा मसुदा होय. बदलत्या काळानुसार मानवाच्या गरजा, ज्ञान-विज्ञान विषयक लोकजागृती, लोकप्रनोधन करणाऱ्या जाहिरात संस्था, जाहिरातींची नवनवी रूपे निर्माण करतात. जाहिरातींच्या माध्यमातून आरोग्यविषयक माहिती दिली जाते.

उदा. पोलिओच्या जाहिरीमध्ये अमिताभ बच्चनच्या माध्यमातून 'दो बूँद जिंदगी के लिए' तर कधी भविष्याच्या गुंतवणुकीबाबत स्प कंपनीची जाहिरात दाखवली जाते. तर कधी प्रवास कंपन्या ऐतिहासिक, सांस्कृतिक संदर्भ देत पर्यटनस्थळांची आणि प्रदेशांची मनाला भारावून टाकणारी माहिती जाहिरातींडारे ग्राहकाला दिली जाते. जाहिराती वाचकांना बहुश्रुत करून त्यांच्या जीवनशैलीत नवे परिणाम देतात. जाहिरातीमधील भाषाशैली साधी सोपी सहज समजणारी असते. ती ग्राहकाला विश्वासात घेऊन, सुख-सुविधाचे आश्वासन देणारी आणि मित्राप्रमाणे मार्गदर्शन करणारी असते.

**जाहिरात लेखनाचे गुण :**

जाहिरात लेखन करताना व्यावसायिकाला आपला ग्राहक समोर ठेवावा लागतो. ग्राहकाला आवडेल-भावेल, तो आकर्षित होईल याकडे विशेष लक्ष द्यावे लागते. जाहिरातदाराने साध्या-सोप्या भाषेत लिहावी जाहिरातीमध्ये प्रामाणिकपणा असावा. जाहिरातीमध्ये खोटी आश्वासने, नढाईखोरपणा, अतिरंजीत दावे असू नयेत. जाहिरात औचित्यविवेक बाळगणारी असावी. जाहिरातीमध्ये इतर उत्पादकांची नींदा-नालस्ती केलेली नसावी. जाहिरातीमधील मजकूर ग्राहकाची दिशाभूल करणारा नसावा. जाहिरातदाराने आपल्या मालाचा केवळ गौरव करून पोकळ आश्वासने देऊ नयेत. जाहिरातदाराने ग्राहकाचा आत्मसन्मान वाढणारे लेखन करावे. ग्राहकाच्या मनात वस्तूविषयी जी भावना असते तिवा जाहिरातीसाठी उपयोग करून घेता आला पाहिजे. ग्राहकाच्या मनातील भावना, विशेषणे व्यक्त करणारे एखादे चित्र आणि त्याच्या जोडीला अर्थपूर्ण आणि उल्हासदायक अशी संहिता लिहिलेली असावी.

**भाषांतरित जाहिरात :**

भारतासारख्या बहुभाषिक देशात जाहिरात करायची असल्यास तीला अनेक भाषांचा आधार घ्यावा लागेल. अनेक भाषांमध्ये तयार केलेली एखादी जाहिरात वेगवेगळ्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द केली जाते. प्रत्येक वर्तमानपत्राच्या भाषेनुसार ती जाहिरात त्यामधून प्रसारीत होते. उदा. इंडियन एक्सप्रेस, हिंदू टाईम्स (इंग्रजी), सकाळ (मराठी), नवभारत समाचार (हिंदी) अशाप्रकारे वेगवेगळ्या भाषांमधील

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

वर्तमानपत्रातून जाहिराती येताना दिसतात. या संदर्भात ल.रा. नसिराबादकर यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. "जाहिरात कंपन्यांमध्ये जाहिरातीचा मूळ मसुदा एकाच भाषेत (बहुतांशी इंग्रजीतून, क्वचित हिंदीतूनही) तयार केला जातो. नंतर ती जाहिरात वेगवेगळ्या देशी भाषांतून (मराठी, हिंदी, गुजराती, तमिळ इ.) प्रसिध्दीसाठी भाषांतरीत केली जाते. म्हणजे अगोदर इंग्रजीने तयार झालेल्या जाहिरातीचे नंतर मराठीकरण होते. यासाठी भाषांतरकाराला इंग्रजी / हिंदी या भाषांचे ज्ञान हवे आणि मराठीवर तर प्रभुत्व हवे."[६] यावरुन आपल्या लक्षात येईल की जाहिरात लेखन करणाऱ्या जाहिरातदारावे अनेक भाषांवर प्रभुत्व असावे. जाहिरातीचे भाषांतर प्रामुख्याने दोन प्रकारे केले जाते.

**१) शब्दशः भाषांतरित जाहिरात:**

अशा भाषांतरामध्ये भाषांतरीत न करता येण्यासारखे काही शब्द असतात. त्यामुळे ते शब्द जसेच्या तसे जाहिरातीमध्ये वापरावे लागतात. त्यामुळे मूल भाषेतील अस्सलपणा, अर्थछटा लक्ष्य भाषेत येत नाही. त्यामुळे असे भाषांतर कृत्रीम स्वरुपाचे ठरते. त्याला आपल्या भाषेचा बाज येत नाही.

उदा.

यावे मराठीत भाषांतर करताना 'उघडत आहे आज' / 'आज खुले होत आहे' असे केल्यासा ते योग्य ठरणार नाही. त्यामुळे याचे मराठीत भाषांतर करताना 'आज शुभारंभ' असे करायला हवे, तरच ते योग्य भाषांतर होईल, अशा स्वरुपाच्या भाषांतरामुळे शब्दशः भाषांतर कृत्रिम ठरते. त्यामुळे जाहिरातदाराचे दोन्ही भाषांवर प्रभुत्व असल्यास त्याला जाहिरातीचे योग्य भाषांतर करता येईल.

**२) स्वैर भाषांतरित जाहिरात:**

"या प्रकारात, मूल जाहिरातीतील आशय मूल सूत्र, मुख्य आशयन हरवता देशी (मराठी) भाषेत आणता येतो. देशी भाषा, संस्कृती, वातावरण, संकेत, अभिरुची यांनुसार हे भाषांतर केले जाते. त्यामुळे ते अकृत्रिम, स्वाभाविक असे बनते. त्यासाठी जाहिरातीची मूळ भाषा आणि जीमध्ये भाषांतर करावयाचे ती लक्ष्य भाषा यांचे स्वरूप, शब्दसंग्रह, लकबी, संस्कृती-परंपरेची वैशिष्ट्ये यांचा चांगला अभ्यास हवा"[७] यावरुन आपल्या असे लक्षात येते की, स्वैर भाषांतरित जाहिरातीचे लेखन करताना जाहिरातदाराने दोन संस्कृतीचे भान ठेवून लेखन करावे. तरच ते आशय संपन्न करते.

उदा.

एअरटेल कंपनीची जाहिरात -

"ना रक्ताचा थेंब, ना बंदुकीची गोळी, हिंदुस्थानला, स्वातंत्र्य मिळवून दिले, फक्त दोनच शब्दांनी, छोडो भारत"[८]

**मराठीत भाषांतर :**

"आता त्यांच्यानंतर हजारो रस्त्यांना त्यांच नाव दिल जाईल. पण या मार्गावरून किती जण चालतात.?"[९] अशा प्रकारची स्वैर-भाषांतरित जाहिरातीची उदाहरणे पाहता येतात.

**जाहिरातीचे भाषांतरण करताना घ्यावयाची काळजी:**

१) 'जाहिरातीचे भाषांतर शब्दशः केल्यास ते कृत्रिम व नीरस होईल. आपल्या प्रदेशाचा / संस्कृतीचा रंग आणि आपल्या भाषेचा बाज भाषांतरित जाहिरातीत असावा. काही वेळा इंग्रजी शब्दांतील अर्थ तसाच प्रकट करणारे शब्द आपल्या भाषेत नसतात. अशा वेळी त्या संकल्पना

स्वीकारण्यासाठी मूळ इंग्रजी शब्द जसेच्या तसे स्वीकारणे भाग पडते.'

२) 'उत्पादन-वस्तुनुया जाहिरातीची भाषा बदलते. सौंदर्य प्रसाधने, गृहोपयोगी वस्तू, खाद्यपदार्थ, औषधे, कृषी अवजारे, यंत्रे यांसारख्या सुविधा / गरजा यांनुसार जाहिरातीची प्रकृती व आशय बदलतो. त्यानुसार अर्थात जाहिरातीची भाषाही बदलली पाहिजे. सौंदर्य प्रसाधने किंवा गृहपयोगी वस्तू यांसाठी लालित्यपूर्ण, हलकीफुलकी भाषा योग्य. पण तीच भाषा आर्थिक / शैक्षणिक विमाविषयक जाहिरातीला चालणार नाही.'

३) 'जाहिरात कोणत्या प्रकारच्या ग्राहकासाठी आहे (स्त्रिया/पुरुष/मुले) कोणत्या वयोगटासाठी (बाल/तरुण/प्रौढ/वृध्द), कोणत्या क्षेत्रातील ग्राहकांसाठी (व्यावसायिक/शेतकरी/गृहिणी/विद्यार्थी) यानुसारही जाहिरातीचे स्वरूप व भाषा बदलेली आहे.'

४) 'जाहिरात नागरी भागासाठी आहे की ग्रामीण, याचाही विचार कराना लागतो. ग्रामीण भागातील ग्राहकाला नागरी भाषा किंवा नागरी भागातील ग्राहकाला ग्रामीण भाषा समजणार नाही, असे नाही, पण कमीत कमी वेळात, चटकन ग्राहकमनाला भिडणे हा जाहिरातीच्या भाषेसाठी एक महत्त्वाचा निकष असतो. शिवाय त्या-त्या भागातील ग्राहकाला ती भाषा आपली वाटली पाहिजे. ती तशी वाटणे म्हणजे जाहिरातीतील उत्पादन चटकन ग्राहकमनापर्यंत पोहोचणे होय.'

५) 'ज्या प्रसारमाध्यमांतून जाहिरात करावयाची त्याचे काही एक स्वरूप, बलस्थान व मर्यादाही असते, वर्तमानपत्र, मासिक, पोस्टर, होर्डिंग, आकाशवाणी, दूरचित्रवाणी या माध्यमांनुसार जाहिरातीची भाषा बदलते.'[१०]

अशाप्रकारे ल. रा. नसिराबादकर यांनी जाहिरातीचे भाषांतर करताना कोणती काळजी घ्यावी याचे सविस्तर वर्णन केले आहे. त्यामुळे योग्य पध्दतीने जाहिरातींचे भाषांतर करावयाचे असेल तर आपल्याला या सर्व गोष्टी कटाक्षाने पाळायला हव्यात. तरच जाहिरातीचे योग्य भाषांतर होईल. यासंदर्भात श्री. अमेय घरत यांचे विधान लक्षात घेण्यासारखे आहे, "जाहिरात क्षेत्रात चांगला भाषांतरकार बनण्यासाठी भाषांतर हे कशासाठी केल जातं ते लक्षात घ्यावं, जाहिरातीच्या मूळ संकल्पनेची कॉपी, जशीच्या तशी भाषांतरित करण्यासाठी नाही, तर भाषांतराचा मूळ उद्देश तो विचार ग्राहकांपर्यंत त्याच्या भाषेत पोहोचवून अधिक चांगल्या प्रकारे संवाद साधण्यासाठी आहे."[११]

**समारोप:**

अशाप्रकारे आपणास भाषांतर आणि जाहिरातीचा अनन्यसाधरण संबंध दाखविता येतो. भाषांतर ही केवळ भाषेच्या आदान प्रदानाची प्रक्रिया नसून विविध देशातील मानवी समूहांना जोडणारा तो एक सांस्कृतिक अनुबंध आहे. साहित्य, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, विज्ञान अशा विविध ज्ञानशाखांचा केंद्रबिंदू माणूस असल्याने देश, काल व भाषा यांच्या सीमा ओलांडून या सर्व क्षेत्रांतील विचार माणवापर्यंत पोहचविण्याचे कार्य भाषांतरीत जाहिरातीच्या माध्यमातून अगदी सहजपणे होताना दिसते. मात्र जाहिरातीचे भाषांतर करताना योग्य प्रकारची काहजी घेणे आवश्क आहे. भाषांतरकाराचे ज्ञान फक्त भाषेपुरते मर्यादित असून चालणार

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

नाही तर त्याल त्या-त्या समाजावे सांस्कृतिक-सामाजिक संदर्भसुध्दा माहित असायला हवेत. अन्यया योग्य भाषांतर होणार नाही.

उदा.

"उष्ण प्रदेशात राहणारा भारतीय माणूसें दतू व प्नम या शब्दांसाठी 'नर्क' एवढाच प्रतिशब्द लिहिल. पण इंग्लंडसारख्या थंड प्रदेशात होणारा दतूसिस (हिमवृष्टी) वेगळा आणि प्जम (नर्फ) वेगळा असा यातील फरक लक्षात घ्याला हवा."[१२] आजच्या जागतिकीकरणाच्या युगात तर भाषांतराशिवाय पर्याय नाही. मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांच्या विकासासाठी भाषांतराची गरज आहे. आणि ही गरज जाहिरात क्षेत्रासाठी महत्वपूर्ण ठरणारी आहे. यात यत्किंचितही शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ:**

१. *डॉ. वरखेडे रमेश 'भाषांतरविद्या स्वरुप आणि समस्या' प्रकाशन-य.व.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक ०५ प्रथम आवृत्ती डिसेंबर १९९४, पृ.क्र. १.*

२. *तत्रैव पृ.क्र. २.*

३. *डॉ. गुरव धनाजी, डॉ. देवरे अरुण 'भाषांतर, रुपांतर, अनुवाद व वाइ. मयीन निबंध' प्रकाशन-प्राध्यापक नि. संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था मुंबई विद्यापीठ, मुंबई, प्रथम आवृत्ती फेब्रुवारी २०११, पृ.क्र. ३, ४.*

४. *कुलकर्णी सुहास (संपादक) 'पुण्यभूषण आजचा काळ आजच साहित्य' (स्मरणिका) प्रकाशन-महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे-३०, प्रथम आवृत्ती २५ मार्च २०१०, पृ.क्र. ११५.*

५. *डॉ. काळे कल्याण, डॉ. पुंडे दत्तात्रय 'व्यावहारिक मराठी' निराली प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती सप्टेंबर २००९, पृ.क्र. १०६.*

६. *नसिराबादकर ल. रा. 'व्यावहारिक मराठी' फडके प्रकाशन-कोल्हापूर, आवृत्ती नववी, ऑगस्ट-२०१०, पृ.क्र. २२१.*

७. *तत्रैव पृ.क्र. २२२.*

८. *तत्रैव पृ.क्र. २२२.*

९. *तत्रैव पृ.क्र. २२२, २२३.*

१०. *तत्रैव पृ.क्र. २२३, २२४.*

११. *तत्रैव पृ.क्र. २२४.*

१२. *तत्रैव पृ.क्र. २०२.*

***Cite This Article:***

*डॉ. चौरे अ. ना. (2025). भाषांतर आणि जाहिरातलेखन.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 18–25).

ISSN-2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# भाषांतर स्वरूप : तत्वे आणि प्रक्रिया

*** डॉ. अमोगसिद्ध शिवाजी चेंडके**

* पोस्ट डॉक्टरल संशोधक.

**प्रास्ताविकः**

भाषांतर म्हणजे एका भाषेतील विचार, भावना आणि माहिती दुसऱ्या भाषेत मूळ अर्थ आणि प्रभाव कायम ठेवून सादर करण्याची सर्जनशील प्रक्रिया. ही केवळ शब्दांची देवाणघेवाण नसून संस्कृती, ज्ञान आणि संवेदना यांना जोडणारी कला आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भाषांतराचे महत्त्व अधिक वाढले आहे. जगभरातील लोक विविध भाषा बोलतात, आणि संवाद साधण्यासाठी भाषांतर आवश्यक ठरते. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, प्रशासन आणि साहित्य या सर्व क्षेत्रांमध्ये भाषांतरामुळे विचारांची देवाणघेवाण शक्य होते. परदेशातील संशोधन, तांत्रिक माहिती किंवा साहित्यिक कृतींचे भाषांतर झाल्यामुळे ते ज्ञान मराठी वाचकांपर्यंत पोहोचते, तर आपल्या स्थानिक साहित्याचा प्रसार जगभर होतो. अशा रीतीने भाषांतर हे ज्ञानविस्तार, सांस्कृतिक संवाद आणि मानवी ऐक्याचे सशक्त माध्यम ठरते.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात भाषांतराची प्रक्रिया पूर्णपणे बदलली आहे. आज डिजिटल भाषांतर साधनांमुळे काही क्षणांत एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत रूपांतरित करता येतो. गुगल ट्रान्सलेट, DeepL आणि मायक्रोसॉफ्ट ट्रान्सलेटर यांसारख्या साधनांनी संवाद अधिक वेगवान आणि सुलभ केला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानामुळे भाषांतराची अचूकता वाढली आहे. शिक्षण, व्यापार, प्रशासकीय कामकाज, आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये या डिजिटल साधनांचा मोठा उपयोग होतो. तरीही डिजिटल भाषांतराची काही मर्यादा आहेत. संगणक प्रणाली भाषेतील भावनिक अर्थ, सांस्कृतिक संदर्भ आणि म्हणी यांचे बारकावे समजून घेण्यात अपयशी ठरतात. म्हणूनच मानवी भाषांतरकारांची भूमिका आजही अत्यंत महत्त्वाची आहे, कारण मानवी संवेदनशीलता आणि भाषिक जाणिवेमुळेच भाषांतर अधिक जिवंत आणि प्रभावी बनते.

भाषांतर करताना अनेक आव्हाने येतात. प्रत्येक भाषेची स्वतःची रचना, व्याकरण, शब्दसंपदा, शैली आणि संस्कृती असते. त्यामुळे मूळ मजकुराचा अर्थ, भाव आणि लय कायम ठेवणे ही कठीण जबाबदारी असते. शब्दशः भाषांतर केल्यास मूळ अर्थ विकृत होतो, आणि मुक्त भाषांतर केल्यास मूळ भावना हरवतात. भाषांतरकाराला अर्थाचे अचूक जतन करणे, वाक्प्रचारांचे रूपांतर करणे आणि सांस्कृतिक संदर्भ जपणे यासाठी संवेदनशीलतेने काम करावे लागते. विज्ञान, कायदा,

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

वैद्यक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तांत्रिक संज्ञांचे भाषांतर करताना अचूकता राखणे मोठे आव्हान असते. साहित्यिक भाषांतरात तर भावना, लय, आणि शैली जपणे अत्यावश्यक असते. त्यामुळे भाषांतरकाराकडे दोन्ही भाषांवरील प्रभुत्व, सर्जनशीलता आणि विषयाची सखोल जाण असणे अत्यंत गरजेचे आहे.

साहित्याच्या दृष्टीने पाहता, भाषांतरामुळे जगभरातील श्रेष्ठ साहित्यकृती स्थानिक वाचकांपर्यंत पोहोचतात. शेक्सपिअर, टॉलस्टॉय, टागोर, पु. ल. देशपांडे, प्रेमचंद अशा महान लेखकांच्या कृतींचे विविध भाषांमध्ये भाषांतर झाल्यामुळे जागतिक साहित्याचा अनुभव सर्व भाषांतील लोकांना घेता येतो. त्याचप्रमाणे, आपल्या प्रादेशिक साहित्याचे भाषांतर इतर भाषांमध्ये झाले की त्या भाषांतील वाचकांनाही आपल्या संस्कृतीचा परिचय होतो. अशा प्रकारे भाषांतर हे संस्कृतींच्या दरम्यान पूल बांधणारे, विचारांची देवाणघेवाण करणारे आणि मानवतेचा एकत्र अनुभव देणारे साधन ठरते.

भाषांतरामुळे केवळ साहित्यिक समृद्धीच वाढत नाही, तर भाषिक आणि सामाजिक एकताही दृढ होते. एका भाषेतील कल्पना दुसऱ्या भाषेत पोहोचवून भाषांतर मानवी अनुभवाला अधिक व्यापक बनवते. त्यामुळे भाषांतर हे भाषेच्या विकासाचेच नव्हे तर मानवतेच्या प्रगतीचे प्रतीक आहे. डिजिटल युगाने भाषांतराचे स्वरूप बदलले असले तरी त्याचे मर्म आजही तेवढेच जिवंत आहे. भाषांतरामुळे भाषा अधिक समृद्ध होते, साहित्य फुलते आणि समाज अधिक व्यापक विचारांकडे वाटचाल करतो. म्हणूनच भाषांतर हे केवळ भाषिक प्रक्रिया नसून, ते मानवी संस्कृती, ज्ञान आणि संवेदनशीलतेचे जिवंत प्रतीक आहेभाषांतर हे कोणत्याही भाषेच्या साहित्यविकासासाठी अत्यंत आवश्यक घटक आहे. मराठी भाषेतील आधुनिक साहित्यावर इंग्रजी, संस्कृत, हिंदी व इतर भाषांतील साहित्याचा प्रभाव भाषांतराद्वारेच पोहोचला. 'शाकुंतल', 'इलियड', 'ओडिसी' यांसारख्या महाकाव्यांचे भाषांतर मराठीत झाले आणि त्या अनुषंगाने मराठी काव्यशैली विकसित झाली. भाषांतरामुळे भाषेचा शब्दसंग्रह वाढतो, वाक्यरचना विकसित होते आणि नव्या संकल्पना समाजात प्रसृत होतात. त्यामुळे भाषांतर हे फक्त माध्यम नव्हे, तर सर्जनशील प्रेरणा आहे.

भारतीय भाषांतर परंपरेचा विचार केला तर मराठी साहित्यातील भाषांतरविषयक चिंतनाचे बीज विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या लेखनात आढळते. त्यांनी निबंधमाला (१८८४) मध्ये भाषांतरावर एक सविस्तर निबंध लिहिला होता. या निबंधात त्यांनी भाषांतर कसे असावे, भाषांतरकाराकडे कोणते गुण असावेत आणि विविध प्रकारच्या साहित्यकृतींचे भाषांतर करताना कोणती काळजी घ्यावी यावर सखोल चर्चा केली होती. चिपळूणकर म्हणतात, "भाषांतरकाराने मूळ साहित्यकृतीबरोबर त्या भाषेतील संस्कृती, रीती-रिवाज यांनाही आपल्या भाषेतून वाचकांपर्यंत पोहोचवले पाहिजे."[१]

**मराठी भाषांतर परंपरेचा ऐतिहासिक आढावा :**

मराठी भाषांतर परंपरेचा उगम हा मराठी भाषेच्या आधुनिकतेशी निगडित आहे. मराठीतील आरंभीचे भाषांतर हे धर्मग्रंथ, नीतिग्रंथ किंवा संस्कृत नाट्यकृतींचे होते. अशा ग्रंथांमधून मराठी वाचक वर्गाला नवे विषय, शब्द आणि साहित्यप्रकार समजले. १८व्या शतकात संस्कृत ग्रंथांचे मराठीत अनुवाद झाले, तर १९व्या शतकात इंग्रजी

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

शिक्षणाच्या प्रसारामुळे पाश्चात्त्य साहित्य मराठीत येऊ लागले. यामुळे भाषांतराला बौद्धिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान मिळाले.

'दक्षिणा प्राईज कमिटी'च्या माध्यमातून संस्कृत ग्रंथांचे मराठी रूपांतर झाले. या अनुवादांमुळे मराठी भाषेची अभिवृद्धी झाली, असे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे मत आहे. संस्कृत नाटके आणि ग्रंथ मोठ्या प्रमाणावर मराठीत आले; परंतु फारसी किंवा अरबी भाषेतील साहित्य त्या काळात मराठीत फारसे आले नाही. त्यामुळे मराठी अनुवाद परंपरेचा पाया मुख्यतः संस्कृत आणि इंग्रजी या दोन भाषांच्या प्रभावाखाली रचला गेला.

यानंतर रवींद्रनाथ टागोरांच्या गीतांजलीला नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर भारतीय साहित्याच्या अनुवादाला नवा वेग मिळाला. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठीतील नामवंत लेखकांनी स्वतःहून जागतिक साहित्याचे अनुवाद करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे मराठी वाङ्मय अधिक समृद्ध झाले.

**भाषांतराची तत्त्वे आणि सैद्धांतिक पाया :**

भाषांतर हा केवळ भाषिक कौशल्याचा विषय नसून, त्यामागे एक सुसंगत तत्त्वज्ञान आहे. भाषांतराच्या प्रक्रियेत मूळ ग्रंथाच्या अर्थाशी प्रामाणिक राहून लक्ष्य भाषेत त्याच भावविश्वाची पुनर्निर्मिती करावी लागते. भाषांतरशास्त्राचा पाया युरोपात सोळाव्या शतकात रचला गेला. फ्रेंच विचारवंत एतिएन डोलेट यांनी इ.स. १५४० मध्ये भाषांतरविषयी पाच तत्त्वे मांडली. त्यांनी सांगितले —

"1) भाषांतर करणे मुळातील अर्थ व असे नीट समजून घेणे आवश्यक आहे मुळातले संधी एकदा अर्थही तो योग्य ते स्वातंत्र्य घेऊन स्पष्ट करू शकतो.

2) मूळ भाषेचे व लक्ष्य भाषेचे उत्तम ज्ञान भाषांतर करा पाशी असायला हवे.

3) रोजच्या वापरातील शब्दप्रयोग त्याने भाषांतरामध्ये योजावेत.

4) भाषांतर कार्याने शब्दांची निवड चोखंदळपणे करून योग्य तो परिणाम साधनाच्या दृष्टीने मांडणी करावी."२

या तत्त्वांमधून डोलेट यांनी भाषांतर हे केवळ भाषिक क्रिया नसून, एक संवेदनशील सांस्कृतिक प्रक्रिया असल्याचे अधोरेखित केले. नंतर John Dryden (1667), Eugene Nida (1964), J.C. Catford (1965) आणि Peter Newmark (1988) यांनीही भाषांतराच्या विविध दृष्टिकोनातून सिद्धांत मांडले, ज्यातून आधुनिक भाषांतरशास्त्राची सैद्धांतिक पायाभरणी झाली.

**रूपांतर : भाषांतराचा सर्जनशील विस्तार**

भाषांतराच्या प्रवासात "रूपांतर" ही संकल्पना पुढे आली. रूपांतर म्हणजे मूळ कृतीचा आशय जपून ती नवीन सांस्कृतिक संदर्भात सादर करणे. ही कृती शब्दशः अनुवादापेक्षा सर्जनशील आणि स्थानिक संस्कृतीशी अधिक निगडित असते.

रूपांतराचा हेतू मूळ कृतीला आपल्या समाजातील वाचकांपर्यंत सहज आणि आकर्षक रीतीने पोहोचविणे हा असतो. म्हणूनच रूपांतरात पात्रे, प्रसंग, स्थळ किंवा काळ यांमध्ये बदल करून ती कृती वाचकांच्या अनुभवाशी अधिक जवळ आणली जाते. उदाहरणार्थ, गो. गो. देवल यांनी शेक्सपियरच्या ऑथेल्लोचे "झुंजारराव" या नाटकात रूपांतर केले, तसेच वि. वा. शिरवाडकर यांनीही या नाटकावर आधारित स्वतंत्र रूपांतर केले आहे. दुसरीकडे, विंदा

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

करंदीकरांनी किंग लियरचे “राजा लियर” हे भाषांतर मूळ कृतीशी प्रामाणिक राहून केले आहे.

प्राचीन मराठी साहित्यात रामायण, महाभारत, भागवत यांसारख्या ग्रंथांची रूपांतरे आढळतात. एखाद्या संस्कृतीच्या साहित्यनिर्मितीत भाषांतराइतकेच रूपांतराचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे.

**भाषांतराचे तात्त्विक अधिष्ठान :** भाषांतर ही केवळ भाषिक प्रक्रिया नसून ती मानवाच्या भावनांचे, विचारांचे आणि संस्कृतीचे एकमेकांशी जोडलेले जाळे आहे. म्हणूनच या प्रक्रियेला तात्त्विक अधिष्ठान मिळणे आवश्यक आहे.

भालचंद्र नेमाडे यांच्या मते, “भाषांतर ही एका संहितेचे एका भाषिक-सांस्कृतिक आवरणातून दुसऱ्या भाषिक-सांस्कृतिक आवरणात स्थानांतरण करणारी द्वैभाषिक प्रक्रिया आहे.”[6] तर दिलीप चित्रे म्हणतात, “कवितेच्या स्वागताच्या मुळाशी परकाया प्रवेशी संवेदना आहे, तीच भाषांतराच्या मुळाशी असायला हवी. त्या त्या कवीच्या काव्यधर्म व्यक्तिमत्त्वाचा स्वतःमध्ये संचार होऊ देणे, हे भाषांतर प्रक्रियेचे मर्म होय.”[7] या विचारांमधून हे स्पष्ट होते की भाषांतर हे तांत्रिक नसून, भावनिक आणि तात्त्विक संवाद आहे. ज्यात भाषांतरकार “संवेदनशील पूल” म्हणून कार्य करतो.

**समारोप:** भाषांतर हे एका संस्कृतीचा दुसऱ्या संस्कृतीशी संवाद घडवणारे माध्यम आहे. भाषांतरामुळे भाषेचा आणि साहित्याचा सर्वांगीण विकास होतो. एका भाषेतील विचार, ज्ञान आणि संकल्पना दुसऱ्या भाषेत आणल्याने त्या भाषेची शब्दसंपदा वाढते आणि ती अधिक समृद्ध होते. भाषांतर ही भाषेच्या आधुनिकीकरणाची आणि विस्ताराची प्रक्रिया आहे. नवीन संज्ञा, विचार आणि अभिव्यक्तीचे मार्ग भाषांतरातून निर्माण होतात. इंग्रजीतील वैज्ञानिक व तांत्रिक शब्दांचे मराठी भाषांतर झाल्यामुळे मराठी भाषेला आधुनिकतेचा नवा आयाम मिळाला.

**संदर्भ ग्रंथसूची:**

1. *काळे, डॉ. कल्याण आणि सोमण, डॉ. अंजली (संपा.). भाषांतरमीमांसा. चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, १५ ऑगस्ट २०१४, पृ. ४४.*
2. *जाधव, रा. ग. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ७, भाग ४. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, २०११, पृ. ३५६–३५७.*
3. *नेमाडे, भालचंद्र. “भाषांतरमीमांसेचे स्वरूप.” नवभारत, ऑगस्ट 1983, पृ. 27.*
4. *चित्रे, दिलीप. “कवितेचे भाषांतर.” नवभारत, एप्रिल 1983, पृ. 27.*
5. *Dolet, Étienne. La Manière de Bien Traduire d’une Langue en Aultre. Lyon, 1540.*
6. *Catford, J. C. A Linguistic Theory of Translation. Oxford University Press, 1965.*
7. *Nida, Eugene A. Toward a Science of Translating. Leiden: Brill, 1964.*
8. *Newmark, Peter. Approaches to Translation. Oxford: Pergamon Press, 1988.*

*Cite This Article:* *डॉ. चेंडके अ. शि. (2025). भाषांतर स्वरूप : तत्वे आणि प्रक्रिया* . **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 26–29).

ISSN-2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# भाषांतरित कादंबऱ्यांमधील स्त्रीजीवन

* डॉ. अमोल सुभाष कवडे

* सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, किसन वीर महाविद्यालय, वाई.

**प्रास्ताविकः**

प्राचीन काळापासून भारतीय समाजरचनेत स्त्रीचे स्थान अत्यंत गुंतागुंतीचे राहिले आहे. धर्म, परंपरा, संस्कार, पितृसत्ताक मूल्यव्यवस्था आणि सामाजिक मानदंड यामध्ये भारतीय स्त्री सतत संघर्ष करीत आल्याचे दिसून येते. अनेक भारतीय लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यामधून स्त्रीच्या या जीवनानुभवांना अभिव्यक्त करण्याचे महत्वाचे कार्य केले आहे. ज्यावेळी या कादंबऱ्या भाषेच्या सीमा ओलांडून इतर भाषांमध्ये भाषांतरित होतात, तेंव्हा स्त्रीचे हे चित्र अधिक व्यापक आणि सार्वत्रिक स्वरुपात सर्व समाजापर्यंत पोहचते. प्रस्तुत शोधनिबंधात वेगवेगळ्या भाषांमधील मराठीत भाषांतरित झालेल्या काही कादंबऱ्यामधील स्त्रीजीवनाचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**'महाश्वेता' कादंबरीतील स्त्रीजीवन :**

'महाश्वेता' ही सुधा मूर्ती यांची मूळ कन्नड भाषेतील कादंबरी असून, उमा कुलकर्णी यांनी तिचे मराठीमध्ये भाषांतर केले आहे. शरीरावर आलेले डाग आणि त्यामुळे उध्वस्त झालेला संसार हा विषय कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. अनुपमा आणि आनंद यांच्या सुखी संसाराचा शेवट अनुपमाच्या शरीरावर अचानक आलेल्या कोडाच्या डागामुळे होतो. तिला सासरच्या लोकांकडून त्रास होत असताना माहेरकडून मात्र कोणतीही साथ मिळत नाही. सासू राधाक्का तिला घरातून हाकलून देते. तर सावत्र आई तिला व्यवस्थित वागवत नाही, घरात घेण्यास तयार होत नाही. या सर्व प्रक्रियेमधून अनुपमाची वाटचाल सामर्थ्यशाली बनण्याकडे झालेली आहे. जीवनामध्ये शारीरिक व मानसिक पातळीवरील खडतर अडचणीचा सामना तिला करावा लागतो. त्यातूनही ती मार्ग काढत पुढे विर्लेपार्ले कॉलेजमध्ये संस्कृतची प्राध्यापक होते. नोकरी करत असताना पुस्तके वाचणे, संकलन करणे यांसारखे विविध छंद जोपासते. स्वतंत्र आणि मुक्तपणे आयुष्य जगणारी अनुपमा आपल्याला कादंबरीच्या उत्तार्धात पहावयास मिळते. कोड आल्यानंतर जीवनात आलेल्या समस्या आणि त्या समस्यांमधून आपल्या अस्तित्वाचा शोध घेणारी अनुपमा लेखिकेने उत्तम रीतीने मांडली आहे.

अनुपमा सर्वांच्या विरोधात उभी राहते आणि आणि व्यवस्थेला प्रश्न विचारते, "कुणाचं चुकलं, काय चुकलं काय बोलायचं याविषयी ? हे काही केवळ शब्द नाहीत. त्या शब्दामागचा अर्थ तुम्हाला समजलाच नाही. मला कोड आलं

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

हा माझा दोष काय? कोडामुळे माझं सौंदर्य नष्ट झालं, यात माझं काय चुकलं ? गरिबाघरची मुलगी करून घेऊन तिच्या गरिबीची चारचौघात टर उडवणं, यात कोणाची चूक ?" [१] अशापद्धतीने अन्यायाविरुद्ध उभी राहणारी अनुपमा महाश्वेता कादंबरीतून सुधा मूर्ती यांनी रेखाटली आहे. ज्यावेळी अनुपमा कोडावर उपचार घेत असते. त्यावेळी उपचार करणारा वसंत तिच्या प्रेमात पडतो. सर्व बाजूनी विचार करून ती वसंतला लग्नाला नकार देते. कुटुंबव्यवस्थेला स्वतःच्या स्वानुभवातून नकार देणारी अनुपमा देखील याठिकाणी आपणास पहावयास मिळते.

काही दिवसानंतर आपण केलेल्या चुकांची जाणीव झालेला आनंद तिला स्वीकारायला तयार होतो पण त्यालाही ती नकार देते. स्वार्थी विचार करणाऱ्या पुरुषी व्यवस्थेला नकार देत असताना तिच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भडकपणा जाणवत नाही, सर्व गोष्टी ती सौम्यपणे नाकारताना दिसते. "जाऊ दे आनंद ! होरपळून गेलेल्या बीजाला पुन्हा संपूर्ण शक्य नाही. आता मला नवरा, प्रेम, माया सारं निरर्थक आहे असं वाटतं. तुम्ही खूप उशिरा आलात ! मला माझ्या जीवनाचे ध्येय समजलं आहे. आता मला कुठल्याही प्रकारच्या आधाराच्या काठीची गरज नाही. प्रत्यक्ष सूर्याचा प्रकाशचं रस्तावर उजेड टाकत असताना कंदिलाचा प्रकाश कशाला पाहिजे ? एकचं सांगते, देवाच्या कृपेने मला बुद्धी आहे, त्यासाठी आवश्यक टी संधी उपलब्ध आहे ! मुंबईसारख्या महानगरान मला अपार रक्षण दिलं आहे ! पण सगळ्या महाश्वेतांची परिस्थिती माझ्यासारखी नाही. ज्यासाठी आपण कुठल्याही अर्थी जबाबदार नाही, त्यासाठी परीत्यात्केचं जीवन वाट्याला आल्यामुळे होणाऱ्या दुःख, वेदनेच्या कल्पनेनं माझं मन आक्रंदून उठतं. तुम्हाला तुमच्या आयुष्यात तसं कोणी भेटलं, तर तुम्ही त्यांना शक्य असेल ती मदत करा. दयेची भीक नको, माणुसकीच्या दृष्टीकोनातून मदत करा." [२] यामधून एक नवी दृष्टी प्राप्त झालेली स्त्री अनुपमाच्या रूपाने आपल्यासमोर उभी राहते.

अशाप्रकारे प्रस्तुत कादंबरीची नायिका अनुपमाच्या माध्यमातून उध्वस्थ झालेल्या संसाराचे दुःख उराशी न बाळगता, ते बाजूला करत त्यातून मार्ग काढणारी सामर्थ्यवान स्त्री सुधा मूर्ती यांनी चित्रित केली आहे.

**'कमला' कादंबरीतील स्त्रीजीवन :**

कृपाबाई सत्यनादन यांची 'कमला' ही १८९५ मध्ये इंग्रजी भाषेत लिहिलेली कादंबरी असून, रोहिणी तुकदेव यांनी तिचे मराठीत भाषांतर केले आहे. प्रस्तुत कादंबरीतून कृपाबाई सत्यनादन यांनी तत्कालीन महाराष्ट्रीय स्त्रीचे सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक जीवन चित्रित करून समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन अधोरेखित केला आहे.

प्रस्तुत कादंबरीची नायिका कमला असून तिचा संपूर्ण जीवनप्रकाश या कादंबरीतून पुढे येताना दिसतो. ही कादंबरी बालविवाहासारख्या महत्वाच्या प्रश्नावर भाष्य करत असून बाल स्त्रीमनाचे चित्रण या कादंबरीत आले आहे. शिवाय स्त्री शिक्षणविषयक कुटुंबाची आणि समाजाची दुय्यम भूमिका या कादंबरीतून पुढे येताना दिसते. स्त्रियांना वाचता येणे हे त्याकाळी कल्पनेच्या बाहेर असणारे होते, परंतु कमला ही वाचन करते हे सर्वांना आश्चर्यचकित तर करणारे होतेच शिवाय मनात धास्ती निर्माण करणारेदेखील होते.

कमलाला तिचे सासरे सोडून सगळेच जाणीवपूर्वक त्रास देतात, तिच्यावर संशय घेतात, तिला चुकीचे वागण्यास भाग

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

पडतात. या सर्व बाबींच्या माध्यमातून कुटुंबव्यवस्था आणि एकंदरीत स्त्रीजीवन चित्रित करण्याचा प्रयत्न या कादंबरीने केला आहे. समाजामध्ये रूढ असलेल्या केशवपणन, सती प्रथा यांसारख्या समस्या ज्या काळात संपुष्टात आल्या होत्या त्या काळातील ही कादंबरी आहे. या कादंबरीतील नायिका पती निधनानंतर सती जात नाही, पण त्याबद्दल भाष्य करताना दिसते. समाजातील पुरुषी वर्चस्व ही त्या काळापासून आजपर्यंत चालत आलेली समस्या आहे त्याचेही चित्रण कमलाचा नवरा गणेशच्या माध्यमातून दिसून येते. गणेश हा तिच्यासमोर सई या स्त्रीसोबत अनैतिक संबंध ठेवतो, तरीदेखील कमला त्याच्यासोबत संसार करते. या गोष्टींचा तिला तिटकारा येत असला तरी, त्याविरुद्ध ती टोकाचा प्रतिकार करत नाही. परंतु ज्यावेळी गणेश तिच्या चारित्र्यावर संशय घेतो, त्यावेळी मात्र ती बंड करते आणि घर सोडून जाते, आणि सासरच्या लोकांना याचा जाब विचारते. याठिकाणी अन्यायाविरुद्ध बंड करणारी कमला आपल्याला दिसून येते.

कमला परंपरेबद्दल विचार करत असताना ती आधुनिकतेचादेखील विचार करते. तिला समाजमान्य संकेत मोडायचे नाहीत आणि जाचक परंपरांना शरणही जायचे नाही, अशा प्रकारचे द्वंद घेऊन जीवन जगणारी कमला या कादंबरीत आपल्याला पाहायला मिळते. आत्मसन्मान जागृत ठेवून कमला पतीचा त्याग करते परंतु त्याग केल्यामुळे आपल्याला विधवेचे जीवन जगावे लागत आहे असे तिला वाटते. तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर मात करत कमला स्वतःचे अस्तित्व तयार करून स्वतःला समाजकार्यात झोकून देते. या कादंबरीसंदर्भात डॉ. नीलिमा गुंडी यांनी नोंदविलेले निरीक्षण महत्वपूर्ण आहे. कादंबरीच्या प्रस्तावनेत त्या म्हणतात, "कमलामध्ये बालविवाह, स्त्री शिक्षणाविषयी समाज मनातली धास्ती, एकत्र कुटुंब पद्धतीतील कुचंबलेले वातावरण, कुटुंबातील पुरुषी वर्चस्ववाद आणि परंपरा व आधुनिकता यातील मूल्यसंघर्ष यांचे चित्रण येते. आत्मसन्मान राखत पतीचा त्याग करणारी यातील कमला ही त्या काळाच्या चौकटीत बंदिस्त झालेली नायिका नव्हती. तिचे वेगळेपण आज उठून दिसते. या कादंबरीतील प्रसंगचित्रण, निसर्गवर्णन आणि भाषाशैली हे घटकही वाचकांना आकर्षित करतील असे आहेत." [३]

तत्कलीन समाजातील स्त्रियांचे जीवन आणि त्यांचे प्रश्न कमला या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न कृपाबाई सत्यानादन यांनी 'कमला' या कादंबरीच्या माध्यामतून केला आहे.

**'अशी काळवेळ' या कादंबरीतील स्त्रीजीवन :**

शशी देशपांडे यांची 'A MATTER OF TIME' ही मूळ इंग्रजी भाषेतील कादंबरी असून सरोज देशपांडे यांनी तिचे मराठीमध्ये भाषांतर केले आहे. प्रस्तुत कादंबरीमध्ये तीन पिढ्यांमधील स्त्रियांच्या मनाचा वेध घेतला आहे. या कादंबरीत 'कल्याणी' आजी, 'सुमी' आई आणि 'अरु' ही सुमीची मुलगी म्हणजेच नात, आई आणि आजी असा तीन पिढ्यांचा नात्यातील परस्परसंबंध शोधण्याचा प्रयत्न लेखिकेने या कादंबरीत केला आहे. कल्याणी आणि सुमी या दोघींनाही मुलगा नसल्याने एक अदृश्य स्वरूपाचा संघर्ष त्यांच्या मनात निर्माण होतो. गोपाल हा सुमीचा पती तिला काहीही न सांगता सोडून जातो. तो का आपल्याला सोडून गेला याचा शोध न घेता ती त्याला मुक्त करून आपल्या मुलीना घेऊन माहेरी जाते.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

माहेरी तिचे वडील 'श्रीपती' यांनी स्वतःला कायम एका खोलीत बंदिस्त करून घेतले असून कोणत्याही कौटुंबिक बाबतीत ते हस्तक्षेप करत नाहीत, त्यांचे आणि पत्नी कल्याणी हिचे ३५ वर्षापासून कोणत्याही प्रकारचे संभाषण नाही. त्यांचा वंशाचा दिवा असणारा मतीमंद मुलगा हरवेलेला असून तो हरवण्यामागे कल्याणीचा हात आहे, म्हणून ते तिला दोषी धरतात. असे असूनही कल्याणीदेखील कोणताही प्रश्न उपस्थित न करता संसार करत आहे.

सुमी गोपालला आणि कल्याणी श्रीपतीला कोणत्याही प्रकारचे प्रश्न विचारत नसली तरी, दोघींच्या संसारातील मूक नाट्याचा शोध घेण्याचा, प्रश्न विचारण्याचा प्रयत्न 'अरु' करते. या दोघींवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचा आणि अबोल वेदनेचा ठाव घेण्याचा प्रयत्न अरु करते. ती आपल्या वडिलांच्या संन्यासाचा आणि आजोबांच्या तटस्थ विरक्तीचा शोध घेते. मूल न होणे यामध्ये स्त्रीचाचं दोष आहे असे पुरुषांना वाटते हा प्रश्न मांडलेला आहे. पारंपारिक विचारसरणीमुळे स्त्रियांच्या वाट्याला येणारे दुःख कल्याणी आणि सुमी या व्यक्तिरेखांच्या रूपाने मांडले आहे. या कादंबरीतील पुरुष पात्रे अबोल असली तरी त्यामध्ये स्त्रियांना दोषी ठरविण्याचे राजकारण आहे.

प्रस्तुत कादंबरी पुरुषप्रधान समाजव्यवस्थेवर भाष्य करत असताना पारंपारिक रूढी व स्त्रियांचे विचार यांचाही वेध घेते. आणि कौटुंबिक स्थानही शोधण्याचा प्रयत्न करते. शेवटी सुमी व श्रीपती गाडीवर प्रवास करत असताना मरण पावतात. परंतु कल्याणी आणि अरु मात्र आपण स्वतंत्र आहोत हे दाखवून देतात. शेवटी अरु म्हणते, "जा तुम्ही बाबा,आम्ही सांभाळून राहू. आमची काळजी करू नका."[४] थोडक्यात आम्ही परावलंबी नाहीत हेच यातून अरुला सुचवायचे आहे.

**'पिंजर' या कादंबरीतील स्त्रीजीवन :**

पिंजर ही अमृता प्रीतम यांची मूळ पंजाबी कादंबरी असून डॉ. राजश्री यांनी या कादंबरीचे मराठीत भाषांतर केले आहे. प्रस्तुत कादंबरीची पुरो ही नायिका असून, गुजरातमधील शाह सावकाराची ती मुलगी आहे. काही कारणाने त्यांनी मूळ गाव सोडून सियामला वास्तव्य केले होते. त्याठिकाणी त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते. पुरो वय साधारणतः चौदा वर्षांची असून रशीद नावाचा एका तरुण खानदानी दुष्मनी मनात ठेवून तिचे अपहरण करतो. रशीद पुरोला सर्व प्रकारचे प्रेम देण्याचा प्रयत्न करतो. परंतु पारंपारिक विचारांच्या संस्कारात वाढलेल्या पुरोचे मन स्वीकारत नाही. ज्यावेळी तिचे आई-वडील तिला घरात घेत नाहीत तेंव्हा ती रशीदसोबत राहण्याचा निर्णय घेते, परंतु मनातून पूर्णपणे खचून जाते. रशीद पुरोवर प्रेम करत असला तरी, तिचे मान आई- वडिलांनी लग्न ठरविलेल्या मुलामध्ये अडकलेले असते, खानदानी दुश्मनीने माझा बळी घेतला आहे का ? हे ती वारंवार रशिदला विचारत, ती म्हणते, "तुझ्या आत्याला माझ्या ताऊने उठवलं(अपहरण) केलं, पण यात माझा काय दोष ! आता मी कुठलीच राहिली नाही, पुरोचा चेहरा अश्रुने भरून आला."[५] यावरून स्त्रियांच्या अन्यायाच्या परंपरेचा अंदाज येतो, ज्यावेळी पुन्हा ती आपल्या घरी जाण्याचा विचार करते, त्यावेळी रशीद तिला सांगतो की, तुला तुझ्या घरचे पुन्हा घरात घेणार नाहीत, कारण तो त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. कोणताही हिंदू हा मुस्लिमांच्या घरचे पाणी प्यायला तयार होणार नाही, याची रशीदला कल्पना असते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

परंपरेने चालत आल्याप्रमाणे पुरोला मुस्लीम धर्माच्या परंपरा स्वीकाराव्या लागल्या, तिचे नाव बदलून हमीदा ठेवण्यात आले. पुढे स्वतःच्या पोटी जन्माला आलेल्या मुलाचाही तिला तिरस्कार वाटू लागतो, कारण तो पुरुष असतो, आणि पुरुष आजवर स्त्रीवर अन्याय करत आला आहे.

हिंदू – मुस्लीम या दोन कुटुंबाच्या वादातून एका स्त्रीवर झालेला अन्याय हा या कादंबरीतून अधोरेखित करण्याचा प्रयत्न 'अमृता प्रीतम' यांनी केला आहे. समाजाला बदला घेण्यासाठी फक्त स्त्रियाचं सापडतात का ? असाही पश्न या ठिकाणी उभा राहतो. शेख घराण्यातील स्त्रीवर शाह घराण्यातील पुरुषांनी केलेला अन्याय असो अथवा, शेख घराण्यातील रशीदने केलेला अन्याय असो, स्त्री ही अशा पद्धतीने वापरली जाते.

**समारोप :**

भारतीय लेखिकांच्या मराठीत भाषांतरित झालेल्या कादंबऱ्यांचा स्त्रीवादी दृष्टीकोनातून विचार करता असे लक्षात येते की, स्त्रियांच्या आयुष्याची विविध रूपे या कादंबऱ्यामधून चित्रित झालेली दिसतात. या स्त्रिया समस्यांना कवटाळून न बसता त्यातून मार्ग काढताना दिसतात, आणि समर्थपणे आयुष्य जगतात. तर काही स्त्रिया पारंपारिक चौकटीत जीवन जगतात. कोड आलेली अनुपमा आणि तिच्या कुटुंबाची अस्वीकार्यता, पुढे जाऊन शिक्षण क्षेत्रात नाव कमावणारी नायिका आपल्याला 'महाश्वेता' कादंबरीत दिसते, तर शशी देशपांडे यांनी '[काळवेळ' मधून तीन पिढ्यामधील स्त्रियांचे आयुष्य चित्रित केले आहे. कमला कादंबरीमध्ये आत्मसन्मान राखत पतीचा त्याग करणारी कमला दिसून येते. धार्मिक संघर्षाला बळी पडणारी आणि मनाविरुद्ध जीवन जगणारी पुरो अमृता प्रीतम यांनी 'पिंजर' या कादंबरीत उभी केलेली आहे.

**संदर्भ :**


१) *मूर्ती सुधा, महाश्वेता, अनु. कुलकर्णी उमा, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, नोव्हेंबर २०१६, पृ. १४४*

२) *तत्रैव, पृ. १४६*

३) *सत्यानादन कृपाबाई, कमला, अनु. तुकदेव रोहिणी, राजहंस प्रकाशन पुणे, जानेवारी २०२२, पृ. ३*

४) *देशपांडे शशी, अशी काळवेळ, अनु. देशपांडे सरोज, रोहन प्रकाशन पुणे, प्र.आ. २००६, पृ. २०२*

५) *प्रीतम अमृता, पिंजर, अनु. राजश्री, विजय प्रकाशन नागपूर, प्र.आ. २०१५, पृ. १५*


*Cite This Article:*

*डॉ. कवडे अ. सु. (2025). भाषांतरित कादंबऱ्यांमधील स्त्रीजीवन.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 30–34).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# भाषांतराचे महत्त्व

* डॉ. आरती विजयकुमार भोसले

* फर्ग्युसन महाविद्यालय पुणे-४

**भाषांतर :**

सर्वप्रथम भाषांतर ही संकल्पना समजून घेत असताना सर्वप्रथम भाषा म्हणजे काय हे समजून घेणे महत्वाचे आहे. भाषा हे कल्पना, विचार आणि भावना व्यक्त करण्याचे साधन आहे. आणि माणसाने हेच भाषा हे साधन विकसित केले. भाषेमुळेच माणूस आपली संस्कृती आणि साहित्य निर्माण करू शकला. आणि भाषेद्वारेच माणूस ज्ञानार्जनही करू शकला. म्हणजेच माणसाच्या जीवनात भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे

विचार व्यक्त करायचे साधन म्हणजे भाषा आणि एका भाषेत व्यक्त केलेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करण्याची प्रक्रिया म्हणजे भाषांतर थोडक्यांत भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर, त्याचा आशय आणि अभिव्यक्तीजन्य अनुभव यासह दुसऱ्या भाषेत उतरवण्याची प्रक्रिया आहे.

डॉ. कल्याण काळे यांनी भाषांतराची व्याख्या अतिशय समर्पक शब्दांत केली आहे ती अशी "भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत त्याच्या शैली, वैशिष्ट्यांसह उतरवण्याची कला. मूळ संहितेच्या वाचनाने मिळणारे ज्ञान आणि विचार, आणि अनुभव, दुसरी भाषा बोलणाऱ्याला त्याच्या भाषेत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न म्हणजे भाषांतर होय.

भाषांतरकार लेखकाला मुळ कृतीतील जो अनुभव भावलेला असतो, त्याची उत्कट प्रतिक्रिया साहित्यकृतीच्या भाषांतर प्रक्रियेत होते.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**विसाव्या शतकातील भाषांतर व्यवहार :**

झपाट्याने झालेल्या जागतिकीकरणामुळे विसाव्या शतकातील भाषांतर व्यवहार हा एक फार मोठा व्यवसाय झालेला आहे. एकोणिसाव्या शतकात अथवा त्याअगोदर भाषांतरव्यवहार हा प्रामुख्याने तत्त्वज्ञान, धर्मप्रसार, वासाहतिक धोरणांचा प्रचार व प्रसार यांच्याशी निगडित होता. त्यामुळे भाषांतरित होणार या संहिता ह्या प्रामुख्याने तत्त्वचिंतनात्मक, धर्मग्रंथ अथवा ललित साहित्य इत्यादी प्रकारात मोडणार या होत्या. विसाव्या शतकात मात्र व्यापारविषयक करार मदार, आंतरराष्ट्रीय न्यायालयात चालणार या खटल्यातील कागदपत्रे, जाहिराती, चित्रपट, दूरदर्शनावरील कार्यक्रम, माहितीपत्रके, तर हेतर हेचे अहवाल, विमाविषयक कागदपत्रे, वैद्यकीय तपासणीचे अहवाल, औषधांवरील व इतर वस्तूंच्या वेष्टनावरील सूचना, तंत्रज्ञानविषयक माहिती अशा अनेक अंगांना भाषांतर वेढून आहे.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

साधारणतः भाषांतराचा ओघ पाहिला तर तो ज्ञानसंपन्न, विकसित, श्रीमंत समाजांच्या भाषांकडून मागास, आर्थिकदृष्ट्या दुर्बळ व अप्रगत समाजांच्या भाषांकडे जाणारा आहे. त्यामुळे पूर्वी भाषांतर प्रक्रियेवर अवलंबन राहून भाषांतराचे सिद्धांतन करण्याचा प्रयत्न होत असे. त्याऐवजी भाषांतरामागची उद्दिष्टे, भूराजकीय समीकरणे, दुर्बल भाषिक समूहांच्या लुप्त होत जाणार या भाषा, भाषांतरकाराची भूमिका या गोष्टींना आता सिद्धांतनात स्थान मिळालेले दिसते.

भाषांतर व्यवहार हा इतक्या मोठ्या प्रमाणावर पसरलेला आणि सर्वव्यापी झाल्यामुळे भाषांतरासाठी संगणकाचा वापर विसाव्या शतकात सुरू झाला. फक्त संगणकीय किंवा संगणकाने केलेले भाषांतर हे अचूकतेच्या कसोटीवर संपूर्णपणे उतरत नसल्याने संगणकाच्या मदतीने भाषांतर हा पर्याय बर यापैकी रूढ झाला आहे. भाषांतरासाठी आवश्यक असणार या ऑनलाईन कोशांची उपलब्धता वाढली आहे. निरनिराळे कोश ऑनलाईन स्वरूपात आणण्याचे कामही चालू आहे. उपयोजित क्षेत्रांतील भाषांतरांच्या बाबतीत मानवी भाषांतरकारांची जागा भविष्यात संगणकीय भाषांतरकार घेतील अशी दाट शक्यता आहे.

भाषांतराचे महत्त्व जागतिक संबंधांमध्ये आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी खूप आहे, कारण ते संस्कृतींच्या सीमा ओलांडून लोकांना एकमेकांना समजून घेण्यास मदत करते.

जागतिकीकरणामुळे विविध भाषा आणि संस्कृतींशी संपर्क वाढत असल्याने, संवाद साधण्यासाठी आणि ज्ञान प्राप्त करण्यासाठी भाषांतर अत्यंत आवश्यक बनले आहे. या प्रक्रियेमुळे मूळ भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत नेमकेपणाने पोहोचवता येतो आणि मराठीसारख्या भाषांमध्ये साहित्य आणि ज्ञानाची वृद्धी होते.

**भाषांतराचे महत्त्वः**

- **ज्ञान आणि संस्कृतीची देवाणघेवाणः** भाषांतरामुळे एका भाषेतील साहित्य, विचार आणि ज्ञान दुसऱ्या भाषेत पोहोचवता येते.
- **जागतिक स्तरावरील संवाद:** जागतिकीकरणाच्या काळात वेगवेगळ्या देशांच्या संस्कृती आणि लोकांशी संवाद साधण्यासाठी भाषांतराची गरज निर्माण झाली आहे.
- **साहित्य आणि वाङ्मयाचा प्रसार:** एका भाषेत असलेले दर्जेदार साहित्य इतर भाषिकांसाठी उपलब्ध करून देण्यासाठी भाषांतरे केली जातात.
- **अनुभवांची देवाणघेवाण:** यामुळे अनुभवविश्व विस्तारते आणि एका प्रदेशातील लोकांचे अनुभव दुसऱ्या प्रदेशातील लोकांपर्यंत पोहोचतात.
- **परस्परांबद्दलची समज वाढवणे:** भाषांतरामुळे वेगवेगळ्या सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या लोकांबद्दलची समज वाढण्यास मदत होते.
- **जागतिक संपर्क वाढवणे:** जागतिकीकरणामुळे विविध देशांतील लोकांशी संवाद साधण्याची गरज निर्माण झाली आहे. भाषांतर हे वेगवेगळ्या संस्कृती आणि देशांना जोडणारा एक पूल आहे.
- **ज्ञानाची देवाणघेवाण:** विविध भाषांमध्ये असलेले ज्ञान, साहित्य आणि इतर माहिती एका भाषेतून दुसऱ्या भाषेत आणण्यासाठी भाषांतर महत्त्वाचे आहे.

- **सांस्कृतिक देवाणघेवाण:** भाषांतर लोकांना इतर संस्कृती आणि विचारांची ओळख करून देते, ज्यामुळे सांस्कृतिक समज वाढते.
- **साहित्य आणि ज्ञानवृद्धी:** भाषांतर हे मराठी साहित्य आणि ज्ञानकोशांना समृद्ध करते. इंग्रजीसारख्या ज्ञानाच्या भाषांमधून मराठीमध्ये अनेक अनुवादित साहित्यकृती उपलब्ध आहेत.
- **रोजगाराच्या संधी:** भाषांतरकारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. आजकाल भाषांतरकारांची मागणी खूप वाढली आहे.
- **आशयाची नेमकी मांडणी:** एका भाषेतला मूळ आशय, विचार आणि दृष्टिकोन दुसऱ्या भाषेत नेमकेपणाने व्यक्त करणे हे भाषांतराचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**निष्कर्ष :**

थोडक्यात, भाषांतर हे केवळ शब्दांचे भाषांतर नसून ते विचार आणि संस्कृती यांचे वहन आहे, ज्यामुळे जागतिक स्तरावर संवाद आणि ज्ञानवृद्धी सुलभ होते.

**संदर्भग्रंथ :-**

1. *भाषांतर स्वरूप आणि समस्या, वरखेडे, रमेश (संपा.), खैरे विश्वाथ, भाषांतर : भाषाविकासाची दोरवाट (लेख), 1997.*
2. *भाषांतर चिकित्सा, डॉ. मधुकर मोकाशी, स्नेहवर्धन प्रकाशन*
3. *भाषांतरमीमांसा, अंजली सोमण, कल्याणी काळे, चिन्मय प्रकाशन, भाषाविषयक*
4. *भाषांतर, सदा कऱ्हाडे, लोकवाड्मय गृह*

*Cite This Article:*

*डॉ. भोसले आ. वि. (2025). भाषांतराचे महत्त्व.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 35–37).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# अनुवादाचे महत्त्व आणि रोजगाराच्या नव्या संधी

* डॉ.कांचन विजय नलावडे

* सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.

भाषा हे एक संपर्काचे, दळणवळणाचे माध्यम मानले जाते. भाषेद्वारे माणूस विचार, कल्पना, भावना व्यक्त करतो. भाषेतूनच मानवाने ज्ञानार्जनाची प्रक्रिया सुरु ठेवली आहे. मानवाच्या विकासात भाषेचा मोठा वाटा आहे. आज जगभरात सुमारे ६९०० भाषा बोलल्या जातात. या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगामध्ये संपूर्ण जग अतिशय जवळ आलेले आहे. त्यामुळे भिन्न भाषिक संपर्कामुळे भाषांतराची, अनुवादाची आवश्यकता भासते. आज अभिरुची वाढविण्यासाठी, इतरांच्या संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी भाषांतरित किंवा अनुवादित साहित्य वाचणाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत संक्रमित होणाऱ्या प्रक्रियेस भाषांतर म्हटले जाते. तर अनुवाद हा संस्कृत तत्सम शब्द आहे. अनुवाद या शब्दाचा संबंध 'वद' या धातूशी आहे. ज्याचा अर्थ बोलणे किंवा सांगणे असा होतो. 'वद' या धातूस 'धत्र' प्रत्यय असून वाद शब्द तयार होतो आणि भाषिक उपयोग करताना 'अनु' उपसर्ग लावून अनुवाद शब्द तयार झालेला आहे. अनुवादामध्ये आशय आणि भावना यांना महत्त्वाचे स्थान असते. अनुवाद म्हणजे केवळ शब्दाला शब्द देणे नव्हे तर मूळ कलाकृतीच्या मूळ विषयाशी अनुवाद समरस झाला पाहिजे तरच तो वाचनीय होतो. अनुवाद ही संकल्पना स्पष्ट करताना प्र. ना. परांजपे म्हणतात, "अनुवाद म्हणजे मौखिक किंवा लिखित भाषेच्या माध्यमातून पुन्हा केलेली मौखिक किंवा लिखित अभिव्यक्ती" [१] अनुवाद हा एक भाषिकही असतो आणि भिन्न भाषिकही असतो. अनुवादामध्ये मूळ कलाकृतीला संपूर्ण न्याय मिळाला पाहिजे हे अपेक्षित असते.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

अनुवाद या लेखनप्रकाराचा उदय एकोणिसाव्या शतकामध्ये झालेला आहे. १८१८ पासून सुरु झालेल्या ब्रिटिश सत्तेमुळे मराठीचा इंग्रजीशी संपर्क आला. ब्रिटिशांच्या आगमनामुळे शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार तळागाळातील लोकांपर्यंत झाला. त्याचा परिणाम म्हणून अनेक शिक्षित तरूण लेखन करू लागले. ते लेखन मुळातच इंग्रजी साहित्याच्या धर्तीवर अवलंबून होते. त्यामुळे या कालखंडातील बहुतांशी लेखन अनुवादित स्वरूपाचे दिसून येते. इंग्रजीतील लेखनाचे मराठीत विपुलतेने भाषांतर होऊ लागले त्यामुळेच १८०० ते १८७४ या कालखंडास 'भाषांतर युग' म्हटले आहे. मूळ लेखक व भाषांतरकार हे सामान्यत: एक व्यक्ती नसतात. ते भिन्न व्यक्तिमत्त्व असलेली दोन माणसे असतात. मूळ लेखनाकडे पाहण्याची भाषांतरकाराची दृष्टी वेगळी असते. ज्या भाषेमध्ये अनुवाद होतो त्या भाषेची प्रकृती, प्रवृत्ती, संस्कृती याचाही

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

विचार अनुवादकाने लक्षात घेतलेला असतो.

अनुवाद करताना अनुवादकाला दोन्ही भाषांचे (मूळ भाषा व लक्ष्य भाषा) ज्ञान असावे लागते. दोन्ही भाषेतील प्रकृती, प्रवृत्ती, संस्कृती याचे ज्ञान अनुवादकाला असणे गरजेचे असते. भाषा आकलन व भाषा उपयोजनाचे कौशल्य अनुवादकाजवळ असेल तर अनुवाद करणे सोपे होते.

**अनुवादाचे महत्त्व :** अनुइवद्कचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आज जागतिकीकरणामुळे सारे जग जवळ आले आहे. जगभरातील देवाणघेवाण अनुवादामुळे अधिक शक्य झाली आहे. प्रदेशानुरूप कला, साहित्य आणि संस्कृती यांचा अनुवादाच्या माध्यमातून शोध घेता येतो. अनुवादामुळे वेगवेगळ्या देशातील उद्योग, व्यवसाय, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, धर्मव्यवस्था, राज्यव्यवस्था, मूल्यव्यवस्था समजण्यास मदत होते. अनुवादामुळे ज्ञान मिळविणे, ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करणे सोपे झाले आहे. अनुवादामुळे देश-विदेशातील माणसांचे जीवन, त्यांच्या वृत्ती प्रवृत्ती, आवडी-निवडी या गोष्टींचा शोध घेता येतो. अनुवादकाला प्रत्येक क्षेत्रात महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**अनुवादाच्या क्षेत्रातील रोजगाराच्या संधी :**

**१) अनुवादक आणि साहित्याचे क्षेत्र-** अनुवाद करण्यासाठी सर्वात महत्त्वाचे क्षेत्र आहे ते साहित्याचे. साहित्यातील कथा, कादंबरी, कविता, आत्मकथन, चरित्र व नाटक या प्रकारांचा मोठ्या प्रमाणावर अनुवाद होतो. आज मानवाने निर्माण केलेल्या ललित आणि वैचारिक वाङ्मयाचा व्यवहार जागतिकीकरणामुळे सर्वदूर पोहोचला आहे. मराठीतील दलित साहित्याचा सर्वप्रथम हिंदी भाषेत अनुवाद झाला आणि त्यानंतर इतर भारतीय भाषांमध्येही झाला. त्याचे सर्व श्रेय अनुवादकानांच जाते. भारतीय साहित्य एकत्रित आणण्यासाठी सर्व भाषेतील अनुवाद आवश्यक आहे. जागतिक पातळीवरील सर्व भाषातील साहित्याचा अनुवाद जर प्रत्येक भाषेमध्ये झाला तर मनुष्य सांस्कृतिक, वैचारिक व संवेदनात्मक दृष्टीने समृद्ध झाल्याशिवाय राहणार नाही. ज्याला अनुवादाची कला अवगत आहे त्याला अनेक चांगली दुसऱ्या भाषेतील पुस्तके मातृभाषेत अनुवादित करून प्रकाशन व्यवसायही करता येऊ शकतो. अनुवादामुळे साहित्य भाषेच्या सर्व सीमा ओलांडून व्यापक होत आहे. अनुवादक म्हणून साहित्याच्या क्षेत्रात रोजगाराच्या व्यापक संधी आज उपलब्ध आहेत. एखाद्या साहित्य कृतीचा अनुवाद किती काळजीपूर्वक केला पाहिजे याबद्दल सुप्रिया वकील म्हणतात, 'पुस्तकाचा अनुवाद करताना जीवन व भाषानुभावाचा कस लागतो. अनुवाद ही टाईमपास म्हणून करण्याची गोष्ट नाही. त्यासाठी एकाग्रता, सचोटी गरजेची असते. अनुवाद ही काळाची गरज बनली आहे.'[२] त्याचबरोबर वेगवेगळ्या भाषेतील इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, अभियांत्रिकी, वैद्यकीय क्षेत्रातील अनुवादाच्या संधी उपलब्ध आहेत. जगातील विविध नामवंत पुस्तके रुपांतरीत व भाषांतरित झाल्याने अनेक प्रकारच्या ज्ञानात भर पडत आहे.

**अनुवाद आणि माध्यमे** : चित्रपट जगतात मौखिक आणि लिखित या दोन्ही पद्धतीने अनुवाद करता येतो. भारताच्या अनेक भागामध्ये तयार होणाऱ्या प्रादेशिक चित्रपटांचे डबिंग आता हिंदी, इंग्रजी अशा भाषांमध्ये मोठया प्रमाणात होत

आहे. चित्रपटाचे डबिंग हे अनुवादकाचेच क्षेत्र आहे. इंग्रजीमध्ये तयार केलेल्या कार्टून फिल्म्स त्या-त्या प्रादेशिक भाषांमध्ये अनुवादाद्वारे लहान मुलांपर्यंत पोहोचविल्या जातात.

संपादक, वृत्तनिवेदक, स्क्रिप्ट रायटर, संवाद लेक अशा विविध पदावर अनुवादकाला व संवादकाला स्थान मिळताना दिसते. आज उत्तम पत्रकार, उत्तम अनुवादक होताना दिसतो. पत्रकाराला किंवा माध्यमाच्या क्षेत्रातील लोकांना विविध भाषांचे, भाषांतराचे, संवादाचे कार्य करावे लागते. हे कार्य तो प्रामाणिकपणे करतो. तेव्हा या माध्यमाच्या क्षेत्रातील मोठ्या संधी त्याला मिळतात.

दूरदर्शन हे २४ तास प्रक्षेपण करणारे असे महत्त्वपूर्ण मध्यम आहे. आज प्रत्येक चॅनल्सनी आपल्या स्वतंत्र बातम्या, क्रीडाविषयक कार्यक्रम सुरु केलेले आहेत. त्याचबरोबर प्रादेशिक चॅनल्सही सुरु झालेले आहेत. मूळ इंग्रजी किंवा हिंदी भाषेतून प्रसारित होणारे कार्टून, रामायण, महाभारत सारखे कार्यक्रम मराठी अल्फा, ईटीव्हिवरती अनुवादित होऊन प्रसारित होताना दिसतात. अनुवादकाला येथेही रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते.

आज विविध नियतकालिके, रेडिओ, चित्रपट यासारख्या प्रसारमाध्यमांचा वाढता प्रसार, प्रभाव आणि त्या माध्यमातून विस्तारणारे अनुवादकाचे क्षेत्र ही अनुवादकांसाठी एक मोठी संधी आहे. जगभर लोकप्रिय असणारे टॉम अँड जेरी, ऑगी अँड कॉकरोच, चार्ली चॅपलीन हे मुलांसाठी कार्यक्रम आणि डिस्कव्हरी, नॅशनल जिओग्राफी, हिस्ट्री या आंतरराष्ट्रीय स्तरावरील दूरप्रक्षेपण करणाऱ्या वाहिन्यांनी भारतामध्ये हिंदी भाषेत आपले प्रसारण सुरु केले आहे. विविध प्रादेशिक भाषांमध्ये या कार्यक्रमांचे प्रसारण करण्यासाठी आज अनुवादकांची गरज आहे. अनुवादासंबंधी प्रा.संदीप किर्दत जी का कहना हैं कि, 'अनुवाद के माध्यम से रोजगार के अवसर भी अधिक है। जो व्यक्ती अनुवाद प्रक्रिया, अनुवाद के भेद, तत्त्व, साधन और सफल अनुवादक के लिए आवश्यक गुणों की साधना करता है तथा संगणक साक्षर है वह अनुवाद कला के बूते अच्छी खासी नौकरी एवं स्वतंत्र व्यवसाय कर सकता है। साहित्य, फिल्म, उद्योग, जनसंचार माध्यम, राजनीतिक, शिक्षा, पर्यटन, वाणिज्य एवं बहुज्ञता आदि अनुवाद के लिए उर्वर भूमी है।"[३] अनेक क्षेत्रामध्ये अनुवादकाची आज गरज वाढते आहे हेच यावरून लक्षात येते.

**अनुवाद आणि उद्योग व्यवसाय :**

अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या विस्तारासाठी आपले जाळे जगभरातील विविध देशामध्ये पसरवित आहेत. आपल्या उत्पादित वस्तूच्या विक्रीसाठी त्यांना जगातील विविध भाषांची मदत घ्यावी लागते आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या वस्तूंच्या विक्रीसाठी त्या-त्या प्रादेशिक भाषेतील अनुवादकांची गरज आहे.

**वैद्यकीय क्षेत्रातील संधी :**

रुग्णाला मार्गदर्शन करण्यासाठी किंवा समुपदेशक म्हणून आज वैद्यकीय क्षेत्रात गरज निर्माण झाली आहे. वैद्यकीय क्षेत्रातील चांगली पुस्तके भाषांतरित तर होतातच पण या क्षेत्रात मोठ्या हॉस्पिटलमध्ये समुपदेशक, कौन्सिलर, जनसंपर्क अधिकारी अशी पदे भरली जातात. यातूनही रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

**समारोप :**

आज अनुवादाचे क्षेत्र महत्त्वपूर्ण मानले जात आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासकीय, व्यापार, उद्योगजगत, इलेक्ट्रॉनिक्स माध्यम अशा अनेक क्षेत्रांमध्ये अनुवादक म्हणून रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. त्याप्रकारे जीवनात तसेच व्यवहाराच्या अनेक क्षेत्रामध्ये अनुवादाची आवश्यकता आहे. तशीच अनुवादकांचीही आहे. जसे अनुवादकासाठी हे क्षेत्र रोजगार म्हणून महत्त्वपूर्ण आहे तसेच आत्मिक समाधानासाठीही महत्त्वपूर्ण आहे. एखाद्या देशाच्या प्रगतीसाठी अनुवादकाची गरज असते तशाच प्रकारे मानवाच्या समाजाच्या प्रगतीसाठीही अनुवादकाची गरज आहे. विश्वसंस्कृती जोडण्यासाठी अनुवाद सेतूबंधनाचे काम करतो. अनुवाद या कलेमुळे विश्वातील एकतेचे व नवनिर्मितीचे कार्य होते म्हणूनच अनुवाद ही २१ व्या शतकातील गरज आहे असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ :**

*१) परांजपे प्र. न., 'मराठी वाड्.मयकोश' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पृ. ९*

*२) वकील सुप्रिया दै पुढारी, ३१ ऑक्टोंबर, २०२२, पृ. ५*

*३) संपा. डॉ. किर्दत, डॉ. जाधव 'अनुवाद स्वरूप, एबीएस प्र. वाराणसी प्र.सं. २०१४, पृ. २९*

*Cite This Article:*

*डॉ. नलावडे कां. वि. (2025). अनुवादाचे महत्त्व आणि रोजगाराच्या नव्या संधी.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 38–41).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# भाषांतरातील आव्हाने

* डॉ. क्रांती हरेश पैठणकर

* सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय शिरूर, जि.पुणे,

भाषा म्हणजे केवळ शब्दांचा संग्रह नव्हे ती माणसाच्या विचार, भावना व्यक्त करण्याची, परस्परांशी संवाद साधण्याची आणि समाजाशी नाळ जोडणारी सजीव शक्ती आहे. भाषा ही माणसाच्या मनाची आणि समाजाच्या रचनेची एक मूलभूत गरज आहे. भाषा म्हणजे निव्वळ अर्थवाही शब्द नसतात, तर त्या त्या भाषेबरोबर त्या त्या भाषिकांची, प्रदेशाची संस्कृती येते. भाषा ही सामाजिक करारावर आधारलेली चिन्हव्यवस्था आहे. मानवाच्या एकूणच समाजाच्या विकासात भाषेचे स्थान अनन्यसाधारण आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून संस्कृती, परंपरा, विचार प्रणाली आणि मानवी भावना यांच्या अभिव्यक्तीचे माध्यम आहे. जगातील प्रत्येक समाजाची, प्रत्येक समूहाची स्वतःची सांस्कृतिक ओळख त्यांच्या भाषेतच अंतर्भूत असते. समाजात व्यवहारपूर्तीचे साधन म्हणून भाषेचाच वापर केला जातो. म्हणूनच भाषा ही एक सामाजिक संस्था ठरते. शतकानुशतके मानवसमूहामध्ये संवाद, व्यापार, राजनैतिक संबंध, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि ज्ञानविस्तार यासाठी भाषांचा परस्पर संबंध वाढत गेलेला दिसतो. भारतासारख्या बहुभाषिक देशात वेगवेगळ्या प्रांतात भिन्न भिन्न भाषा बोलल्या जातात. या बहुभाषिक लोकांमध्ये विचारांची देवाण-घेवाण व्हावी म्हणून उपयुक्त असणारे साधन म्हणजे भाषांतर होय. भाषांतर म्हणजे मौखिक किंवा लिखित भाषेच्या माध्यमातून एकदा व्यक्त झालेल्या आशयाची त्याच भाषेच्या किंवा दुसऱ्या भाषेच्या माध्यमातून पुन्हा केलेली मौखिक किंवा लिखित अभिव्यक्ती होय. डॉ. कल्याण काळे यांनी भाषांतराची अतिशय संयुक्तिक अशी व्याख्या केली आहे. "भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत त्याच्या शैली वैशिष्ट्यांसह उतरवण्याची कला. मूळ संहितेच्या वाचनाने मिळणारे ज्ञान आणि विचार, आनंद आणि अनुभव दुसरी भाषा बोलणाऱ्याला त्याच्या भाषेत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न म्हणजे भाषांतर होय. भाषांतर केवळ आनंद देत नाही तर, अन्य भाषिक संस्कृतीचा, समाजाचा परिचय करून देते. आपली आत्ममग्नता आणि आत्मसंतुष्टता यांना छेद देऊन आपली दृष्टी विशाल उदार बनवते. " एकूणच भाषांतरविद्येचे हे महत्त्व ओळखून डॉ. कल्याण काळे यांनी निरनिराळ्या अंगांनी 'भाषांतरमीमांसा' या ग्रंथामध्ये त्याची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भाषा आणि भाषांतराचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. विविध देश, संस्कृती आणि समाज एकमेकांच्या अधिक जवळ येत आहे. डिजिटल माध्यमे, इंटरनेट आणि सामाजिक नेटवर्किंगमुळे माहितीचा प्रवाह अनियंत्रित वेगाने वाढतो आहे. अशा परिस्थितीत भाषांतर हे जगाला जोडणारे ज्ञानप्रवाह वाढवणारे आणि संस्कृतीमध्ये संवाद साधणारे एक अनिवार्य माध्यम बनले आहे.

भाषांतर ही दोन संस्कृतींना जोडणारी साखळी आहे. एका भाषेतील वाचकांना दुसऱ्या भाषेतील विचारप्रवाह, जीवनशैली, आणि भावविश्व समजून घेण्यास भाषांतर मदत करते. योग्य भाषांतरामुळे सांस्कृतिक अंतर कमी होते आणि परस्पर समज वाढते.भाषांतरात नेहमीच 'शब्दशः' आणि 'भावार्थानुसार' भाषांतर यामध्ये संतुलन राखण्याची गरज असते. मूळ लेखनाशी निष्ठा राखत असताना, नवीन भाषेत ते तितकेच प्रभावी आणि नैसर्गिक वाटणे आवश्यक असते. हे संतुलन साधणे म्हणजेच एक प्रकारचे कलाकौशल्य आहे. भाषांतरात भाषांतरकाराची भूमिका ही महत्त्वाची असते.भाषांतरकार हा केवळ शब्दांचा वाहक नसतो; तो एक सहनिर्माता असतो. मूळ लेखकाच्या भावविश्वाचा अर्थ लावून ते दुसऱ्या भाषेत पुनर्निर्मित करणे ही एक कल्पक प्रक्रिया आहे. तांत्रिक कौशल्य, भाषिक संवेदनशीलता आणि सांस्कृतिक जाण या सर्व गुणांचा मिलाप म्हणजे भाषांतरकाराचे खरे सामर्थ्य..भाषांतर ही केवळ एक प्रक्रिया नाही, तर ती संवेदनशीलता आणि सौंदर्य जपणारी एक कला आहे. योग्य भाषांतराचे महत्त्व आजच्या जागतिकीकरणाच्या युगात अधिकच वाढले आहे.

भाषांतर, अनुवाद, रूपांतर या संकल्पना अगदी प्राचीन काळापासून प्रचलित आहे. भाषांतर आणि अनुवाद या दोन्ही संज्ञा हल्ली समानार्थी म्हणून वापरल्या जातात याविषयी विवेचन करताना डॉ. कल्याण काळे 'भाषांतर मीमांसा- एक दृष्टिक्षेप' या आपल्या लेखात म्हणतात की, "अनुवाद ही व्यापक संज्ञा असून भाषांतर ही तिच्यात सामावणारी, तिच्या एक प्रकारचा निर्देश करणारी संज्ञा आहे. भाषांतर हा ही अनुवादच असल्याने त्यातही सारांश, विस्तार, स्पष्टीकरण, गद्यरूपांतर, पद्यरूपांतर इ. प्रकार संभवतात. पण एकभाषिक अनुवादामध्ये सहसा न आढळणारा एक प्रकार भिन्न भाषिक अनुवादामध्ये आढळतो. तो म्हणजे एका भाषेतील संहितेचा अर्थ दुसऱ्या भाषेमध्ये उतरवून प्रतिसंहिता तयार करणे हा होय. याच प्रकाराला रूढ अर्थाने भाषांतर असे म्हणण्याचा प्रघात आहे." तर भाषांतर व अनुवाद याविषयी विवेचन करताना डॉ. उज्ज्वला जोगळेकर म्हणतात, 'लिखित मसुद्याचे ते भाषांतर' व 'मौखिक अभिव्यक्तीचा तो अनुवाद'. निशिकांत ठकार यांनीही या संकल्पनांचा मागोवा घेताना आपल्या 'भाषांतर प्रसंग' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, "भाषांतर आणि अनुवाद हे दोन्ही शब्द मराठीत सध्या प्रायः समानार्थाने वापरले जात आहेत. त्यात विवेक करण्याची गरज आहे. साहित्यिक भाषांतरासाठी अनुवाद आणि अन्य वा सर्व त-हेच्या एका भाषेतून दुसऱ्या भाषेत जाण्याच्या प्रक्रियेसाठी भाषांतर हा शब्द वापरावा अशी एक भूमिका सर्वसाधारणपणे मान्य होत आहे असे दिसते. मराठीत भाषांतर या शब्दाला ऐतिहासिक परंपरा आहे व मराठी साहित्याच्या आधुनिक इतिहासात एक भाषांतर युगही होऊन गेले आहे."

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

भाषांतराविषयी आपली भूमिका स्पष्ट करताना निशिकांत ठाकर पुढे असेही म्हणतात की, "पुन्हा एकदा भाषांतरयुग आले आहे असे वाटणे इतकी भाषांतरे होऊ लागली आहेत परदेशी भाषांबरोबरच भारतीय भाषांतील साहित्याची ही ओळख होऊ लागली आहे आपल्या विश्वाच्या कक्षा वाढतील तर त्याचे स्वागतच करायला हवे." एकूणच आजच्या काळात भाषांतराचे वाढते महत्त्व व आवश्यकता यातून सूचित होतेच तसेच वरील अभ्यासकांनी भाषांतर व अनुवाद या संकल्पनेचा घेतलेला मागोवा लक्षात घेता या दोन स्वतंत्र संज्ञा आहे हे सुद्धा लक्षात येते.

भाषांतर शास्त्र की कला? या ग्रंथात प्रा.म.वि. फाटक व रजनी ठकार यांनी भाषांतराच्या प्रक्रियेबद्दल अधिक विस्ताराने मांडणी केली आहे ते म्हणतात," एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत उतरवणे म्हणजे भाषांतर होय. मुळात Translation ही संकल्पना लॅटिन वाङ्मयात आहे. Trans व Lation दोन शब्दांतून ही संकल्पना तयार होते. Trans म्हणजे पलीकडे अथवा पार आणि Lation म्हणजे नेणे अथवा नेण्याची क्रिया करणे. म्हणजेच या संकल्पनेत स्थलांतर अभिप्रेत आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे अथवा पार करणे म्हणजेच स्थलांतर करणे हा अर्थ यात अभिव्यक्त होतो. पुढे स्थलांतराकडून ही संकल्पना भाषेकडे वळली. एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत आणणे ही कल्पना अर्थपरिवर्तनाने रूढ झाली. कालांतराने अर्थपरिवर्तनातून अर्थविस्तार झाला व Translation म्हणजे भाषांतर हा शब्द मराठीत अर्थ विस्तारातून आला व मान्यता पावला. एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत उतरवणे हा अर्थ सर्वत्र मान्य केला गेला." भाषांतर ही संज्ञा कशी सर्वमान्य झाली हे यातून कळते.भाषांतर ही कला आहे की शास्त्र याबाबतही वाद निर्माण होताना दिसतो परंतु भाषांतर ही प्रक्रिया तांत्रिक आणि सृजनशीलता या दोघांनाही आधार देते दोन्ही तत्वांचा समन्वय भाषांतरात होत असल्यामुळे भाषांतर हे शास्त्रही आहे व कलाही आहे असे म्हणता येते.

खरे पाहता मराठीतील भाषांतर विचाराला स्वतःची अशी पूर्वपीठिका नाही. भारतात ब्रिटिशांचे राज्य सुरू झाल्यानंतर मराठीत भाषांतराचा विचार सुरू झाला. मराठीत जो भाषांतर विचार मांडला गेला तो मुख्यत्वे पाश्चात्य भाषांतर विचाराच्या आधारेच आला असला तरी आजच्या जागतिकीकरणाच्या, विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात भाषांतर प्रक्रिया ही अतिशय गतिशील झालेली आहे असे दिसून येते.

भाषांतर या संकल्पनेचा विकास कसा झाला याविषयी विवेचन करताना अंजली सोमण म्हणतात,"भाषांतर ही एकीकडे व्यक्तिनिष्ठ कला आहे तर दुसरीकडे समाज जीवन, संस्कृती, तत्वविचार, साहित्यविचार, भाषाविचार इत्यादी सर्वांशी भाषांतर विद्येचा संबंध येत असतो. भाषांतराच्या या गुंतागुंतीच्या प्रक्रियेमुळे भाषांतर संकल्पनेच्या इतिहासाचे नेमके टप्पे ठरवणे अवघड आहे. मात्र भाषांतर संकल्पनेचा विकास कसा झाला याचा स्थूल आलेख काढणे शक्य होते. जॉर्ज स्टेनरने आपल्या 'आफ्टर बायबल' या ग्रंथात भाषांतर संकल्पनेच्या विकासाचे चार टप्पे सांगितले आहे. पहिला रोमन कालखंड, दुसरा बायबलच्या भाषांतराचा, तिसरा 1940 नंतर यांत्रिक भाषांतर सुरू झाल्यानंतरचा आणि चौथा 1960 नंतर मांडल्या गेलेल्या नव्या संकल्पनांचा." याचाच अर्थ रोमन कालखंडापासून म्हणजे ख्रिस्त पूर्व पहिल्या शतकापासून पाश्चात्य देशात भाषांतरमीमांसेचा विचार सुरू

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

झाला. एरिक याकोबसनने तर असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, भाषांतर करणे ही रोमन लोकांनी शोधलेली कला आहे. तिथपासून ते आजपर्यंत भाषांतर या संकल्पनेचा काळानुरूप टप्प्याटप्प्याने कसा विकास झाला हे यातून दिसून येते.

भाषांतर ही केवळ एक भाषेतून दुसऱ्या भाषेत शब्दांचे रूपांतर करण्याची क्रिया नाही; ती एक गुंतागुंतीची बौद्धिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रक्रिया आहे. भाषांतरकाराला मूळ मजकुराचा अर्थ, सूक्ष्मता, शैली, प्रसंग, आणि सांस्कृतिक संदर्भ अचूकपणे समजून तो लक्ष्यभाषेत जिवंत करण्याची कला अवगत असावी लागते. जागतिकीकरणाच्या युगात भाषांतराची मागणी वाढली असली तरी, त्यासोबत आव्हानांची गुंतागुंत देखील वाढत चालली आहे. भाषांतरातील आव्हाने पुढीलप्रमाणे सांगता येतील.

- **शब्दांचे बहुअर्थत्व — योग्य अर्थ शोधण्याचे आव्हान**

  एकाच शब्दाचे विविध अर्थ असू शकतात. उदा.: इंग्रजी “Light” या शब्दाचे प्रकाश,हलके,कमी वजनाचे इ.असे अनेक अर्थ निघतात.वाक्याच्या संदर्भानुसार योग्य अर्थ शोधणे ही संशोधनात्मक प्रक्रिया आहे. अनुवादकाला संदर्भ, विषय, मूळ लेखकाचा हेतू, तसेच भाषिक पातळी तपासावी लागते. बऱ्याचदा दुसऱ्या भाषेत काही संकल्पनांना थेट समतोल शब्द मिळत नाही. तर साहित्यिक, धार्मिक, तांत्रिक, वैज्ञानिक किंवा वैद्यकीय शब्द दुसऱ्या भाषेत वेगळ्या संदर्भाने वापरले जातात. अशावेळी भाषांतर कर्त्याला शब्दाचा योग्य अर्थ शोधण्याचे आव्हान असते. तसेच अशावेळी त्याला बहुभाषिक असणेही अत्यंत गरजेचे असते.

- **मूळ रचनेतील लय, ताल, भाव आणि प्रतिमा टिकवणे**

  भाषांतर म्हणजे केवळ एका भाषेतील शब्द दुसऱ्या भाषेत रूपांतरित करणे नव्हे. ती एक सर्जनशील आणि संवेदनशील प्रक्रिया आहे. विचार, भावना, संस्कृती आणि संदर्भ यांचे नेमकेपणाने स्थानांतर करणे ही एक अत्यंत सूक्ष्म कला आहे. म्हणूनच, भाषांतरकाराला दोन्ही भाषांचे ज्ञान जितके आवश्यक असते, तितकीच कलात्मक दृष्टीही आवश्यक असते.शब्दांचा अर्थ शब्दांतूनच व्यक्त होतो असे नाही; त्यामागील भावार्थ, उद्देश, आणि लेखकाने निर्माण केलेली वातावरणशैलीही महत्त्वाची असते. उदाहरणार्थ, कविता किंवा साहित्यकृतीचे भाषांतर करताना फक्त भाषिक समानता पुरेशी नसते; मूळ रचनातील लय, ताल, भाव, आणि प्रतिमा टिकवणे ही भाषांतराची खरी कसोटी ठरते.

- **व्याकरणातील भिन्नता**

  इंग्रजी आणि इतर भारतीय भाषा यात वाक्यरचनेच्या पातळीवर मोठाच फरक आहे. कर्ता-कर्म -क्रियापद हा आपल्या भारतीय भाषांचा सहज क्रम. इंग्रजीत मात्र कर्ता-क्रियापद -कर्म अशी रचना असते त्यात शब्दांचे कार्य त्यांच्या स्थानावर अवलंबून असते.विविध भाषांची व्याकरणात्मक संरचना भिन्न असल्यामुळे अनेकदा वाक्यरचना बदलावी लागते. यामुळे थेट शब्दशः भाषांतर अनेकदा अयोग्य ठरते. प्रत्येक भाषेची व्याकरण एक वैशिष्ट्ये वेगवेगळी असू शकतात त्यामुळे भाषांतर प्रक्रियेचा घाट बदलतो. तेव्हा शब्दचिन्हांचे व्याकरण रूपही बदलते. भाषांतरकाराला व्याकरणाविषयी जागृत

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

राहिले पाहिजे. अनुवाद करताना वाक्ये जशीच्या तशी भाषांतरित न करता, लक्ष्यभाषेच्या नैसर्गिक प्रवाहाशी जुळवून घ्यावी लागतात. यासाठी भाषाविज्ञानाचे संशोधन आवश्यक आहे. काळ, वचन, लिंग सर्व भाषांमध्ये सारखे नसतात. इंग्रजीला लिंगभेद कमी तर मराठीत सर्व शब्दांना लिंग असते. भाषांतर करताना वाक्यांची लांबी, उपवाक्यांचे स्थान अलंकारिक रचना जपणे म्हणजे तारेवरची कसरत होते.

- **शब्दांची लवचिकता, शब्दाच्या विविध अर्थछटा, भावछटा इ.जाण हवी**

भाषांतराबाबत आपला असा समज असतो की ज्या दोन भाषांचा भाषांतराशी संबंध असतो त्या दोन्ही भाषांमध्ये आवश्यक तेवढे शब्द परिचित असले म्हणजे भाषांतर करता येईल. पण तसे नसते त्या दोन्ही भाषातील शब्दांचा तर परिचय असावा लागतोच पण त्या शब्दांच्या विविध अर्थछटा व भावछटा यांचाही बारकावा माहिती असावा लागतो. काही भाषांमध्ये शब्दांचे अर्थ अत्यंत संदर्भाधारित असतात. एकाच शब्दाला अनेक सांकेतिक, भावनिक किंवा रूपकात्मक अर्थ असू शकतात. याची जाण भाषांतरकाराला नसल्यास भाषांतर कृत्रिम होण्याची शक्यता असते.

- **सांस्कृतिक पार्श्वभूमीची जाण हवी**

भाषांतरात संस्कृतीचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. भाषा प्रत्येक संस्कृतीची प्रतिनिधी असते. मूळ कृती ज्या सांस्कृतिक पिंडातून घडली त्याची पूर्ण ओळख भाषांतरकर्त्याला असणे फार आवश्यक असते. शिरीष सहस्रबुद्धे भाषांतरातील आव्हांनाबाबत विवेचन करताना म्हणतात, "विशिष्ट संस्कृतीचे गुणधर्म अथवा सांस्कृतिक वैशिष्ट्ये यांची भाषानिहाय विशिष्टता त्यांच्या अनुवादामध्ये अडचणी उपस्थित करते. यालाच आपण सांस्कृतिक अडसर किंवा हस्तक्षेप म्हणतो. शब्दांच्या मागे जे सांस्कृतिक संदर्भ उभे असतात त्यांच्यामुळे त्यांच्या अनुवादात अन्य भाषेतील पर्यायी शब्द वापरणे अत्यंत आव्हानात्मक ठरते. आपल्याकडच्या भाषांमध्ये बालकाच्या जन्मापूर्वीचे व जन्मानंतरचे विधी आणि हिंदू व्यक्तीच्या मृत्यूनंतरचे पारंपरिक विधी यांना खूप महत्त्व दिले जाते. सटवाईपूजनासारखे विधी म्हणा किंवा उठामणा, दशक्रिया विधी, तेरावे, वर्षश्राद्ध यांना इंग्लिश अथवा अन्य युरोपीय भाषांमध्ये थेट प्रतिशब्द नाही. त्यासाठी अनुवादकास भरपूर शोधाशोध व आटापिटा करावा लागतो." भाषांतर कर्त्याला सांस्कृतिक पार्श्वभूमीची जाण असणे किती महत्त्वाचे आहे हे यातून स्पष्ट होते.एखाद्या भाषेमध्ये ज्या संकल्पना सहज आणि नैसर्गिक वाटतात, त्या दुसऱ्या भाषेत अस्तित्वातच नसू शकतात किंवा त्यांचा अर्थ बदलतो. अशावेळी त्या संकल्पनेचा ऐतिहासिक धार्मिक आधार काय ? मूळ संस्कृतीतील भावार्थ कसा जपायचा? त्या संकल्पनेला दुसऱ्या संस्कृतीतील कोणता जवळचा संदर्भ लागू होईल हा शोध अनुवादकाला घ्यावा लागतो अन्यथा भाषांतर तुटक, कृत्रिम व अपूर्ण ठरेल.

- **वाक्प्रचार आणि म्हणींचे भाषांतर**

म्हणींचे शब्दशः भाषांतर केल्यास विनोदी किंवा चुकीचा

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

अर्थ निघू शकतो. भाषांतरात भाषेतील म्हणी, वाक्प्रचार यांचा समर्पक वापर करता येणे हे भाषांतराचे यश असते. म्हणी शब्दशः अनुवादित करता येत नाही. त्या म्हणींमागील सामाजिक किंवा ऐतिहासिक कारण शोधणे, मूळ भाषेत तिचा व्यंजनार्थ काय, लक्ष्यभाषेत त्याच अर्थाची पर्यायी म्हण आहे का हा शोध न घेतल्यास आशय हरवण्याची शक्यता असते.

- **साहित्यिक भाषांतरातील गुंतागुंत**

भाषांतर म्हणजे फक्त शब्द बदलणे नाही तर भाव जपणे इथे महत्त्वाचे असते.साहित्यिक रचना, कविता, कादंबरी, नाटक यामध्ये ध्वनीवैशिष्ट्ये, लय, अलंकार, लेखकाचा भाव, त्याची विशिष्ट शैली टिकविणे अत्यंत आव्हानात्मक असते. मुळात लेखक ज्या भावनेत वाक्य लिहितो ते वाचकांपर्यंत तितक्याच प्रभावाने पोहोचवणे आवश्यक असते. .काव्याचे भाषांतर करताना मूळ लय राखणे आणि अर्थ कायम ठेवणे हे दोन्ही साधणे आव्हानात्मक आहे.. 'ललित साहित्याचे भाषांतर -एक यक्षप्रश्न' या लेखात प्रा. लीला अर्जुनवाडकर याविषयी म्हणतात, "भाषांतर कर्त्याची सत्वपरीक्षा पाहणारा घटक म्हणजे मूळ कृतीतील काव्यात्मकता. ती भाषांतरात उतरवायची म्हणजे चांदणे मुठीत पकडण्यासारखे असते. त्याबाबतीत अमुक करावे, तमुक करू नये असे सांगणे केवळ अशक्य. त्यासाठी भाषांतरकर्ता स्वतः सहृद्य रसिक असणे मात्र फार जरुरीचे आहे." एकूणच साहित्यिक भाषांतर करणे भाषांतर कर्त्याच्या दृष्टीने एक कसोटीच असते.

- **तांत्रिक आणि शास्त्रीय भाषांतरातील समस्या**

वैद्यकीय, अभियांत्रिकी, जैविक, कायदेशीर संगणकशास्त्र अर्थशास्त्र या क्षेत्रात अत्यंत अचूक शब्द लागतात. या क्षेत्रातील विविध संकल्पना नीट समजल्या नाही तर भाषांतर चुकीचे होऊ शकते.भाषांतरात एकही शब्द चुकीचा चालत नाही. प्रत्येक संज्ञा अचूक असावी लागते.तंत्रज्ञान किंवा विज्ञानातील अद्ययावत माहिती असणे तसेच योग्य मराठी संज्ञा किंवा अधिकृत शासकीय सूची, व्यावसायिक क्षेत्रात स्वीकारली जाणारी शब्दयोजना इत्यादी बाबींची माहिती भाषांतरकर्त्याला असणे अत्यंत गरजेचे असते. विज्ञान, वैद्यक, अभियांत्रिकी, कायदा, अर्थशास्त्र इत्यादी क्षेत्रांत विशिष्ट संज्ञा अपरिहार्य असतात. चुकीचे भाषांतर गंभीर दुष्परिणाम करू शकतात. मराठी विश्वकोशाच्या खंडात भाषांतर या संकल्पनेच्या विषयी विवेचन करताना याबाबत असे म्हटले आहे की, "विज्ञान, इतिहास, अर्थशास्त्र यासारख्या विषयातील मजकुराचे भाषांतर करणे तुलनेने काहीसे सोपे असते. कारण यात केवळ वाच्यार्थ अपेक्षित असतो. संकेतार्थ,गूह्य वा गूढ अर्थ, भाषेच्या शैलीची वैशिष्ट्ये यासारख्या अवघड गोष्टींचा संबंध अशा भाषांतरात कमी येतो. परंतु या विषयात नित्यनव्या संकल्पनांची, शोधांची, माहितीची व त्याला अनुसरून शब्दांची भर पडत असल्याने त्यासाठी मराठी प्रतिशब्द शोधणे व रुढ करणे हे आव्हानात्मक काम आहे."

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

- **वेगाने बदलणारी तांत्रिक प्रगती**

जागतिकीकरणाच्या व विज्ञान तंत्रज्ञानाच्या या युगात नवीन तंत्रज्ञानासाठी नवनवी संज्ञा उदयास येत असतात, ज्यांचे स्थानिक भाषांतील पर्याय लगेच उपलब्ध नसतात. भाषांतरकारासमोर हे एक मोठे आव्हान असते त्यामुळे भाषांतरकारांनी सतत अद्ययावत रहाणे गरजेचे असते.

- **यंत्रणात्मक व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मर्यादा**

विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात आज Google Translate किंवा AI-आधारित अनुवाद साधने खूप प्रगत झाली असली तरी भावार्थ, सांस्कृतिक संदर्भ ओळखण्यात अजूनही मर्यादा आहेत. अर्थातच यंत्रणात्मक व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मर्यादा भाषांतरकर्त्याला आव्हानात्मक ठरू शकतात.

- **बोलीभाषांचा विविधतेचा प्रश्न**

प्रत्येक बोली ही त्या भागाच्या सांस्कृतिक जडणघडणीचा भाग असते. बोलीभाषेतील वाक्प्रचार, म्हणी आणि सांस्कृतिक संदर्भ भाषांतरामध्ये अचूकपणे मांडणे कठीण होते. बोलीभाषा ही एखाद्या समुदायाच्या ओळखीचा आणि संस्कृतीचा भाग असते. भाषांतर करताना त्यातील सांस्कृतिक ओळख टिकून ठेवणे भाषांतरकारासाठी मोठे आव्हान असते. बोली भाषेतील काही विशिष्ट शब्द किंवा वाक्य प्रमाण भाषेत नसल्यामुळे त्यांच्या अर्थाचा नेमका अंदाज लावणे कठीण होते.उदा.: विदर्भातील मराठी, कोकणी मराठी, अहिराणी, वऱ्हाडी यांच्या शब्दांचा अर्थ सर्वत्र सारखा नसतो. यासाठी भाषांतरकाराला स्थानिक समाजशास्त्र, त्या प्रदेशाची बोली, इतिहास, उच्चार, समानार्थी पर्याय माहीत असणे गरजेचे असते. मराठी, हिंदी किंवा इतर भारतीय भाषांच्या असंख्य प्रादेशिक बोलीभाषा आहेत. त्यांच्यातील शब्दवैविध्य व वापरातील फरक ओळखणे कठीण जाते.

- **इंग्रजीचा प्रभाव**

भारतात अनेक तांत्रिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रांत इंग्रजी प्रधान भाषा असल्याने भाषांतर करताना इंग्रजी शब्दांचा अतिवापर किंवा अनावश्यक मराठीकरण या दोन्ही समस्या उद्भवतात.

थोडक्यात भाषांतर ही फक्त भाषिक क्रिया नसून सांस्कृतिक, बौद्धिक आणि सामाजिक संवादाची महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. वरील सर्व आव्हानांचा विचार करता भाषांतरणातील आव्हाने विविध अंगांनी गुंतागुंतीची आहेत—भाषिक रचना, सांस्कृतिक संदर्भ, तांत्रिक मर्यादा, शैलीगत धागेदोरे, आणि नैतिकता. आधुनिक तंत्रज्ञानाने अनेक सोयी दिल्या आहेत, परंतु मानवी संवेदनशीलता, आकलन, आणि सांस्कृतिक समज ही भाषांतरातील प्रमुख गरज आहे. त्यामुळे भविष्यकाळातही मानवी भाषांतरकारांचे कौशल्य अतिशय महत्त्वाचे राहणार आहे.

भाषांतर ही अत्यंत सूक्ष्म आणि संशोधननिष्ठ प्रक्रिया आहे. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत विचार, शैली, भावना आणि संदर्भ जसाच्या तसा पोहोचवणे हे सहजपणे घडत नाही. भाषांतरातील प्रत्येक पायरी ही एक संशोधन यात्रा आहे. शब्द, संस्कृती, शैली, संदर्भ, विज्ञान, समाज या सर्वांचा सखोल अभ्यास करूनच चांगले भाषांतर घडते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

म्हणूनच भाषांतरातील आव्हानांवर मात करणे अत्यावश्यक आहे.अनुवादक हा केवळ शब्द बदलणारा कारागीर नसून : भाषाशास्त्रज्ञ, संस्कृतिवेत्ता, विचारवंत,संशोधक आणि सर्जनशील कलाकार यांचा संगम असतो.त्यामुळे भाषांतर म्हणजे अखंड शोध आणि उकल करण्याची विद्या असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**संदर्भ:**

*१. संपा. काळे कल्याण, सोमण अंजली – 'भाषांतर मीमांसा', प्रतिमा प्रकाशन, पुणे प्र.आ. ऑगस्ट 1997*

*२. ठकार निशिकांत, 'भाषांतर प्रसंग', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र. 2009*

*३. संपा. तावरे स्नेहल,'व्यावहारिक मराठी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे ,प्र.आ.ऑगस्ट 1995*

*४. गोविलकर लीला,पाटणकर जयश्री, 'व्यावहारिक मराठी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे*

*५. जोशी प्रभाकर, पाटील किशोर, 'उपयोजित मराठी', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव,प्रा.आ. सप्टेंबर 2015*

*६. संपा. मोडक केतकी, शेणई संतोष,शेणई सुजाता,'उपयोजित मराठी', पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्र.आ. ऑगस्ट 2012*

*७. संपा. गुर्जर रवींद्र , 'अनुवादविश्व' दिवाळी अंक, 2025*

*Cite This Article:*

*डॉ. पैठणकर क्रां. ह. (2025). भाषांतरातील आव्हाने.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 42–49).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# आधुनिक कालखंडात तौलनिक साहित्याचे स्वरूप व महत्त्व

* डॉ. गजानन विठ्ठल भोसले

* सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे-०४

**प्रास्ताविक:**

तौलनिक साहित्याभ्यास ही साहित्याच्या अभ्यासाची एक नवी शाखा आहे. तुलना या विशेषणामुळे या साहित्याभ्यासाला जे वेगळे परिमाण प्राप्त झाले. तौलनिक साहित्याभ्यासात तुलना हा घटक आधारभूत आहे. साहित्याभ्यासाला तुलना ही गोष्ट सहज लक्षात येण्याजोगी आहे. तुलनेसाठी एकापेक्षा अधिक साहित्याची अपेक्षा असणार हे उघड आहे. तुलना हाच एक स्वतंत्र सिध्दांत आहे. तुलना ही भूमिका एकदा ठामपणे स्वीकारली, म्हणजे तुलना हाच वाङ्मय निर्मितीचा पाया कसा आहे. कोणताही लेखक विशिष्ट विषय, तपशील, पात्रे निवडताना तुलना करीतच असतो. त्याच्या शब्दांच्या निवडीतही तुलनात्मकता अंगभूत असते. साहित्यकृतींच्या तुलनेमधूनच आपल्या मनातील साहित्याविषयीचे तारतम्य निर्माण होऊ लागते.

कोणत्याही साहित्याच्या अभ्यासात जर तुलना ही नेहमीच आधारभूत असते. तर कोणत्याही साहित्याभ्यासाला, तौलनिक म्हणावयास काय हरकत आहे, असा आक्षेप येथे सहजच निष्पन्न होईल. विशिष्ट साहित्याभ्यासात अनुस्यूत असलेली तुलना ही सहसा अप्रकट असते, आणि पुष्कळवेळा गृहितही धरलेली असते. साहित्याचे उत्तम, मध्यम ठरविणे आणि मूल्यकल्पना निश्चित करणे. एवढाच हेतू अशा तुलनेमागे असतो. क्वचित दोन लेखकांच्या प्रवृत्तींची, निर्मितीची तुलना होत नाही असे नाही. तेवढ्यापुरती तौलनिक साहित्याभ्यासांची पद्धती अभ्यासली जाते. तौलनिक साहित्याभ्यासात मात्र एकापेक्षा अधिक साहित्यांच्या संदर्भात प्राणभूत तत्त्व म्हणून तुलनेसाठी अंगीकारले जातात.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

तुलनात्मक साहित्य अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट होते. साहित्य अभ्यासात परिपूर्ण अपेक्षा आणि जबाबदाऱ्यांचे भान तौलनिक साहित्यात ठेवले जाते. तुलनात्मक अभ्यासाचे महत्त्व आज निश्चितच निर्विवाद आहे. आजच्या कालखंडात तुलनात्मक अभ्यासाच्या साहाय्याने विभिन्न भाषा, शैली, राष्ट्र तसेच त्यांची संस्कृती इत्यादींना आपण एकाचवेळी अभ्यासासाठी घेऊ शकतो.

मध्ययुगीन मराठी वाङ्मय आणि तौलनिक साहित्याभ्यासात तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक चळवळी आणि मराठी वाङ्मय व तौलनिक साहित्य या प्रस्तुत घटकांची मांडणी केली जाते. मध्ययुगीन कालखंड हा समूह जीवनाला प्राधान्य देणारा होता. या काळात निर्माण झालेले संत साहित्य

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहचलेले दिसून येते. तत्कालीन संतांचे विचार हे आधुनिक विचारसरणीचा पाया घालणारे होते. संस्कृत भाषेत एकवटलेले ज्ञान जनसामान्यांच्या भाषेत देण्याचे काम सर्व प्रथम संतांनी केलेले आहे. मध्ययुगीन मराठी संत बहुभाषी होते. गरज पडली तेव्हा त्यांनी इतर भाषांतही रचना केल्या. त्यात हिंदी बहुतेक सर्व मराठी संतांची दुसरी भाषा होती. मध्ययुगीन भारतीय साहित्य हा एक विलक्षण अद्भुत प्रकार आहे. तौलनिक अभ्यासाचे मूळ लोकविद्येतून आले आहे. मध्ययुगीन संदर्भात हे विशेष महत्त्वाचे आहे. या पद्धतीमुळे मौखिक साहित्याच्या अभ्यासाची गरज उत्पन्न झाली. लोककथांची आशयसूत्रे कशी स्थलांतरीत होतात. याचा अभ्यास तौलनिक साहित्यात करता येतो.

मध्ययुगीन कालखंडातील जीवनव्यवहाराला परंपरेला, संस्कृतीला आणि त्या कालखंडात निर्माण झालेल्या साहित्याला तौलनिक अभ्यासाने चांगल्या पद्धतीने समजावून घेतले जाऊ शकते. तसेच समाजात असणारी विविधता हे त्याचे मुख्य कारण आहे. एकंदरीतच प्रदेशाच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या पलीकडे जाऊन अन्य प्रांतीयांची संस्कृती, भाषा, जीवनव्यवहार समजावून घेण्यासाठी तौलनिक अभ्यासाची गरज आहे. संपूर्ण विश्वामध्ये प्रचंड भिन्नता आहे. तरीही या सर्वांच्या गरजा, मूलभूत तत्त्वे त्यांच्या समस्या यासंदर्भात काही एक समानता देखील आहे. एकूण मध्ययुगीन साहित्याच्या संदर्भात तौलनिक साहित्याची भूमिका महत्त्वाची आहे.

**तौलनिक साहित्याची संकल्पना:** तौलनिक साहित्याभ्यास ही मराठी संकल्पना इंग्रजी मधून स्वातंत्र्योत्तर कालखंडात रूढ झाली. तसेच पाश्चात्य देशात विसाव्या शतकाच्या मध्यावर या संकल्पनेच्या व्याख्येच्या व व्याप्तीच्या संदर्भात अभ्यासकांमध्ये खूप वाद झालेले दिसून येतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ही संकल्पना मराठीत आलेली आहे. तौलनिक साहित्याभ्यास ही खऱ्या अर्थाने साहित्याच्या अभ्यासाची एक नवी शाखा आहे. दोन साहित्याची तुलना करता येते येवढेच ह्या संकल्पनेत महत्त्व आहे. त्यामुळेच मराठीमध्ये तौलनिक साहित्याभ्यास अशा स्वरूपाची संकल्पना रूढ झालेली आहे. यातूनच तौलनिक साहित्याभ्यासाला सुरुवात झाली. तसे पाहिले तर ही अभ्यास पद्धती फार व्यामिश्र व गुंतागुंतीचे असल्याचे दिसून येते. अर्थातच तौलनिक साहित्याची अर्थ निश्चिती करता येत नाही.

तौलनिक साहित्यासंदर्भात एकमत असल्याचे दिसून येत नाही. त्यांच्यात भिन्न- भिन्न मतांचा समावेश असल्याचे दिसून येते. तसेच ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी विविध अभ्यासकांनी आपली मते मांडलेली आहेत, यामध्ये पाश्चिमात्य अभ्यासक व भारतीय अभ्यासक यांचा समावेश आहे. परंतु त्यांच्या व्याख्येतून देखील तौलनिक साहित्याचे व्यामिश्र रूप उलघडत नाही. अशीच या संकल्पनेच्या संदर्भात नोंद करावी लागते.

तौलनिक साहित्याच्या संकल्पनेच्या अनुषंगाने विचार करतांना संस्कृती या घटकाचे विश्लेषण करणे देखील महत्त्वाचे आहे. कारण सातत्याने आपल्या सांस्कृतीक जीवनात घुसळन झालेली दिसून येते. एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीवर अघात करतांना किंवा आपला प्रभाव प्रस्थापित करतांना दिसून येते. लोकसमूहाचे स्थलांतर, प्रवास, प्रादेशिक घुसळन, वसाहतीकरण अशा विविध कारणांनी दोन संस्कृती

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

समोरा समोर उभ्या रहातात. तेव्हा खऱ्या अर्थाने सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, वाङ्मयीन बदल मोठ्या प्रमाणात होत असतात. यातूनच त्या - त्या संस्कृतीत कळत नकळत स्वरूपात अनुकरण व देवान घेवान होत असते. या सर्व गोष्टी समजून घेण्यासाठी किंवा आकलन करून घेण्यासाठी समाजाला एका नवीन अभ्यास पद्धतीची गरज भासत असते. परिणामी यातूनच तौलनिक साहित्य संकल्पना निर्माण झालेली दिसते. मुख्यतः यामध्ये संस्कृती बरोबरच भाषा, प्रदेश या घटकांचा देखील समावेश करता येतो. तौलनिक साहित्याचा अभ्यास आज जगभर केला जात आहे. यात दोन साहित्यकृतीतील साम्य भेदांचे विश्लेषण करणे व त्यांची तत्त्वे सिद्ध करणे अशा स्वरूपाचा अभ्यास ह्या संकल्पनेच्या अनुषंगाने केला जातो.

तौलनिक साहित्यात साहित्यविषयक तुलना विविध बाजूंनी विस्तारल्या जातात. आशयसूत्रे, व्यक्तिरेखा, भाषा, संरचना या कलाकृतीच्या घटकांच्या अनुषंगाने तुलना केली जाते. तसेच साहित्याच्या प्रेरणा, प्रवृत्ती, प्रवाह, चळवळी, संप्रदाय अशा साहित्यव्यवहारातील या तुलना असू शकतात. साहित्यकृती, लेखक, साहित्यप्रकार, कालखंड, साहित्य इतिहास इत्यादी घटकांचा तौलनिक संकल्पनेच्या दृष्टीने अभ्यास केला जातो. तसेच विविध देश, भाषा, संस्कृती आणि साहित्य परंपरा यांचा तौलनिक अभ्यास केला जातो. ह्या अभ्यासाला स्थळकाळाचे बंधन देखील नसते. अशाप्रकारे तौलनिक साहित्याभ्यास ही सर्वव्यापी अशी संकल्पना आहे. तौलनिक साहित्याचा परिघ हा वैश्विक स्वरूपाचा आहे. यामध्ये विविध देश व साहित्यकृतीचा समावेश होतो. दोन किंवा अधिक साहित्यांमधील परस्परसंबंधाचा अभ्यास केला जातो. विविध देशांमधील साहित्य संबंधाचा शोध हा तौलनिक साहित्याचा केंद्रीय विषय असल्याचे दिसून येते.

कोणत्याही साहित्याचे यथार्थ आकलन दुसऱ्या साहित्याच्या संदर्भातच होऊ शकते, अशी तौलनिक साहित्याची धारणा आहे. या धारणेवरच साहित्यकृती एकमेकीशी ताडून पहाणे त्याचे तौलनिक अर्थनिरूपण व मूल्यमापन करणे हे तौलनिक साहित्याचे मूळ स्वरूप आहे. तंत्र, भाषा, शैली आणि संरचना या साहित्य घटकांच्या तुलना असू शकतात. साहित्याच्या प्रेरणा, प्रवृत्ती, प्रवाह, अभिरूची अशा साहित्यव्यवहारातील या तुलना असू शकतात. साहित्यकृती, लेखक, कालखंड आणि साहित्याचा इतिहास अशा सगळया महत्त्वाच्या अभ्यासप्रकारातील या तुलना असू शकतात.

साहित्यव्यवहाराच्या अनुषंगाने मांडणी करतांना मंचरकर र. बा. म्हणतात की, तौलनिक साहित्याभ्यासामध्ये वेगवेगळे देश त्यांच्या भाषा, संस्कृती आणि साहित्यपरंपरा यांचा तौलनिक अभ्यास केला जातो. त्यास काळाचे बंधन नसते. त्यामुळे साहित्य आणि आणि संस्कृती यांची तौलनिकचिकित्सा केली जाते. त्यामुळे तुलनेचा विस्तार असल्याचे जाणवते. अमर्याद साहित्यामुळे इतर कलांना विषय मिळतात. दोन वेगवेगळया भाषा, दोन समाज, त्यांची संस्कृती स्थलकालाच्या सीमा ओलांडून या अभ्यासण्याचे सामर्थ्य तौलनिक साहित्याच्या अभ्यासामागे असल्याचे दिसते. विविध ज्ञानशाखांचा अभ्यास तौलनिक साहित्यामध्ये केला जातो. धर्माच्या कुशीतून व धर्म प्रेषितांच्या मुशीतून बाहेर पडलेले साहित्य अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था यांच्या प्रेरणांनी प्रभावित साहित्य आपल्या जीवन जाणिवांनी आणि

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

सौंदर्याने विविध क्षेत्रावर आपला ठसा उमटवित असते. त्यामुळे साहित्य आणि जीवन धर्म, विज्ञान व अर्थ यांच्या परस्परसंबंधाचा त्यांच्या प्रतिक्रियांचा अभ्यास तौलनिक साहित्यामध्ये केला जातो.

साहित्य आणि ज्ञानशाखा, जीवनक्षेत्रे यांच्यातील संवाद विरोधाचा, संबंधाचा आणि आंतरक्रियांचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासामध्ये केला जातो. लौकिक व अलौकिक अशा दोन्ही दृष्टिकोनातील समान घटकांचा शोध तौलनिक साहित्यामध्ये घेतला जातो. लौकिक व अलौकिक मतभेदांचा मागोवा तौलनिक साहित्यामध्ये घेतला जातो. समीक्षेत ज्या संकल्पना वापरल्या जातात त्यांची परकीय साहित्याच्या संदर्भात तपासणी करून समीक्षा अधिक नेमकेपणाने कशी करता येईल याचे दिशादर्शन केले जाते. मौखिक साहित्याचाही अभ्यास तौलनिक साहित्यात केला जातो. मौखिक साहित्याची ग्रांथिक साहित्याशी होणारी आंतरक्रिया त्यातील मूलाधाराचा आशय रूप यांचाही अभ्यास आरंभीच्या काळात तौलनिक साहित्याभ्यासात केला जात होता.

आधुनिक कालखंडात तौलनिक अभ्यासाची क्षेत्रे विस्तारली आहेत. साहित्य ही मानवी व्यक्तिकरणाची भारतीय संस्कृती भिन्न असलेली आढळते. भिन्न भिन्नतेतूनच एकत्त्वाकडे जाणे हे तौलनिक साहित्याचे उद्दिष्ट ठरते. राष्ट्र, जात, व्यक्ती यांना स्वत:ची संस्कृती असते. त्यामुळे संस्कृतीचा अभ्यास करताना त्या संस्कृतीची तुलना दुसऱ्या संस्कृतीबरोबर करणे इष्ट ठरते. हुकूमशहाला त्याची मते दुसऱ्यावर लादून राज्य करावेसे वाटेल. त्याच्या दृष्टीने त्याची विचारसरणी, संस्कृती वेगळी असेल, लोकशाही राष्ट्रात राहणाऱ्यांना ते बंधन वाटेल. अशा प्रकारे वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया भौगोलिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक प्रकारची संस्कृती उदयास येते. त्या संस्कृतीचा अभ्यास तौलनिक साहित्यामध्ये केला जातो.

तौलनिक साहित्यामध्ये कलाकृतीतील अनन्यसाधारणत्त्व उघड होईल. हेच तत्त्व दोन किंवा अधिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय साहित्यातील तुलनेला लागू केले तर निश्चितच साम्याबरोबरच फरक स्पष्ट होतील. तौलनिक अभ्यासात वाङ्मयीन सिद्धांत व राजकीय व सामाजिक मीमांसा अटळ आहे. तौलनिक साहित्यात अतिशय चांगल्या प्रकारे अभ्यासता येतात. तौलनिक अभ्यासकांच्या साहित्य म्हणजे समकालीन, संस्कृतिसापेक्ष स्वत्त्वाच्या प्रादेशिक आधाररेषा प्रथम पक्क्या आखून सांस्कृतिक राष्ट्रीयता व भाषांच्या सीमा छेदणारी साहित्य आणि इतर साहित्य आणि शास्त्रे नवी जुनी ज्ञानक्षेत्रे तसेच मानवी अभिव्यक्तींच्या पद्धतीचा परस्पर विभिन्न संबंधाची अनेक विद्याशाखीय दृष्टिकोन वापरून विविध तुलनात्मक चिकित्सा होय.

तुलनात्मक साहित्यातील परंपरामधील सहज समानतेचे विभिन्न दृष्टिकोनातून विश्लेषण करत तपासून घेत असते. यातील दृष्टिकोन मनोवैज्ञानिक अभ्यासातून प्राप्त होतो. सृष्टीत ज्या स्वाभाविक घटना घडत असतात. त्यातून दुसऱ्या मानव समूहाविषयी त्यांच्या संस्कृतीविषयी माणसाला एक प्रकारची जिज्ञासा असते. दुसऱ्या संस्कृतीच्या ज्ञानाच्या प्रकाशात तो आपल्या समाजाच्या संस्कृतीला ताडून पाहत असतो. दुसऱ्याला जाणण्यातच त्याला स्वतःची खरी ओळख होत असते. अशा सांस्कृतिक कुतूहलाचा एक भाग म्हणून तौलनिक साहित्याचा उदय झाला. आशयसूत्रे, अनुभवविश्व,

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

व्यक्तिरेखा, भाषाशैली आणि संरचना या अनुषंगाने महत्त्व आधोरेखित करता येते.

**तौलनिक साहित्याचे स्वरूप:** तौलनिक अभ्यास ही शाखा आधुनिक कालखंडाचे प्रतिनिधित्त्व करते. ही अभ्यास शाखा प्रदेशाच्या, भाषेच्या, काळाच्या पलीकडे जाऊन वैश्विकतेचा विचार करते. साहित्याच्या अभ्यासानंतर लगेच समीक्षेची प्रक्रिया सुरू होते. ही प्रक्रिया सुरू असताना अभ्यासकाच्या मनामध्ये नकळतपणे साहित्यकृतीच्या बाबतीत तुलनेचा विचार सुरू होतो. कारण तुलना करणे हा गुण माणसाकडे उपजतपणे असतो. आपण एखाद्या पुस्तकाच्या दुकानात जातो. गेल्यानंतर आपल्या समोर अनेक प्रकारची पुस्तके असतात. या पुस्तकांपैकी त्यातील एकदोन पुस्तके आपण निवडतो. आपली निवड आपल्या अभिरूचीवर, रसिकतेवर, शिक्षणावर, ज्ञानावर आवलंबून असते. परंतु या सर्वांच्या सहाय्याने आपण पुस्तकामध्ये चांगले काय व वाईट काय याचा आपल्या परीने निर्णय घेतो. म्हणजेच आपल्या मनाशी केलेल्या मूल्यांच्या आधाराने आपण उपलब्ध पुस्तकांची तुलना करतो. आणि मग आपल्याला आवडलेली पुस्तके आपण निवडतो. म्हणजेच आपण आपल्या सर्व व्यवहारांमध्ये अशीच प्रकट किंवा अप्रकट तुलना करून निर्णय घेत असतो. कोणत्याही क्षेत्रातील उच्च कोटीचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी तुलनेची आवश्यकता आहे. या प्रकारचे ज्ञान हे तुलनेमुळेच मिळू शकते.

आधुनिक कालखंडात भाषा, संस्कृती, यांमध्ये प्रचंड भिन्नता असूनही त्यामध्ये एक प्रकारची समानता ही आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे संपूर्ण विश्व एखाद्या खेड्यासारखे बनले आहे. त्यामुळे विश्वातील मानवाची संस्कृती, त्याच्या समस्या, त्याची प्रगती या गोष्टी सहजपणे समजू लागल्या आहेत. भारतीय संत साहित्यामध्ये लोकोद्धाराची तळमळ दिसते. त्याचप्रमाणे बायबल, हॅम्लेट, ऑडिसी, इलियट इ. पाश्चिमात्य साहित्यकृतींमध्ये सुद्धा दिसते. त्यामुळे या सर्वांना समजावून घेण्यासाठी, विश्व साहित्याच्या माध्यमातून सार्वभौम आणि प्रगत विचार देण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यासाची आवश्यकता आहे.

तौलनिक साहित्याचे महत्त्व स्पष्ट करताना निशिकांत आलाटे म्हणतात की, दोन घटकांमध्ये साम्य भेद करण्याची, त्यांची तुलना करण्याची मानवी प्रवृत्ती उपजतच आहे. शास्त्र प्रगती नंतर तुलना अभ्यासात निश्चितता येते. वाङ्मयाच्या क्षेत्रातही याचा विकास झपाट्याने होत आहे. हे विश्वची माझे घर ही संकल्पना विश्वातील मानवी मूल्ये, सांस्कृतिक भेद शोधण्याबरोबरच या माझ्याच घरच्या खुणा, ही वैश्विक दृष्टी तुलनात्मकतेकडेच अर्थात मानवी सांस्कृतिक मूल्यांकडेच नेणारी आहे. अर्थात साधर्म्य दर्शविणारी आहेत. तौलनिक साहित्य हे विश्वसाहित्याचे प्रतिनिधित्त्व करते. हे मान्य करावे लागेल.

रविंद्रनाथ टागोरांनी तौलनिक साहित्याला विश्व साहित्य म्हणून संबोधले ते अगदी समर्पक आहे. संपूर्ण मानवाचे जीवन व संस्कार समजण्यासाठी तुलना अभ्यासाची आवश्यकता आहे. भारतीय जीवनाला, परंपरेला, संस्कृतीला तुलना अभ्यासाने अधिक चांगल्या पद्धतीने समजावून घेतले जावू शकेल. तुलनेमुळे राष्ट्रीय एकात्मतेचे किंबहुना वैश्विक एकात्मतेचे ध्येय साध्य होवू शकेल. ज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड वाढ होऊ शकेल. कारण तौलनिक अभ्यास हा सर्व बंधनाच्या पलीकडे जावून ज्ञानक्षेत्रे खुली करतो. मानवाचे जीवन हे

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

वैविध्यपूर्ण आहे. त्यामुळे निःपक्ष तुलना जीवनाच्या विविध क्षेत्रात महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते. भिन्न प्रदेशातील साहित्यामध्ये भिन्नता असणे स्वाभाविकच आहे. परंतु त्यांच्यामधील समानता तसेच विशेषणांचा अभ्यास करणे हे तुलनेचे काम आहे. त्यामुळे विश्वातील तौलनिक साहित्याच्या अभ्यासामध्ये प्रभाव आणि प्रभव या संकल्पनेचे महत्त्व अनन्यसाधारण अशा स्वरूपाचे आहे. अर्थात दोन भाषांमधील आदान प्रदानामुळे भाषिक साहित्यव्यवहारात एक अभिसरण सुरू होते. त्यामुळे भिन्नभाषिक लेखक परस्परांच्या साहित्यकृतींमुळे प्रभावित झालेले दिसून येतात. साहित्यक्षेत्रामधील आदान प्रदानामध्ये विशिष्ट साहित्याची किंवा विशिष्ट लेखकाची प्रभावशालिता हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे.

तौलनिक साहित्यात विशिष्ट भाषिक समाज अन्य भाषिक साहित्याचे अथवा लेखकाचे स्वागत करतो. त्याच्या प्रभावाचा जाणीव पूर्वक स्वीकार करतो. अन्य भाषिक साहित्याचा स्वीकार करणे म्हणजे कमीपणाचे लक्षण नाही. साहित्यामध्ये संकुचित विचाराला स्थान नसते. तेथे फक्त प्रतिभेला, कल्पकतेला, गुणवत्तेला महत्त्व असते. अशावेळी भाषिक मर्यादा रहात नाहीत. एका भाषेतील प्रतिभावंताचे दुसऱ्या भाषेतील अस्वादक व लेखक अनुकरण करू लागतात. या संदर्भात वसंत बापट म्हणतात की, सदृश संस्कृती, सदृश समाजव्यवस्था, सदृश्य आर्थिक व्यवस्था, सदृश राजकीय वातावरण, सदृश साहित्यिकांपैकी कोणत्याही कारणांमुळे दोन साहित्यात साधर्म्य उत्पन्न होईल ही पण तिथे देते साहित्य व घेते साहित्य असे नाते संभवत नाही. याचाच अर्थ विशिष्ट साहित्याचा किंवा साहित्यिकाचा प्रभाव अन्यभाषिक साहित्यावर पडल्याची उदाहरणे वारंवार आढळली तरी अशा प्रभावाची कारणे भिन्न भिन्न असू शकतात. दोन भिन्नभाषांतील साहित्यकृती एकमेकांच्या सान्निध्यात आल्या की त्या एकमेकींवर प्रभाव टाकू लागतात. या प्रभाव मीमांसेला तौलनिक साहित्याभ्यासात महत्त्वाचे स्थान आहे.

मध्ययुगीन प्राकृत भाषांतील साहित्यावर प्राचीन संस्कृत साहित्याचा प्रभाव पडलेला दिसतो. मोगलांच्या साम्राज्याबरोबर भारतीय साहित्यावर फारसी भाषेचा प्रभाव पडलेला आहे. त्याचप्रमाणे शेक्सपिअर, इब्सेन, इलियट यांचा मराठी रंगभूमीवर प्रभाव पडला आहे. याउलट भारतीय साहित्याचाही पाश्चिमात्य विचारवंतांवर प्रभाव पडलेला दिसतो. एकूणच भिन्नभाषिक साहित्यकृती परस्परांच्या संपर्कात येताच परस्परांवर कमी अधिक प्रमाणात प्रभाव टाकतात. त्यामुळे त्यांच्या साहित्यकृतीत साम्यस्थळे आढळतात. व म्हणून त्यांचा तौलनिक अभ्यास करणे गरजेचे आहे. एखाद्या साहित्यकृतीच्या प्रभावातून दुसऱ्या साहित्यकृतीची निर्मिती होते. या प्रक्रियेला प्रभव असे संबोधले जाते. तौलनिक साहित्याभ्यासकाला दोन साहित्यकृतींच्या संदर्भात प्रभावक व प्रमाणित प्रभावित संबंध लक्षात घ्यावा लागतो. प्रभाव पाडणारे घटक प्रभव म्हणून कार्यान्वित होत असल्याने प्रभव प्रभावांचा अभ्यास संलग्नच आहे. एकूणच अशा घडामोडी साहित्यक्षेत्रात प्रभावशाली प्रतिभावंतांमुळे घडत असतात. परंतु तेथे परिस्थिती, परंपरा, आणि नाविन्य यांचे भान असणे गरजेच आहे. ह्या घडामोडी जेव्हा देश, काळ, भाषा इ. साहित्यात प्रवेश करतात तेव्हा त्यांच्याबद्दल एक नवी जिज्ञासा निर्माण होते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

मध्ययुगीन वाङ्मयाची व्याप्ती ही खूप मोठी असल्याचे स्पष्ट होते. मध्ययुगीन काळात विविध चळवळी, विविध प्रवाह निर्माण झालेले दिसून येतात. मानवी जीवनातील अस्थिरतेमुळे साहित्य व्यवहारातही धामधूम दिसून येते. त्यातून विविध प्रवाहात देखील साहित्य विभागलेले दिसते. मध्ययुगीन साहित्याला ग्रांथिक परंपरेबरोबरच मौखिक परंपराही आहे. मध्ययुगाची संस्कृती ही प्रामुख्याने ग्रामीण संस्कृती आहे. त्यात शहरांना स्थान असले तरी ते मर्यादितच आहे. तीर्थक्षेत्र, व्यापारी केंद्र आणि राजधान्या हेच त्या काळातील शहरांचे स्वरूप होते. बहुसंख्य माणसे खेड्यात राहणारी होती. त्यांच्याशी त्यांना समजेल अशा भाषेतच बोलण्याची गरज होती. मध्ययुगीन साहित्याची मुख्य हीच खरी प्रेरणा होती. त्याच्यावर शहरी परंपरेचा देखील प्रभाव होता. त्यामुळे मध्ययुगीन साहित्याला शहरी धारणा आणि ग्रामीण लोकजीवन यांचा आविष्कार अशी दोन्ही अंगे असल्याचे दिसून येते. गद्य आणि पद्य अशा दोन्ही माध्यमातून मध्ययुगीन साहित्याची मांडणी झालेली दिसून येते.

मध्ययुगीन साहित्यात संतांनी लोकभाषा आत्मसात केलेली दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांनी लोकछंद, गणगौळण, लावणी, डफगाणे, धवळे, अभंग, भारूड यांसारख्या लौकिक रचनांच्या माध्यमातून त्यांनी आपल्या अलौकिक अनुभवांची मांडणी केली. तसेच अभिजनांचे साहित्य आणि बहूजनांचे साहित्य यात एक आंतरक्रिया चालू असते. ती मध्ययुगीन साहित्यात दिसून येते. मध्ययुगीन कालखंडातील वाङ्मय हे ग्रांथिकतेकडून लोकपरंपरेकडे जात असल्याचे दिसून येते. अशा अनुषंगाने मध्ययुगीन व आधुनिक मराठी साहित्याची तौलनिक मांडणी केली आहे. तसेच तत्कालीन कालखंडातील मराठी साहित्य व इतर भाषेतील साहित्य यांची देखील मांडणी केली आहे.

**समारोप:** तौलनिक साहित्याच्या क्षेत्रात देवाण घेवाण ही होत असते. या प्रक्रियेला साहित्यात महत्त्वाचे स्थान असते. साहित्याचे वाचक, श्रोते, प्रसारमाध्यमे यांच्यात परस्परसंबंध जसजसा वाढत जात असतो. तसतशी साहित्याची देवाण घेवाण वाढत जात असते. निरनिराळ्या भाषेतील साहित्यात आश्चर्यकारक असे साम्य आढळते. साहित्यविश्वात आदानप्रदानामध्ये विशिष्ठ साहित्य प्रकाराची किंवा साहित्यिकांची प्रभावशीलता ही महत्त्वपूर्ण गोष्ट असते. अशा अन्य भाषांतील साहित्याच्या सर्व क्षेत्रातील साधर्म्य, प्रभाव शोधून केलेल्या अभ्यासातून मांडलेले विचार, समीक्षा म्हणजे तौलनिक अभ्यास होय.

प्रभाव हा तौलनिक अभ्यासाचा मुख्य केंद्रबिंदू असतो. सर्वसाधारणपणे एखाद्या भाषेतील साहित्याचा किंवा साहित्यिकांचा दुसऱ्या भाषेतील साहित्यावर किंवा साहित्यिकावर पडलेला प्रभाव येथे महत्त्वपूर्ण ठरतो. साहित्याचा तौलनिक अभ्यास करीत असताना प्रभाव हा घटक आपणाला प्रकर्षाने जाणवत राहतो. त्याचे तौलनिक साहित्य अभ्यासातील असलेले अनन्यसाधारणत्व आपणाला मान्य करावे लागते. प्रभाव म्हणजे परिणाम असे सर्वसाधारणपणे मानले जाते. दोन किंवा अधिक समाजातील साहित्यसंबंधाचा अभ्यास करून तुलनांच्या आधारे त्यातील साम्यस्थळावर प्रकाश टाकणे, त्यातील साम्यविरोधांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. केवळ तुलना करणे हे प्रभाव अभ्यासाचे वैशिष्ट्य ठरत नाही. त्याबरोबरच इतर गोष्टींचा शोध घेणे प्रभाव अभ्यासाचे प्रयोजन असते. साहित्य आदान

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

प्रदानात प्रभावशीलता प्रभावी ठरते.

आधुनिक मराठी साहित्याचा विचार केला तर पाश्चात्त्य साहित्याचा पडलेला प्रभाव ठळकपणे जाणवतो. प्रभाव हा नेहमी एकाच प्रकारचा पडतो असत नाही. कधी तो रचनेपुरता मर्यादित जाणवतो तर कधी तो आशय, भावना, जीवनविषयक असाही आढळतो. प्रभाव उद्दिपीत करणारे घटक म्हणून प्रत्यक्ष जीवनचरित्र, भौगोलिक, राजकीय, भाषांतर, आदर्श सर्जनशीलता, नाविन्याचे आकर्षण, धर्मांतर, चळवळ यांचा विचार करता येतो. प्रभावाचे काही प्रकार संभवतात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष प्रभाव असे ते सांगता येतात.

प्रभाव आणि साहित्य या संदर्भात वसंत बापट म्हणतात की, दोन साहित्यात साधर्म्य आढळले की, तेथे प्रभाव शोधणे बरोबर ठरणार नाही. सदृश्य संस्कृती, समाजव्यवस्था, आर्थिक व्यवस्था, राजकीय वातावरण, साहित्यिकांच्या गरजा यापैकी कोणत्याही प्रकारांमुळे साहित्यात साधर्म्य उत्पन्न होईल. पण तेथे देते साहित्य आणि घेते साहित्य असा संबंध संभवत नाही. प्रभाव आणि परंपरा यांचा अभ्यास करत असताना संप्रेक्षण, स्वीकार यांचा विचार करावा लागतो. संप्रेक्षण ही साहित्याच्या क्षेत्रात निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ती फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. अन्य भाषेतील साहित्याशी संबंध आल्यावर त्या भाषेतील साहित्य प्रकार अथवा साहित्यिक यांचा स्वीकार केला जातो.

तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व अनन्य साधारण स्वरूपाचे आहे. भारत हा तौलनिक साहित्याभ्यासाच्या दृष्टीने अगदी अनूकूल आहे. विविधतेतील एकता हे येथील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अनेक भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे अभिसरण या ठिकाणी प्राचीन काळापासून चालत आले आहे. त्यांचा तौलनिक अभ्यास साहित्याची जाण वाढवणारे तर आहे, पण राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात आपल्यापुढे नवी आव्हाने उभी आहेत. तसेच नव्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत. या सांस्कृतिक सपाटीकरणाच्या काळात आपले अस्तित्व टिकविण्यासाठी अनुवाद, रूपांतरे आणि तौलनिक साहित्याभ्यास यांच्या माध्यमातून आधुनिक भारतीय भाषांतील साहित्याशी व जागतिक साहित्याशी जोडून घेणे आवश्यक आहे. यामुळे आपले साहित्य समर्थ तर होईल, पण ते जागतिक पातळीवर स्वतःचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करेल.

**संदर्भसूची:**


१. *पाटील आनंद, तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९९ पृष्ठ ४३*

२. *बापट वसंत, तौलनिक साहित्याभ्यास मूलतत्त्वे आणि दिशा, मौज प्रकाशनगृह मुंबई प्रथमावृत्ती १९८१ पृष्ठ २३*

३. *मंचरकर र. बा., तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००३ पृष्ठ ४४*


*Cite This Article:* ***डॉ. भोसले ग. वि.*** *(2025). आधुनिक कालखंडात तौलनिक साहित्याचे स्वरूप व महत्त्व* .In **Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 50–57).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# डिजिटल युगातील भाषांतराचे महत्त्व

* डॉ. गणेश निवृत्ती चौधरी

* मराठी विभाग , सहायक प्राध्यापक , अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट.

**प्रास्ताविक :**

भाषा, साहित्य, ज्ञान, संस्कृती, परंपरा, विचार व इतर अनेक प्रकारचे घटक हे त्या त्या विशिष्ट प्रदेशात असतात. मात्र भाषांतराच्या माध्यमातून वरील सर्व आणि इतर घटक दुसऱ्या प्रदेशापर्यंत, समूहापर्यंत, व्यक्तींपर्यंत पोहोचत असतात. एखाद्या व्यक्तीची भाषा, त्याचे सण-उत्सव, परंपरा, त्यांच्या समूहाची भाषा यांच्या माध्यमातून तो जीवनव्यवहार साधत असतो. इतर व्यक्तीसमूह, प्रदेश, ज्ञान यांच्याविषयी जेव्हा त्याला जाणून घ्यावेसे वाटते तेव्हा भाषांतरासारखा घटक उपयोगी ठरतो. भाषांतर म्हणजे काय? 'एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत घेऊन जाणे' असे आपण म्हणतो. भाषांतराचेही प्रकार असल्याने आपल्या गरजेनुरूप आपण भाषांतर करतो किंवा भाषांतर झालेले वाचत होतो. भाषांतराचा इतिहास पाहिला की आपल्या लक्षात येते, की भाषांतर हे प्राचीन काळापासून होत आलेले आहे. यामध्ये भर पडली ती साधनांची किंवा माध्यमांची.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**डिजिटल युगातील भाषांतर :**

मानवाने अनेकविध घटकांवर संशोधन केले. त्यातून नवनवीन कल्पना, विचार, दृष्टिकोन समोर आले. या संशोधकीय वृत्तीतूनच मानव आपली प्रगती साधत आला आहे. सुरुवातीस आपली मूळ भाषा आणि दुसरी शिकवून घेतलेली भाषा या दोन भाषांमध्ये भाषांतर होत. आज मात्र तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगात एकाचवेळी अनेकविध भाषांमध्ये आपण तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भाषांतर करू शकतो, वाचू शकतो. डॉ. विजया देव म्हणतात, "मोठे क्षेत्र व्यावहारिक भाषिक देवघेवीने व्यापलेले होते. आणि या क्षेत्रात भाषांतराची गरज पदोपदी जाणवते." भाषांतर करणाऱ्यास भाषांतरकार किंवा अनुवादक म्हणून ओळखले जाते. आज मात्र तंत्रज्ञानामुळे आपल्याला ज्या भाषेविषयी कोणतीही माहिती नाही त्या भाषेत उपलब्ध असणारे ज्ञान, ती भाषा बोलणाऱ्याची संस्कृती, परंपरा, व्यवहार आपण आपल्या भाषेत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भाषांतरित करून घेऊन समजून घेत आहोत. यासाठी फार काही वेळ घालवावा लागत नाही फक्त तंत्रज्ञान वापराबाबतचे कौशल्य आपल्याजवळ हवे आहेत.

भाषांतरकाराजवळ मूळ भाषा आणि लक्ष्य भाषा या दोन्ही भाषांचे परिपूर्ण ज्ञान असावे लागते. कारण मूळ भाषेतील आशय लक्ष्य भाषेत घेऊन जाताना मूळ आशयसौंदर्य,

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

आशय, अर्थ या व इतर बाबी लक्ष्य भाषेत जाणे अभिप्रेत असते. एका भाषेतील आशयाचा अर्थ दुसऱ्या भाषेत जाताना बदल होणार नाही याची काळजी भाषांतरकाराला घेणे जरुरीचे ठरते. आपण डिजिटल माध्यम किंवा साधनांचा वापर करून भाषांतर करणार असू तर आपल्याला योग्य तो शब्द, योग्य ती भाषा किंवा निवडलेल्या शब्दांतून तोच आशय, अर्थ निघेल असे नाही. कारण यात अनावश्यक शब्दांची कितीतरी भर पडलेली दिसते. मग मात्र आपल्याला योग्य आशय पोहोचवणाऱ्या शब्दांची निवड करावी लागते. एकूणच डिजिटल युगात भाषांतर करणे सोयीचे झालेले असले तरी ते परिपूर्ण होतेच असे मात्र होताना दिसत नाही. म्हणूनच तर आपणास प्रत्येक वेळी त्या साधनास सूचना करत करत आपल्याला अपेक्षित असलेला आशय आपणास अंतिम करावा लागतो. असे असले तरी या डिजिटल युगातील भाषांतराच्या साधनांचे महत्त्व मात्र अनन्य साधारण असे आहे. त्याचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

डिजिटल युगातील भाषांतराचा विचार करताना पुढील काही घटकांचा विचार करता येईल. त्यातूनच भाषांतराचे व साधनांचे महत्त्व लक्षात येईल.

**प्रवास :** मानव हा असा प्राणी आहे की तो कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रवास करत असतो. स्थानिक किंवा आपल्या प्रदेशातच प्रवास असेल तर भाषेची अडचण जाणवत नाही. भाषाबदल मात्र जाणवल्याशिवाय राहत नाही. नवनवीन ठिकाणे बघण्याचा अनेकांचा छंद असतो. तसेच इतर काही नैमित्तिक कारणाने प्रवास हा घडतच असतो. यातून नवीन प्रदेश, तेथील भाषा, संस्कृती, खाद्य-संस्कृती, आदींची माहिती होत जाऊन अनुभव समृद्धता येत जाते. परंतु जेव्हा नवीन भाषिक प्रदेशांमध्ये गेल्यावर संवाद साधण्याची वेळ येते तेव्हा मात्र आपणास डिजिटल भाषांतर साधन उपयोगी पडताना दिसते. कारण आपण जेव्हा संवाद साधण्याचा प्रयत्न करतो तेव्हा भाषेची अडचण येते. आपण ज्या ठिकाणी जात आहोत ते स्थळ याबाबतची उत्सुकता आपणाला असते. मग त्या विशिष्ट स्थळाविषयी माहिती देणारे लोक हे स्थानिक असतात. त्यांच्याशी आपणास संवाद साधावा लागतो. वास्तव्याच्या ठिकाणी संवाद साधावा लागतो. तसेच प्रवास करताना आपण गुगल मॅप साधनाचा वापर करत असतो. परंतु त्या त्या प्रदेशातील स्थानिक भाषा मॅपमध्ये आलेली असते. रस्त्याबाबत स्थानिकांशी संवाद साधावा लागतो. तसेच गावाच्या नावाचे बोर्ड स्थानिक भाषेत असतात तेव्हा आपण कोणत्या गावात आहोत हे समजून घेण्यासाठी. ऐनवेळी एखादी कठीण परिस्थिती उद्भवली तर मदतीसाठी. तसेच नवीन ठिकाणी जेव्हा जातो तेव्हा अपरिहार्यपणे आपण खरेदी करतो, मग व्यवहार पूर्णत्वास जाण्यासाठी, सांस्कृतिक अनुभव घेण्यासाठी अशा नानाविध कारणांसाठी आज डिजिटल भाषांतर उपयोगी पडत आहे.

**हस्तलिखित-शिलालेख वाचन** : विविध हस्तलिखितांमधून आपला इतिहास, संस्कृती, साहित्य, विज्ञान लिहून ठेवले गेले आहे. त्याला हजारो वर्षांचा इतिहास आहे. इतिहासाची सत्यासत्यता पटण्यासाठी आज शिलालेख, हस्तलिखित, भूर्जपत्रे आदींचा अभ्यास केला जातो. तसेच अनेक भाषांच्या लिपींमध्ये साधर्म्यही आढळून येते, तेव्हा डिजिटल भाषांतर उपयोगी ठरते. तसेच यामुळे दुर्मीळ हस्तलिखिते आपण वाचू शकतो. याच डिजिटल भाषांतरामुळे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा माहीत होऊन त्यांचे आज आपण जतन

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

करत आहोत. अनेक दुर्मीळ हस्तलिखिते या डिजिटल भाषांतरामुळे पुनरुज्जीवीत झाली आहेत. तसेच शिलालेखांतील नोंदी समजून घेण्यासाठी डिजिटल भाषांतर महत्त्वाची भूमिका बजावत आहे. शिलालेखांना इतिहासातील अस्सल पुरावा म्हणून बघितले जाते. स्थानिक भाषेतील शिलालेखांचे आपण वाचन करू शकतो. परंतु वेगवेगळ्या लिप्यामध्ये किंवा भाषांमध्ये कोरल्या गेलेल्या शिलालेखांचे वाचन आपण करू शकत नाही. या डिजिटल भाषांतर साधनाच्या माध्यमातून आपण शिलालेखांवरील माहिती तत्काळ समजून घेऊ शकतो. उदाहरणार्थ मराठीतील विविध शिलालेख तसेच सीमावर्ती भागातील शिलालेखांचा विचार करता येईल. कोल्हापूर जिल्ह्यातील खिद्रापूर येथे ऐतिहासिक कोपेश्वर मंदिर आहे. हे मंदिर कर्नाटक महाराष्ट्र सीमावर्ती भागात असल्याने मंदिराच्या भिंतीवर कन्नड भाषेतील शिलालेख कोरलेला आहे. तसेच दिवेआगर येथील शिलालेख. अशा विविध भाषांमधील शिलालेखांचे वाचन आपण अगदी सहजरित्या डिजिटल भाषांतरामुळेच करू शकतो.

**अहवाल लेखन :** शैक्षणिक, सामाजिक, प्रशासकीय तसेच इतर विविध ठिकाणी अहवाल लेखन केले जाते. त्यांचे विषय, संदर्भ वेगवेगळे असतात. " छोट्या किंवा मध्यम स्वरूपाचा उद्योग उभा करणारा उद्योजक वित्तसंस्थांना आपला प्रकल्प अहवाल सदर करतो. तो अहवाल इंग्रजीत असतो आणि त्यातील तांत्रिक भाषा परिभाषा केंद्रित असते." स्थानिक पातळीवरील अहवालास भाषेची अडचण येत नाही. परंतु प्रशासकीय किंवा राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय स्तरावर जेव्हा अहवाल पाठवायचा असतो तेव्हा तो तेथील प्रशासकीय किंवा इंग्रजी भाषेतच असावा लागतो. ते काम अगदी सहज आणि सोप्या पद्धतीने डिजिटल भाषांतरामुळे शक्य झाले आहे. तसेच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या घटना, त्यांचे अहवाल, आंतरराष्ट्रीय संशोधन हे या भाषांतराच्या माध्यमातून अगदी कमी वेळेत आपल्यापर्यंत पोहोचते.

**प्रशासकीय कामकाज :** प्रशासकीय कामकाज हे विविध पद्धतीने पार पाडले जाते. तसेच ते माहिती केंद्रित असते. सरकारी दस्तऐवज, राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय करार, धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी यांसाठी भाषेचा अडथळा ठरू शकतो. इतर देशांतून, राज्यांतून आलेल्या धोरणात्मक शिफारशी, कायद्याच्या सूचना आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील करार यांचे तात्काळ भाषांतर करणे हे भाषांतर साधनांमुळे शक्य होते. या भाषांतरामुळे एकाच संकल्पनेसाठी वेगवेगळ्या शब्दांचा केला जाणारा वापर टाळता येतो. विविध कागदपत्रे मागविणे, बँकेमध्ये व्यवहार करताना आपल्याला दोन भाषांमधून अर्ज उपलब्ध करून दिला जातो तसेच विविध शासकीय योजनांची माहिती पुस्तके आपल्याला या भाषांतराच्या माध्यमातूनच आपल्यापर्यंत पोहोचत असतात.

**समारोप :** आजच्या या डिजिटल युगात भाषांतर करणे आणि भाषांतरित साहित्य वाचणे सहजसाध्य बनले आहे. आपल्याला अनेकविध अडवणूकीतून मार्ग निघालेला आहे. लेखन, वाचन, चिंतन, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बाबतची माहिती, दैनंदिन आणि नैमित्तिक अशा विविध कारणांसाठी भाषांतर आणि आजची साधने महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

अशा प्रकारे डिजिटल युगातील भाषांतर आणि भाषांतराची साधने यांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**

*१) तावरे स्नेहल (संपा.), व्यावहारिक मराठी, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, चौथी आवृत्ती २०११.*

*२) सांगळे संदीप (संपा.), व्यावहारि उपयोजित मराठी व प्रसारमाध्यमांची कार्यशैली, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१३.*

*३) मिरजकर निशिकांत, तौलनिक साहित्य,प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१६.*

*४) पाटील आनंद, तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९९८.*

*Cite This Article:*

*डॉ. चौधरी ग. नि. (2025). डिजिटल युगातील भाषांतराचे महत्त्व.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 58–61).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# गुजरातीमधून मराठीत भाषांतरित झालेल्या दलित कथा

* प्रो. डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे

** मराठी विभागप्रमुख,मराठी विभाग, किसन वीर महाविद्यालय वाई.*

साहित्य आणि समाज यांचा घनिष्ठ संबंध असतो. साहित्य हे समाजाचा आरसा असते, त्यामुळे ते समाजापासून अलिप्त करताच येत नाही. साहित्य आणि समाज हे एकमेकांस पूरक असतात. समाजात घडणाऱ्या घडामोडींचे दर्शन साहित्यात घडताना दिसते. या संदर्भात जयंत गाडीत म्हणतात, ‘‘ प्रत्येक मनुष्य हा समाजाचे एक अंग असतो. तो चिंतक असो वा सर्जक, ज्या समाजात तो जगतो त्या समाजाविषयी त्याची काही एक जबाबदारी असते. सर्जनशील व्यक्ती ज्या समाजात जगते, त्या समाजाकडे तो पाठ फिरवू शकत नाही. माणूस समाजात राहत असतो आणि प्रत्येक माणसाचा जीवनाविषयीचा दृष्टीकोन त्याच्या आजूबाजूचा समाजच घडवत असतो.’’[1] समाजात जे परिवर्तन घडत असते, त्याचा परिणाम साहित्यावरही होताना दिसून येतो. म. गांधींच्या चळवळीचा व विचारधारेचा प्रभाव गुजराती साहित्यावर पडलेला होता. मानवकल्याण हेच साहित्याचे केंद्र असले पाहिजे, असे गांधीजींचे मत होते. गांधीजींच्या या विचारांच्या प्रभावामुळे गुजराती साहित्यिक दलितांचे वास्तववादी चित्रण करू लागले. जे विषय तुच्छ व हलक्या दर्जाचे समजले जात होते, त्यावर लेखन होऊ लागले. दलित –पीडितांना साहित्यात जागा मिळाली. अस्पृश्यता देव निर्मित नसून टी मानवनिर्मित असल्याचे भारतीय समाजक्रांतीचे जनक म. जोतिबा फुले यांनी यापूर्वीच सांगितले होते.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दालितोद्धारासाठी सारे आयुष्य पणाला लावले. काळाराम मंदिर प्रवेश, महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, बौद्ध धम्माचा स्वीकार इ. महत्त्वाच्या घटनांमुळे संपूर्ण देशात खळखळ निर्माण झाली. भारतीय राज्यघटनेतून दलितांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी अतिशय क्रांतिकारक पाऊल उचलले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा व तत्वज्ञानाचा सर्वत्र प्रचार व प्रसार होऊ लागला. त्यांच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवून मराठी, हिंदी, गुजराती इ. भाषांमध्ये विविध साहित्यप्रकारांमध्ये दलितांविषयी लेखन होऊ लागले. दलित पॅंथरच्या स्थापनेनंतर दलित साहित्याने चांगलाच वेग पकडला. मराठीनंतर गुजरातमध्येही ‘दलित पॅंथर’ अस्तित्वात आली व त्यानंतर दलित साहित्य मोठ्या प्रमाणात लिहिले गेले.

या ठिकाणी आपल्याला गुजरातीमधून मराठीत भाषांतरित झालेल्या काही निवडक दलित कथांचा अभ्यास अपेक्षित

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

आहे. गुजरातीमधील पहिली दलित कथा कोणती आहे, याविषयी बरीच मतमतांतरे आहेत; परंतु काही अभ्यासकांच्या मते प्रसिद्ध गुजराती साहित्यिक श्री. जोसेफ मॅक्वान यांच्या 'जीवादोरी' या कथेला प्रथम दलित कथेचा मान जातो. इ.स.१९५६ मध्ये ही कथा लिहिली गेली आणि 'कंकावटी' या नियतकालिकामध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर १९५९ मध्ये श्री. बी. केशरशिवम यांची 'राती रांयणनी रताश' ही दुसरी कथा 'चांदनी' या नियतकालिकामध्ये प्रसिद्ध झाली. या कथांच्या प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व मराठी दलित साहित्य आहे. या कथांमधून दलित समाजाचे जीवन व त्यांच्या रितीरिवाजाचे चित्रण येताना दिसते. ताराचंद्र खांडेकर म्हणतात, " It does not make any differences between man and man on the basis of caste, class, sex, language religion and colour. Every depressed and oppressed man is its universel Trinity of Liberty, Equality and Fraternity." [२] दलित साहित्याचा मूळ हेतू 'समानता' हा आहे,

गुजरातीमधून मराठीत भाषांतरित झालेल्या काही निवडक दलित कथांची चिकित्सा करून, त्यामध्ये दलित जाणीवा, विद्रोह,नकार ही वैशिष्ट्ये कोठे कोठे आढळतात, तसेच स्वातंत्र्य, समता व बंधुता इ. मूल्यांना ही कथा प्राधान्य देते का? हे पाहणे आवश्यक आहे.

दलपत चव्हाण यांचे गुजराती दलित कथेत मोठे योगदान आहे. त्यांनी अनेक कथा लिहिल्या असून त्यातील 'किरडू' ही कथा लक्षणीय आहे. या कथेतील वीरा हा भंगी कुटुंबातील आहे. त्यांचा लहान मुलगा शिवा याला सर्पदंश होतो. गावातील सर्व मंडळी गावकुसाबाहेर असणाऱ्या त्याच्या घराभोवती गोळा होतात. त्यातील एक जण त्याच्या जातीविषयी बोलताना म्हणतो, " ते तं बाबा आंदीच्या जल्माचे भोग चुकते कराचे असत्यात नायतं त्ये ओरगाणं व्हतीलच कशापाई? आसं तं चालतच राहतं बाबा, त्येंना काय गावामंदी घर कराय नाय देता येत त्यापाई. आरं हालकी जात ही गावाभाईरच बरी; म्हंजी त्येंच्या घराला काय दगाफटका झाला तरी आपल्या श्येतालाबी ढका नाय लागत ....”[३] वीराच्या मुलाला सर्पदंश झाला असतानाही गावातील लोक वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करतात. सर्पदंशाचे गांभीर्य कोणालाही नसते. वीराच्या मुलाचे विष उतरवण्याकरिता गोग महाराजांचा भक्त मोहन रबारी उगवतीच्या टेकडाकडे जातो. मोहन रबारी वीराच्या मुलाचे विष झटक्यात उतरवणार, अशी गावकऱ्यांची खात्री असते. मोहन रबारी घुमत घुमत वीराच्या घराच्या अंगणात येतो. वीराची बायको व तो स्वतः हात जोडून मोहनच्या पाया पडतात. आपल्या मुलाला मोहनने वाचवावे म्हणून त्याला विनंती केली जाते. वीराचा मुलगा शिवाचे शरीर काळे निळे पडते. त्याच्या तोंडातून हिरवट फेस निघू लागतो. मोहन रबारी हा गोग महाराजांचा मोठा भक्त असल्याने तो शिवाच्या अंगातील विष शोषून घेईल, अशी सर्वांची खात्री असते. दरम्यानच्या काळात मोहन रबाऱ्याची उधळलेली गाय शेणखळीत पडते. सर्व गावकरी तिकडे वळतात. वीराही पुण्याचे काम म्हणून ती गाय खड्ड्यातून बाहेर काढण्यासाठी मदत करतो. वीराच्या घरातून आक्रोश ऐकू येतो. वीराचा मुलगा शिवा मृत्युमुखी पडतो.

अंधश्रद्धेत अडकलेला वीरा आपल्या मुलासाठी औषधोपचार न करता, भक्ताकडून आपल्या मुलाचे विष

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

उतरले जाईल अशा भ्रामक कल्पनेत असतो. गावकरी त्याच्याकडून काम करून घेतात, परंतु त्याला कोणीही योग्य सल्ला देत नाही. त्याच्या मुलाच्या मृत्यूला त्याचे अज्ञानीपण जेवढे कारणीभूत आहे, तेवढेच गावाकरीही जबाबदार आहेत. गावाच्या कामापुढे वीराच्या मुलाच्या मृत्यूचे गावकऱ्यांना काहीही वाटत नाही. दलितांच्या जीवनाला कोणत्याही प्रकारची किंमत नसते, हे या कथेमधून दिसून येते. प्रस्तुत कथेमधून दलपत चौहाण यांनी दलितांच्या दुःखाचे केवळ घटनात्मक पद्धतीने वर्णन केलेले आहे. यामध्ये कोठेही आंबेडकरी विचार दिसून येत नाहीत.

अरविंद वेगडा यांची 'आसरा' ही कथा दलित व सवर्ण यांच्यामधील संघर्षावर प्रकाश टाकताना दिसते. प्रस्तुत कथेतील रायसंगची पत्नी जकु हिच्यावर गावातील जमीनदार मंगळूभा अत्याचार करण्याचा प्रयत्न करतो. शेताच्या बांधावरील गवत कापून आणण्यासाठी गेलेल्या जकुचा विळा व पासोडी मंगळुभा कब्जात घेतो. घाबरलेली जकु आपण सामान्य असल्याचे त्याला सांगते. त्यावर निर्लज्जपणे उत्तर देताना मंगळुभा म्हणतो, "आगं हितं कोणती रयत आणि कोणता राजा! आणि कसली मानमरजाद ....? आं...? आतनं तं समदे सारखेच की....!"[४] जकुची अब्रू घेण्यासाठी निघालेल्या मंगळुभावर लखमण हल्ला करतो व त्याला रक्तबंबाळ होईपर्यंत मारतो.

काही दिवसांनंतर मंगळुभा, लखमणचे घर पेटवितो. लखमणने आपले उभे पीक कापून नेले म्हणून तो त्याच्यावर खोटी तक्रार करतो. चिडलेला लखमण म्हणतो, "मंगळुभा शेवटी जात दाखवलीस तू....! अन् पोलिसात बी मान्स त्येंचीच की... मारून मारून पार हाडकं मोडून काढतील ... आणि त्यात परत आपलं हलकं रगात पाण्यासारखं...! पोलिसांच्या हाती मार खाऊन मरावं, का तं जेलमंदी सडाव. त्याच्या परिस पळाव त्ये बर... त्या मंगळुभाला एकदा अखेरचा धडा शिकवायचा आसल तं आत्ताच्या घडीला एकच रस्ता, पळावं."[५] पोलिसांना खबर मिळण्याच्या अगोदर लखमण गाव सोडून पळून जातो. लखमणभावने पळापळ करण्यापेक्षा पोलिसात हजर व्हावे व होईल ती शिक्षा भोगून परत यावे, असे जकुला वाटते. मंगळुभाबरोबर पुन्हा संघर्ष नको, अशी तिची भावना असते, परंतु शेवटी जकु व तिचा पती यांचे मतपरिवर्तन होते. अन्यायाविरुद्ध लढण्याची त्यांच्यामध्ये उर्मी निर्माण होते. येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याचे ते दोघे धाडस दाखवितात. आणि धाडसाने लखमणला आपल्या घरी घेऊन ठेवून घेतात. अशा प्रकारे जकु आपली अब्रू वाचवणाऱ्या लखमणला आसरा देते व कथेचा शेवट होतो.

मोहन परमार यांची 'गावदर' ही कथा हिंदू-मुस्लिम धर्मवादावर प्रकाश टाकताना दिसते. प्रस्तुत कथेतील हुसेन अली हिंदूंच्या मंदिरात आरतीसाठी जातो. आपण मुसलमान असल्यामुळे सुरुवातीला आपल्यावर रागवणारा बुवा मंदिरात लोकांसमोर आपल्याला काहीही बोलत नाही, याचा आनंद हुसेन अलीला होतो. परंतु खाजगी भेटीत मात्र तो हुसेन अलीवर आगपाखड करतो. हुसेन अली शौचासाठी जाताना घेतलेला डबा बुवा पायाने उडवतो. हुसेन अलीला राग येतो, तो बुवाला म्हणतो, "मुझे मंदिर मे आने की इजाजत नही है ?......तेरे बाप का मंदिर है भेंचो ...... हर बार मेरेको ही ठपका देता है तू !"[६] परंतु हुसेन अलीच्या डब्याला लाथ मारल्यामुळे आपण भ्रष्ट झालो आहोत, हे समजून बुवा तळ्यावर

आंघोळीसाठी जातो. तोंडाने शिव शिव... हरी ओम म्हणत तोंडाने प्रभुनाम पुटपुटतो. केवळ आपण मुस्लिम आहे म्हणून, आपली भक्ती नाकारणाऱ्या बुवाचा हुसेन अलीला प्रचंड संताप येतो. ते मंदिराच्या कळसाकडे पाहून हात जोडतात. मन प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतात. हुसेन अलीच्या मनात हिंदूंच्या मंदिराविषयी चांगली भावना असते. परंतु देवाचा भक्त समजणाऱ्या व मनात जातीभेद बाळगणाऱ्या बुवाविषयी मात्र त्याच्या मनात संताप असतो. हुसेनअली रागाने शौचाच्या डब्याने तलावातील पाणी बुवाच्या माथ्यावर ओततो व निघून जातो. देवाच्या दरबारात सर्व मनुष्यप्राणी सारखा असतो, परंतु माणूसच जातीच्या आधारावर भेद करतो ही न पटणारी गोष्ट मोहन परमार 'गावदर' या कथेमधून अधोरेखित करताना दिसतात.

'प्रसाद' ही विनोद गांधी यांची कथा विशेष उल्लेखनीय आहे. शिक्षणानंतरही जातीभेद हा माणसाच्या मनातून कसा जात नाही, हे 'प्रसाद' या कथेतून लेखकाने सांगितले आहे. आपला पती चांगल्या नोकरीला आहे. आपल्याला बंगला व नवीकोरी गाडी आहे व आपण चांगल्या कॉलनीत राहतो, त्यामुळे आपल्याला इतरांप्रमाणे मानपान मिळेल असे रमीला वाटत असते. सवर्ण असणाऱ्या रिटाबेन अवर्ण रमीला पूजेचे निमंत्रण देते. इतर स्त्रियांप्रमाणे आपल्यालाही पूजेचे निमंत्रण दिल्याने रमीला आनंदी होते. ती आपला नवरा मनोज याला म्हणते, " बघा तुम्ही म्हणत होतात ना की, काही झालं तरी या लोकांच्या मनातून भेदभाव जायचा नाही म्हणून, अगदी चूक, साफ चूक आहे ते. उच्च-नीच भेदभाव अशिक्षित लोकांमध्ये असेलही; किंवा जुन्या मागल्या पिढीच्या सवर्णांमध्ये असेल पण आजच्या काळातल्या शिकल्या सवरल्या लोकांमध्ये काही असला भेदभाव नाही."[७] आपण सुशिक्षित असलो, श्रीमंत असलो तरी सवर्ण हे आपल्याला कमीच समजतात हे मनोज आपल्या पत्नीला सांगतो, पण त्यावर तिचा विश्वास बसत नाही. रीटाबेनच्या घरच्या पूजेच्या प्रसंगी आरतीचे ताट तिला दिले जात नाही व पूजेचा शिरा तिला एका पानातून दिला जातो. परंतु अशा प्रसंगाकडे ती सकारात्मक दृष्टीने पाहते.

रमीला जेव्हा आपल्या घरी सत्यनारायणाची पूजा करायची ठरवते, तेव्हा ती कॉलनीतील सर्व स्त्रियांना आमंत्रण देते. पूजेसाठी येऊ न शकलेल्या रिटाबेनला जेव्हा ती घरी नेण्यासाठी प्रसादाचा शिरा देते, तेव्हा दुसऱ्या दिवशी रिटाबेनच्या कंपाऊंडच्या बाहेरील दगडावर शिरा विखुरलेला असतो व कावळे त्यावर ताव मारत असतात. अवर्ण सुशिक्षित झाला व तो श्रीमंत झाला तरी सवर्ण त्याला हीनतेची वागणूक देतात, हे सत्य 'प्रसाद'या कथेतून लेखकाला सांगावयाचे आहे. काळ बदलला तरी सवर्णांच्या मनातील जातिभेद मात्र कायम असल्याचे, लेखक या कथेतून सांगताना दिसतो.

गुजरातीमधून मराठीत भाषांतर झालेल्या काही निवडक कथांचा आढावा घेतल्यानंतर काही निष्कर्ष नोंदविता येतील.

१) गुजरातीमधील दलित कथांनी विविध विषय मांडून, दलित जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श केला आहे.

२) दलितांवर होणारे अन्याय व अत्याचार यांची घटनात्मक मांडणी पाहावयास मिळते.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रेरणा मानणारे साहित्यिक अन्यायाविरुद्ध विद्रोह पुकारत नाहीत, त्यामुळे ती कथा अत्यंत संयत वाटताना दिसते.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

४) विद्रोही लेखन केल्यास आपल्याला कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागेल, कदाचित या भीतीने दलित लेखक नकार व विद्रोह या मूल्यांना आपल्या लेखनात स्थान देताना दिसत नाहीत,

५) दलित समाजामध्ये जागरुकता निर्माण करण्याचे काम गुजराती दलित कथा करताना दिसते.

दलित कथेची अनेक वैशिष्ट्ये गुजराती कथांमध्ये दिसून येत नसली, तरी दलित साहित्य विकसित करण्याचे काम मात्र तिने केले आहे.

**संदर्भ सूची :**

*१) गाडीत जयंत, 'नवलकथा वास्तव अने वास्तववाद' गुर्जर प्रकाशन, अहमदाबाद, पृ.३८*

*२) 'लोकराज्य': खंड ३६, क्र.२३, एप्रिल १९८१, पृ. ४१*

*३) मंगलम् हरीश (संपा.) अनु. जोशी अरुणा, 'गुजराती दलित कथा', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००८, पृ. १०*

*४) तत्रैव, पृ. ९८*

*५) तत्रैव, पृ. १००*

*६) तत्रैव, पृ. १४१*

७) *तत्रैव, पृ. १२२*

*Cite This Article:*

***प्रो. डॉ. कांबळे चं. शं.*** *(2025). गुजरातीमधून मराठीत भाषांतरित झालेल्या दलित कथा.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 62–66).

ISSN-2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# भाषांतर आव्हाने, मर्यादा, अडचणी आणि त्यावरील उपाय

*** प्रा. डॉ. सौ. जयश्री कृष्णा शहाणे**

** सहाय्यक प्राध्यापक - एस.एम.आर.के.ए.के. बी. के. महिला महाविद्यालय, नाशिक.*

**प्रस्तावना** :

भाषांतर म्हणजे मूळ कृतीची हुबेहूब प्रतिकृती असावी असे मानले जाते, तो शब्दश: थोडाफार स्वतंत्र होऊन; तर कधी स्वैर म्हणजे फार जास्त स्वातंत्र्य घेऊन केलेल्या अशा प्रकारच्या लेखन कृतीस 'भाषांतर' असे म्हणतात.

भाषांतर ही संकल्पना पाश्चात्य देशात लॅटीन भाषेतून इंग्रजी व इतर युरोपियन भाषेत आली. तर आपल्याकडे ती संस्कृतातून मराठी भाषेत भाषेत आली. परंतु भाषांतर हे शास्त्र आहे याचा विचार इंग्रजी कालखंडापासून होऊ लागला. इंग्रजीत Translation या शब्दाला पर्याय म्हणून भाषांतर हा शब्द योजला जाऊ लागला. एका भाषेत व्यक्त झालेले विचार दुसऱ्या भाषेत व्यक्त करण्याच्या प्रक्रियेला 'भाषांतर' म्हटले जाऊ लागले. दोन भिन्न संस्कृतीची देवाण-घेवाण करण्यास भाषांतर उपयुक्त ठरते.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**भाषांतराच्या व्याख्या :**

"भाषांतर करणे म्हणजे एका भाषेतील अर्थ दुसऱ्या भाषेत नेत असताना मूळ अर्थ तसाच ठेवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करणे होय." - ए. एच स्मिथ

"भाषांतर हे मुळावर हुकूम असावे ते स्वतंत्र रचनात्मक नसावे" - प्रो. न्यूमन

"परकीय ग्रंथात जे अपरिचित आहे ते आपल्या शब्दात अशा कौशल्याने मांडणे की, प्रारंभी अपरिचित वाटणारी संकल्पना ही आपल्या नेहमीच्याच परिचयाची वाटावी."

- रुबेल ब्रोअर

"भाषांतर करणे म्हणजे मुळ कलाकृतीसारखाच परिणाम भाषांतरीत कलाकृतीने साधावा." - एझरा पाऊंड

आगरकरांनी भाषांतर म्हणजे काय? हे सांगितले नाही. परंतु प्रामुख्याने इंग्रजी नाटकांची मराठी भाषांतरे कशी करावी व त्यातल्या त्यात शेक्सपियरच्या नाटकांचे भाषांतर कसे असावे? याबाबत ६ सूत्रे मांडली. त्यांच्या मते, भाषांतरकाराने होता होईल तेवढे ते मुळास धरून भाषांतर करावे. देश-कालमानाप्रमाणे किंवा मराठी रीती रिवाजा प्रमाणे सढळ हाताने फेरफार करून भाषांतर करू नये."

- गो. ग. आगरकर

"एका कुपीतील अत्तर दुसऱ्या कुपीत ओततांना त्याचा एक थेंब होत वाया जाऊ न देणे" असे बेमालूमपणे भाषांतर झाले पाहिजे."

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

-पु. ल. देशपांडे

"काव्यगर्भ कलाकृतीमध्ये त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व दिसले पाहिजे, असे भाषांतर पाहिजे."

- दि. पु. चित्रे

"भाषांतर ही एका संहितेचे एका भाषिक, सांस्कृतिक आवारातून दुसऱ्या भाषिक सांस्कृतिक आवारात स्थानांतरण करणारी एक द्विभाषिक प्रक्रिया आहे."

- भालचंद्र नेमाडे

"भाषांतर ही एक प्रक्रिया आहे. एखादया लिखित वा मौखिक बचनाला एका भाषेतून दुसऱ्या भाषेत नेत असतांना मुळ भाषेतील अर्थ जसा असतो तसा उतरविणे म्हणजे भाषांतर होय."

- सी.रेबीन

"भाषांतर करणे म्हणजे एका भाषेतील अर्थ दुसऱ्या भाषेत नेत असताना मूळ अर्थास धक्का न लावणे."

- डॉ. जॉन्सन

**भाषांतराचे प्रकार :**

1. **छायानुवाद** – या प्रकारात मूल लेखनातील शब्दशः अर्थ जतन करण्याचा प्रयत्न केला जातो
2. **भावानुवाद** - या शब्दांचा अर्थ आणि त्या मागील भावना आणि संदर्भ लक्षात घेऊन भाषांतर केले जाते.

भाषांतर याचा सरळ अर्थ असा होतो की, कोणताही मजकूर एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अर्थ न बदलता रुपांतरीत करणे होय. भाषेतील बदलाच्या साहाय्याने सदर मजकूर दुसऱ्या भाषेत रुपांतरीत केला जातो.

**भाषांतराची आवश्यकता :** सध्याच्या काळात भाषांतर प्रक्रियेला अधिकाधिक महत्व प्राप्त होत आहे. जागतिकीकरण जसजसे वाढत जाईल तसतसे जगातल्या भाषांचे ग्रहगोल एकमेकांना छेद देऊन जातील. आजवर बऱ्याच भाषा आपल्या जाणिवेपलीकडे होत्या, मात्र भाषांतर अनुवाद प्रक्रियांमुळे अनेक प्रकारे त्या आपल्यापर्यंत येऊन पोहोचत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातही भाषांतर युग आपल्याकडे होते मात्र त्याचे स्वरुप मर्यादित होते. आज केवळ इंग्रजीतून मराठी, संस्कृतातून मराठी इतकेच हे भाषांतर उरले नाही. तर भाषांचे विस्तारीत क्षेत्र जागतिकीकरणामुळे आपल्या साहित्यानेही पादाक्रांत केले आहे. शंभर वर्षाहून अधिक काळ इंग्लिशच्या छायेत राहिलेल्या मराठीमध्ये भाषांतर ही महत्वाची गोष्ट ठरते. बऱ्याच महाराष्ट्रीयन कुटुंबात घरी मराठी परंतु कार्यालयात इंग्रजी भाषा बोलली जाते. दोन्ही भाषेतील वृत्तपत्र वाचली जातात. या ना त्या अशा अनेक कारणांनी भाषांतर होणे ही काळाची गरज बनली आहे.

**भाषांतरकाराचे आवश्यक गुण :**

भाषांतरकार मूळ आणि ज्या भाषेत भाषांतर करणार आहे त्या अशा दोन्ही भाषेत पारंगत असावा. दोन्ही भाषांतील शब्द, शब्दच्छटा, अर्थ, व्याकरण, बोलीभाषेतील प्रचलित शब्द, शब्दांचे अर्थ यांसारख्या गोष्टींचा विचार करून भाषांतर केले जाते. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अर्थाचे संक्रमण होताना मूळ आशयाला कोणताही धक्का लागणार नाही, अशा प्रकारचे भाषांतर असावे. केलेले भाषांत हे भाषांतर आहे, असे वाचकाला वाटता कामा नये.

भाषांतर करताना भाषांतरकाराला सर्वसामान्य लोकांची बोली, व्यावसायिकांची भाषा, शास्त्रीय व तांत्रिक शब्दरचना या घटकांचा अभ्यास असावा लागतो. दोन्ही भाषांतील

शब्दकोश, परिभाषा कोश यांचा भाषांतरकाराला सतत आधार घ्यावा लागतो. भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, अलंकार, शैली यांच्यावर भाषेचे वैभव अवलंबून असते व यांचा वापर मुख्यत्वे ललित वाङ्मय प्रकाशनात केला जातो. कारण शब्द, पद, वाक्ये इत्यादींचा उपयोग त्यांच्या मूळ वाच्यार्थाहून भिन्न अर्थाने भाषेत रूढ झालेला असतो. तसेच म्हणी, वाक्प्रचार, लोकानुभव हे लोकांच्या व्यवहारांतून रूढ होत असतात.

**भाषांतरातील मुख्य आव्हाने, मर्यादी व अडचणी :**

भाषांतर करण्याचा हेतू, दर्जा, या सर्व गोष्टींचा विचार करून विविध कारणांसाठी भाषांतार करतात. एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत आणतांना दोन्ही भाषा तसेच संबंधित साहित्य, संस्कृती, यांच्याशी समरस झालेला असतो. अर्थछटा, लक्ष्यार्थ, व्यंगार्थ, यांच्यासह तो भाषांतर करू शकतो. अर्थात भाषांतर करतांना अनेक अडचणी येतात. त्यातील काही अडचणी पुढीलप्रमाणे-

1. **मूळ मजकुराचा अर्थ बदलता कामा नये** :
   भाषांतरामध्ये मूळ मजकुराचा अर्थ हा कायम असावा मजकुरातील स्पष्टता कायम राखणे आवश्यक आहे. जर भाषांतर स्पष्ट नसेल तर मुख्य मजकुराचा अर्थ बदलतो अथवा मूळ मजकुराचा योग्य अर्थ भाषांतरात आलेला दिसून येत नाही.
2. **साहित्यिक भाषांतर** –
   विविध साहित्यकृतींचे भाषांतर करणे हे काम कठीण अथवा आव्हानात्मक असते. कारण विविध साहित्यकृतीमध्ये विशिष्ट भाषा शैली, अलंकार, म्हणी, वाक्प्रचार, भाषेचे विविध कंगोरे, सूक्ष्म बारकावे असतात अशा घटकांचे भाषांतर करणे प्रचंड आव्हानात्मक असते.
3. **शब्दसंग्रह आणि शब्दशः भाषांतर-**
   विविध साहित्य प्रकारात वेगवेगळे शब्द वापरलेले असतात. त्या त्या शब्दांचे काही खास असे अर्थ असतात. अशा शब्दांचे जसेच्या तसे भाषांतर करता येत नाही. एका भाषेत असलेल्या अशा विशिष्ट शब्दाला दुसऱ्या भाषेत तसाच अर्थ असलेला शब्द असेलच असे सांगता येत नाही त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात.
4. **व्याकरण आणि वाक्यरचना** –
   विविध भाषांना विविध प्रकारची व्याकरणाची रचना असते. एका भाषेतील वाक्यरचना अथवा व्याकरणाची रचना दुसऱ्या भाषेत तशीच्या तशीच वापरल्यास अर्थ बदलू शकतो. त्यामुळे व्याकरणानुसार भाषांतरात योग्य वाक्यरचना करणे हे एक जिकिरीचे काम होऊन बसते.
5. **सांस्कृतिक फरक** –
   आज जगभरात तसेच एखाद्या प्रदेशामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या संस्कृती आपणास दिसून येतात या विविध संस्कृतीमध्ये अनेक संदर्भ वेगवेगळ्या पद्धतीने घेतले जातात. यामध्ये विशिष्ट वाक्प्रचार, म्हणी, अलंकार, भाषेतील काही विशिष्ट शब्द, काही विशिष्ट प्रकारचे वाक्य त्या त्या संस्कृतीच्या संदर्भाने मांडले जातात किंवा दिले जातात. एका संस्कृतीत दिलेले शब्द दुसऱ्या संस्कृतीमध्ये त्याच अर्थाने असतील असे सांगता येत नाही.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

6. **शब्दसंपत्तीची मर्यादा** –

काही शब्द किंवा तांत्रिक संकल्पना मराठीमध्ये आपणास दिसून येत नाहीत. तसेच मराठीत असणारे काही शब्द इतर भाषांमध्ये आपणास दिसून येत नाहीत त्यामुळे त्या त्या भाषेची शब्द मर्यादा किती आहे यावर भाषांतर हे अवलंबून आहे.

7. **दोन्ही भाषेचे सखोल ज्ञान असेलच असे नाही** -

भाषांतरकाराला दोन्ही भाषा, बोली, संबंधित रूढी परंपरा याची उत्तम जाण असेलच असे नाहे. त्यामुळे वस्तुस्थितीचा विपर्यास होऊ शकतो.

8. **विषय नीट समजून न घेणे** –

भाषांतराचा विषय भाषांतर करणाऱ्याने व्यवस्थित समजून न घेतल्यास भाषांतरात मूळ मजकुराचा अर्थ जसाच्या तसा येताना अनेक अडचणी येतात.

9. **संदर्भ विश्लेषण लक्षात घेतले जातेच असे नाही** –

भाषांतर करतांना मजकुरातील मूळ विषयाचा संदर्भ भाषांतर करणाऱ्याने लक्षात घेणे आवश्यक आहे. भाषांतराचा वाचक वर्ग, त्याची बोली भाषा हे घटक लक्षात घेऊन भाषांतर करणे आवश्यक आहे.

10. **आविष्कारात होणाऱ्या चुका** –

भाषांतर हा प्रकार देखील त्या भाषेतील अविष्कार होय. असा आविष्कार करतांना काही चुका होऊ शकतात. त्याने अचूक भाषांतर होत नाही.

**भाषांतरातील आव्हानांवर मात करण्यासाठी उपाय योजना :**

1. **सांस्कृतिक बारकावे समजून घेणे** -

सांस्कृतिक संदर्भ असलेल्या वाक्यांचे अथवा मजकुराचे भाषांतर करताना स्थानिक भाषेच्या तज्ज्ञांची मदत घेणे महत्त्वाचे आहे. त्या त्या संस्कृतीच्या संदर्भात विशिष्ट शब्दांचे काय संदर्भ आहेत याचा सखोल अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

2. **शब्दशः भाषांतराऐवजी अर्थाकडे लक्ष देणे** –

शब्दांच्या पलीकडे जाऊन वाक्याच्या संपूर्ण अर्थाचा तसेच पॅराग्राफच्या संपूर्ण अर्थाचा विचार करून योग्य तो शब्द निवडणे महत्त्वाचे आहे. केवळ शब्दशः भाषांतर केल्यास वेगळा अर्थ घेतला जाऊ शकतो. यासाठी समग्र आशयाचा विचार भाषांतर करताना करावा.

3. **व्याकरणाचे पालन करणे** –

भाषेच्या व्याकरणानुसार भाषांतर करणे महत्त्वाचे आहे. असे केल्यास ते अधिकाधिक योग्य वाटेल आणि भाषांतरीत लिखाण हे स्वाभाविक किंवा मूळ लिखाण आहे असे वाटण्यास मदत होते.

4. **मजकूर सोपा करणे** –

एखादा भाग जर समजण्यास कठीण असेल तर भाषांतर करताना तो आपण आपल्या भाषेमध्ये व्यक्त करणे महत्त्वाचे आहे. अर्थात यामध्ये अर्थ बदल होता कामा नये ही काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

**समारोप** : अलीकडील कालावधीत भाषांतर या घटकाला मोठ्या प्रमाणावर महत्त्व प्राप्त होत आहे. भाषांतर करताना अनेक गोष्टींची जाणीव भाषांतरकाराला ठेवावी लागते. चांगले भाषांतर करणे हे करणाऱ्यासाठी तारेवरची कसरत आहे. किंबहुना मूळ लेखकाच्या कामापेक्षादेखील हे काम किचकट आहे असे म्हणावे असे वाटते. परंतु भाषांतरामुळे साहित्यामध्ये भर पडत असते हे महत्त्वाचे आहे. भाषांतरामुळे नवनिर्मिती होत असते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

**निष्कर्ष :**

1. *भाषांतर हा साहित्यातील एक महत्त्वाचा भाग आहे.*
2. *विविध साहित्यात भाषांतर हा एक आवश्यक भाग आहे.*
3. *भाषांतर करणारी व्यक्ती ही साहित्यातील जाणकार असावी लागते.*
4. *भाषांतर प्रक्रियेत अनेक अडचणी असल्या तरी मूळ अर्थ न बदलता भाषांतर करणे आवश्यक आहे.*

**संदर्भ :**


1. *मराठी विश्वकोश*
2. *भाषांतर चिकित्सा – डॉ. मधुकर मोकाशी*
3. *तौलनिक साहित्याभ्यास - डॉ.दिवाकर इंगोले*
4. *तौलनिक साहित्याभ्यास आणि भाषांतरे – डॉ. सारिका ठोसर*


*Cite This Article:*

***प्रा. डॉ. सौ. ज. कृ. शहाणे (2025).*** *भाषांतर आव्हाने, मर्यादा, अडचणी आणि त्यावरील उपाय .* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 67–71).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# डिजिटल युगात इंग्रजी भाषांतराचा प्रभाव

* डॉ. दीपक गायकवाड

* श्री. शाहू मंदिर महाविद्यालय पर्वती, पुणे.

**प्रस्तावना** :

आधुनिक काळात दळणवळण क्षेत्रात प्रगती झाल्यामुळे संपूर्ण जगाला खेड्याचे रूप आले आहे. जागतिकीकरणामुळे संपूर्ण जगच ढवळून निघाले. भाषा, साहित्य, संस्कृती, सेवा, वस्तू अशा सर्वच पातळीवर आदान-प्रदाने वेगवान झाली व त्यामुळे संपर्क वाढला. परस्परांची भाषा, साहित्य संस्कृती जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली, पण मुख्य अडचण भाषेची होती. आज महाराष्ट्रात, भारतात संपूर्ण जगाचा विचार केला तर हजारो भाषा बोलल्या जातात. त्यामुळे वैचारिक देवाण घेवाण होण्यासाठी एका भाषेतील कलाकृती इतर भाषांमध्ये भाषांतरित होऊ लागली. मराठी भाषाही याला अपवाद ठरली नाही.

मराठीत भाषांतराची प्राचीन परंपरा असून संस्कृत महाकाव्यापासून अव्वल इंग्रजी कालखंडापर्यंत अनुवाद झाले आहेत. पेशवाईच्या अस्तापासूनच इंग्रजी शिक्षणाचा प्रसार, मुद्रणकलेचा विकास इत्यादी गोष्टींमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनात अनेक बदल झाले. साहजिकच साहित्यक्षेत्रातही बदल होण्यास सुरुवात झाली. ललित व ललितेतर साहित्याचे मोठ्या प्रमाणावर भाषांतरे मराठीत होऊ लागले. सुरुवातीला चार्ल्स डिकन्स, स्टीव्हन्सन, लार्ड लिटन, जेन ऑस्टिन, इत्यादी लेखकांच्या पाश्चात्त्य कादंबऱ्यांचे मराठीत भाषांतर झाले. हे भाषांतर करण्यात ल. न. परळकर, के. रा. पुरोहित, गं. भा. बापट, इंदिराबाई सहस्रबुद्धे, कृ. ना. आठल्ले, वा.पु. पटवर्धन इत्यादींनी हातभार लावला. १९९० नंतर तर यामध्ये खूपच भर पडलेली दिसते.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**भाषांतराचा प्रभाव:**

आज आपण सर्वजणच बहुसांस्कृतिक जीवन जगत आहे. त्यामुळे अनुवाद, भाषांतर आणि रुपांतर या प्रक्रियांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यावसायिक क्षेत्र म्हणूनही याकडे पाहिले जाते. विविध समाज गटांच्या बेलीमुळे परस्परसंवाद प्रस्थापनेसाठी एक अडथळा निर्माण होतो. त्यामुळे साहित्य, शिक्षण, प्रशासन, व्यापार इत्यादी क्षेत्रात भाषांतराची गरज वाढली आहे.

'आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे जगभरातील लोक एकमेकांच्या जवळ येत आहेत. विविध क्षेत्रातील ज्ञानाबरोबर

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article

साहित्याच्या अनुवादासाठी महत्त्व प्राप्त झाले आहे. सर्व जगच एका छोट्या खेड्यामध्ये परिवर्तित झाल्यामुळे या काळात भाषांतराचे महत्त्व पूर्वीपेक्षा खूप वाढले आहे. प्रत्येक भाषा त्या भाषिक समाजाची सांस्कृतिक संचित असते. परंपरा, श्रद्धा, रूढी आणि संस्कृती याचा वारसा त्या समाजाची भाषा जाेपासत असते. अनुवादक अनेक अडचणींना तोंड देत अनुवाद करत असतो. कधी कधी मूळ शब्दाला चपखल असा शब्द भाषांतर करताना मिळत नाही, म्हणून तो आहे तसा घेतला जातो.[१] इंग्रजीतून मराठीत भाषांतरित कादंबरीत अशा प्रकारे मूळ शब्द व वाक्यांचा वापर जशाचा तसा भाषांतरकाराने केला आहे. मात्र त्यामुळे मूळ आशय समजण्यास वाचकांना अडचण निर्माण होत नाही किंवा त्याला धक्का पोहोचत नाही.

कलाकृतीची निवड करत असताना उत्कृष्टता हा निकष लावावा लागतो. मूळ कलाकृतीचा बाज आणि तिचे गुणविशेष भाषांतरामध्येही आले पाहिजेत. भाषांतरकाराला दोन भाषा आल्या म्हणून उत्तम भाषांतर होईलच असे नाही, तर स्त्रोत भाषा आणि लक्ष्य भाषा अशा दोन्ही भाषांचे अद्ययावत शास्त्रीय आणि सखोल ज्ञान लागते. सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाबरोबर भाषेत अस्तित्वात असलेल्या वैविध्यपूर्ण रूपांची जाण असणे गरजेचे असते. यासाठी चतुरस्र वाचन व व्यासंग असावा लागतो. एखाद्या वाक्याचा व शब्दाचा अनुवाद करताना नेमका शब्द योजण्यासाठी शब्दकोशाची हाताळणी केली पाहिजे. या अभ्यासासाठी घेतलेल्या मूळ इंग्रजी साहित्याला आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त झाल्याचे दिसतात. त्या मूळ कलाकृतीने आपल्या देशातील साहित्यात अग्रक्रमाने स्थान मिळवलेले आहे. यावरून या इंग्रजी साहित्याची महत्त्व कळते. मराठी भाषेतील ही भाषांतरे मूळ कलाकृतीतील आशयाला धक्का न लावता केल्यामुळे ते वाचकांना भावतात. यामुळे वाचकवर्गाच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे.

एकूणच भाषांतरित पुस्तकांमध्ये वैविध्यपूर्णता दिसून येते. साहित्याच्या पलिकडे जाणारे अनेक विषय वाचकांना खुणावत आहेत. मराठीत असे विषय कमी प्रमाणात हाताळले जात असल्यामुळे इंग्रजीतून मराठीत अशी पुस्तके भाषांतरित करण्याची गरज आहे. आजच्या परिस्थितीत इंग्रजी भाषेशी मराठी वाचक परिचित आहे. त्यामुळे एका साहित्य कलाकृतीचे रूपांतर करण्यापेक्षा प्रामुख्याने इंग्रजी भाषेतून अनुवाद मराठीत होत आहेत. कितीतरी अनुवादित पुस्तके आज उपलब्ध होत असून ती खपत आहेत. याचे कारण मराठीतून वाचणे, समजणे सोपे जात आहे. शिवाय सर्वच महाराष्ट्रातील लोकांना इंग्रजी अवगत आहे असे नाही. म्हणून इंग्रजी व भारतीय भाषांतील पुस्तके मराठीत अनुवादित करणे गरजेचे बनले आहे.

युराेपमध्ये औद्योगिक क्रांती घडून आल्यापासून विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये झपाट्याने प्रगती झाली. जागतिकीकरण, माहिती तंत्रज्ञानाची प्रगती, इंटरनेट या एकविसाव्या शतकातील बदलामुळे निरनिराळे लोक व त्यांची संस्कृती व देश खूपच जवळ आले. एकमेकांवरचे अवलंबन वाढून तंत्रज्ञान व विचारांची देवाण-घेवाण वाढली. अशा अनेक कारणांमुळे भाषांतराचे महत्त्व वाढत गेले. भाषांतरित साहित्य वाचकांपर्यंत पोहोचवणे ही एक काळाची गरज बनली आहे.

आधुनिक काळात भाषांतराचे महत्त्व व आवश्यकता-

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

(1) भाषांतरामुळे सामाजिक अभिसरण घडून येण्यास मदत होते.

(2) मोखिक अनुवाद एक व्यवसाय व व्यवहार बनला आहे.

(3) शिक्षण क्षेत्रात बदल होण्यासाठी तसेच अध्ययन व अध्यापनात भाषांतराचे महत्त्व दिसून येते.

(4) भाषा, साहित्य, संस्कृतीच्या प्रगतीसाठी अनुवादाचे महत्त्व लक्षात घ्यावे लागते.

(5) व्यापार, व्यवसायाच्या विकासासाठी जागतिकीकरणात भाषांतराशिवाय तर पर्यायच नाही.

(6) वैज्ञानिक क्षेत्रातील घडामोडी सर्वदूर पोहोचविण्यासाठी भाषांतराचा आधार महत्त्वाचा वाटतो.

(7) भिन्नभाषिक व्यक्ती व समूहाचे परस्परांशी संपर्क वाढल्याने प्रशासन व शासकीय कामकाजात भाषांतर करणे महत्त्वाचे ठरत आहे व ते व्यवहार्यही मानले जाऊ लागले आहे.

(8) जुन्या पोथ्या, शिलालेख, प्राचीन, धार्मिक ग्रंथाचेही भाषांतर केले जाते.

(9) प्राचीन संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी ग्रंथांच्या भाषांतराची आवश्यकता आहे.

(10) भाषांतरामुळे दोन भाषा, समाज यांच्यात भावनिक व वैचारिक संबंध प्रस्थापित होऊ शकतात.

(11) भाषांतरामुळे परक्या भाषेतील साहित्य, समाज, संस्कृती आपल्या पर्यंत पोहोचू शकते.

(12) दोन भाषांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी भाषांतर करणे आवश्यक आहे.

(13) भाषांतरामुळे दोन भाषांतील साहित्य कसे वेगवेगळे आहे, त्याचे विषय काय आहेत, त्या विषयांची लेखक कशाप्रकारे हाताळणी करतो, त्यांच्याकडील रंजकतेची भाषिक अभिव्यक्ती कशी आहे हे अनुवादामुळे समजण्यास मदत होते.

भाषांतरित मूळ साहित्य कृतीतून जो संदेश पोहोचविण्याचा आहे तो त्याच्या भाषेशी एकरूप झालेला असला तरी, दुसऱ्या भाषेतून तितक्या प्रभावीपणे तो व्यक्त होऊ शकतो. म्हणून आज पुस्तक प्रदर्शनातून किंवा पुस्तकांच्या दालनांतून प्रामुख्याने एक गोष्ट दिसून येते की अनुवादित पुस्तके व वाचकांची वाढलेली संख्या होय.

भाषांतरकाराला अनेक गोष्टींचे भान ठेवावे लागते. शब्द, शब्दच्छटा, विविध बोली, म्हणी, वाक्प्रचार, शैली, वातावरण निर्मिती, व्यक्तीचित्रण, घटना प्रसंग, मांडणी इत्यादी मूळ कलाकृतीतील घटक लक्षात घेऊन अनुवादित कलाकृती मांडण्याचे काम भाषांतरकार करत असतो. त्यामुळे भाषांतरकाराला भाषा आणि व्यवहाराचे परिपूर्ण ज्ञान असावे लागते. भाषांतर करणे, कसरतीचे व कोशल्याचे काम आहे यात शंका नाही. हे कोशल्य विकसित करण्यासाठी भाषांतरकाराला दाेन्ही भाषांचे परिपूर्ण ज्ञान असावे लागते. सरावातून व अभ्यासातून ही सहजसाध्य गोष्ट आहे. दोन भाषा, दोन संस्कृती आणि दोन समाज परस्परांच्या सहवासात आल्यानंतर ताैलानिक दृष्टिकोन निर्माण होणे ही एक अपरिहार्य गोष्ट आहे. अनुकरणशीलता हीदेखील माणसाची सहजप्रवृत्ती आहे. दुसया भाषेत जे काही उत्तम आहे, अनुकरणीय आहे ते आपल्या भाषेत आणून आपले साहित्य आणि भाषा समृद्ध करणे ही गोष्ट साहित्य निर्मीती इतकीच महत्त्वाची आहे. भाषांतरित साहित्याचे महत्त्व यशवंत कळमळकर यांनी नेमक्या शब्दांत सांगितले आहे.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

भाषांतरमीमांसा या ग्रंथात कल्याण काळे म्हणतात, "आता जग जवळ येत चालले आहे, त्यामुळे विविध देशांच्या राजकीय जवळिकीबरोबर त्यांच्या संस्कृती, त्यांच्या साहित्यकृती जवळजवळ येत राहतील. त्यांच्यात आदानप्रदान होत राहील, त्यामुळे नवीन प्रेरणा मिळत राहतील आणि परिणामी त्या क्षेत्रांची एकांगी वाढ थांबून त्यांना बहुआयामी स्वरूप प्राप्त होईल.[२]" भाषांतर व अनुवादाचे भविष्यकाळातील महत्त्व या विधानावरून स्पष्ट होते.

**सकारात्मक परिणाम :**

भाषांतरामुळे आज जगातील ज्ञान सार्वत्रिक झाले आहे. कोणत्याही भाषेतील माहिती सर्वांना उपलब्ध होते. शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात सर्वांना समान संधी मिळतात. भाषांतरामुळे स्थानिक संस्कृती जागतिक पातळीवर पोहोचते, आणि त्याच वेळी परकीय संस्कृतीचा परिचयही होतो. डिजिटल माध्यमांमुळे विविध समुदायांमध्ये समज, सहिष्णुता आणि सहकार्य वाढते — हे जागतिक शांततेसाठीही आवश्यक आहे.

भारतीय भाषा संदर्भातील भाषांतर एक चळवळ आहे. भारत हा बहुभाषिक देश असल्याने येथे भाषांतराचे महत्त्व अधिक आहे. संविधानाने २२ अधिकृत भाषा मान्य केल्या आहेत. शासनव्यवस्थेपासून ते शिक्षणापर्यंत सर्व क्षेत्रांमध्ये भाषांतराची आवश्यकता भासते. ‘राष्ट्रीय भाषांतर मिशन’, ‘भारतीय भाषा डेटा सेंटर’, आणि ‘AI4Bharat’ सारख्या प्रकल्पांद्वारे भारतीय भाषांना डिजिटल सामर्थ्य दिले जात आहे. मराठी भाषेसाठीही “मराठी विश्वकोश”, “मराठी कॉर्पस”, “गूगल मराठी इनपुट टूल” अशी अनेक साधने विकसित झाली आहेत. यामुळे मराठीतील साहित्य, संशोधन, आणि शैक्षणिक माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचते आहे.

**भविष्याचा दृष्टिकोन :**

डिजिटल युगातील पुढील पाऊल म्हणजे बहुभाषिक कृत्रिम बुद्धिमत्ता. भविष्यातील AI मॉडेल्स भाषेची भावनात्मक, सांस्कृतिक आणि सामाजिक संदर्भांसह अचूक व्याख्या करू शकतील. “रिअल-टाइम ट्रान्सलेशन गॉगल्स” किंवा “व्हॉइस इंटरप्रिटिंग इअरबड्स” यांसारख्या तंत्रज्ञानामुळे थेट संभाषणाचे त्वरित भाषांतर होईल.

यामुळे भाषेची अडचण पूर्णतः नाहीशी होईल आणि “जग एकच कुटुंब” — वसुधैव कुटुंबकम् — ही संकल्पना खऱ्या अर्थाने साकार होईल. 'इंग्रजीचा प्रभाव भारतीय समाज मनावर राहिल्याने आधुनिक ज्ञानाची कवाडे इंग्रजीच्या माध्यमातून मराठीत निर्माण झाली. ललित व ललितेतर साहित्याचे मोठ्या प्रमाणावर अनुवाद मराठीत झाले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण जगच बदलून गेले. याचा परिणाम साहित्यावरही झाला. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगातील अनेक समूह परस्परांच्या संपर्कात आले. दोन भाषा, दोन संस्कृती, दोन समाज परस्परांच्या सहवासात आल्यावर हे भावविश्व जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली.

प्रामुख्याने इंग्रजी ही ज्ञान भाषा असल्यामुळे तिच्यातून इतर भाषांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनुवाद होऊ लागले. भाषेची अडचण असल्यामुळे इंग्रजीतून मराठीतही अनुवाद होण्यास सुरवात झाली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय घडामोडीचे प्रतिबिंब मराठी साहित्य विश्वात प्रकर्षाने उमटले. भारतासारख्या

बहुभाषिक देशात अनुवादाची गरज नेहमीच जाणवते. अलीकडच्या काळात अनेक दर्जेदार इंग्रजी साहित्यकृतींचे मराठीत अनुवाद झाले.

अनुवादामुळे भाषिक आणि सांस्कृतिक दुरावा दूर होतो . इतर भाषांतील समृद्ध, उत्तम साहित्य केवळ भाषा न येण्यामुळे वाचकांपर्यंत पोहाचत नाही. यावर अनुवाद हाच उपाय आहे"[३].

**निष्कर्ष :**

डिजिटल युगात भाषांतर हे केवळ तांत्रिक साधन नाही, तर मानवतेच्या संवादाचे शस्त्र आहे. ते ज्ञान, संस्कृती, आणि भावनांना जोडणारा पूल आहे. भाषांतरामुळे विविधतेतून एकता साधता येते आणि स्थानिक भाषांनाही जागतिक ओळख मिळते.

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भाषांतर अधिक व्यापक होत असले तरी मानवी संवेदनशीलता, सांस्कृतिक जाण आणि भावनिक अचूकता यांचा समन्वय राखणे आवश्यक आहे. भविष्यातील समाजात जो भाषिक दृष्ट्या समृद्ध असेल, जो भाषांतराचा योग्य वापर करेल, तोच खऱ्या अर्थाने ज्ञानसमृद्ध आणि जागतिक नागरिक ठरेल. डिजिटल युगात इंग्रजी भाषांतर हे ज्ञान, संवाद, संस्कृती आणि प्रगती यांचे केंद्रस्थान बनले आहे. त्याने जागतिक स्तरावर एकतेची भावना निर्माण केली आहे, परंतु स्थानिक भाषांचे अस्तित्व टिकवून ठेवण्याची जबाबदारी आपलीच आहे.

भाषांतर हे तंत्रज्ञानाचे साधन असूनही, त्यामागे मानवतेचा आत्मा आहे. त्यामुळे डिजिटल युगातील इंग्रजी भाषांतराचा प्रभाव हा केवळ भाषिक न राहता मानवी सभ्यतेच्या प्रगतीचा द्योतक ठरतो.

**संदर्भ :**


१. *गायकवाड दीपक , 'अनुवादित मराठी कादंबरी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०२१, पृ. ११*

२. *काळे कल्याण, सोमन अंजली (संपादक), 'भाषांतर मीमांसा', प्रतिमा प्रकाशन, पुणे आवृत्ती प्रथम, १९९७, पृ. ०९*

३. *'अनुवादित मराठी कादंबरी', पृ. १९*



*Cite This Article:*

***डॉ. गायकवाड दी, (2025).*** *डिजिटल युगात इंग्रजी भाषांतराचा प्रभाव.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 72–76).

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# भाषांतर आणि अभिजात साहित्य

* डॉ. नूतन लोणकर – नेवसे

* सहायक प्राध्यापक, मराठी , वाघीरे महाविद्यालय, सासवड .

साहित्य हे मानवी विचार भावना आणि संस्कृतीचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. समाजातील विविध संस्कृती, इतिहास, परंपरा आणि जीवनमूल्ये यांचे प्रतिबिंब साहित्याद्वारे उमटते. प्रत्येक भाषेतील काही साहित्यकृती या केवळ त्या समाजापुरत्याच मर्यादित राहत नाहीत तर त्या कालातीत मूल्ये आणि वैश्विक विचार मांडतात. अशा साहित्यकृतींना अभिजात साहित्य म्हणतात.

अभिजात साहित्य हे काळाच्या ओघातही टिकून राहते. कारण त्यात मानवी जीवनाचे सर्वसाधारण सत्य, सौंदर्य, नैतिकता आणि संवेदनशीलता यांचा शोध असतो. या साहित्याचा विस्तार आणि प्रभाव केवळ एका भाषेतच नव्हे तर इतर भाषांमध्ये होण्यासाठी भाषांतर हे एक महत्त्वाचे साधन ठरते. भाषांतरामुळे अभिजात साहित्याचे आशय,विचार,तत्त्वज्ञान आणि कलात्मकता इतर भाषिक समाजात पोहोचतात. त्यामुळे भाषांतर आणि अभिजात साहित्य हे परस्पर पूरक आणि अविभाज्य घटक आहेत.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

भाषांतर म्हणजे एका भाषेत लिहिलेल्या मजकुराचे दुसऱ्या भाषेत अर्थपूर्ण आणि भावनिकदृष्ट्या समतुल्य रूपांतर करणे. मराठीत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भाषांतर संकल्पना रुजू लागली आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत ती बरीच जोमाने विस्तार पावल्याचे दिसते. विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी 'गेल्या शतकात भाषांतर' म्हणून जो निबंध मालेत एक प्रदीर्घ लेख लिहिला त्यात ते म्हणतात "उत्कृष्ट भाषांतरकाराला भाषांतरित कृती ज्या भाषेत असेल तिचे आणि भाषांतर ज्या भाषेत करायचे तिचे दोन्ही भाषांचे संपूर्ण ज्ञान पाहिजे" हे विष्णूशास्त्रांचे म्हणणे योग्यच आहे.कारण भाषाभाषांतील तफावत अनेक प्रकारची असते भाषांतर केवळ शब्दांचे रूपांतर नसून ती एक संस्कृतीच्या संवादाची प्रक्रिया आहे. पुढे ते असे म्हणतात की, "भाषांतर कसे असावे, भाषांतरकाराजवळ कोणते गुण असावेत, वेगवेगळ्या साहित्यकृतींचे भाषांतर कसे करावे वगैरे महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली होती. त्यांनी वेगळ्या भाषेतील संस्कृतीतील 'रीतिरिवाज' असा अतिशय साधा, पण सुयोग्य शब्द वापरून आपण साहित्यकृतीबरोबर तेथील रीतिरिवाजही आपल्या भाषेतून वाचकांपर्यंत पोहोचवत असल्याचे म्हटले होते त्यामागील भूमिका अनुवादकार्यास मोठी प्रेरक ठरते."

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

भाषांतराच्या माध्यमातून विविध भाषिक समाज एकमेकांच्या विचार विश्वाशी परिचित होतात उदाहरणार्थ संस्कृत मधील साहित्य इंग्रजीत अनुवादित झाल्याने भारतीय संस्कृती जगभर पोहोचली त्याचप्रमाणे युरोपियन अभिजात साहित्य मराठीसह भारतीय भाषांमध्ये आल्याने भारतीय वाचकांना जागतिक साहित्याचा परिचय झाला भाषांतराचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे विचारांचे सार्वत्रिकीकरण करणे.

**भाषांतरास प्रेरणादायी घटना** :

1950 नंतर भारत सरकार तर्फे 12 मार्च 1954 रोजी 'साहित्य अकादमी' स्थापन झाली. 'अनुवाद' हा साहित्य अकादमीच्या कार्यातील महत्त्वाचा भाग आहे. भारत सरकारने स्वीकृत केलेल्या सर्व 23 भाषांतील उत्तम ग्रंथ इतर भारतीय भाषांत अनुवादित केले जातात. साहित्य अकादमी अनुवादास नुसते प्रोत्साहन देत नाही तर प्रतिष्ठाही मिळवून देण्याचा प्रयत्न करते. 1957 मध्ये स्थापन झालेली 'नॅशनल बुक ट्रस्ट' ही संस्थाही अनुवाद क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करते. तसेच 'चिल्ड्रन बुक ट्रस्ट' तर्फेही बाल साहित्यातील उत्तम पुस्तकाचे अनुवाद प्रसिद्ध केले जातात. 'युनायटेड स्टेट्स इन्फर्मेशन सर्व्हिस' तर्फे अमेरिकन पुस्तकांचे अनुवाद भारतीय भाषांत करण्यात आले रशियन सरकारने ही मराठी अनुवादाचा कार्यक्रम राबवला त्यामुळे लेखकांच्या साहित्याचा परिचय मराठी वाचकांना झाला.

'महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ' ह्या संस्थेचे अनुवाद कार्यही मोठे आणि महत्त्वाचे आहे. संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच ,जर्मन ,इटालियन, रशियन इत्यादी भाषांतील अभिजात ग्रंथांचे आणि निवडक पुस्तकांचे मराठी भाषांतर करणे हा संस्थेच्या भाषांतर मालेचा उद्देश आहे.

"मंडळाने पाश्चात्य व भारतीय अशी सुमारे 300 पुस्तके निवडली त्यात होमर ,व्हर्जिल ,एस्किलस, ॲरीस्टोफेनीस, युरिपिडीज, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस ,ॲक्कायनस, न्यूटन, डार्विन, रुसो, कांट, हेगेल ,जॉन स्टुअर्ट मिल ,गटे , शेक्सपीयर,टॉलस्टॉय,दोस्तोवस्की, कॅसिरेर ,गार्डन व्हीचाइल्ड इत्यादींचा समावेश आहे संस्कृत मधील वेद, उपनिषदे ,महाभारत रामायण, भरतमुनींचे नाट्यशास्त्र प्राकृतातील गाथासप्तशती इत्यादींचा समावेश आहे".

दुर्गाबाई भागवत म्हणतात "अनुवाद करणे हे मला कधीच कमीपणाचे वाटले नाही अनुवादासाठी स्वतंत्र प्रतिभेची गरज असते मी वेगवेगळ्या विषयांवरील पुस्तकांचे अनुवाद केले त्या त्या पुस्तकांना अनुरूप अशी शैली मी वापरली आहे प्रत्येक लेखकाने अनुवाद केलेच पाहिजेत त्यामुळे त्यांच्या अनुभव विश्वात भाषाबळात वाढ होते.काही वेळा अनुवादाचे काम माझ्याकडे चालत आले पण ते ते ग्रंथ करते कादंबरीकार मला भरपूर देऊन गेले ते माझ्या विसाव्याचे स्थान ठरले". दुर्गाबाई भागवतांचे हे उद्गार म्हणजे अनुवादाच्या महात्मतेवर केलेले शिक्कमोर्तबच होय.

अभिजात साहित्य या संकल्पनेत असा साहित्य प्रवाह समाविष्ट होतो. जो केवळ ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा नसून त्याची शैलीविषय आणि तात्विक खोली कालातीत असते. हे साहित्य भाषिक आणि सांस्कृतिक सीमा ओलांडून मानवी अस्तित्वाकडे मूलभूत प्रश्न हाताळते. उदाहरणार्थ एलियर्ड फर्जिलचे एनीज, कालिदासाचे अभिज्ञानशाकुंतलम् किंवा

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, वाल्मिकी चे रामायण आणि व्यासांचे महाभारत यांची विविध भारतीय आणि विदेशी भाषांमध्ये भाषांतरे झाली. त्यामुळे साहित्याला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली त्यांच्या मूळ कालखंडातील संदर्भ गमावून आजही तितकीच प्रासंगिक आहेत. सर्वकालिक, सार्वत्रिकता, तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन आणि कलात्मकतेचा उत्कर्ष प्रखरपणे दिसून येतो. अभिजात साहित्य भाषांतरची समृद्ध अशी परंपरा आहे.

**इतर भाषांमध्ये अनुवादित मराठी पुस्तके:**

इतर भाषांमध्ये मराठी जी पुस्तके अनुवादित झाली त्यात सर्व साहित्यप्रकार असून अभिजात आहेत. ज्ञानेश्वरांचा 'अमृतानुभव' आणि 'चांगदेवपासष्टी' हे ग्रंथ 1965 मध्ये बंगालीत भाषांतरित झाले आहे लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' हे आत्मचरित्र कन्नडमध्ये 1966 मध्ये तर गुजरातीत 1971 मध्ये अनुवादित झाले. रवींद्रनाथ टागोरांच्या 'गीतांजली' ची अनेक भाषांत भाषांतरे झाली.हरी नारायण आपटे यांची 'पण लक्षात कोण घेतो' ही कादंबरी तेलगू मध्ये अनुवादित झाली. श्री ना पेंडसे यांची 'गारंबीचा बापू' ओडियात पोहोचली धर्मानंद कोसंबी यांचा 'भगवान बुद्ध' हा ग्रंथ 1957 मध्ये तमिळ,तेलगू, अस्मिया, गुजराती, सिंधी ,उर्दूत अनुवादित झाला इरावती कर्वे यांचे 'युगांत' असमीया, बंगाली ,सिंधी, तेलगू इत्यादी भाषांत पोहोचले .वि स खांडेकरांची 'ययाती' कादंबरी असमीया भाषेत अनुवादित झाली.श्री ना पेंडशांची 'रथचक्र' आणि भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ह्या कादंबऱ्या गुजरातीत पोचल्या. व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' कादंबरी गुजरातीत अनुवादित झाली. 'ययाती' या कादंबरीचेही तमिळमध्ये अनुवाद झाले. सरोजिनी बाबर यांची 'महाराष्ट्राची लोकगीते' कन्नडमध्ये अनुवादित झाली.चंद्रशेखरन पिलाई यांनी ज्ञानेश्वरीचा अनुवाद केला. 'अनुभवामृत' आणि 'तुकारामांचे निवडक अभंग' यांचा इंग्रजीत अनुवाद झाला. मराठी नाटके ही अनुवादित झालेली आहेत. त्यामध्ये 'नटसम्राट' हे नाटक उर्दूत आणि असमीयात अनुवादित झाले. महेश एलकुंचवारांच्या 'वाडा चिरेबंदी'या नाटकाचे इंग्रजी भाषांतर झाले. महात्मा जोतीराव फुले यांच्या 'गुलामगिरी' चा वीणा आलासे यांनी बंगालीत अनुवाद केला.बालसाहित्यात ना धों. ताम्हनकरांचे 'गोटया', 'लीलावती' 'भागवतांचे' 'रानातील रात्र' पुस्तके हिंदी ,इंग्रजी, बंगाली, पंजाबी, डोंगरी भाषांत पोहोचली आहेत.बाळ फोंडके यांचीही काही पुस्तके हिंदी उर्दू गुजराती पंजाबी या भाषांत अनुवादित झाली. इत्यादी अभिजात साहित्यकृती आधुनिक काळात वाचकांपर्यंत पोहोचल्या आहेत.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भाषांतराचे स्वरूप अधिक व्यापक झाले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान ऑनलाईन साधने आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे भाषांतराची गती वाढली आहे. अभिजात साहित्याचे भाषांतर अजूनही मानवी समज,भावनिक जाण आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यावर आधारित आहे. अनेक भारतीय अभिजात ग्रंथांचे आधुनिक भाषांतर ई-बुक्स आणि डिजिटल माध्यमांतून उपलब्ध आहे.यामुळे वाचक वर्गाची सीमा जगभर वाढली आहे.अभिजात साहित्य आणि भाषांतर या दोन्हींच्या संगमामुळे जागतिक साहित्याचा समृद्ध पट तयार झाला आहे.भाषांतराने अभिजात साहित्याला नवे आयुष्य दिले आणि जगातील विविध संस्कृतींना एकत्र आणले.

**संदर्भ टिपा:**


1. *वसंत बापट, 'तौलनिक साहित्याभ्यास', मौज प्रकाशन गृह मुंबई, दुसरी आवृत्ती मार्च 2014 पृ. क्र.49.*
2. *मुख्य संपादक प्रा.रा.ग.जाधव, डॉ. वि.भा.देशपांडे 'मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सातवा भाग चौथा 1950 ते 2000', महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे. प्रथमावृत्ती 27 मे 2011.पृ. क्र.357.*
3. *तत्रैव, पृ. क्र. 309.*
4. *तत्रैव पृ. क्र.361-362.*
5. *मुळे वीणा, 'मराठी अनुवाद ग्रंथसूची', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई. 1998.*
6. *संपादन डॉ. कल्याण काळे , डॉ.अंजली सोमण 'भाषांतरमीमांसा', प्रतिमा प्रकाशन पुणे.1 जानेवारी 2025.*


*Cite This Article:*

***डॉ. लोणकर – नेवसे नू.* (2025).** *भाषांतर आणि अभिजात साहित्य.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 77–80).

ISSN-2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# भाषांतर : एक कौशल्य

* डॉ. पुरुषोत्तम प्रल्हाद महाजन

* मूळजी जेठा महाविद्यालय (स्वायत्त), जळगाव, जिल्हा पेठ, जळगाव जि.जळगाव, ४२५००१, महाराष्ट्र.

**प्रास्ताविक :**

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सर्व विषयांच्या माहितीचा प्रचंड साठा आहे.विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, राजकीय क्षेत्र, व्यापार, वैद्यकीय व्यवसाय, सामाजिक क्षेत्र इ. सर्व क्षेत्रात ज्ञानाचा व माहितीचा खूप मोठा भाग भाषांतरित केला जातो. माहिती तंत्रज्ञानाने जग जवळ आलेले आहे. यामुळे वेगवेगळी भाषा बोलणारी व्यक्ती एकत्र काम करू लागली. अशा परिस्थितीमध्ये भिन्न भाषा त्यातही परकीय भाषा शिकणे गरजेचे झालेले आहे. आपल्या क्षेत्रात निपुणता प्राप्त करण्यासाठी व्यक्ती एकतरी परकीय भाषा शिकायला लागली. आपल्या ज्ञानात भर व्हावी तसेच वेगवेगळ्या संधीद्वारे आपले करिअर समृद्ध करावे, यासाठी परकीय भाषा अवगत करायला सुरुवात झालेली आहे. अशातच 'भाषांतर' हे करिअर मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. सर्व राष्ट्रांची भाषा एक नसल्याने संपर्कासाठी इतर भाषांबरोबर हा भाग खूप मोठा आहे. त्याची व्याप्ती मोठी असली तरी इंग्रजी व मराठी या दोन भाषांपुरता विचार केल्यास इंग्रजीची दर्जेदार पुस्तके मराठीत भाषांतरित झाल्यास मराठी भाषेतील वाचकांची वाचन भूक निश्तितच वाढेल, असे म्हणावे लागेल.

भाषांतर ही प्रक्रिया पुनर्निर्मितीचा आनंद देते. एखादी साहित्यकृती ही भाषांतरामुळे इतर भाषिक लोकांपर्यंत पोहोचणार असते. शास्त्रीय ग्रंथांचे भाषांतर व माहितीपर भाषांतर करणे हे साहित्यकृतीच्या भाषांतर करण्यापेक्षा वेगळे असते. माहितीपर व विज्ञान क्षेत्रातील भाषांतराला वस्तुनिष्ठ पद्धतीने भाषांतर करणे महत्वाचे असते. तर साहित्यकृतीचे भाषांतर करताना भाषांतरकाराला परक्या संस्कृतीचा, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, परकीय भाषेचा अभ्यास करणे अत्यावश्यक ठरते. ज्या भाषेत भाषांतर करावयाचे आहे, त्या भाषेचे मुलभूत ज्ञान तसेच त्या भाषेची समज असणे अत्यावश्यक ठरते.याचा अभ्यास व्हावा यासाठी विद्यापीठस्तरीय व स्पर्धा परीक्षांमध्ये एका परिच्छेदाचे भाषांतर करायला सांगून विद्यार्थ्यांची इतर भाषेची समज व ज्ञान तपासण्यात येते.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**भाषांतर – व्याख्या :** भाषांतर या लेखन कौशल्याच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

मूळ भाषेतील वाक्यरचना, शब्दरचना आणि शैली यांचे दुसऱ्या भाषेत रुपांतर करणे यास 'भाषांतर' असे म्हणतात.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

1. एखादा उतारा किंवा साहित्यकृती तिच्या आशयात बदल न करता दुसऱ्या भाषेत मांडणे यास 'भाषांतर' असे म्हणतात.
2. मूळार्थाचे केलेल्या इतर भाषेतील रुपांतर प्रक्रियेस 'भाषांतर' असे म्हणतात.
3. भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर,त्याचा आशय आणि अभिव्यक्तीजन्य अनुभव यासह दुसऱ्या भाषेत उतरण्याची प्रक्रिया – डॉ.कल्याण काळे
4. Oxford Dictionary- Translation is the communication of the meaning of a source Language text by means of an equivalent target language text.

वरील व्याख्यांचा विचार करता भाषांतर म्हणजे अशी प्रक्रिया की,ज्या भाषेत भाषांतर करावयाचे आहे, त्या भाषेत संपूर्ण ज्ञान मिळवून मूळ भाषेतील आशय, विचार जसाचा तसा दुसऱ्या भाषेत उतरवणे होय.

भाषांतरास भावानुवाद, स्वैर भाषांतर, भावार्थ भाषांतर असेही म्हटले जाते. भाषांतर करताना ज्या भाषेत मूळ मजकूर असतो,तिला 'मूळ भाषा' असे म्हणतात. तसेच ज्या भाषेत मजकुराचे भाषांतर करावयाचे असते, तिला 'लक्ष्य भाषा' असे म्हणतात.

**भाषांतर – प्रकार**

भाषांतराचे सामान्यतः प्रमुख दोन प्रकार पडतात,ते पुढीलप्रमाणे

1. **मूल्यनिष्ठ भाषांतर-**

ज्या भाषांतर प्रक्रियेत मूळ भाषेतील शब्द, शब्दरचना आणि आशय, शैली यांचे तंतोतंत अनुकरण केले जाते, त्यास 'मुल्यनिष्ठ भाषांतर' असे म्हणतात.

उदा. सिंहकटी शब्दाचे भाषांतर 'सिंहासारखी कमर असणारी सुंदरी'

The young man and the river – तरुण आणि नदी

2. **लक्ष्यनिष्ठ भाषांतर-**

ज्या भाषांतर प्रकारात शब्दरचना, वाक्यरचना, शैली भिन्न असते. परंतु मूळ भाषेतील आशयाला अनुसरूनच भाषांतर केले जाते,त्यास 'लक्ष्यनिष्ठ भाषांतर' असे म्हणतात.

उदा. उपयोजित लेखन, तांत्रिक लेखन.

रवींद्रनाथ ठाकुरांच्या लिहिलेल्या गीतांजलीचे स्वतः ठाकुरांनी आणि टोटस या दोघांनी केलेले भाषांतर या प्रकारात मोडते.

**भाषांतर व्यवहारानुसार भाषांतराचे प्रकार :**

1. **शास्त्रीय ग्रंथाचे भाषांतर –**

शास्त्रीय ग्रंथाच्या भाषांतरात आशय हा नेमकेपणाने सांगण्यावर अधिक भर दिला जातो. यात नेमक्या शब्दात मजकुराची मांडणी केलेली असते.

उदा. सं.ग.मालशे यांनी केलेले Rene Wellek यांच्या A theory of literature या ग्रंथाचे 'साहित्य सिद्धांत' या नावाने केलेले भाषांतर.

2. **ललित साहित्याचे भाषांतर –**

कथा, काव्य, कादंबरी, नाटक व ललित साहित्याच्या भाषांतरात सांस्कृतिक आणि सामाजिक संकेताचा वापर मोठ्या प्रमाणात आढळतो.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

उदा. 'मोगरा फुलला' या कादंबरीत ज्ञानेश्वरकालीन भाषेचा वापर केलेला आहे.

3. **धर्मग्रंथाचे भाषांतर** –

धर्म ग्रंथाचे भाषांतर करताना अचूकता हा महत्त्वाचा पैलू आवश्यक असतो. वेगवेगळ्या धर्मातील धर्मग्रंथाचे भाषांतर करताना मूळ ग्रंथाच्या संकल्पना लक्ष्य भाषेत अचूकपणे, काटेकोरपणे प्रकट करताना अडचणी येतात. हे भाषांतर परिभाषानिष्ठच असते.

4. **वैचारिक ग्रंथाचे भाषांतर** –

या प्रकारच्या भाषांतरात प्रगल्भ भाषेचा वापर करावा लागतो. मूळ ग्रंथातील विचार जसाचा तसा भाषांतरित करावा लागतो.

**भाषांतर करताना आवश्यक बाबी** :

1. **मूळ मजकुराचा आशय** –

भाषांतर करताना अनेक महत्त्वाच्या बाबींचा विचार करणे आवश्यक असते. भाषांतर हा केवळ शब्दांचा बदल नसून अर्थ, संदर्भ आणि शैली यांचे अचूक रूपांतर करण्याची सूक्ष्म प्रक्रिया आहे. सर्वप्रथम, मूळ मजकुराचा आशय नीट समजणे गरजेचे आहे. लेखकाने काय सांगितले आहे, त्यामागील उद्देश काय आहे, याचा योग्य अर्थ लक्षात घेतल्याशिवाय अचूक भाषांतर होऊ शकत नाही.

2. **संदर्भ**

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे संदर्भ. एकाच शब्दाचे अनेक अर्थ असू शकतात आणि त्या शब्दाचा अर्थ संदर्भानुसार बदलू शकतो. त्यामुळे शब्दशः भाषांतर न करता वाक्याचा आणि विषयाचा संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे.

3. **भाषाशैली** -

मूळ मजकूर औपचारिक, अनौपचारिक, भावनात्मक किंवा विनोदी असल्यास त्याच शैलीत भाषांतर करणे अपेक्षित असते. शैली बदलल्यास संदेशाचा परिणाम बदलू शकतो.

भाषांतर करताना मूळ भाषेतील शब्दसंग्रह असणे आवश्यक आहे.कारण दिलेल्या आशयाचे दुसऱ्या भाषेत भाषांतर करताना त्या आशयास पर्यायी शब्द देणे आवश्यक आहे.भाषांतरकाराने लक्ष्य भाषा व मूळ भाषा या दोन्ही भाषेचा शब्दसंग्रह वाढविणे आवश्यक आहे.म्हणून उत्कृष्ट भाषांतरकार हा भाषेचा चालता बोलता विश्वकोश, शब्दकोश हवा.

4. **सांस्कृतिक संदर्भ** –

काही म्हणी, रूपके किंवा सांस्कृतिक उदाहरणे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतरित करणे शक्य नसते. त्यासाठी समतोल अर्थ असलेले पर्यायी शब्द किंवा वाक्प्रचार वापरावे लागतात. म्हणून भाषांतर करताना सांस्कृतिक निर्देश असणारे शब्द भाषांतरित करताना जशाच्या तसा भाषांतरित न करता त्या भाषेची संस्कृती लक्षात घेऊन भाषांतर करावे.

5. **व्याकरणाची इत्यंभूत माहिती** –

भाषांतर करताना मूळ भाषा व लक्ष्य भाषा याचे व्याकरणाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. मूळ भाषेतील वाक्यरचना समजून घेऊन त्याचे लक्ष्य भाषेत योग्य रीतीने रुपांतर करणे, भाषांतर करताना आवश्यक ठरते. वाक्याचा अर्थ न बदलता भाषांतर होणे अत्यावश्यक आहे. यासाठी

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

मूळ भाषेची वाक्यरचना, त्याचा अर्थ समजण्यासाठी व्याकरणाचा अभ्यास उपयुक्त ठरतो. व्याकरणामुळे भाषांतरकारास कोणत्याही साहित्याचे भाषांतर करताना अडचणी येत नाही. त्यामुळे भाषांतरकारास व्याकरणाची इत्यंभूत माहिती असणे आवश्यक आहे.

**6. सराव**

कोणतेही कौशल्य हे सरावाने साध्य होते. त्याप्रमाणे भाषांतर हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी सराव महत्वाचा आहे. भाषांतर करताना आधी साध्या सोप्या वाक्यातून सराव करणे आवश्यक आहे. या सरावातून आत्मविश्वास वाढीस लागतो आणि भाषांतर कौशल्याची गोडी निर्माण होते. भाषांतरकाराने नित्य सराव केल्यास तो योग्य भाषांतरकार म्हणून नावलौकिक मिळवू शकतो.

**भाषांतर कसे करावे ?**

भाषांतर ही शब्दांची केवळ अदलाबदल नसून अर्थ, संदर्भ, शैली आणि भाव यांचे रूपांतर करण्याची एक कलात्मक आणि बौद्धिक प्रक्रिया आहे. प्रभावी भाषांतर करण्यासाठी पुढील टप्पे उपयुक्त ठरतात:

1.**मूळ मजकूर नीट समजून घेणे -**

भाषांतर करण्यापूर्वी मजकूर किमान दोन-तीन वेळा वाचून त्याचा आशय, उद्देश, लेखकाचा दृष्टिकोन आणि संदर्भ समजून घेणे आवश्यक आहे. शब्दशः भाषांतर करू नये; कारण प्रत्येक शब्दाचा अर्थ संदर्भानुसार बदलतो.

2. **लक्ष्य भाषा आणि वाचकांची ओळख -**

भाषांतर कोणत्या भाषेसाठी आणि कोणत्या प्रकारच्या वाचकांसाठी आहे हे समजून घेणे महत्त्वाचे असते. विद्यार्थी, संशोधक, सर्वसामान्य वाचक किंवा तज्ज्ञ यांच्या पातळीनुसार भाषांतरकाराने भाषा निवडावी.

3.**शब्दार्थ आणि वाक्प्रचारांची योग्य निवड -**

एकाच शब्दाचे अनेक अर्थ असल्याने शब्दकोशाचा आणि योग्य भाषिक संदर्भांचा वापर आवश्यक असतो . भाषांतर करताना भाषांतरकाराने म्हणी, वाक्प्रचार, सांस्कृतिक संकल्पना यांच्या अर्थपूर्ण पर्यायांचा शोध घ्यावा.

4. **वाक्यरचना आणि व्याकरण -**

लक्ष्य भाषेच्या व्याकरणानुसार वाक्यरचना करावी. वाक्ये तुटक, कच्ची किंवा कृत्रिम वाटणार नाहीत याची काळजी घ्यावी. भाषांतरात प्रवाहीपणा आणि नैसर्गिकता असावी.

5. **शैली व भाव जपणे -**

मूळ मजकूर विनोदी, वैज्ञानिक, भावनिक, साहित्यिक किंवा औपचारिक असल्यास त्याच्या शैलीचे भाषांतर करणे अपेक्षित असते. शैली बदलल्यास मूळ अर्थाचे सौंदर्य हरवू शकते.म्हणून भाषांतर करताना भाषांतरकाराने शैली जपणे आवश्यक आहे.

6. **पुनर्वाचन व मुद्रितशोधन -**

भाषांतर पूर्ण झाल्यानंतर चुका, अर्थातील विसंगती, वाक्यरचना आणि शब्दप्रयोग तपासणे आवश्यक आहे. शक्य असल्यास इतर कुणाला वाचून अभिप्राय घ्यावा.

**भाषांतराची आवश्यकता :**

भाषांतर म्हणजे एका भाषेत व्यक्त झालेला विचार, ज्ञान, साहित्य किंवा माहिती दुसऱ्या भाषेत पोहोचविण्याची प्रक्रिया होय. आजच्या जागतिक युगात भाषांतराची आवश्यकता अधिक तीव्रतेने जाणवते. कारण जगभरातील लोक

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

वेगवेगळ्या भाषांमध्ये बोलतात, लिहितात आणि विचार करतात. या विविधतेत संवाद साधण्यासाठी भाषांतर हा एक महत्त्वाचा घटक ठरतो.

1. **संवादासाठी भाषांतर आवश्यक -**

   आंतरराष्ट्रीय व्यापार, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रांत विविध भाषिक लोकांमध्ये परस्पर समज निर्माण करण्यासाठी भाषांतराशिवाय पर्याय नाही. उदाहरणार्थ, एखाद्या औषधाची माहिती इंग्रजीत लिहिलेली असेल तर ती मराठीत भाषांतरित केल्याशिवाय स्थानिक लोकांना समजणार नाही.

2. **ज्ञानविस्तार -**

   धर्मग्रंथ, साहित्य, संशोधन यांचे भाषांतर झाल्यामुळे ते जगभर पोहोचले. भगवतगीता, बायबल, कुराण यांचे विविध भाषांतील भाषांतरामुळे जगभरातील लोकांना त्यांचा अभ्यास करता आला. शेक्सपिअरचे नाटकं किंवा पु. ल. देशपांडे यांचे विनोदी लेखन भाषांतरामुळे व्यापक वाचकवर्गापर्यंत पोहोचले.

3. **संस्कृती आदानप्रदान -**

   एका समाजाची कला, परंपरा, विचार दुसऱ्या समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी भाषांतर पूलाचे काम करते. यामुळे विविध संस्कृतींमध्ये परस्पर आदर आणि समज वाढते. भाषांतर ही केवळ शब्दांची देवाणघेवाण नसून विचार, संस्कृती आणि ज्ञान यांचा सेतू आहे. आधुनिक काळात तांत्रिक भाषांतर, साहित्यिक भाषांतर, भावानुवाद अशा विविध प्रकारांनी भाषांतराचे स्वरूप विस्तारले आहे. त्यामुळे भाषांतराची आवश्यकता ही सर्व क्षेत्रांत अनिवार्य ठरते.

**भाषांतरातील अपेक्षा :**

भाषांतर ही केवळ शब्दांची अदलाबदल नसून अर्थ, भाव आणि सांस्कृतिक संदर्भ यांचे संवेदनशील रूपांतरण असते. त्यामुळे भाषांतरकाराकडून काही मूलभूत अपेक्षा धरल्या जातात.

पहिली अपेक्षा म्हणजे अर्थनिष्ठ भाषांतर. मूळ मजकुरातील संदेश बदलू न देता, तो लक्ष्य भाषेत तितक्याच अचूकतेने पोहोचणे महत्त्वाचे आहे. दुसरी अपेक्षा म्हणजे संदर्भाची जाणीव. शब्दाचे किंवा वाक्याचे अर्थ संदर्भानुसार बदलू शकतात; त्यामुळे भाषांतर करताना विषयाच्या संदर्भाचे अचूक भान आवश्यक असते.

तिसरी महत्त्वाची अपेक्षा म्हणजे भाषेची शैली जपणे. मजकूर वैज्ञानिक, विनोदी, काव्यात्मक किंवा शैक्षणिक असेल, तर भाषांतरातही त्याच शैलीचा प्रभाव कायम राहणे आवश्यक आहे. चौथी अपेक्षा म्हणजे व्याकरणदृष्ट्या शुद्ध, प्रवाही आणि नैसर्गिक भाषा वापरणे. लक्ष्य भाषेत वाक्य तुटक, कृत्रिम किंवा अनाकर्षक वाटू नयेत.

तांत्रिक, कायदेविषयक किंवा वैद्यकीय भाषांतरात योग्य संज्ञावलीचा वापर करणे ही आणखी एक महत्त्वाची अपेक्षा आहे. यासोबत मुद्रितशोधन आणि संपादन करून चुका दुरुस्त करणे आवश्यक असते. भाषांतरातील अपेक्षा या अचूकता, संदर्भ-जाण, भाषिक सौंदर्य, सांस्कृतिक संवेदनशीलता आणि वाचकांसाठी स्पष्टता या पाच मुख्य आधारस्तंभांवर उभ्या आहेत. अशा अपेक्षा पूर्ण झाल्यास भाषांतर प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण ठरते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

**निष्कर्ष :**

भाषांतर हे बौद्धिक, भाषिक आणि सांस्कृतिक जाण आवश्यक असलेले सक्षम कौशल्य आहे. केवळ भाषाविज्ञानच नव्हे तर मनोविज्ञान, समाजशास्त्र, इतिहास, संस्कृती या सर्वांचा मिलाफ भाषांतर प्रक्रियेत दिसून येतो. जागतिकीकरणाच्या काळात बहुभाषिक संवादासाठी भाषांतर एक अत्यावश्यक शस्त्र ठरले आहे. तंत्रज्ञानाचे साहाय्य लाभले असले तरी मानवी भाषांतराची संवेदनशीलता आणि सौंदर्य पूर्णपणे साध्य करू शकत नाही. म्हणूनच भाषांतर हे भविष्यातील सर्वात प्रभावी, मागणी असलेले आणि सृजनशील भाषिक कौशल्य म्हणून निरंतर विकसित होत राहील.

**संदर्भ :**

1. *काळे कल्याण आणि पुंडे ,डॉ. दत्तात्रय, व्यावहारिक मराठी, निराली प्रकाशन, पुणे, सुधारित आवृत्ती, मार्च २०१५*
2. *काळे कल्याण, सोमण अंजली (संपा), भाषांतरमीमांसा, पुणे, प्रतिमा प्रकाशन, १९९८*
3. *कऱ्हाडे सदा, भाषांतर, लोकवाङ्मयगृह प्रकाशन ,मुंबई, १९९२*
4. *महाजन डॉ. पुरुषोत्तम, स्पर्धा परीक्षांसाठी मराठी व्याकरण (भाग १ व २), अथर्व प्रकाशन, जळगाव, २०२४*

***Cite This Article:***

***डॉ. महाजन पु. प्र. (2025).*** *भाषांतर : एक कौशल्य.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 81–86).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# भाषांतरातील भाषिक आव्हाने

* डॉ. प्राजक्ता प्रल्हादराव निकम

* सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग , सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,कराड.

एका भाषेच्या सहाय्याने निर्माण झालेल्या आशयाची पुनरावृत्ती दुसऱ्या भाषेत करणे याला भाषांतर म्हणता येईल. संप्रेषण ज्या भाषेमध्ये होते. त्यातील भाषिक द्रव्य, जसे शब्द, रूप, वाक्यरचना इत्यादी, यांच्या साहाय्याने संप्रेषणाचे प्रयोजन व अर्थ निश्चित करणे व ज्या भाषेत संप्रेषणाची पुनरावृत्ती करायची असेल तिच्यातील समकक्ष पर्यायांचे उपयोजन करून तोच आशय पुनरावृत्त करणे असे भाषांतराचे स्वरूप असते. भाषांतरालाच मराठीमध्ये 'अनुवाद' ही पर्यायी संज्ञा वापरण्यात येते. भाषांतराचे स्वरूप लिखित किंवा मौखिक अशा दोनही प्रकारचे असू शकते. भाषांतर म्हणजे एका साहित्य कृतीचे दुसऱ्या भाषेमध्ये अनुवाद करणे होय. भाषांतरासाठी कमीत कमी दोन भाषेची गरज असते. एक जी मूळ भाषा व दुसरी ज्या भाषेमध्ये भाषांतर करावयाचे आहे ती भाषा. भाषांतरला इंग्रजी Translation म्हणतात Translation म्हणजे the action of process of turning from one language in to another. म्हणजेच एका भाषेचे दुसऱ्या भाषेत रूपांतर करणे होय. एका भाषेमध्ये वक्त केलेले विचार, मते दुसऱ्या भाषेमध्ये त्या वक्तीला समजण्यासाठी केलेली योजना म्हणजे भाषांतर होय.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**'भाषांतर' व्याख्या -**

कल्याण काळे यांनी भाषांतराची व्याख्या करताना स्पष्ट केले आहे की, 'भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर त्याचा आशय आणि अभिव्यक्तीजन्य अनुभव यासह दुसऱ्या भाषेत उतरवण्याची प्रक्रिया" दुसऱ्या भाषेत सांगताना ते म्हणतात "भाषांतर म्हणजे मूळ साहित्यकृतीची अथवा अन्य मजकूराची लक्ष भाषेत केलेली प्रतिनिमिती होय"

लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले आहे की, "भाषेचा वापर म्हणजे भाषांतर. भाषा व्यवहार हा तीन प्रकारचाः बोलणारा व लिहिणारा अर्थ संप्रेषण करतो... परंतु साधारणतः अनुवाद म्हणजे दुसऱ्या भाषेत अनुवाद असे आपण समजतो, अन्य भाषिक अनुवादालाच भाषांतर असे म्हणतात."

अशोक केळकर यांनी 'मराठी शब्दकोश खंड १२' मध्ये नमूद केलेली व्याख्या अगदी परिणामकारक वाटते, "भाषेचा वापर म्हणजे भाषाव्यवहार. भाषा व्यवहार हा तीन प्रकारचाः बोलणारा व लिहिणारा अर्थ संप्रेषण करतो. परंतु काही वेळा एकच व्यक्ती प्रथम अर्थग्रहण करुन नंतर त्याला अनुसरुन अनुप्रेषण करते. ते अर्थाकडे लक्ष न देता केले म्हणजे

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

अनुप्रस्तुती होते. उदा. ऐकलेले पाठ म्हणून दाखविणे देवनागरीतील मजकूर रोमनलिपीत उतरविणे पण अर्थ लक्षात घेऊन ते केले म्हणजे अनुवाद होतो. उदा. त्याच भाषेत घोषवारा सांगणे. परंतु साधारणतः अनुवाद म्हणजे दुसऱ्या भाषेत अनुवाद असे आपण समजतो. अन्यभाषिक अनुवादालाच भाषांतर असेही म्हणतात.”

भालचंद्र नेमाडे भाषांतराची व्याख्या करताना म्हणतात "भाषांतर ही एका संहितेचे एका भाषिक सांस्कृतिक आवरणातून दुसऱ्या भाषिक सांस्कृतिक आवरणात स्थानांतरण करणारी द्वैभाषिक प्रक्रिया आहे." याशिवाय विश्वनाथ खैरे यांनी "एका भाषेतल्या पाठाच्या दुसऱ्या भाषेत केलेला अर्थ म्हणजे भाषांतर.

वरील व्याख्यांच्या अनुषंगाने भाषांराचे स्वरूप समजते.भाषांतर ही संज्ञा दोन परस्परावलंबी गोष्टींचा निर्देश करते. एक म्हणजे पुर्ननिर्मितीची प्रक्रिया आणि या प्रक्रियेचे फलस्वरूप म्हणून निर्माण झालेली दुसऱ्या भाषेतील संहिता. प्रक्रिया आणि तिचे फल ह्या दोन्ही गोष्टी एकमेकांशी अतूटपणे संलग्न आहेत. दोन्ही गोष्टींचा संबंध अर्थ निर्णयनाशी आहे.भाषांतर नेहमीच भाषांतराचा उद्देश लक्षात ठेवून केले पाहिजे, तसेच लक्ष्यित प्रेक्षकांवर परिणाम करणारे सामाजिक आणि सांस्कृतिक घटक देखील लक्षात ठेवले पाहिजेत. भाषांतर ही मूळ भाषेतील मजकूर लक्ष्यित भाषेत अर्थ आणि आशय न बदलता रूपांतरित करण्याची एक जटिल प्रक्रिया आहे. जागतिकीकरण, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगात भाषिक आणि सांस्कृतिक अडथळे दूर करण्यासाठी भाषांतराची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तथापि, ही प्रक्रिया केवळ भाषिक समस्येपुरती मर्यादित नसून, त्यात अनेक सांस्कृतिक, वैचारिक आणि तांत्रिक आव्हाने आहेत. भाषांतर करताना मूळ आशयाचा काही भाग हरवतो. प्रस्तुत शोधनिबंध भाषांतराच्या प्रक्रियेतील प्रमुख आव्हानांचे सखोल विश्लेषण केले आहे.

**प्रस्तावना :**

जागतिकीकरणामुळे आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे भाषांतराचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.साहित्य, विज्ञान, व्यापार, कायदा आणि माध्यमांमध्ये भाषांतर हा आंतरभाषिक संवाद साधण्याचा एक आवश्यक पूल बनला आहे.भाषांतर ही केवळ शब्दांची अदलाबदल नसून, ती एक जटिल भाषिक आणि सांस्कृतिक प्रक्रिया आहे. मूळ भाषेतील अर्थ, भावना,आणि संदर्भ लक्ष्यित भाषेत तंतोतंत पोहोचवताना अनेक भाषिक आव्हाने येतात. भाषांतरातील भाषिक आव्हाने ही एक विस्तृत आणि गुंतागुंतीची समस्या आहे. ज्यामध्ये भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि तांत्रिक पैलूंचा समावेश होतो. या आव्हानांमध्ये भाषेच्या संरचनेतील भेद, शब्दसंपत्तीतील अभाव, अर्थाचे योग्य अनुवाद करणे, भाषिक विविधता आणि प्रादेशिक बोलींचा समावेश तसेच जागतिकीकरण आणि इंग्रजी भाषेचा वाढता प्रभाव यांचा समावेश होतो.

**शोधनिबंधाचा उद्देश :**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये भाषांतरकाराला भाषांतर करताना कोणत्या भाषिक आव्हानांना सामोरे जावे लागते याचा विचार करण्यात आलेला आहे. कारण भाषांतर ही एक जातील व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे प्रत्येक भाषेची स्वतःची एक शैली असते तिची एक ढब असते, तीच शैली दुसऱ्या भाषेची

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

असेल असे काही नाही त्यामुळे दोन्ही भाषेचा अभ्यास करताना भाषिक अडथळे येतात. भाषांतराच्या प्रक्रियेतील प्रमुख भाषिक आव्हानांचे विवेचन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. याआव्हानांच्या स्वरूप आणि कारणांचे विश्लेषण करणे इत्यादी उद्देश.

**संशोधनपद्धती** :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी तुलनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, .समाजशास्त्रीय पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. उपलब्ध सैद्धांतिक संकल्पना आणि उदाहरणांचा अभ्यास केला आहे.

**भाषांतरातील प्रमुख भाषिक आव्हाने :**

१. **शब्दशः भाषांतर टाळण्याची गरज** - कधी कधी शब्दशः भाषांतर चुकीचे ठरते. कारण दोन भाषांची सांस्कृतिक पार्श्वभुमी भिन्न असल्यामुळे भाषांतरात अडचणी उद्भवतात. उदा. माहेर, उष्टा यांना भारतीय भाषेत पर्याय सापडू शकतील, परंतु इंग्रजी व अन्य परदेशी भाषेत अवघड आहे. याशिवाय प्रत्येक भाषेत रूढी, परंपरा, चालीरिती, समजुतीविषयक शब्द असतात. तेव्हा देखील अडचणी येतात. उदा. आपल्याकडे श्राद्ध पिड तिसरा, केशवपण, बांगडी फुटणे, कुंकू पुसणे याला काही एक अर्थ आहे. या चालीरिती इतर समाजात असतीलही पण वेगळ्या मग यांचे भाषांतर करताना कसे करायचे हे मोठे आव्हानच ठरते

२. **शाब्दिक/शब्दसंग्रहातील आव्हाने** - भाषांतरकाराला शब्दाची योग्य निवड करता आली पाहिजे शब्दाच्या वापरावर विशेष लक्ष देणे गरजेचे असते. काही विभागवार शब्दांची योजना लेखक करत असतो काही शब्द त्या त्या भाषेमध्ये, त्या त्या समाजामध्ये परिचित असतात व त्याचे तसे अर्थही निघत असतात त्यामुळे शब्द अचूक वापरावे लागतात. बऱ्याच वेळेला एका शब्दाला समान अर्थी शब्द, दुसऱ्या भाषेमध्ये उपलब्ध होईल असे नाही किंवा त्या भाषेमध्ये तो नसतोही अशा वेळेला त्या शब्दाच्या अर्थाच्या जवळ जाणारा शब्द शोधावा लागतो बऱ्याच वेळेला त्या शब्दाच्या अर्थाचा दुसरा शब्द त्या लक्ष भाषेमध्ये नसेलही त्यावेळेला त्या शब्दाचे स्पष्टीकरण देऊन मोकळे होता येते कारण प्रत्येक भाषेचा एक वेगळा सांस्कृतिक धर्म आहे त्यामुळे सर्व शब्दाचे पर्यायी शब्द मिळतील असे सांगता येत नाही.अनेक शब्दांना लक्ष्यित भाषेत नेमका समानार्थी शब्द मिळत नाही. मराठी वाक्यरचना (कर्ता-कर्म-क्रियापद) आणि इंग्रजी वाक्यरचना (कर्ता-क्रियापद-कर्म) भिन्न असल्यामुळे,मूळ लेखकाची भाषाशैली आणि शब्दांवर दिलेला जोर भाषांतरित मजकुरात तसाच टिकवून ठेवणे मोठे आव्हान असते. एकाच शब्दाचे संदर्भानुसार वेगवेगळे अर्थ असू शकतात.उदाहरणार्थ: मराठीतील 'मान' या शब्दाचा अर्थ'आदर' किंवा 'गळा/Neck' असू शकतो. 'तीर'- बाण/किनारा किंवा इंग्रजीतील 'Bank, 'धार' (तलवारीची, पाण्याची, दुधाची). योग्य अर्थ निवडण्यासाठी संपूर्ण मजकूराचा संदर्भ विचारात घ्यावा लागतो.योग्य संदर्भ ओळखणे महत्त्वाचे असते.अनेकदा मूळ भाषेतील एखाद्या संकल्पनेसाठी लक्ष्य भाषेत नेमका किंवा समान अर्थाचा शब्द नसतो.विशेषत: तंत्रज्ञान, कायदेशीर किंवा वैद्यकीय संज्ञांच्या बाबतीत हे आव्हान

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

येते.काही शब्दांचे दोन अर्थ असल्याने मशीन ट्रान्सलेशन (यंत्राद्वारे भाषांतर) करताना गोंधळ होऊ शकतो. उदाहरणार्थ: मराठीतील 'वर' (वधू-वर मधील'वर' किंवा' Above'वर) किंवा'बस'(बसणे किंवा प्रवासी वाहन). विज्ञान आणि तंत्रज्ञानातील नवीन संकल्पनांसाठी लक्ष्य भाषेत योग्य प्रतिशब्द तयार करणे किंवा स्पष्टीकरणात्मक शब्द वापरणे आवश्यक ठरते. शब्दांचा सूचक किंवा भावनिक अर्थ भाषांतरित करणे (उदा. 'Home' आणि' House 'यांमधील फरक) हे आव्हानच आहे.

विविध भाषांमधील ध्वनीप्रणाली आणि व्याकरणातील फरक भाषांतरात आव्हाने निर्माण करतात. काही शब्दांचे दुसऱ्या भाषेत नेमके पर्याय नसतात ज्यामुळे अर्थाचे योग्य भाषांतर करणे कठीण होते. भाषांतर करताना सांस्कृतिक संदर्भाचा योग्य विचार न केल्यास अर्थाचा गोंधळ होऊ शकतो. स्थानिक बोली, परंपरा, आणि सामाजिक संदर्भ समजून घेऊन भाषांतर करणे आवश्यक आहे. भाषांतरातील मूलभूत समस्या भाषेच्या संरचनेत आणि शब्दांच्या अर्थातील भिन्नतेमुळे उद्भवतात

३. **व्याकरणिक आणि वाक्यरचनात्मक आव्हाने** : मराठी (कर्ता-कर्म-क्रियापद) आणि इंग्रजी (कर्ता-क्रियापद-कर्म) यांसारख्या भाषांमधील वाक्यरचनेत असलेला फरक .उदाहरणार्थ: इंग्रजीमध्ये कर्ता-क्रियापद-कर्म अशी रचना असते, तर मराठीत कर्ता-कर्म-क्रियापद अशी रचना असते. या रचनेतील फरक जपून अर्थ अचूक ठेवणे हे मोठे आव्हान आहे. दोन भाषांमधील लिंग (स्त्रीलिंग, पुल्लिंग, नपुंसकलिंग), वचन (एकवचन, अनेकवचन) आणि काळाचे नियम भिन्न असू शकतात. मराठीत नाम आणि विशेषणांवर होणारे बदल काळजीपूर्वक भाषांतरित करावे लागतात.

मराठीसारख्या भाषांमध्ये शब्दांना अनेक प्रत्यय किंवा विभक्ती लागून शब्दांचे रूप बदलते. हे बदल लक्ष्य भाषेत अचूकपणे व्यक्त करणे कठीण असते. क्रियापदांचे वेगवेगळे प्रकार आणि त्यांचे उपयोजन यांतील भाषिक फरक भाषांतरकारासाठी आव्हान निर्माण करतात. विविध भाषांमध्ये काळ आणि विभक्ती वापरण्याची पद्धत वेगळी असते, ज्यामुळे अर्थाचा अचूक क्रम टिकवून ठेवणे कठीण होते.

ज्या भाषेतील साहित्याचे आपण भाषांतर करणार आहोत त्या भाषेचे संपूर्ण ज्ञान असणे गरजेचे असते .प्रत्येक भाषा ही आपापली वैशिष्ठे घेऊन जन्माला आलेली असते. शब्दांच्या रचना, अर्थाच्या छटा, व्याकरणातील काही गोष्टी, वाक्यप्रचार, म्हणी ,काही लोकभ्रम हे प्रत्येक भाषेमध्ये वेगवेगळे असते ज्या इतर भाषेपेक्षा वेगळ्या असू शकतात त्यामुळे स्तोत्र भाषा व लक्ष भाषा यातील कल्पना या एकच राहतील हे सांगणे कठीण आहे. काही वेळेस दोन्ही भाषेच्या मांडणीमध्ये, व्याकरणामध्ये, उदाहरणामध्ये बदल असू शकतो याचा योग्य अभ्यास व ज्ञान भाषांतरकाराला असने गरजेचे असते ते जर नसेल तर योग्य प्रकारे भाषांतर होऊ शकत नाही. कधी कधी एका भाषेतील वाक्याचा अर्थ सांगताना किंवा त्याचे भाषांतर करत असताना स्पष्टीकरणाची गरज असते किंवा वेगळ्या उदाहरणाची गरज असते ते देण्यासाठी दोन्ही भाषेचे सखोल ज्ञान भाषांतरकाराला असणे गरजेचे असते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

४. **सांस्कृतिक आणि भाषिक शैली संबंधित आव्हाने** - भाषांतर करताना मूळ भाषेतील सांस्कृतिक संदर्भ, म्हणी, वाक्प्रचार, चालीरीती किंवा प्रथा यांचा अर्थ योग्यरित्या समजून घेणे आणि तो लक्ष्य भाषेत त्याच प्रभावाने मांडणे आवश्यक असते. अनेकदा यासाठी भाषिक समतोल शब्द शोधणे अवघड जाते.उदा: मराठीतील 'हळदी-कुंकू'किंवा'भूपाळया'यांसारख्या शब्दांचे इंग्रजीमध्ये भाषांतर करताना केवळ शाब्दिक अर्थ पुरेसा नसतो. भाषेतील वाक्प्रचारांचा शब्दशः अनुवाद केल्यास अर्थ पूर्णपणे बदलतो. वाक्प्रचार हे विशिष्ट संस्कृती आणि अनुभवातून निर्माण झालेले असतात,त्यांचे शब्दशः भाषांतर केल्यास मूळ अर्थ हरवतो. वाक्प्रचार, म्हणी आणि अलंकारिक भाषा,रूपके आणि उपमा प्रत्येक संस्कृतीत वेगळया असू शकतात.उपमा, रूपके, आणि अतिशयोक्ती यांसारख्या भाषिक अलंकारांचे मूळ सौंदर्य व परिणाम जपून ठेवणे.एकाच वाक्याचे किंवा शब्दांचे अनेक अर्थ निघण्याची शक्यता असल्यास, योग्य अर्थ निवडणे.आव्हान ठरते .मूळ मजकुरातील विनोदी, गंभीर, किंवा औपचारिक अशा भाषेचा स्वर आणि शैली लक्ष्यित भाषेत कायम ठेवणे महत्वाचे आहे.

प्रत्येक भाषेमध्ये प्रादेशिक बोलीभाषा (उदा. अहिराणी, मालवणी, वऱ्हाडी) आणि स्थानिक बोलचालीचे शब्द मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. प्रमाणभाषेत भाषांतर करताना किंवा विशिष्ट बोलीभाषेत भाषांतर करताना विशेष लक्ष द्यावे लागते. सध्या जगात ७००० हून अधिक भाषा अस्तित्वात आहेत आणि त्या प्रत्येकाची स्वतःची विशिष्ट उत्पत्ती, मुळे आणि रचना आहे. भाषांतरकाराने अस्तित्वात असलेल्या जवळजवळ अनंत प्रादेशिक बोलीभाषांचा देखील विचार केला पाहिजे.विशिष्ट प्रदेशांमध्ये बोलल्या जाणाऱ्या या विशिष्ट भाषा प्रकारांमध्ये वेगवेगळ्या वापराचे शब्द किंवा ध्वनी असू शकतात ज्यांचा उच्चार वेगळा करता येतो. जगभरातील स्थानिक संस्कृतींमध्ये बोलीभाषा आणि उच्चारांमधील फरकांमुळे ही संख्या झपाट्याने वाढत आहे. बोलीभाषांमध्ये होणारे हे भाषिक विचलन आणि भाषांचे जलद उत्क्रांती हे भाषांतरातील सर्वात मोठे आव्हान आहे.

दोन भाषा बोलणाऱ्या समाज संस्कृतीचे पुरेसे आकलण न होणे हे प्रमुख आव्हान आहे. हिंदीचे मराठीकरण करताना ही अडचण जाणवत नाही पण मराठीचे इंग्रजीकरण करताना दोन्ही संस्कृती अत्यंत भिन्न असल्यामुळे आयत्या पीठावर रेघोट्या, हळद काढणे, नजर लागणे, टोपीतील गणित याचे भाषांतर कसे करायचे किंवा पर्यायी शब्द काय वापरायचे हे आव्हानच ठरते. मराठीत आकाशातून पडणारा बर्फच, कारखान्या तयार होणारा बर्फच पण इंग्रजीत Snow आणि Ice हे दोन स्वतंत्र शब्द आहेत. मूळ भाषेतील मजकुराचा औपचारिकपणा किंवा अनौपचारिकपणा तसेच लेखकाचा भाव किंवा टोन (व्यक्तीचा आवाज/भाव) लक्ष्य भाषेत तसाच राखणे हे एक मोठे भाषिक आव्हान आहे.मराठीत'चालू-चालू','लहान-सहान'अशा पुनरावृत्त शब्दांचा वापर केला जातो,ज्यांचे भाषांतर करणे एक आव्हान असते.

६. **वाक्यातील स्पष्टता संबंधित आव्हाने** - एकाच वाक्याचे किंवा शब्दांचे अनेक अर्थ निघत असल्यास भाषांतरकार

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

गोंधळात पडू शकतो. मूळ भाषेतील संदिग्धता ओळखून लक्ष्य भाषेत ती स्पष्टपणे किंवा आवश्यक असल्यास तशीच ठेवणे महत्त्वाचे असते. मराठीसारख्या भाषांमध्ये वाक्यातील कर्ता स्पष्टपणे न वापरताही अर्थ व्यक्त होतो.अशावेळी लक्ष्य भाषेत योग्य शब्दांची निवड करणे गरजेचे असते.

**सारांश:**

मराठी भाषांतर करताना केवळ भाषिक नियम नव्हे, तर सांस्कृतिक बुद्धिमत्ता आणि विषयाचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे, जेणेकरून मूळ आशयाची अचूकता आणि प्रभावीता कायम राहील.भाषांतर करताना केवळ शब्दांची अदलाबदल न होता, भाषेच्या आणि संस्कृतीच्या अनेक स्तरांवर आव्हाने येतात.भाषांतर प्रक्रियेमध्ये मूळ भाषा आणि लक्ष्य भाषा यांच्यातील भाषिक फरकांमुळे अनेक अडचणी येतात.

**निष्कर्ष:**

भाषांतरातील भाषिक आव्हाने अपरिहार्य आहेत आणि ती केवळ शब्दांच्या स्तरावर नसून व्याकरण, अर्थ, शैली आणि सांस्कृतिक संदर्भांच्या स्तरावरही आहेत. भाषांतर हे केवळ भाषिक कौशल्य नसून ते सांस्कृतिक आणि वैचारिक पूल बांधण्याचे कार्य आहे. भाषांतरातील आव्हाने ही केवळ भाषिक अडथळे नसून, मानवी संवाद, संस्कृती आणि विचारधारेची गुंतागुंत दर्शवतात. यशस्वी भाषांतरकार केवळ दोन भाषांमध्ये प्रवीण नसतो, तर तो दोन संस्कृतींमधील दूत असतो. अर्थाची निष्ठा आणि लक्ष्यित वाचकासाठी नैसर्गिकता या दोन टोकांमध्ये संतुलन साधणे हे भाषांतराचे सार आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे भाषांतराची गती वाढली असली तरी, सूक्ष्मता, सांस्कृतिक संवेदनशीलता आणि शैली यासाठी मानवी कौशल्ये आणि व्यावसायिक दृष्टी अपरिहार्य आहे. भाषिक आव्हानांवर मात करण्यासाठी केवळ भाषेचे ज्ञान पुरेसे नाही, तर दोन्ही भाषांच्या सांस्कृतिक संदर्भांची सखोल जाण असणे,तसेच प्रसंगी नवीन शब्द तयार करण्याची किंवा स्पष्टीकरण देण्याची क्षमता असणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची :**

*१) भाषांतरमीमांसाः संपा. कल्याण काळे डॉ. अंजली सोमन, प्रतिभा प्रकाशन, पुणे*

*२) भाषांतर : डॉ. सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मयगृह, मुंबई*

*३) मराठी विश्वकोश, खंड-१२, पृ.४७९-४८०*

*Cite This Article:*

*डॉ. निकम प्रा. प्र. (2025). भाषांतरातील भाषिक आव्हाने.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 87–92).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# भाषांतराच्या दृष्टीने सुभाषिताचे महत्त्व

*प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक

* मराठी विभाग , सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड.

**प्रस्तावना:**

संस्कृत ही सर्वात प्राचीन ज्ञान-विज्ञानाची भाषा आहे. भारतीय संस्कृतीचे खरे स्वरूप पहायचे असेल तर संस्कृत भाषेशिवाय पर्याय नाही. पूर्वीच्या भारतात राहणा-या लोकांनी जे जीवनाचे सत्य अथवा तत्त्वज्ञान जाणले, समजले ते सर्व त्यांनी संस्कृत भाषेतून ग्रंथरूपाने तसेच सुभाषितांच्या रूपाने जतन करून ठेवले. तसेच जीवनाच्या विविध अंगांना ज्यामुळे व जसे त्यांनी समृद्ध केले त्या सर्वांचे वर्णन संस्कृत भाषेतून व सुभाषितांच्या मधून केले आहे; त्यामुळे संस्कृत भाषा भारतातील संस्कृती, धर्म, अध्यात्म, कला-कौशल्य, खरा इतिहास व परंपरेला जाणण्याचे विश्वसनीय साधन असल्यामुळे भारतातील सर्व प्रादेशिक भाषांनी तिच्यापासून काही ना काही तरी स्वीकारलेले आहेच. एवढेच नव्हे तर ही भाषा अनेक प्रादेशिक भाषांच्या निर्मितिलाही कारण ठरली आहे. म्हणूनच अनेक भाषांची व सुभाषितांची जननी म्हणून तिला भारतात गौरविले जाते. व तिच्या विषयी सर्वजन एक श्रद्धेचा भाव ठेवतात. या संस्कृतचा मराठीशी अनेक प्रकारे संबंध आहे. हा नुकताच संबंध नाही तर हा एक मोठा ऋणानुबंध आहे आणि हा ऋणानुबंध तयार झाला आहे तो संस्कृतेने मराठीला अनेक प्रकारे व विविध स्वरूपाचे जे दान दिले आहे त्यामुळे. वर्षानुवर्षे गेली तरी दोघींच्यामधला हा ऋणानुबंध आजही टिकून आहे. मराठीला संस्कृतशी असणा-या या ऋणानुबंधाचा आदर व सन्मान हा या सुभाषितांच्या मुळे करावा असं वाटतो.

संस्कृत सर्वात प्राचीन ज्ञान विज्ञान सुभाषिते ही भारतीय साहित्याची अत्यंत महत्त्वाची आणि प्रिय साहित्यिक श्रेणी आहे. 'सुभाषित' म्हणजेच लहान, तर्कपूर्ण आणि अर्थपूर्ण वचनं किंवा विचार. यामध्ये जीवनाच्या विविध पैलूंचा, धर्म, नीतिमत्ता, राजकारण, प्रेम आणि नैतिकतेचा विचार केला जातो. सुभाषितांचे भाषांतर करतांना त्यांच्या शाब्दिक सौंदर्याची, गूढ अर्थाची आणि सांस्कृतिक संदर्भांची शुचिता टिकवून ठेवणे अत्यंत आव्हानात्मक असते. या निबंधात, भाषांतराच्या दृष्टीने सुभाषितांच्या महत्त्वाचा शोध घेण्यात येईल आणि त्या भाषांतराच्या विविध पैलूंवर चर्चा केली जाईल. यासाठी सुभाषितांच्या विविध पैलूवर प्रकाश टाकावयाचा आहे.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

६. डॉ. लीला गोविलकर व डॉ. जयश्री पाटणकर, व्यावहारिक मराठी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र. आ. १ मार्च २००४, किंमत ५०/- पृ. १३०.

७. डॉ. उज्ज्वला जोगळेकर, उपयोजित मराठी, डॉ. गं. ना. जोगळेकर कृतज्ञता ग्रंथ, संपा. केतकी मोडक, संतोष शेणई, सुजाता शेणई,पद्मगंधा प्रका. पुणे,प्र.आ. ,१४ ऑगस्ट २०१२, किंमत २००/-, पृ. १८७.

८. तत्रैव, पृ. १८८.

९. तत्रैव, पृ. १९२.

*Cite This Article:*

*डॉ. गायकवाड शा. ला. (2025). भाषांतर व अनुवाद: स्वरूप व वैशिष्ट्ये.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 128–132).

ISSN-2278-5655

**Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**

**Volume-XIV, Special Issues – III (b)** **Nov – Dec, 2025**

OPEN ACCESS Original Research Article

# कविता – भाषांतर

*प्रा. डॉ. संगीता पैकेकरी

* मराठी विभागप्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा, जि. सोलापूर.

**सारांश:**

*वरील निबंधात भाषांतर म्हणजे काय व कशा पद्धतीने केले आहे यावर प्रकाश टाकत हिंदी कवितेचे मराठीत व मराठी कवितेचे हिंदीत भाषांतर यावर विचार मांडला आहे. हिंदी व मराठी या संस्कृतच्या पोटभाषा असल्याने व मराठी वाचकाला हिंदी भाषेची जाण आहे व हिंदी वाचकालाही मराठी परिचित आहे. त्यामुळे भाषांतर करणे सोपे जाते व आनंददाई ही होते.*

*भाषांतर करताना अनेक शब्द निवडून जो कोणता चपखल बसेल तोच वापरला वापरावा लागतो. तसेच स्वतःच्या मनाने कवितेत नसलेले शब्द टाकल्यास निरस होतो. मूळ कवितेचा गाभा नष्ट होत व आस्वादकाचा रस भंग होतो.*

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना :**

आदीम काळापासून मानव प्राणी साहित्य निर्मिती करत आला आहे.आदीम काळातील साहित्य हे मौखिक साहित्य होते ते अजीकडून नातवाकडे येत असे. करमणूक करणे ही मानवाची एक भूक आहे. धकाधकीच्या जीवनात विरंगुळा म्हणून पूर्वीही व आजही साहित्य लिहिले जाते व वाचले जाते.

जे आपल्याला माहित आहे ते दुसऱ्याला सांगणे यावरून भाषांतर प्रक्रिया सुरू झाली असावी. डॉ. विजया देव यांच्या मते "अनुवाद करणे ही सुसंस्कृत वाचकाची एक स्वाभाविक प्रतिक्रिया असते. चांगले काही वाचले की ते दुसऱ्याला सांगावे या उर्मीतून अनुवाद प्रक्रियेला चालना मिळते"आपल्याला ठावे ते दुसऱ्या सांगावे प्रमाणे आपणाला जे आवडते ते ईतरांना सांगावे म्हणूनच भाषांतर प्रक्रिया सुरू झाली. जगाच्या पाठीवर अनेक भाषा बोलल्या जातात. त्या भाषा सर्वांनाच अवगत असतील असे नाही पण काही साहित्यकृती वाचनीय असतात. अशा साहित्य कृतींचे भाषांतर होते.भाषांतर हे एक ज्ञान प्रसाराचे माध्यम आहे. एखादी भाषा आपल्याला येत नाही म्हणून साहित्यकृती वाचता येत नाही पण भाषांतरामुळे जग जवळ आले आहे. जगातील सर्वांचे सुखदुःख सर्वांनाच कळाले आहे.

**भाषांतर म्हणजे काय ?**

भाषांतर म्हणजे एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत सांगणे किंवा लिहिणे याला भाषांतर म्हणतात.

**मराठी विश्वकोश** - मूळ भाषेतील मजकूर अथवा आशय आपल्याला अपेक्षित असलेल्या दुसऱ्या (म्हणजे लक्ष्य) भाषेत व्यक्त करण्याची कला म्हणजे भाषांतर किंवा अनुवाद

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

होय .

**डॉ. कल्याण काळे** - भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर त्याचा आशय आणि अभिव्यक्ती जन्य अनुभवा सह दुसऱ्या भाषेत उतरण्याची प्रक्रिया .

**डॉक्टर उज्वला जोगळेकर** - एका पेक्षा जास्त भाषा येणाऱ्याने त्यातील एकच भाषा येणाऱ्याला समजावे फळ म्हणून दुसऱ्या भागात व्यक्त झालेले विचार व उद्गार त्याला समजणाऱ्या भाषेत सांगण्याची प्रक्रिया या प्रक्रियेसाठी भाषांतर व अनुवाद हे शब्द विशिष्ट अर्थाने वापरले आहेत लिखित मसुद्याचे ते भाषांतर व मौखिक अभिव्यक्तीचा तो अनुवाद

**ल.रा. नसीराबादकर** -भाषांतर केवळ भाषाविषयक आदान प्रदानाची प्रक्रिया नसून विविध देशीय आणि विविध भाषक मानवी समूहांना जोडणारा तो एक सांस्कृतिक अनुबंध आहे. एका मनातील विचार व भावना अखिल मानव जातीपर्यंत पोहोचवून सर्वांच्या अंतकरणात एक संवेदना निर्माण करू शकणारे ती एक प्रगल्भ व व्यापक अशी जीवन विषयक जाणीव आहे.

वरील मते अभ्यासकांनी मांडले आहेत. भाषांतर म्हणजे एका भाषेतील विचार लेखन दुसऱ्या भाषेत मांडणे म्हणजे भाषांतर होय.

**भाषांतर ही एक कला आहे.**

भाषांतर ही एक कला आहे कलेची निर्मिती आवडीतूनच होते दोन भाषा सर्वतोपरी अवगत असल्या तरच भाषांतर करता येते. काही काही भाषांतर करांमध्ये साहित्याच्या नावापासून किंवा हे मथळ्यापासून भाषांतर केले जाते. काही वेळा असे दिसते की मथळा न बदलता भाषांतर केले जाते. कलेचा आस्वाद घेणे ही मानवाची गरज आहे. त्या गरजेतूनच आपल्याला जे आवडेल ते दुसऱ्याला सांगावे. यावरून अनुवाद किंवा भाषांतर निर्माण झाले. ललित साहित्याची भाषांतर करणे तसे अवघड आहे.ललित साहित्याचे भाषांतर करताना फक्त दोनच भाषा अवगत असून चालत नाही तर दोन भाषेतील संस्कृती, जीवनशैली, भाषा, वातावरण या सर्वांची माहिती असेल तरच भाषांतर करता येते. हिंदीतून मराठी व मराठीतून हिंदी चे भाषांतर करणे सोपे आहे पण मराठीतून इंग्रजी रशियन किंवा इतर पाश्चात्य भाषेत भाषांतर करणे अवघड आहे. भारतीय संस्कृतीत व पाश्चात्य संस्कृतीत खूप फरक असल्याने भाषांतर करणे अवघड जाते.

'नॉट विदाऊट माय डॉटर' हे पुस्तक इंग्रजीत आहे पण त्याचे मराठी भाषांतर याच नावाने केले आहे. या पुस्तकाची मूळ लेखिका बेटी महमुदी आहे तर भाषांतर त्यांच्याच नावाने उपलब्ध आहे. फक्त सह लेखक विल्यम ऑफर आहे. इंग्रजीचे मराठीत भाषांतर झाले आहे पण नाव तेच ठेवले आहे.

हिंदी भाषेतील कविता मराठीत भाषांतर करणे किंवा मराठी भाषेतील कविता हिंदीत भाषांतर करणे या दोन्ही भाषांतरात दोन्ही भाषांचे ज्ञान हवे. त्याचबरोबर या दोन्ही भाषा जुळ्या बहिणीच आहेत. त्यामुळे भाषांतर सोपे जाते.

कवितेची भाषांतर करणे तसे अवघड आहे "कवितेची भाषा इतर कृती प्रमाणे सार्वत्रिक नसते ती आत्मलक्षी आणि जास्तीत जास्त व्यक्ती केंद्रित होते. त्या व्यक्तीकेंद्री स्वरूपामुळे मूळ भाषेतही सर्वसामान्यांना तिचे आकलन कठीण झालेले असते" असे डॉ.कल्याण काळे यांचे मत आहे व ते बरोबरी

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

आहे कवितेचे भाषांतर करताना कवीच्या मनातील भाव शब्दातून व्यक्त होतातच असे नाही त्या भावनांना गर्भित अर्थ असतो तो अर्थ भाषांतरकारला धरता आला पाहिजे व तो लक्ष्य भाषेत व्यक्त करता आला पाहिजे.

भाषांतरकाराकडे सूक्ष्म संवेदनशीलता हवी. जी कविता भाषांतरासाठी निवडली त्या कवितेचा आशय ,विषय, हेतू , गर्भित अर्थ,माहिती पाहिजे. तसेच ज्या भाषेत भाषांतर करावयाचे त्या भाषेतील त्याच ताकतीचे शब्द निवडून भाषांतर करायला हवे. नाहीतर मूळ कवितेत जे मांडले ज्या हेतूने मांडले ते लक्ष्य भाषेत किंवा कवितेत उतरत नाही.

**उदाहरणार्थ :**

मूळ कविता पंजाबी पाश या कवींची आहे.

मै घास हु

मै आपके हर किये - धरे पर उग जाऊंगा

या ओळीचा अनुवाद निरंजन उजगरे यांनी केला आहे

मी गवत आहे

तुम्ही काहीही केलं तरी

मी जमिनीवर उगवून येईल

या भाषांतर केलेल्या ओळीत जी ताकद पंजाबी कविता दिसते ती दिसत नाही मराठी भाषांतर करताना जमिनीवर हा शब्द वापरून कवितेतील आशयाला संकुचित केला आहे असे वाटते.

कवी पाश है पंजाबी कवी आणि क्रांतिकारक आहेत. त्यांच्या कवितेतून क्रांतीची भाषा येते. भाषांतर करणाऱ्याला क्रांतीची सामाजिक व राजकीय विषयाची जाणीव असेल तरच अशा कवितेचे भाषांतर तेवढ्याच ताकतीने होते. शेवटी ही कवी लिहितो

मै घास हू

मै अपना काम करूँगा

मै आपके हर किये - धरे पर उग जाऊंगा

यावर भाषांतर असे केले आहे

मी गवत आहे

मी माझं काम करीन

तुम्ही काही केलं तरी

मी जमिनीवर उगवून येईन

या भाषांतरात जमीन शब्द कुठून घेतला कळत नाही. किये- धरे पर या शब्दासाठी जमीन शब्द वापरला आहे. पण किये- धरे पर साठी जमीन शब्द योग्य वाटत नाही. भाषांतर करताना योग्य शब्दांचा वापर केला तर खऱ्या अर्थाने भाषांतर होते.

भाषांतर करणाऱ्या व्यक्तीला ज्या भाषेत भाषांतर करावयाचे त्याचे सखोल ज्ञान हवे व ज्या भाषेत भाषांतर करावयाचे त्याचेही सखोल ज्ञान हवे. भाषांतर - भाषांतर असूनही भाषांतर वाटले नाही पाहिजे. इतके ते सहज सुलभ असले पाहिजे. ज्याप्रमाणे नाटकातील नट अभिनय करतो पण तो अभिनय वाट वाटता कामा नये त्याचप्रमाणे भाषांतर करताना ते भाषांतर वाटले नाही पाहिजे. कारण रसिकाला ते वाचत असताना कुठलाच अडथळा येऊ नये. ही काळजी भाषांतर करणाऱ्या लेखकाला घ्यावी लागते.

डॉ. कल्याण काळे सरांनी आपल्या लेखात म्हटले आहे."लक्ष भाषेला ज्या रूपात बसविणे ही सोपी गोष्ट नाही. त्यासाठी सूक्ष्म संवेदनशीलता, लक्ष भाषेतील शब्दांची अचूक निवड, समर्पक छंद प्रकारांची निवड, धान्य अनुभवाची प्रतिनिर्मिती इत्यादी. कौशल्य पणाला लावावे लागतात. बहुतेक वेळा मूळ कवितेतील सौंदर्यानुभव भाषांतरित कृतीमध्ये हरविण्याची

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

शक्यता अधिक असते" कवितेची भाषांतर करताना हा धोका जाणवतो अजून एका कवितेचे भाषांतर पाहूया प्रियदर्शन यांची '

"नष्ट कुछ भी नही होता" या कवितेचे भाषांतर विजय चोरमारे यांनी केले आहे.' काहीच नष्ट होत नसतं' या नावाने

नष्ट कुछ भी नही होता
धूल का एक कण भी नही
जल की एक बूंद भी नही
बस सब बदल लेते है रूप

या ओळींचे भाषांतर

काहीच नष्ट होत नसतं
धुळीचा एक कण ही
पाण्याचा एक थेंब ही
फक्त सगळ्यांची बदलतात रूप

या कवींचे भाषांतर अर्थासहित झाले असे वाटते. कवितेचा शेवट

कभी - कभी सुख भी चला आता है
अचरज के कपडे पहनकर की
सब कुछ के बांधेसूद अजब - अनुठी है जिंदगी
क्योंकि नष्ट कुछ भी नही होता
धूळ भी नही
जल भी नही
जीवन भी नही
मृत्यु के बावजूद

**मराठी अनुवाद**

कधीकधी सुख सुद्धा येतं
विस्मयाचे वेश परिधान करून
जणू सगळं काही असलं तरी विलक्षण आहे जगणं
कारण काहीच नष्ट होत नसतं
धुळ ही
पाणीही
आयुष्यही नाही
मृत्यू असला तरी

वरील कवितेचे भाषांतर विषयाशी विचाराची सुसंगत वाटते. तुम्ही त्याचे भाषांतर करताना समानार्थी शब्द निवडून कोणता चपखल बसेल तो बसवायचा असतो म्हणजे वाचकाचा आस्वादभंग होणार नाही.

संदर्भासाठी एका मराठी कवितेचे हिंदीत केलेले भाषांतर पाहूया

नारायण सुर्वे यांची कविता

तेव्हा एक कर
जेव्हा मी या अस्तित्वाच्या पोकळीत नसेल
तेव्हा एक कर

**हिंदी अनुवाद:**

तब एक करना
जिस वक्त में इस जीवन के खालीपण मे नही रहूंगा
तब एक करना

शेवटच्या ओळी

खुशाल खुशाल तुला आवडेल असे एक नवं घर कर
मला स्मरून कर हवे तर विस्मरून कर

हिंदी भाषांतर

खुशी खुशी तुमको जो अच्छा लगे उसके साथ नया घर बसालो
मुझे याद करके या भूलकर

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

आवडणाऱ्या कवितेचे भाषांतर करणे आनंददायी आहे. अनेक अभ्यासकांनीही हा मुद्दा मांडला आहे. भाषांतर करणारा भाषांतर पहिल्यांदा आनंदासाठीच करतो किंवा हे साहित्य इतर भाषेत आलेच पाहिजे म्हणून भाषांतर करतो. ही प्रक्रिया आहे व दुसरी प्रक्रिया काही काही लेखकांना स्वत:लाच वाटते आपल्या साहित्यकृतीचे भाषांतर व्हावे अशाही साहित्याचे भाषांतर होते. मराठीतून हिंदी इंग्रजी इतर पाश्चात्य भाषा कन्नड अशा अनेक भाषेमध्ये भाषांतरे झालेले पाहायला मिळतात. या भाषांतरामुळे जग जवळ आले असे वाटते. आपल्याला जरी अनेक भाषा येत नसल्या तरी आपल्याला येणाऱ्या भाषेत भाषांतर वाचण्यास मिळाल्यास वाचकाला आस्वादाचा आनंद घेता येतो.

**निष्कर्ष :**

१ भाषांतर ही एक कला आहे.

२ भाषांतर करणे हे आनंददायी अनुभव आहे.

३ कवी कविता उस्फूर्तपणे लिहितो पण भाषांतर करणारा विचारपूर्वक चिंतन करून शब्दांची निवड करून भाषांतर करतो.

४ दोन भारतीय भाषेत भाषांतर करताना अडचणी कमी येतात.

५ भारतीय भाषे शिवाय पाश्चात्य भाषेत भाषांतर करणे अवघड व जड आहे.

६ मूळ भाषा व लक्ष्य भाषा या दोन भाषांचा चांगला अभ्यास असेल तर भाषांतर चांगले होते.

७ भाषांतरित साहित्य वाचताना रसभंग होऊ नये.

८ भाषांतरित साहित्य भाषांतरित वाटले नाही पाहिजे.

९ आस्वादकाला आनंद मिळाला पाहिजे.

**संदर्भसूची :**

*१ व्यवहारिक मराठी- ल.रा. नसीराबादकर, प्रकाशन, कोल्हापूर, 2010*

*२ उपयोजित मराठी- डॉ. गं.ना. जोगळेकर, कृतज्ञता ग्रंथ, सं. केतकी मोडक, संतोष शेणई, सुजाता शेणई, पद्मगंधा प्रकाशन, पुणे. 2012*

*३ भाषांतर मीमांसा- सं. डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमन, प्रतिभा प्रकाशन ,पुणे.2097*

*४ व्यवहारिक मराठी - सं. डॉ. स्नेहल तावरे ,स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. 2011*

*५ अक्षरवेल - सं. संजय साठे, संजय चौधरी ,रविकांत शिंदे, थिंक टॅंक पब्लिकेशन, सोलापूर. 2024*

*६ गुगल*

*Cite This Article:*

*प्रा. डॉ. पैकेकरी सं.* (2025). *कविता – भाषांतर.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 133–137).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# भारतीयांच्या मनात महासत्तेचे बीज पेरणारी डॉ. अब्दुल कलाम यांची अनुवादित ग्रंथसंपदा

** प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात*

** सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, किसन वीर महाविद्यालय,वाई*

**प्रस्तावना:**

मराठी माणसाला वसंत गोवारीकर, रघुनाथ माशेलकर, भालचंद्र उदगावकर, शंकर आगरकर, विजय भटकर, जयंत नारळीकर, अनिल काकोडकर, अरूण तिवारी ही महाराष्ट्रीयन व कृष्णस्वामी कस्तुरीरंगन, जी.के.मेमन, एन.आर.राव, रोडाम नरसिंह, होमी भाभा, अब्दुल कलाम, वाय.एस.राजन, नंबी नारायण ही भारतीय शास्त्रज्ञांची नावे आता सुपरिचित झाली आहेत. त्यांचे विज्ञान क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. या सर्वच शास्त्रज्ञांनी आपल्या देशाचे नाव जागतिक स्तरावर उंचावण्याचे काम केले आहे. माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांनीतर भारतीयांच्या मनात महासत्तेचे बीज पेरले. सदर लेखाच्या माध्यमातून अब्दुल कलाम यांच्या ‘भारत २०२०’व ‘प्रज्वलित मने’या दोन अनुवादीत पुस्तकांच्या आधारे त्यांच्या या विचारांचा परामर्ष घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## डॉ.अब्दुल कलाम यांची साहित्यसंपदा :

अब्दुल कलाम यांच्या बऱ्याच पुस्तकांचा अनुवाद मराठीत झालेला आहे. इथे विस्तार भयास्तव मोजक्या पुस्तकांची नावे व कंसात मराठी अनुवादकाचे नाव दिले आहे. अदम्य जिद्द (सुप्रिया वकील), अग्निपंख (माधुरी शानभाग), टर्निंग पॉइंट्स (अंजनी नरवणे ), दीपस्तंभ (सहलेखक : अरुण तिवारी; कमलेश वालावलकर), परिवर्तनाचा जाहीरनामा (सहलेखक - व्ही. पोतराज, अशोक पाध्ये), ए.पी.जे. अब्दुल कलाम : संपूर्ण जीवन (अरुण तिवारी), भारतीय प्रबोधनपर्व – वैभवशाली भारताची आगामी दिशा (संजय माळी).

## अनुवादाचा इतिहास :

मराठी साहित्यामध्ये एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच भाषांतरित साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागले होते. मुद्रणकलेच्या शोधामुळे इतर भाषेतील समृद्ध साहित्य मराठी मध्ये छापले जाऊ लागले. त्याच्या निर्मितीसाठी इंग्रज सरकारने १९ व्या शतकात बक्षीस योजना राबवली होती. सुरुवातीला धर्म प्रचार-प्रसारासाठी धार्मिक ग्रंथांचे भाषांतर होऊ लागले, मात्र नंतर भारतात शालेय मुलांसाठी शालेय पुस्तकांची भाषांतरे करण्यात आली. त्याचबरोबर ललितवाङ्मयाचे भाषांतर भारतीय भाषांमध्ये

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

झालेले पहावयास मिळते. पाश्चात्य गद्य साहित्य त्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक यांचे भाषांतर होऊ लागले. मराठीमध्ये त्याकाळात भाषांतर युग अवतरल्याचे दिसून येते. आज भारतातील सर्वच भाषांत भाषांतरित साहित्य फार मोठ्या प्रमाणात निर्माण होताना दिसते. तरीही या प्रांतामध्ये अजूनही अभ्यासकांना व संशोधकांना मोठी संधी असल्याचे दिसून येते. जगाकडे आज एक 'ग्लोबल व्हिलेज' म्हणून पाहिले जाते. जगातील लोकांचाही बहुभाषिक बनण्याकडे कल वाढलेला दिसून येतो. भाषांतरित साहित्याला अनुवादित साहित्य ही संज्ञा समानार्थक म्हणून वापरली जाते. आपल्या 'जागतिकीकरण आणि अनुवादित साहित्य' या लेखात अशोक शिंदे म्हणतात, 'मराठी साहित्याच्या प्रारंभापासून मराठी भाषकांना भाषांतर, रूपांतर किंवा अनुवाद टीका या साहित्यप्रक्रियेची ओळख आहे महानुभावीय, संत-पंत वाङ्मयातून भाषांतराची, रूपांतराची, टीकालेखनाची किंवा अनुवादाची पध्दत रूढ होत आलेली दिसते. 'कानडीने केला मऱ्हाटी भ्रतारू'हा तुकारामांचा विनोदी बाज असलेला अभंग सर्वश्रुत आहे. नाथांच्या अर्जदस्तात दरबारी उर्दू दस्तऐवजाच्या रूपांतराची ओळख पटेल.'१ या अवतरणाचा विचार केल्यास अनुवादाची परंपरा थेट प्राचीन काळापर्यंत पोहोचते. सध्या अनुवादाच्या क्षेत्रात चंद्रकांत व लीला बांदिवडेकर, प्रकाश जगताप, पद्मजा घोरपडे, मृणालिणी सावंत, निशिकांत ठकार, असावरी काकडे, प्रफुल्ल शिलेदार, लिना सोहनी, उमा कुलकर्णी, चंद्रशेखर मुरगुडकर, अभय सदावर्ते, बलवंत जेऊरकर यांनी विपूल कार्य केले आहे.

मूळ (स्रोत) भाषेतील; साहित्य लक्ष्य भाषेत अनुवादित करून, अनुवादक भिन्न भाषिक वाचकांना सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक देवाणघेवाण करत असतो. भारतात विविध भाषा बोलल्या जातात. प्रत्येकाचे रूढी, परंपरा, रिती, सण-उत्सव, राहणीमान, सामाजिक, राजकीय जीवन हे वेगवेगळे असते. त्यांच्या जीवनपद्धतीचे दर्शन साहित्याच्या माध्यमातून आलेले पहावयास मिळते. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. भिन्न भाषिक लोकांचे जीवनमान अभ्यासण्यासाठी साहित्याचा अभ्यास केला जातो. भाषेच्या अडचणीमुळे त्या त्या भाषेतील साहित्य वाचणे अवघड होऊन जाते. ही समस्या अनुवादित साहित्यामुळे दूर होते व त्या भाषेतील साहित्याचा अभ्यास केला जाऊ शकतो. 'अनुवादित साहित्य' या दामोदर खडसे यांच्या हिंदी लेखाचा अनुवाद करताना चंद्रकांत भोंजाळ लिहितात, 'स्वत:चं अस्तित्व दिसणार नाही, याची काळजी अनुवादकाला घ्यावी लागते. ते एक पुन:सर्जन आहे ह्याचेही भान ठेवावे लागते. अनुवादकाला स्वत:ला विसरावं लागतं. आपली शैली विसरून, आपल्या विचारांची वस्त्र उतरून नवीन कपडे अंगावर चढवावी लागतात. या प्रक्रियेला परकाया प्रवेशही म्हटलं जातं. एका भाषेतील आत्मा कायम ठेवत त्याची पुनर्स्थापना करण्यासारखचं हे काम आहे.'२

**भारतीयांच्या मनात महासत्तेचे बीज पेरणारी डॉ. अब्दुल कलाम यांची अनुवादित ग्रंथसंपदा:**

'इग्नायटेड माइंड्स: अनलीशिंग द पॉवर विदिन इंडिया'या इंग्रजी पुस्तकाचा 'प्रज्वलित मने'या नावाचा मराठी अनुवाद चंद्रशेखर मुरगुडकर यांनी केला आहे. तर 'इंडिया २०२०- ए व्हिजन फॉर द न्यू मिलेनियम' या इंग्रजी पुस्तकाचा (सहलेखक वाय.एस. राजन); मराठी अनुवाद 'भारत २०२० : नव्या सहस्रकाचा भविष्यवेध' या नावाने अभय सदावर्ते

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

यांनी केला आहे. अब्दुल कलाम यांची ही दोन्ही पुस्तके अत्यंत महत्त्वाची आहेत. 'प्रज्वलित मने' हे पुस्तक लिहिताना कलामांनी तरूणांना डोळ्यासमोर ठेवले आहे तर 'भारत २०२०' या पुस्तकात भारताचे परिवर्तन सुरू असून ते कोणत्या दिशेने करणे श्रेयस्कर होईल याचे मार्मिक विश्लेषण आहे. म्हणूनच सदर लेखासाठी ही दोन पुस्तके घेतलेली आहेत. तसेच या पुस्तकांतून कलामांनी भारतीयांच्या मनात महासत्तेचे बीजही पेरलेले आहे.

**नव्या सहस्रकाचा भविष्यवेध घेणारे पुस्तक : भारत २०२०**

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात व स्वातंत्र्यानंतर अनेक घोषणा व उद्घोषणा करण्यात आल्या व त्याची अंमलबजावणीही झाली. स्वातंत्र्यसैनिकांची 'वंदे मातरम्', लालबहादूर शास्त्री यांची 'जय जवान जय किसान', याला जोडूनच राजिव गांधी यांची 'जय विज्ञान'ही घोषणा. या घोषणा खूपच गाजल्या. अशा घोषणांनी भारतीय तरूणांच्या समोर एक जाज्वल्य ध्येय ठेवले व त्या ध्येयाप्रत कष्ट करण्याची प्रेरणा त्यांच्यात भरली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तरूणांना भारताच्या महासत्तेचे ध्येय देऊन, त्यांच्यात सातत्याने ऊर्जा भरण्याचे काम अब्दुल कलाम यांनी केले आहे. त्यांच्या 'भारत २०२० : नव्या सहस्रकाचा भविष्यवेध' या पुस्तकातून त्याचे प्रत्यंतर घडते.

एकूण बारा प्रकरणांमध्ये हे पुस्तक विभागलेले आहे. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील पृथ्वीवरील जगाच्या नकाशावरील भारताच्या नकाशाचा ठळक दिसणारा फोटो लक्ष्य वेधून घेतो. भारत एक प्रगत राष्ट्र बनू शकेल काय? या पहिल्या प्रकरणापासून, स्वप्नपूर्तीच्या दिशेने या शेवटच्या प्रकरणापर्यंतचा प्रवास म्हणजे महासत्तेचा हमरस्ताच आहे असे वाटते. हा प्रवास करताना एक भारतीय म्हणून आपल्याला काय करायला हवे याची साधक-बाधक चर्चा या पुस्तकातून घडते. त्यासाठी काही कोष्टके, आलेख (स्तंभालेख व रेखालेख), आकृत्या यांचाही समयोचित वापर केला आहे. पहिल्या प्रकरणातील 'ज्या दिवशी कुणीही देशवासी दु:खी राहणार नाही, त्याच दिवाशी आपण एक राष्ट्र आहोत, असे स्वत:ला संबोधण्यास पात्र ठरू' (पृ.क्र.०३) हा महात्मा गांधींच्या विचारांचा दाखला देऊन कलाम वाचकांचे देशप्रेम जागृत करतात. इतर राष्ट्रांना स्वत:च्या भवितव्याबद्दल काय वाटते? या प्रकरणातून युरोप व अमेरिकेतील देशांपासून चीन, जपानचे दाखले देऊन कलाम म्हणतात, 'आपले पहिले लक्ष्य हे आज आपले जे लक्षावधी बांधव दारिद्र्याच्या अंधारात आहेत त्यांना सुबत्तेच्या किमान प्रकाशात आणणे आणि त्यापुढील पायरी म्हणजे २०२० पर्यंत आपली ओळख एक प्रगत आणि प्रगल्भ राष्ट्र अशी जगाला करून देणे हे होय.(पृ.क्र.५०) अशा मौलिक विचारांनी भारतीयांचे आत्मभान जागृत होते. भारताच्या तांत्रिक उत्क्रांतीचा भविष्यवेध-२०२०, अन्न, कृषी आणि प्रक्रिया, विविध भौतिक पदार्थ आणि भविष्यकाळ, रासायनिक उद्योग आणि आपली जैविक संपत्ती, भविष्यासाठीचे उत्पादन, सेवाक्षेत्र-एक जनसंपत्ती, नाभिस्थानी असलेले उद्योग, सर्वे सन्तु निरामय:, समर्थ पायाभूत सोयी आणि सुविधा अशा प्रकरणांतून लेखकाने देशापुढील समस्यांबरोबरच देशाच्या बलस्थानांवरही प्रकाशझोत टाकलेला आहे.

भारतीय अध्यात्म हा जगाला शांतीचा संदेश देणारा विचार आहे. या विचारांच्या जोरावरच स्वामी विवेकानंदांनीही तरूण-तरूणींच्या माध्यमातून बलशाली भारताचे स्वप्न

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

पाहिले होते. सर्वे सन्तु निरामय: या प्रकरणातून अब्दुल कलामांच्या विचारांचाही तोच धागा असल्याचे दिसून येते. सर्वांना आरोग्यमय जीवन मिळावे असा या संस्कृत वचनाचा अर्थ आहे. अन्न, वस्त्र, निवारा व आरोग्य याबाबत सजग राहणे गरजेचे असल्याची जाणीव येथे करून दिली आहे. तर स्वप्नपूर्तीच्या दिशेने या प्रकरणातून एक देशप्रेमी भारतीय म्हणून आपली काय भूमिका आहे व आपण आपापल्या क्षेत्रात काय करू शकतो याची मोठी यादीच दिलेली आहे. अब्दुल कलामांच्या भारत-२०२० या व्हीजन बद्दल माधुरी शानभाग म्हणतात, 'दूरदृष्टी ही फक्त डोळ्याच्या डॉक्टरांची मक्तेदारी राहिलेली नाही. अख्ख्या देशाला त्यांनी २०२० दृष्टी दिली आहे. आज देशातील तरूणाईसमोर ही दृष्टी स्वप्नरूपाने उभी आहे.'३ आज जरी २०२५ हे वर्ष चालू असले तरी भारताने बऱ्याच अंशी प्रगती केल्याचे दिसून येते. २०२२ या वर्षात आपल्या देशाकडे जी-२० चे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. आंतरराष्ट्रीय पटलावर आपण स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'वसुधैव कुटुंबकम्'हे भारतीय संस्कृतीचे मोठेपण सांगणारे वचन आहे आणि 'एक पृथ्वी, एक कुटुंब आणि एक भविष्य' असे ब्रीदवाक्य जी-२० या परिषदेचे होते. हा योगायोग जुळून आला आहे. याप्रमाणेच प्रत्येक भारतीयाने काम केल्यास आपल्या देशाला महासत्ता बनण्यापासून कोणिही रोखू शकत नाही असे मला म्हणावेसे वाटते.

**भारतीय तरुणांचे मन प्रज्वलित करणारे पुस्तक : प्रज्वलित मने:** अब्दुल कलाम हे भारतीय तरूणांचे 'आयडॉल'होते. कलामचाचा म्हणून ते आबालवृध्दांच्यात प्रसिध्द होते. तरूणांच्यात मिसळून त्यांना बोलते करणे हा त्यांचा छंद होता. प्रज्वलित मने या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेत कलाम म्हणतात, 'बारावी मध्ये शिकणाऱ्या एका मुलीला हे पुस्तक मी अर्पण करतोय. तिचं नाव आहे स्नेहल ठक्कर ११ एप्रिल २००२ या दिवशी संध्याकाळी मी आनंदला पोहोचलो, तेव्हा तिथे जातीय दंगलीमुळे कर्फ्यु पुकारण्यात आला होता. दुसऱ्या दिवशी आनंदालय हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांशी बोलताना एक प्रश्न आला: आपला शत्रू कोण ? प्रश्नांची खूप उत्तरे मुलांकडून आली, परंतु तिच्याकडून आलेले उत्तर अचूक होते. ते सर्वांनी मान्यही केले : आपला शत्रू आहे गरिबी; आपल्या समोरच्या अनेक प्रश्नांचे ते एकच मूळ कारण आहे. गरिबी हा आपल्या लढाईचा विषय व्हायला हवा, आपापसातल्या भांडणांचा नव्हे.'(पृ.क्र.०५) पुस्तकाच्या सुरूवातीच्या पानावरील सदर अर्पणपत्रिकेने सुरू होणारे हे पुस्तक शेवटच्या पानावरील तारुण्य गीताने सर्वांची मने प्रज्वलित करूनच संपते. भारतीय तरूणाई ह्या पुस्तकाच्या केंद्रस्थानी आहे.

'आपण झोपेत पाहतो ते खरं स्वप्न नसतं, तर आपली झोप उडवतं ते स्वप्नं असतं' असे भाषणातून वारंवार सांगणाऱ्या डॉ. कलाम यांच्या विचारांचा धागा पकडूनच पुस्तकातील 'स्वप्न आणि संदेश' या पहिल्या प्रकरणाच्या माध्यमातून त्याचे प्रत्यंतर घडविले आहे. महात्मा गांधी, अल्बर्ट आईनस्टाईन, सम्राट अशोक, अब्राहम लिंकन आणि खलीफ ओमर या तत्त्ववेत्यांशी संवाद साधून त्यांचे विचार व कार्य त्यांनी तरूणांसमोर मांडले आहे. तरूणांची मने प्रज्वलित करताना अध्यात्म, शिक्षण व विज्ञान यांची सांगड घालायला हवी हेही सांगायला ते विसरत नाहीत. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. कलाम म्हणतात, 'जर स्वप्ने नसतील तर

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

अमुलाग्र किंवा क्रांतिकारी विचार निर्माणच होणार नाहीत आणि जर विचारच नसतील तर मग कुठलेही कार्य आपल्याकडून होणार नाही म्हणून शिक्षक आणि पालकांनी, विद्यार्थ्यांना स्वप्ने पहायची परवानगी द्यावी. स्वप्नांच्या माध्यमातूनच माणूस यशस्वितेपर्यंत पोहोचतो.'(पृ.क्र.३४) 'स्वप्न खरी होण्यासाठी स्वप्नं पाहणं गरजेचं आहे' या कलामांच्या वचनाची प्रचिती इथे येते. ही स्वप्ने पूर्ण करण्यासाठी तरूणांना आदर्श म्हणून आई ,वडिल व शिक्षक यांच्याकडे पाहण्याचा सल्लाही कलामांनी दिला आहे. अध्यापक व वैज्ञानिक यांच्यावर आगामी भारताची भीस्त असल्याचेही ते नम्रपणे सांगतात. यासाठी त्यांनी आर्यभट्ट, भास्कराचार्य, रामानुजन, सी.व्ही.रामन, जगदिशचंद्र बोस, रवींद्रनाथ टागोर यांच्या समर्पणाचे दाखले दिले आहेत. डॉ. कलाम म्हणतात , 'दूरदृष्टीचा परिपाक म्हणजे प्रज्वलित मने' जे.आर.डी. टाटा, सतीश धवन, विक्रम साराभाई यांच्यासारख्या दूरदृष्टीच्या नेत्यांची आज भारताला गरज आहे. या महान माणसांनी एका पिढीसमोर काही विधायक उद्दिष्टे ठेवली आणि त्या उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या भावनेतून ती पिढी एकत्र आली आणि त्यातून देशाचा फायदा झाला आहे.'(पृ.क्र.५९) अशा कार्यतत्पर अध्यापक व वैज्ञानिकांची एक फळी निर्माण होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. अशा अपेक्षेबरोबरच त्यांनी भारतीय अध्यात्मालाही अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. या पुस्तकात 'संत आणि महंतांची शिकवण'असे एक प्रकरणच त्यासाठी अवतरते. देशाच्या महासत्ता बनण्याच्या मार्गात शिक्षण, आरोग्य, शेती, माहिती आणि संदेशवहन व तंत्रज्ञान अशा पाच क्षेत्रांचा विकासासाठी विचार करणाऱ्या कलाम यांना स्वामीनारायण संस्थेचे प्रमुख स्वामी महाराज 'देवावरची श्रध्दा' हा सहावा मुद्दाही समाविष्ट करायला सांगितला. इथे देव हा शब्द त्यांनी सर्वधर्मीयांसाठी वापरला आहे. पण याचा परिणाम दिसण्यासाठी राजकारण आणि धर्मकारण यांच्या पलिकडची देशभक्ती निर्माण करून ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. ही निर्मिती करताना ग्रामीण भारताला महत्त्व देऊन खेड्याकडे जाण्याचा अनमोल सल्ला त्यांनी दिला आहे. येथील खनिज संपत्तीचा योग्य वापर करून प्रथम राज्य व नंतर देशाची योग्य बांधणी केल्यास भारत देश उच्च भरारी घेऊ शकतो असे त्यांना वाटते. त्यासाठी त्यांनी 'हे विधात्या, हे पालनकर्त्या, माझ्या माणसांना कठोर परिश्रम करू दे. त्यांच्या परिश्रमातून शत्रूचा नायनाट करणारी 'अग्नी" सारखी अनेक क्षेपणास्त्रे तयार होऊ देत. माझ्या देशात समृध्दी आणि शांतता नांदू दे. माझ्या माणसांमध्ये एकोपा असू दे. एक देशाभिमानी नागरिक म्हणून माझी राख होऊ दे. पुन्हा एकदा ताठ मानेने याच देशात जन्म घेण्याकरता... '(पृ.क्र.१३६) अशी भावनिक प्रार्थनाही केली आहे. या अवतरणातून कलामचाचांचे देशाबद्दलचे प्रेम, तळमळ व राष्ट्रभावना निदर्शनास येते. डॉ. कलामांच्या अंत:करणात "भारतीय" शब्द कोरलेला होता. त्यांचा विचार या पुस्तकाच्या माध्यमातून भारतीयांचे मन प्रज्वलित करतो.

**पुस्तकांचे साहित्यिक मूल्य :**

डॉ. कलाम यांच्या अनुवादित ग्रंथांकडे आपणास साहित्य म्हणूनही पाहता येते. एक खूप मोठा वर्ग या साहित्याचा वाचक आहे. 'भारत २०२०: नव्या सहस्रकाचा भविष्यवेध' ह्या पुस्तकाचा बराच भाग काही कोष्टके, आलेख, आकडेवारी, आर्थिक टक्केवारी यांनी व्यापलेला असला तरी,

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

गौतम बुध्द, महात्मा गांधी, तेलगु कवी गुरजदा, सुब्रमण्यम भारती, रवींद्रनाथ ठाकूर, मुरे गेल-मान, तमिळ संत कवयित्री अयुवायर या व्यक्तींची वचने, काव्यपंक्तींचा समर्पक वापर अनुवादकाने मराठीतून केला आहे. पुस्तकातील 'सर्वे सन्तु निरामयाः' या दहाव्या प्रकरणाच्या सुरुवातीस तमिळ संत कवयित्री अयुवायर यांच्या,

'कुठल्याही शरीरात देऊ नका थारा
रोग तोचि मारा मुळातून'

अशा काव्यपंक्ती देऊन प्रकरणाला सुरुवात केली आहे. या प्रकरणात लेखकाने भारतीय जनतेच्या आरोग्याच्या प्रश्नांकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. 'सर्वेत्र सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः'या संस्कृत वचनातून मानव जातीच्या आरोग्याची याचना विधात्याकडे केली आहे. त्याचा समर्पक वापर या प्रकरणात केला आहे. भारतीय जनतेला शुद्ध पाणी, हवा मिळावी हेच या प्रकरणात मांडले आहे. अशी अनेक कोटेशन पुस्तकात वाचायला मिळतात, त्यामुळे पुस्तकाचे साहित्यिक मूल्य वाढते.

प्रज्वलित मने या पुस्तकातही महात्मा गांधी, गोथे, स्वामी विवेकानंद, थिरूक्कुरल, अब्राहम लिंकन, एफ. मॅक्स मुलर, रवींद्रनाथ टागोर यांच्या वचनांचा वापर केल्यामुळे पुस्तकाला साहित्यिक मूल्य प्राप्त झाले आहे. तसेच डॉ. कलाम यांनी लिहिलेली जीवनवृक्ष ही कविता, १००० वर्षांपूर्वी अवैयार यांनी लिहिलेली,

'मानव जन्म मिळणे तसे दुरापास्त आहे.
त्यातून कोणतेही व्यंग नसलेला जन्म अधिक दुरापास्त आहे.
तुम्ही अव्यंग असाल तरी ज्ञान आणि शिक्षण मिळणे त्याहीपेक्षा अवघड आहे.
त्याग आणि तप करणे तर अधिक दुरापास्त आहे.
पण जो हे सगळं साध्य करील त्याच्यासाठी
स्वर्गाचे दरवाजे सतत उघडे असतील'

ही कविता वाचल्यावर लेखक डॉ. अब्दुल कलाम भारावून गेल्याचे प्रांजळपणे सांगतात. सदर पुस्तकाच्या शेवटी डॉ. कलाम यांनी लिहिलेले 'आणि माझा देश – भारत' हे तारुण्य गीत प्रत्येक भारतीयाने आपल्या मनावर कोरून ठेवावे असे आहे.

या देशाचा तरुण नागरिक या नात्याने
आणि तंत्रज्ञान, ज्ञान व देशप्रेम यांच्यासह
मी जाणतो की छोटी उद्दिष्टे डोळ्यासमोर
ठेवणे म्हणजे जणू गुन्हा करणे.
मी मोठी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवेन
त्यांच्या परिपूर्तीसाठी घाम गाळेन.
भारत देशाला विकसित देश म्हणून पुढे आणेन.
त्यासाठी आर्थिक आणि मूल्यप्रणाली या दोन शक्ती
माझ्याकडे असतील.
मी.. या देशातल्या अब्जावधींपैकी एक आहे.
फक्त एक दृष्टीकोन देशातली अब्ज मने प्रज्वलित करू शकतो
ती ठिणगी माझ्या हृदयात पडली आहे.
प्रज्वलित झालेला आत्मा हा या पृथ्वीवरचाच नव्हे,
तर ब्रम्हांडातला आणि पाताळातला महाप्रचंड असा स्त्रोत आहे.
मी ज्ञानदीप सतत उजळत ठेवेन
भारताचे विकसित देशात रूपांतर करण्यासाठी.

ही कविता म्हणजे डॉ. कलाम यांच्या विचारांचे जणू सारच आहे. सदर कवितेने पुस्तकाचे साहित्यिक मूल्य वाढतेच

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

शिवाय तरूणांच्या मनात देशाभीमान जागृत होतो. एक राष्ट्र म्हणून भारताकडे पाहण्याची दृष्टी भारतीयांच्या मनात वृद्धींगत होते. हे या कवितेचे मोल आहे.

**वरील पुस्तकांतून व्यक्त होणारे, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी विचार :**

१) आपण झोपेत पाहतो ते खरं स्वप्न नसतं, तर आपली झोप उडवतं ते स्वप्नं असतं.

२) देशात सर्वाधिक बुद्धिमत्ता असलेल्या व्यक्ती शक्यतो वर्गाच्या शेवटच्या बाकावरच सापडतात.

३) स्वप्न खरी होण्यासाठी स्वप्नं पाहणं गरजेचं आहे.

४) यशाचा आनंद अनुभावण्यासाठी व्यक्तीला आयुष्यात अडचणीचा सामना करावाच लागतो.

५) सामर्थ्यच सामर्थ्याचा आदर करते.

६) तांत्रिक विकास घडवून आणणे हाच भारताला बलशाली आणि प्रगत राष्ट्र बनविण्याचा रामबाण उपाय आहे.

७) सुदृढ, आणि आनंदी भारत घडविण्याच्या आपल्या मोहिमेची ती सुरुवात असेल.

**समारोप :**

तरुणाईच्या जोरावर 2020 मध्ये भारत हा केवळ प्रगतीशील देश राहणार नाही तर एक विकसित देश होईल असा अब्दुल कलाम यांचा दृष्टिकोन होता. 2020 मधला भारत कसा असेल? याबाबतचे त्यांचे विचार त्यांनी आपल्या 'इंडिया 2020: व्हिजन फॉर न्यू मिलेनियम' व प्रज्वलित मने या पुस्तकात मांडले आहेत. अनुवादित साहित्य ही एक स्वतंत्र निर्मितीच असते. अनुवाद करताना अनुवादकाच्या विचाराचे प्रतिबिंबही त्यात पडताना दिसते. अब्दुल कलाम यांनी ज्या गोष्टींचा अंदाज वर्तवला होता त्यापैकी अनेक गोष्टी साध्य झाल्या आहेत पण त्याच बरोबर आणखी भारताला विकसित देशांच्या यादीत झळकण्यासाठी मोठा पल्ला गाठायचा आहे हे देखील तितकेच खरे आहे. त्यामुळेच आजच्या तंत्रज्ञानाच्या जगात पुस्तकरूपाने आपल्या भावना व्यक्त करताना ‘सध्या ती काय करते?’ या कवितेत साताऱ्याचे ज्येष्ठ कवी शशिकांत पार्टे म्हणतात.

भारत देशाला महान करायचे म्हणते।
अब्दुल कलमांचे ध्येय पूर्ण करायचे म्हणते।
जागतिक कीर्तीत भारत सुखी समृध्द झालाच पाहिजे म्हणते।
जन हो समजलेना ती काय काय करायचे म्हणते।६

या काव्यपंक्तींतून साहित्यिकांच्या, विचारवंतांच्या मनावरील अब्दुल कलाम यांच्या विचारांचे गारूड अजूनही कमी झाल्याचे दिसत नाही, हे या अनुवादित साहित्याचे मोल आहे असे शेवटी म्हणावेसे वाटते.

**संदर्भ :**

*१. गायकवाड शरद, शिंदे सुनील (संपा.) : ‘जागतिकीकरण आणि मराठी साहित्य’, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००९, पृ.२१६.*

*२. लिंबाळे शरणकुमार(संपा.) : ‘साठोत्तरी मराठी वाङमयातील प्रवाह’, दिलिपराज प्रकाशन, पुणे, २००७, पृ.३५१.*

*३. माधुरी शानभाग(अनु.) : ‘ए. पी. जे. अब्दुल कलाम एक व्यक्तिवेध’, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१० पृ.७८.*

४. सदावर्ते अभय(अनु.) : 'भारत २०२० नव्या सहस्रकाचा भविष्यवेध', राजहंस प्रकाशन, पुणे, २०१३.

५. मुरगुडकर चंद्रशेखर (अनु.) : 'प्रज्वलित मने', चिनार पब्लिशर्स, पुणे, सहावी आवृत्ती २००५.

६. पार्टे शशिकांत : 'वृध्दामृत', मुक्ताई प्रकाशन, वाई, प्रथम आवृत्ती २०२०.

***Cite This Article:***

**प्रा.डॉ. सं. गो. थोरात (2025).** *भारतीयांच्या मनात महासत्तेचे बीज पेरणारी डॉ. अब्दुल कलाम यांची अनुवादित ग्रंथसंपदा.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 138–145).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# मध्ययुगीन मराठी तौलनिक साहित्याचे स्वरूप

* डॉ. संतोष काशीद

* सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, संघवी केशरी महाविद्यालय, चिंचवड.

**प्रास्ताविक:**

मध्ययुगीन मराठी साहित्यात तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक चळवळी आणि मराठी साहित्य व तौलनिक साहित्य या प्रस्तुत घटकांची मांडणी केली जाईल. मध्ययुगीन कालखंड हा समूह जीवनाला प्राधान्य देणारा होता. या काळात निर्माण झालेले संत साहित्य समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहचलेले दिसून येते. तत्कालीन संतांचे विचार हे आधुनिक विचारसरणीचा पाया घालणारे होते. संस्कृत भाषेत एकवटलेले ज्ञान जनसामान्यांच्या भाषेत देण्याचे काम सर्व प्रथम संतांनी केलेले आहे. मध्ययुगीन मराठी संत बहुभाषी होते. गरज पडली तेव्हा त्यांनी इतर भाषांतही रचना केल्या. त्यात हिंदी बहुतेक सर्व मराठी संतांची दुसरी भाषा होती.

तौलनिक अभ्यासाचे मूळ लोकविद्येतून आले आहे. मध्ययुगीन संदर्भात हे विशेष महत्त्वाचे आहे. या पद्धतीमुळे मौखिक साहित्याच्या अभ्यासाची गरज उत्पन्न झाली. लोककथांची आशयसूत्रे कशी स्थलांतरीत होतात. याचा अभ्यास तौलनिक साहित्यात करता येतो.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

मध्ययुगीन कालखंडातील जीवन व्यवहाराला परंपरेला, संस्कृतीला आणि त्या कालखंडात निर्माण झालेल्या साहित्याला तौलनिक अभ्यासाने चांगल्या पद्धतीने समजावून घेतले जाऊ लागले. तसेच समाजात असणारी विविधता हे त्याचे मुख्य कारण आहे. एकंदरीतच प्रदेशाच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या पलीकडे जाऊन अन्य प्रांतीयांची संस्कृती, भाषा, जीवनव्यवहार समजावून घेण्यासाठी तौलनिक अभ्यासाची गरज आहे. संपूर्ण विश्वामध्ये प्रचंड भिन्नता आहे. तरीही या सर्वांच्या गरजा, मूलभूत तत्त्वे त्यांच्या समस्या यासंदर्भात काही एक समानता देखील आहे.

एकूण मध्ययुगीन वाङ्मयाच्या संदर्भात तौलनिक साहित्याची भूमिका महत्त्वाची आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर, संत एकनाथ, संत सेनामहाराज आणि संत रविदास यांच्या काव्याचा तौलनिक अभ्यास केला जाईल. साहित्य आणि तुलना यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. साहित्यनिर्मिती, त्याचे आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन या सर्व क्रियांमध्ये तुलना सक्रिय असते. लेखक साहित्यनिर्मिती करतो, तेव्हा त्याची प्रतिभा सातत्याने येणाऱ्या असंख्य अनुभूतींमधून काही खास अर्थपूर्ण अनुभूतींची निवड करतो. त्याच्या आधारे काही एक

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

आशयसूत्र निश्चित करतो. ते मांडण्यासाठी योग्य असा वाङ्मयप्रकार निवडतो. विशिष्ट आकृतिबंध, त्यातील घटक, विविध कल्पना, शब्द यांच्या आधारे तो आपली साहित्यकृती साकार करतो. या सर्व क्रियांमध्ये तो तुलनेचा आधार घेत असतो. हे करत असताना तो स्वतःच निर्मिलेल्या साहित्यकृतीची समीक्षाही करत असतो.

साहित्यनिर्मिती ही एकाच वेळी क्रिएटिव्ह आणि क्रिटिकल असते. असे टी. एस. इलियट यांनी म्हटले आहे. या साहित्यकृतीचे वाचन करताना वाचकाच्या मनात त्याने प्रत्यक्ष घेतलेल्या अनुभूतींशी साहित्यकृतीमधील अनुभूतींची तुलना सुरू असते. साहित्यसमीक्षेत साहित्यकृतीच्या बाह्य संदर्भांची तुलना अटळ असते. तसेच मूल्यमापनासाठी वापरावयाचे निकष जुन्या नव्या निकषांची तुलना करूनच निवडावे लागतात. साहित्यकृतीचा दर्जा ठरवताना तिच्याशी समतुल्य अशा अन्य एका किंवा अनेक साहित्यकृतींशी तिची तुलना करावी लागते. साहित्यिक आणि त्याची साहित्यकृती यांचे परंपरेतील स्थान निश्चित करणे तुलनेशिवाय शक्य होणार नाही. साहित्यसमीक्षेतील तुलनेचे स्थान अपरिहार्य आहे. म्हणूनच तुलना आणि विश्लेषण ही टीकाकाराची मुख्य साधने आहेत असे टी. एस. इलियट यांनी म्हटले आहे. समीक्षा म्हणजेच तुलना करणे, असेही म्हटले जाते. तरीही प्रत्येक समीक्षेला तौलनिक समीक्षा म्हणता येणार नाही. कारण इतर समीक्षापद्धतीत तुलना ही आनुषंगिक व अप्रकट असते. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये तुलना हे प्राणभूत तत्त्व असते. मुख्य साधन असते.

मध्ययुगीन साहित्याची व्याप्ती ही खूप मोठी असल्याचे स्पष्ट होते. मध्ययुगीन काळात विविध चळवळी, विविध प्रवाह निर्माण झालेले दिसून येतात. मानवी जीवनातील अस्थिरतेमुळे साहित्य व्यवहारातही धामधूम दिसून येते. त्यातून विविध प्रवाहात देखील साहित्य विभागलेले दिसते. मध्ययुगीन साहित्याला ग्रांथिक परंपरेबरोबरच मौखिक परंपराही आहे. मध्ययुगाची संस्कृती ही प्रामुख्याने ग्रामीण संस्कृती आहे. त्यात शहरांना स्थान असले तरी ते मर्यादितच आहे. तीर्थक्षेत्र, व्यापारी केंद्र आणि हेच त्या काळातील शहरांचे स्वरूप होते. बहुसंख्य माणसे खेड्यात राहणारी होती. त्यांच्याशी त्यांना समजेल अशा भाषेतच बोलण्याची गरज होती.

तौलनिक साहित्याभासाची सैद्धान्तिक मांडणी करताना अनेक अभ्यासकांनी त्याच्या विविध व्याख्या केल्या आहेत. वसंत बापट यांनी त्याची साधी सोपी व्याख्या करताना म्हटले आहे, "तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे तुलनेच्या साह्याने एकापेक्षा अधिक साहित्यांचा अभ्यास होय." तर निशिकांत मिरजकर यांच्यामते ही व्याख्या अव्याप्त आहे. म्हणजेच या पद्धतीचे स्वरूप संपूर्णपणे तिच्यामधून स्पष्ट होत नाही. ती फक्त या अभ्यासाची पद्धत वर्णन करते.

तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप तौलनिक साहित्याभ्यासामध्ये दोन किंवा अनेक भिन्नभाषिक साहित्यकृतींची वा साहित्यिकांची तुलना केली जाते, हे आपण पहिले. पण अशी तुलना करण्यासाठी त्या साहित्यांमध्ये कोणत्या तरी प्रकारचा संबंध असला पाहिजे. कोणताही संबंध नसलेल्या साहित्यांची तुलना होऊ शकत नाही. कुणी तसा प्रयत्न केला तरी सांस्कृतिक दृष्ट्या फलदायी ठरणार नाही. तुलनीय साहित्यांमध्ये वा साहित्यिकांमध्ये कोणत्या प्रकारचे संबंध असले पाहिजेत, याबाबत निशिकांत

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

मिरजकर यांनी उपयुक्त आणि सविस्तर विवेचन केले आहे. भिन्न भिन्न भाषांत निर्माण होणाऱ्या साहित्यांमधील मानवी मनाची अभिव्यक्ती ही सारखीच आहे. माणूस हा अंतिमतः एकच आहे. अशा वैश्विक एकात्मतेचे भान नसण्यामुळे साहित्यव्यवहारामध्ये निर्माण झालेली संकुचित वृत्ती नाहीशी होऊन साहित्याची आणि एकूण जीवनाचीही जाणीव अधिक विकसित होण्यासाठी ही अभ्यासपद्धती अत्यंत उपयुक्त व महत्त्वाची आहे.

राष्ट्रीय साहित्य वेगवेगळ्या राष्ट्रातील साहित्यांची तुलना करणं हा तौलनिक साहित्यामधील एक फार लोकप्रिय अभ्यासक्रम आहे. फ्रेंच साहित्य आणि जर्मन साहित्य किंवा फ्रेंच साहित्य आणि इंग्लिश साहित्य यांचे असे तुलनात्मक अभ्यास केले आहेत. त्यातूनच राष्ट्रीय साहित्य ही संकल्पना उदयास आलेली आहे. राष्ट्रीय साहित्य म्हणजेच एका देशाचे, एका भाषेचे आणि एका संस्कृतीचे साहित्य असे त्या संकल्पनेचे स्वरूप आहे. राष्ट्र ही संकल्पना धर्म, शिक्षण, भाषा आणि साहित्य या साऱ्यांची मिळून त्या त्या राष्ट्राची परंपरा निर्माण होते. कोणत्याही भौगोलिक, आर्थिक अथवा राजकीय घटकांमध्ये बदल घडून आले की, राष्ट्र या संकल्पनेची परिणामे बदलतात.

प्रत्येक समाजाची एक विशिष्ट जीवनसरणी असते. त्यातून त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन आकार घेत असतो. या जीवनविषयक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब राष्ट्रीय साहित्यात उमटणे अपरिहार्य असते. वेगवेगळ्या राष्ट्रांचे त्या त्या राष्ट्रीय साहित्याच्या आधारे ठरविण्याचा प्रयत्नांना ऐतिहासिक महत्त्व आहे. एकाच भाषेतील साहित्यात वेगवेगळ्या राष्ट्रांच्या साहित्याचा समावेश होतो. तेव्हा राष्ट्रीय साहित्याचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होतात. राष्ट्रीय साहित्याचे विहंगमावलोकन करुन विशिष्ट कालखंडावर अथवा त्या त्या राष्ट्रीय साहित्याच्या विकसन प्रवृत्तीवर तुलना केंद्रित करणे लाभदायक ठरते. इंग्लिश आणि फ्रेंच साहित्याच्या सातत्याने विकसीत होणाऱ्या साहित्याची तुलना सातत्याने विकसीत न होणाऱ्या जर्मन साहित्याशी अशा तऱ्हेने करणे उपयुक्त ठरेल, असे एस. एस. प्रावर यांचे म्हणणे आहे.

तुलनेचा इतिहासातील एखाद्या विशिष्ट कालखंडाशी आणि एखाद्या विशिष्ट वाङ्मयप्रकाराच्या ऐतिहासिक विकासक्रमाशी संबंध असावा असेही त्यानी बजावलेले आहे. राष्ट्रीय साहित्याच्या संकल्पनेला जास्त वाव मिळत गेला, असे रेन वेलेक यांना वाटते. रॉय पास्कल यांनी केलेली इंग्लिश कादंबरी आणि जर्मन कादंबरी यांची तुलना राष्ट्रीय साहित्यांच्या तुलनेत एक नमुना म्हणून एस. एस. प्रावर यांनी उदाहरणादाखल दिलेली आहे.

विश्वसाहित्य या संज्ञेच्या अभिप्रेत असलेल्या अर्थछटा भिन्नच आहेत. जगातील साहित्याचे जे स्वरुप असेल त्याला गटे यांनी विश्वसाहित्य हे अभिधान दिले आहे. काही समीक्षकांनी विश्वसाहित्य ही संकल्पना जगातील महान साहित्यकृतींचे भांडार या अर्थाने उपयोजीली आहे. होमर, शेक्सपिअर, गटे, कालिदास, तुकाराम, टॉलस्टॉय, चेकॉव्ह यांच्यासारखे साहित्यकार आणि रामायण, महाभारत या सारख्या साहित्यकृती साऱ्या जगात प्रतिष्ठाप्राप्त असतात आणि ती प्रतिष्ठाही असते. या अशा सगळ्या साहित्याला मिळून विश्वसाहित्य असे काही समीक्षक संबोधतात.

भारतातील वाङ्मयेतिहासकारांनी सुरुवातीला या संज्ञेचा स्वीकार केला नाही. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात विविध

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

भारतीय भाषांतील वाङ्‌मयेतिहासकारांनी आपला भाषेतील साहित्याचा स्वतंत्रपणे इतिहास गोळा करण्यातच समाधान मानले. एकोणिसाव्या शतकांतील भारतीय साहित्य म्हणजे संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या भाषांमध्ये निर्माण झालेले साहित्य एवढाच सीमित अर्थ होतो.

**समारोप**:

राष्ट्रीय साहित्य या संकल्पनेची जी सर्वसाधारण अर्थकक्षा आहे. त्यापेक्षा भारतीय साहित्य ही संकल्पना खूपच वेगळी आहे. किंबहुना ते राष्ट्रीय साहित्य या संकल्पनेच्या ठराविकतेला एक आव्हानच आहे आणि याला कारण म्हणजे भारतीय जीवनामध्ये शतकानुशतके मुरलेली आणि भारतीय जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनलेली अनेकता हे होय. या देशात एक दोन नव्हे तर अगणित भाषा एकत्र नांदत आहेत. भारतीय राज्यघटनेने प्रारंभी चौदा भारतीय भाषा भारताच्या प्रमुख भाषा म्हणून मान्य केल्या होत्या. कालांतराने या यादीत भर पडत गेलेली दिसते. पुन्हा या सर्व भाषांच्या वेगवेगळया बोली भाषा या असंख्य विविध भाषा एकाच वेळी भारतात पिढ्यानपिढ्या गुण्यागोविंदाने नांदत आहेत. भाषिक वाङ्मयीन आणि सांस्कृतिक क्षेत्रात आदान प्रदान अनुभवास येते.

मराठी आणि कोकणी, मराठी आणि कन्नड, कन्नड आणि तामिळ, असमिया आणि बांग्ला, बिहारी, हिंदी संबंध सातत्याने आढळून येतात. अशा तऱ्हेचे पूर्विध्यपूर्ण भाषिक सहजीवन मिरवणारे भारत हे जगाच्या पाठीवरील एकमेव राष्ट्र आहे. संत नामदेवांनी सातशे वर्षापूर्वी मराठी आणि हिंदुस्थानी या दोन्ही भाषात आपल्या आध्यात्मिक अनुभूतीला काव्यरुप दिले होते. कथाकार प्रेमचंद यांनी प्रथम काही वर्षे उर्दूमध्ये कथालेखन केले. हिंदीमध्ये कथालेखन करू लागले. काका कालेकरांनी मराठी, गुजराती आणि हिंदी या तीन भाषांमध्ये साहित्याचे सृजन केले आणि या तिन्ही भाषांच्या साहित्यपरंपरेमध्ये स्वतःचे स्थान निर्माण करुन ठेवले. कमलादास यांनी मल्याळम आणि इंग्लिश या दोन्ही भाषांमध्ये काव्य आणि गद्य लेखन केले.

भारतीय साहित्य या संकल्पनेच्या आव्हानात्मकतेचा हा एक पैलू आहे. भारतीय साहित्यामध्ये केवळ साहित्यकारच नव्हे, तर साहित्यकृती देखील बहुभाषिक असल्याचे अनोखे दृश्य पहावयास मिळते.

**संदर्भसूची:**

*१. पाटील आनंद, तौलनिक साहित्य नवे सिद्धांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९९ पृष्ठ १२*

*२. बापट वसंत, तौलनिक साहित्याभ्यास मूलतत्त्वे आणि दिशा, मौज प्रकाशनगृह मुंबई प्रथमावृत्ती १९८१ पृष्ठ ८६*

*३. आलाटे निशिकांत, (लेख) तौलनिक साहित्याभ्यासाची वैश्विकता उगवतीचे रंग त्रैमासिक, (संपा.), साहेबराव खरात एप्रिल - मे - जून २००६ पृष्ठ १२*

*४. जैन रविंद्रकुमार, (लेख) तुलनात्मक अनुसंधान, प्रक्रिया एवं समस्याएँ, हिंदी साहित्य भंडार, लखनऊ प्रथमावृत्ती १९८० पृष्ठ ३६*

*Cite This Article:* **डॉ. काशीद सं. (2025).** *मध्ययुगीन मराठी तौलनिक साहित्याचे स्वरूप.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 146–149).

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# संत साहित्य आणि भाषांतर

*प्रा. (डॉ.) सविता अशोक माळी

* मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव.

**प्रस्तावना :**

भारताच्या सांस्कृतिक इतिहासात संत साहित्याला एक अद्वितीय स्थान आहे. भक्ती, समता, मानवता आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारे संतवाङ्मय विविध भारतीय भाषांमध्ये विकसित झाले असून त्याचा प्रभाव साहित्यापासून समाजपरिवर्तनापर्यंत दिसून येतो. लोकभाषेत लिहिलेल्या या साहित्याची सहजता आणि भावस्पर्शीता यामुळे त्याचे अनेक भारतीय तसेच परदेशी भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. मात्र भाषांतर प्रक्रियेत मूळ प्रतीकांचे, सांस्कृतिक संदर्भांचे आणि भावार्थांचे अचूक रूपांतर करणे ही एक महत्त्वाची आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्यामुळे संत साहित्याच्या भाषांतराचा अभ्यास हा केवळ भाषांतरशास्त्रीय नसून सांस्कृतिक, सामाजिक आणि अध्यात्मिक दृष्टीनेही महत्त्वाचा ठरतो. मराठीच्या वैचारिक आणि सांस्कृतिक इतिहासात संत साहित्य हे एक अद्वितीय आणि क्रांतिकारक पर्व मानले जाते. अभंग, ओवी, गाथा, कीर्तन आणि गवळणी या विविध काव्यप्रकारांद्वारे संतांनी ज्या प्रकारे अध्यात्म, नैतिकता, सामाजिक समता आणि भक्तीचे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचवले, त्यात केवळ काव्यनिर्मिती नव्हे तर ज्ञानाचे लोकशाहीकरण सामावलेले होते. या प्रक्रियेच्या मध्यभागी एक अत्यंत महत्त्वाची, पण अनेकदा कमी चर्चिली जाणारी घटना म्हणजे भाषांतर. संतांनी संस्कृताधारित ग्रंथ, पुराणकथा, तत्त्वज्ञान, वेदान्तीय संकल्पना आणि धार्मिक सिद्धान्त यांचे मराठीतील पुनर्वाचन केले. कधी भाषांतराच्या, कधी व्याख्येच्या, तर कधी पूर्ण अर्थनिर्मितीच्या रूपात. ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिका, एकनाथांच्या भागवताचे भाष्य, नामदेवांच्या अभंगांत दिसणारे गुरुग्रंथसाहिबाशी असलेले संबध, आणि तुकारामांच्या तत्त्वकेंद्रित अभंगातील गीतेच्या विचारांचे पुनर्परीभाषण हे सर्व "भाषांतर" या शब्दाच्या पारंपरिक सीमांना विस्तृत करणारी उदाहरणे आहेत. संत साहित्याच्या संदर्भात भाषांतर ही केवळ भाषांची देवाणघेवाण नव्हती; ती संस्कृतींची देवाणघेवाण, अर्थांची पुनर्रचना आणि सामाजिक संरचना बदलण्याचे साधन होती. शब्दांतील अर्थ जनमानसाच्या आयुष्याशी जोडून देण्याची क्षमता संतांनी दाखवली. म्हणूनच संत साहित्याचे भाषांतर हे एक स्वतंत्र, स्वायत्त आणि सर्जनशील प्रक्रिया म्हणून पाहणे आवश्यक ठरते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'संतसाहित्य आणि भाषांतर' या विषयाच्या अनुशंगाने अभ्यास करणे हा मुख्य उद्देश आहे.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. मराठी संत साहित्याची वैशिष्ट्ये, तत्त्वज्ञान आणि भाषिक शैली यांचा अभ्यास करणे.

२. मूळ कलाकृतीतील भावार्थ, अध्यात्मिकता आणि सांस्कृतिक संदर्भ आणि भाषांतर यातील साम्य-भेद अभ्यासणे .

३. भिन्न भाषिक वाचकांपर्यंत संत साहित्य पोहोचवण्यासाठी भाषांतराची भूमिकाचा अभ्यास करणे .

४. जागतिकीकरणात भाषांतराचा वाटा आणि त्यातील मर्यादा यांचा अभ्यास करणे .

५. संत साहित्य हे मराठी संस्कृतीचे आध्यात्मिक, सामाजिक आणि साहित्यिक अधिष्ठान आहे, त्यामुळे त्याच्या भावार्थाचे विविध भाषांतील सादरीकरण समजून घेणे.

६. संत साहित्याचा व्यापक प्रसार भाषांतराद्वारे शक्य होतो, त्यामुळे भाषांतरातील यश, मर्यादा व अडथळे अभ्यासणे.

७. संत साहित्याचा सामाजिक संदेश, समता, प्रेम, भक्ती, नैतिकता जाणून घेणे.

**विषय विवेचन :**

संत साहित्य हे भारतीय भक्ती परंपरेचे मूळ गमक जपणारे आणि सामाजिक परिवर्तन घडवणारे अद्वितीय साहित्य आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, जनाबाई, चोखामेळा आदी संतांनी सामान्य जनतेच्या बोलीत अध्यात्म, नैतिकता, सामाजिक समता आणि वैयक्तिक शुद्धीचा संदेश दिला. या साहित्याचे वैशिष्ट्य म्हणजे सरळ, सोपे, अर्थगर्भ आणि आध्यात्मिक स्वरूप, जे कोणत्याही वर्गाला सहज समजते. भाषांतर ही केवळ शब्दांची अदलाबदल नसून भावार्थ, सांस्कृतिक संदर्भ, भावभूमी, प्रतीकात्मकता आणि अध्यात्मिक अनुभव यांचे नवे भाषिक पुनर्सृजन आहे. संत साहित्याचे भाषांतर करताना अनुवादकास केवळ भाषिक अचूकता नव्हे तर भक्तीभावाचा सूर, पदांच्या लयतालाचे सौंदर्य, उपमा-प्रतीकांची स्थानिकता आणि तात्त्विक खोली जपण्याचे आव्हान असते. त्यामुळे संत साहित्याचे भाषांतर ही एक संवेदनशील आणि सांस्कृतिकदृष्ट्या गुंतागुंतीची प्रक्रिया ठरते.

संत साहित्य अनेक भारतीय तसेच परदेशी भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. परंतु या अनुवादांमध्ये अनेकदा भावार्थाचे विकृतीकरण, सांस्कृतिक संदर्भांची हरवणूक, अध्यात्मिक अनुभूतीचे पतन होणे, भाषिक लयतालाचा अभाव अशी समस्याही दिसून येतात. यामुळे संत साहित्याचा मूलस्वर, आध्यात्मिक अनुभूती आणि सामाजिक भूमिकेचा प्रभाव अपेक्षेप्रमाणे परभाषिक वाचकांपर्यंत पोहोचतोच असे नाही. भाषांतरशास्त्राच्या दृष्टीने संत साहित्याचे भाषांतर हा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरतो, कारण यात पारंपरिक भक्ती साहित्याची मर्मभावना टिकवून परभाषेत नवे वाङ्मय तयार करण्याची प्रक्रिया असते. या प्रक्रियेत अनुवादकाची दृष्टी, संस्कृतीतील अंतर, भाषिक क्षमता व साहित्यिक समज अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात भारतीय संत साहित्य जगभर पोहोचू शकते, परंतु त्यासाठी गुणवत्तापूर्ण, सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील आणि तात्त्विक खोली राखणारे भाषांतर आवश्यक आहे. म्हणूनच “संत साहित्य आणि भाषांतर” हा विषय सांस्कृतिक, तात्त्विक आणि भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातूनही अभ्यासनीय ठरतो.

**संतांच्या भाषांतर प्रक्रियेमुळे मराठी भाषेचा विकास :**

मराठी भाषेचा विकास संतांच्या भाषांतर प्रक्रियेने मोठ्या प्रमाणावर समृद्ध झाला आहे. भक्ती चळवळीतील संतांनी ज्ञान, अध्यात्म आणि समाजजागृतीचे साहित्य सामान्य मराठी माणसापर्यंत पोहोचावे या उद्देशाने अनेक संस्कृत, प्राकृत, किंवा प्रादेशिक भाषांतील ग्रंथांचे मराठीत रूपांतर केले. यामुळे भाषा अधिक लोकाभिमुख, समृद्ध आणि अभिव्यक्तिपूर्ण बनली.

**१. संस्कृत ग्रंथांचे मराठीकरण:**

अनेक संतांनी संस्कृतातील कठीण ग्रंथ मराठीत भाषांतरित केले. ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका/ज्ञानेश्वरी –

भगवद्गीतेचे लोकसुलभ भाषांतर केले . यामुळे मराठी गद्य–पद्याला तात्त्विक, दार्शनिक शब्दसंपदा मिळाली. नवीन रुपके, म्हणी, व्याकरणशैली विकसित झाली. नाथ संप्रदायातील संतांचे ग्रंथ – योग, तत्त्वज्ञानाचे संस्कृत संकल्पना मराठीत उतरल्या.

**२. लोकभाषेचे संस्कृतीकरण व परिष्करण :**

भाषांतर करताना संतांनी सामान्य बोलीभाषेला साहित्यिक स्वरूप दिले. ग्रामीण, प्रादेशिक शब्दांना अभिजात संदर्भ मिळाला. मराठीला लयदार, भावस्पर्शी ओव्या, अभंग, गवळणी, भारुडे यांमधून नवी अभिव्यक्तीशैली मिळाली.

**३. धार्मिक संकल्पनांच्या स्थानिकीकरणामुळे शब्दनिर्मिती :**

संतांनी संस्कृतातील जटील संकल्पना मराठी परिभाषेत रूपांतरित केल्या. उदा. कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग → कर्म, भक्ती, ज्ञान यांचे सुलभ अर्थ. ब्रह्म, माया, संसार यांचे स्थानिक रूपकांतून स्पष्टीकरण. यामुळे तत्त्वज्ञान सांगण्याची मराठी क्षमता वाढली.

**४. सामाजिक भाषेचा विकास :**

भाषांतरासोबतच संतांनी लोकांमधील अंधश्रद्धा, जातिभेद, सामाजिक विसंगती यांवर भाष्य केले. समाजविषयक शब्द, रूपके व विचारप्रवाह भाषेत सहजपणे रूजला. "वृत्ती", "दृष्टि", "समत्व", "कर्म", "भक्तभाव" यांसारख्या संकल्पनांची लोकप्रियता वाढली.

**५. शिक्षणासाठी भाषा सुसंस्कृत :**

संतांच्या अनुवादांमुळे मराठी ही शिक्षण, धर्मप्रचार, विवेकशील विचार यांसाठी उपयुक्त भाषा बनली. त्यानंतर पुढील शतकांमध्ये मराठी साहित्य, काव्य, नाटक आणि वाङ्मय परंपरेवर याचा खोल प्रभाव पडला.

**तत्त्वज्ञानाचे लोकाभिमुखीकरण :**

संतांच्या भाषांतर प्रक्रियेमुळे तत्त्वज्ञानाचे लोकाभिमुखीकरण हा मराठी सांस्कृतिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा परिणाम आहे. याने जटिल तात्त्विक विचार सामान्य लोकांसाठी सुलभ, समजण्याजोगे आणि उपयुक्त बनवले.

**१. संस्कृत तत्त्वज्ञानाचे लोकभाषेत रूपांतर :**

संतांनी गीता, उपनिषदं, योगशास्त्र किंवा वेदांत यांसारख्या गुंतागुंतीच्या ग्रंथांचे मराठीतील बोलीभाषा आणि पद्यरूपात भाषांतर केले. ज्ञानेश्वरीने वेदांत आणि गीतेतील गूढ विचार सामान्य शेतकरी-मजुरालाही समजू शकतील अशा शब्दांत मांडले. त्यामुळे लोकांनी तत्त्वज्ञान 'विद्वानांची मक्तेदारी' नसून सर्वांसाठी आहे हे मान्य केले.

**२. उपदेशाऐवजी संवादाची तत्त्वज्ञानशैली :**

संतांचे तत्त्वज्ञान उपदेशात्मक नव्हते; ते संवाद, कथा, रूपक, उदाहरण यांच्या माध्यमातून मांडले गेले. त्यामुळे हे तत्वज्ञान सर्वसामान्यांना आपले वाटते. उदा. गवळणी, अभंग, भारुडे, ओव्या – अशाप्रकारे सर्व साहित्य लोकगीतांच्या ढंगात भाषांतरित झाले आहे. याचा परिणाम म्हणजे हे तत्त्वज्ञान ऐकण्याची, समजण्याची, गाण्याची संस्कृती निर्माण झाली.

**३. तत्त्वज्ञानाचा अनुभवाधारित दृष्टिकोन :**

संतांनी 'वेद, शास्त्र' यांच्या अधिकारापेक्षा अनुभव, भक्ति, प्रेम, कर्म यांवर अधिक भर दिला. यामुळे तत्त्वज्ञान लोकांच्या जीवनानुभवाशी जोडले गेले. "अखंड नामस्मरण", "समत्व", "विटंबना न करणे", "आपुलकी", "वैराग्य"—हे व्यवहारात जगण्याचे तत्त्वज्ञान बनले.

**४. सामाजिक समता व लोककल्याणाचा संदेश :**

तात्त्विक विचार केवळ आत्मज्ञानापुरते न ठेवता संतांनी ते सामाजिक सुधारणा व समतेशी जोडले. जातिभेदाचा विरोध कर्मामध्ये समानता सर्वांत परमात्मा पाहण्याचा दृष्टिकोन यामुळे तत्त्वज्ञान शोषित, वंचित, सामान्य लोकांच्या जगण्याशी जोडले गेले.

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

**५. धार्मिक-सांस्कृतिक संकल्पनांची सोपी भाषांतरे :**

संतांनी कठीण संस्कृत संकल्पना स्थानिक रूप देऊन लोकाभिमुख केल्या. उदा. ब्रह्म ⟶ परब्रह्म/सर्वत्र देव, माया ⟶ मोह, योग ⟶ साधना, भक्ती ⟶ प्रेम, समर्पण यामुळे तत्त्वज्ञान तांत्रिक उंचीवरून उतरून लोकांच्या मनात मुरले.

**६. तत्त्वज्ञानाचा लोकव्यवहारातील उपयोग:**

संतांचे तत्त्वज्ञान फक्त ग्रंथापुरते न राहता कीर्तन, प्रवचन, भजनी मंडळे, वारी, दिंडी अशा लोकसांस्कृतिक माध्यमांत पसरले. यामुळे तत्त्वज्ञान हे: गावे-खेड्यांत वाड्या-वस्त्यांत समाजातील सर्व स्तरांत प्रत्यक्ष अनुभवले गेले.

**सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन** :

संतांच्या भाषांतर प्रक्रियेमुळे अन्य भाषेतील तत्त्वज्ञान हे लोकांसाठी, लोकांच्या भाषेत, लोकांच्या जीवनाशी जोडले गेले. संतांच्या भाषांतर प्रक्रियेमुळे समाजात सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन अत्यंत व्यापक पातळीवर घडले. संस्कृतातील तात्त्विक, आध्यात्मिक व नैतिक विचारांना लोकभाषेत उतरवून संतांनी सामान्य समाजाच्या विचारसरणी, मूल्यव्यवस्था आणि सांस्कृतिक आचारांना बदलण्याची ताकद निर्माण केली.

**१. ज्ञानाचे लोकशाहीकरण:**

संस्कृतातील जटिल ग्रंथ ही पूर्वी विद्वानांची मक्तेदारी होती. संतांनी त्यांचा भावार्थ साध्या-सरळ मराठीत दिल्यामुळे सर्व जाती-धर्मांच्या लोकांना आध्यात्मिक व नैतिक विचार समजले, ज्ञानाला आर्थिक व सामाजिक वर्चस्व असणाऱ्या वर्गाची सीमा उरली नाही, समाजात समान बौद्धिक हक्कांची भावना निर्माण झाली.

**२. जातिभेदाला टक्कर देणारी विचारधारा-**

तत्त्वज्ञानाची भाषा लोकाभिमुख झाल्यावर संतांनी सांगितलेले समानता, समत्व, भक्तीचे सार्वभौमत्व हे विचार सर्वांमध्ये पोहोचले. "अवघा देवाचा दास", "सर्वाधिक देव एक"— अशा विचारांमुळे जन्माधारित भेदभावाला धक्का बसला. सामाजिक समतेची संस्कृती निर्माण होऊ लागली.

**३. भक्ती चळवळीतून सामाजिक एकात्मता :**

भाषांतरित विचार कीर्तन, प्रवचन, वारी, दिंडी, भजन यांतून पसरले. त्यामुळे: सर्व जात-धर्म, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत यांचा एकत्र सहभाग वाढला, सामूहिक उपासना व सामुदायिक संस्कृती रुजली, सामाजिक एकात्मतेचे नवे बंध निर्माण झाले.

**४. स्त्रियांसाठी शिक्षणाची संधी :**

संतांनी लोकभाषेत ज्ञान सांगितल्यामुळे स्त्रिया, ज्यांना संस्कृत शिक्षणाची संधी नव्हती अशा स्त्रिया सांस्कृतिक व आध्यात्मिक प्रक्रियेचा केंद्रबिंदू बनल्या. जनाई, बहिणाबाई यांसारख्या स्त्रीसंतांची परंपरा मजबूत झाली. स्त्रियांच्या सांस्कृतिक सहभागास नवी प्रतिष्ठा मिळाली.

**५. नैतिक-आचारधर्माचा सामाजिक प्रसार :**

संतांनी धर्म हे कर्म, नैतिकता, दया, परोपकार, सत्य, प्रेम यांतून जगण्याची गोष्ट आहे हे लोकांना शिकवले. सामाजिक वर्तनात साधेपणा, प्रामाणिकपणा , संयम, परस्परांबद्दल आदर वाढला. समाजातील दांभिकता, कर्मकांड आणि भोंदूपणावर प्रहार झाला.

**६. स्थानिक संस्कृतीचा विकास :**

भाषांतर प्रक्रियेने मराठी लोकगीतं, अभंग, ओव्या, भारुडे, वारी परंपरा यांची संस्कृती म्हणून वाढ झाली. लोकसंगीत, लोकनृत्य, लोककला यांना धार्मिक-सामाजिक पाठबळ मिळाले. सांस्कृतिक वारसा अधिक समृद्ध आणि सर्वसमावेशक बनला.

**७. ग्रामीण समाजात नैतिक शिक्षणाचे जाळे :**

भाषांतरित तत्त्वज्ञान गावागावांत कीर्तनकार, कथाकथनकार, वारकरी यांच्या माध्यमातून पोहोचले. ग्रामीण जनतेला विचार, नैतिकता, भक्ति आणि सामाजिक मूल्यांची शिकवण मिळाली. सामाजिक बंध, परस्पर

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

सहकार्य आणि सामुदायिक जीवन मजबूत झाले.

**८. वैयक्तिक ते सामूहिक परिवर्तन :**

तत्त्वज्ञानामुळे व्यक्तीचे अंतःकरण बदलले, व्यक्तीच्या बदलातून कुटुंबाचे, कुटुंबातून समाजाचे, आणि समाजातून संस्कृतीचे पुनर्रचनन झाले.

**निष्कर्ष :**

१. संत साहित्य हे भारतीय भक्तिपरंपरेचे आध्यात्मिक, तात्त्विक आणि सांस्कृतिक शिल्प आहे.

२. सामाजिक समता, मानवतावाद, भक्ती, नैतिकता आणि सार्वत्रिक प्रेम या मूल्यांवर आधारित हे साहित्य काळाच्या पलीकडे जाणारे आहे

३. संत साहित्याचे भाषांतर ही फक्त शब्दांची देवाणघेवाण नसून एक संस्कृती-पूल उभारण्याची प्रक्रिया आहे.

४. संत साहित्याचे भाषांतर हे फक्त साहित्यिक कृती नसून संवादाचे, आध्यात्मिक सेतूचे आणि सार्वत्रिक मूल्यांच्या प्रसाराचे प्रभावी साधन आहे.

५. संतांच्या काव्यातील समत्व, करुणा आणि भक्तिभाव यांचे भाषांतरित स्वरूप जगभरातील वाचकांना जोडते.

६. नवे अर्थ आणि नवे संदर्भ उलगडते व संत साहित्याची वैश्विकता अधोरेखित करते.

**समारोप :**

मराठी साहित्य समृद्ध होण्यामागे संत साहित्याचा मोठा वाटा आहे. भाषांतरित साहित्य म्हणजे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, अध्यात्मिक अशा विविध परंपरां भाषांतराच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचवणे होय. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात नांदणाऱ्या दोन संस्कृतींना एकत्र आणण्याचे महत्वपूर्ण कार्य भाषांतरित साहित्य करीत असते. भाषांतराच्या प्रक्रियेमुळे विश्वबंधुत्वाची संकल्पना वृधींगत होऊन सर्व क्षेत्रातील ज्ञानाचा प्रसार होताना दिसतो. म्हणूनच भाषांतराकडे सांस्कृतिक आणि भाषिक समृद्धीचे प्रतिक म्हणून पाहता येते.

**संदर्भग्रंथ:**

*१. भाषांतर मीमांसा-संपा. डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण*

*२. साहित्याची भाषा- डॉ. भालचंद्र नेमाडे*

*३. भाषांतर- सदा कराडे*

*४. भाषांतरशास्त्र: संकल्पना व स्वरूप – डॉ. अ. के. प्र. देशमुख*

*५. मराठी संत साहित्य इतिहास – वि. स. खांडेकर*

*Cite This Article:*

*प्रा. (डॉ.) माळी स. अ. (2025). संत साहित्य आणि भाषांतर .* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 150–154).

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# भाषांतर-अनुवाद-रूपांतराने जागतिक साहित्यप्रसारास चालना

*** डॉ. सायली आचार्य**

** मराठी विभागप्रमुख, एस.एम.आर.के. महिला महाविद्यालय, नाशिक – ९*

**सारांश:**

*भाषा ही मानवी समूहाची खरी ओळख असते. मग ती कुठलीही भाषा असो. संस्कृती ही भाषेच्या हातात हात घालून येते. त्यामुळे एखाद्या भाषेत निर्माण झालेले साहित्य केवळ त्या भाषेतील शब्द घेऊन येत नाही तर त्या भाषेतील संस्कृती, आचार-विचार, परंपरा, रीतिरिवाजही दुसऱ्या भाषेत घेऊन जातात. हे स्थानांतरण केवळ त्या साहित्यकृतीतील आशयाचे नसते तर ती भाषा बोलणाऱ्या संपूर्ण समाजाची संस्कृती त्यात सामावलेली असते. म्हणूनच प्रत्येक वेळी केवळ शब्दशः भाषांतर न करता आशयाची गरज लक्षात घेऊन भाषांतर – अनुवाद-रूपांतर तसेच भावानुवाद, अर्थानुवाद या प्रकारातील एक प्रक्रिया निवडून हे भाषांतर केले जाते. जागतिक पातळीवर या भाषांतर प्रक्रियेचे म्हणूनच महत्त्वाचे योगदान आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात एखाद्या भाषेतील आशय, संस्कृती, विचार, भावना इ. नेऊन पोहचविण्याचे काम ही प्रक्रिया करते.*

***महत्त्वाचे शब्द :*** *भाषांतर, अनुवाद, रूपांतर, छाया, अनुसर्जन, स्वैर अनुवाद, भावानुवाद, संस्कृतीचे स्थानांतरण, स्त्रोत भाषा, लक्ष्य भाषा*

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून माणसाची रानटीपणापासून ते समाजाकडे झालेली आहे, ही भाषेचीच देणगी आहे असे म्हणावे लागते. भाषा ही माणसाच्या अस्तित्वाचे, जगण्याचे अविभाज्य अंग आहे. केवळ तिच्या स्वरूपात काळानुरूप बदल होत गेल्याचे आढळतात. जंगलात राहत असताना गुहेत एकटेपणाने राहत असलेल्या माणसाला भाषेची गरज तितकीशी जाणवली नाही पण पुढे कळपात रहायला लागल्यापासून भावना व्यक्त करण्यासाठी संवादाची गरज भासू लागली यातून भाषेचा जन्म झाला. गरज ही शोधाची जननी आहे ही उक्ती याठिकाणीही लागू पडते. हा संवाद माणसाबरोबरच प्रगत होऊ लागला आणि भाषा बदलू लागली. असंख्य शब्दांची त्यात भर पडू लागली. पण भाषा ही केवळ एक चिह्नव्यवस्था नसते तर संस्कृतीही त्या त्या प्रदेशात संपन्न होत असते. त्यामुळे भाषा आणि संस्कृती या परस्परांच्या हातात हात घालून चालणाऱ्या बाबी आहेत. आधुनिकीकरणात जग जवळ आले आणि आदानप्रदान वाढू लागले तसे साहित्यातही भाषांतराचे प्रमाण

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

वाढले. किंबहुना इ.स. १८१८ ते १८७४ हा काळ भाषांतर युग म्हणूनच ओळखला जातो. कारण याकाळात केवळ ग्रंथांची भाषांतरेच होत होती. नवीन साहित्यनिर्मिती पूर्णपणे थांबली होती म्हणूनच या काळाला तमोयुग किंवा अंधारयुगही म्हटले जाते. इंग्रजी राजवटीत अनेक संस्कृत ग्रंथांची भाषांतरे इंग्रजांनी त्यांच्या भाषेत करून घेतली तेव्हा आपल्याकडील प्राचीन दुर्मीळ ज्ञान त्यांना त्यांच्या देशात, भाषेत घेऊन जायचे होते हा उद्देश प्रधान होता. यालाच अनुसरून आपल्याकडील पहिल्या इंग्रजी शिकलेल्या पिढीने अनेक इंग्रजी ग्रंथांची भाषांतरेही मराठी भाषेत केली. याकाळापासून एका भाषेतील ज्ञान दुसऱ्या भाषेत नेण्यासाठी भाषांतराचा वापर होऊ लागला.

**विषय प्रवेश :** भाषांतर ही एक कला आहे शिवाय ते एक शास्त्रही आहे. "संस्कृतमध्ये भाषांतराला छाया असे म्हणतात. छाया म्हणजे प्रतिमा, प्रतिबिंब, मूलकृतीशी ते एकरूप असेलच असे नाही, समरूप मात्र असावे अशी अपेक्षा असते."[१] थोडक्यात भाषा समृद्धीसाठी भाषांतराची आवश्यकता आहे. परभाषेतील जे जे सुंदर, रमणीय, अर्थपूर्ण, उपयुक्त व आकर्षक वाटते ते साहित्य स्वभाषेत आणण्याची इच्छा या प्रक्रियेमागे आहे. एका भाषेतील विचार दुसऱ्या भाषेत पोहचविणे यात अभिप्रेत आहेत. परंतु या प्रक्रियेसाठी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला जातो ज्याला आपण भाषांतराचे प्रकार म्हणू शकतो. या प्रकारांकडे वळण्यापूर्वी या भाषांतर प्रक्रियेचा इतिहास बघणे आवश्यक ठरते.

**भाषांतर इतिहासाची पार्श्वभूमी :**

भाषांतराला प्राचीन काळापासून महत्त्व दिले गेलेले आहे. असंख्य संस्कृत आख्यानकाव्यांची, ग्रंथांची, महाकाव्यांची भाषांतरे इतर भाषांमध्ये झाली आहे. किंवा एकाच भाषेतील साहित्यकृतीचेही त्याच भाषेत भाषांतर केले जाते यामागे सोपे व सुटसुटीत करून सांगणे हा प्रधान हेतू असतो. संस्कृतातील अनेक ग्रंथ अशाप्रकारे बोलीभाषेतही घेतलेले दिसतात. पाश्चात्य देशात देखील प्राचीन काळापासून बायबलसारखे धार्मिक ग्रंथ, महाकाव्य, गणित, इतिहासातील लेखन हे लॅटीनमधून फ्रेंच, जर्मन वा इंग्रजी भाषेत भाषांतरीत केले गेले. मराठीत विष्णुदास शर्मांचे पंचतंत्र, हितोपदेश, ज्योतिषशास्त्र, गीतेतील तत्त्वज्ञान अशी असंख्य उदाहरणे देता येतील. तंजावरचे सरफोजी राजे यांनी ग्रंथकारांना प्रेरणा देवून इसापनीतीचे भाषांतर दख्खनच्या पंडितांकडून करून घेतले व बालबोध मुक्तावली नावाने ते छापले हे मराठी पुस्तकाचे पहिले भाषांतर मानले जाते. मराठीत उपलब्ध असलेले भगवद्गीता, रामायण, महाभारत या पौराणिक ग्रंथांवरून रचलेले स्वैर अनुवाद अथवा प्राचीन पंडित कवींची आख्यानकविता पुनःकथनासाठी भाषांतरीत केली गेली. मात्र इंग्रजांनी पुनःकथनाऐवजी भाषेवर भर देत ही भाषांतरे करवून घेतली . तेव्हापासून भाषांतराकडे एक विद्या म्हणून, एक शास्त्र म्हणून बघितले जाऊ लागले.

**भाषांतराचे प्रकार :**

१७ व्या शतकातील ड्रायडन नावाच्या लेखकाची भाषांतरकार म्हणूनच ख्याती होती. त्याने भाषांतर करताना भाषेव्यतिरिक्त शक्यतो काहीही न बदल करण्यावर भर दिला. तसेच त्याने भाषांतराच्या ३ श्रेणी सांगितल्या.

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS
Original Research Article




१) "**शब्दशः भाषांतर** – या प्रकारच्या भाषांतरात भाषांतरकार मूळ भाषेतील शब्द न् शब्द तसेच ओळ दुसऱ्या भाषेत आणण्याचा प्रयत्न करतो.

२) **अर्थानुवाद** – या प्रकारच्या भाषांतरात मात्र भाषांतरकार बरेचसे स्वातंत्र्य घेऊन मोकळेपणाने भाषांतर करतो. मूळ साहित्यकृतीचे विस्मरण होऊ नये म्हणून भाषांतरकार मूळ लेखक सतत डोळ्यासमोर ठेवतो... आशयात थोडीफार वाढ झाली तरी चालेल पण मूळ आशयात बदल होणार नाही याची तो दक्षता घेतो.

३) **अनुकृती** – अशा प्रकारच्या भाषांतरात भाषांतरकार शब्द आणि अर्थ यात फेर करण्याचे स्वातंत्र्य तर घेतोच पण प्रसंगोपात त्यांचा त्यागही करतो. भाषांतरीत कृतीचा मूलाधार तयार करण्यासाठी मूळ साहित्यकृतीतून काही सूचना तो जरूर घेतो पण बाकी आपल्या मर्जीने करतो." [२]

वरील ड्रायडनने सांगितलेल्या ३ श्रेणींनुसार बघायचे झाल्यास शास्त्रीय ग्रंथांचे साधारण शब्दशः भाषांतर केले जाते. ज्या ग्रंथांच पारिभाषिक शब्दांना महत्त्व असते तिथे इतर भाषांतर प्रकारांपेक्षा शब्दशः भाषांतराचाच वापर केला जातो. परंतु ललित साहित्याचे भाषांतर करताना भाषांतर, अनुवाद, अर्थानुवाद, भावानुवाद, स्वैर अनुवाद किंवा रूपांतर, अनुकृती या अनेक पद्धतींचा वापर करता येतो. अर्थात हे ठरविण्याचे स्वातंत्र्य भाषांतरकार घेतो. कान्होबा कीर्तिकर यांनी टेनिसनच्या प्रिन्सेस चे इंदिरा नावाने केलेले भाषांतर हे भाषांतर नसून अनुकृती आहे. कारण प्रिन्सेस काव्यातून कीर्तिकरांना योग्य वाटल्या त्याच ओळी घेतल्या व स्वतःचे विचारही त्यात समाविष्ट केले.

**भाषांतर व्याख्या :**

एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे म्हणजे भाषांतर होय. अगदी व्याख्याच द्यायची झाली तर स्त्रोत भाषेतील अर्थ किंवा कथ्य लक्ष्य भाषेतील प्रतीक व्यवस्थेद्वारे अभिव्यक्त करणे म्हणजे भाषांतर होय, थोडक्यात एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अर्थाचे संक्रमण होत असताना मूळ अर्थ टिकून राहिला पाहिजे तसेच पुनःकथन तिथे घडले पाहिजे. आपण ज्या भाषेतील साहित्यकृती भाषांतरासाठी निवडतो तिला मूळ किंवा **स्त्रोत भाषा** म्हणतात तर ज्या भाषेत ते साहित्य घेऊन जायचे आहे, तिला **लक्ष्य भाषा** म्हणतात. पण काळाच्या ओघात भाषांतराचे प्रमाण वाढले तसे गरजा वाढल्या,तसतसे गरजेनुसार त्याचे स्वरूपही बदलू लागले म्हणून भाषांतराकडे एक नवनिर्मिती म्हणूनही बघितले जाऊ लागले. त्यामुळे स्वैर, स्वातंत्र्य घेऊन भाषांतर करण्याकडे कल वाढला यातून अनुवाद, अर्थानुवाद, भावानुवाद, रूपांतर या संकल्पनांचा जन्म झाला.

**भाषांतराच्या पाश्चात्यांनी केलेल्या व्याख्या:**

**सी. रेबीन** – यांच्या मते, भाषांतर ही एक प्रक्रिया आहे. एखाद्या लिखित वा मौखिक वचनाला एका भाषेतून दुसऱ्या भाषेत नेत असताना मूळ भाषेतील अर्थ जसा असतो तसा उतरविणे म्हणजे भाषांतर होय.

**डॉ. जॉन्सन** – यांच्या मते, भाषांतर करणे म्हणजे एका भाषेतील अर्थ दुसऱ्या भाषेत नेत असताना मूळ अर्थाला धक्का न लावणे.

तर मराठी अभ्यासकांनी केलेल्या व्याख्येपैकी पु.ल. देशपांडे यांची व्याख्या अधिक साधी सोपी व यथार्थ वाटते.

**पु. ल. देशपांडे** – यांच्या मते, एका कुपीतील अत्तर दुसऱ्या कुपीत ओतताना त्याचा एक थेंबही वाया जाऊ न देणे असे बेमालूमपणे भाषांतर झाले पाहिजे.

भाषांतरातील शब्दशः भाषांतरात शब्द बदलले तरी मूळ अर्थाला धक्का न लागू देणे हा असतो. तर अनुवादात मूळ आशयाला धक्का न लावता पण पुरेसे स्वातंत्र्य घेऊन एका भाषेतील दुसऱ्या भाषेत आणणे म्हणजे अनुवाद. यात शब्दशः भाषांतराला स्थान नसते. अनुवाद हा अर्थ आणि आशय या दोन्हींची अभिव्यक्ती करणारा असतो. अनुवाद ही व्यापक संज्ञा आहे. मूळ भाषेशी प्रामाणिक राहून अनुवाद करावा लागतो. केवळ आशय नाही तर त्या भाषेतील संस्कृतीही या दुसऱ्या भाषेत आणली जाते. "साहित्यकृतीत भावार्थाला महत्त्व असते. मूळ भाषेतील साहित्यकृतीतील फक्त भावार्थ महत्त्वाचा मानून तो लक्ष्य भाषेत आणला जातो. त्यास भावानुवाद म्हणतात."[३] तर रूपांतरकाराला केवळ दोन भाषांचे ज्ञान असणेच पुरेसे नसते तर त्याला त्या त्या भाषेची संस्कृती परंपरा, प्रथा, रीतिरिवाज, सामाजिक संकेत, सभ्यता या सर्वांचे भान असणे आवश्यक असते.

**काही उदाहरणे:**

नाटकांच्याच संदर्भात बघावयाचे झाल्यास शेक्सपिअरच्या 'ऑथेल्लो' नाटकाचे भाषांतर महादेवशास्त्री कोल्हटकर यांनी मराठीत केले. ते आदर्श नाटक समजले गेले. गो.ग. आगरकर यांनी 'हॅम्लेट'चे रूपांतर 'विकार विलसित' या नावाने केले. अनंत काणेकर यांनी इब्सेनच्या 'डॉल्स हाऊस' नाटकाचा अनुवाद 'घरकुल' या नावाने केला. जॉर्ज बर्नाड शॉच्या 'पिग्मॅलियन'चे रूपांतर पु. ल. देशपांडे यांनी 'ती फुलराणी' नावाने केले तर वि.वा. शिरवाडकरांनी मॅकबेथचे 'राजमुकूट', ऑस्कर वाईल्डच्या 'आयडियल हजबंड' चे रूपांतर 'दूरचे दिवे' या नावाने केले. गो.वि. करंदीकरांनी किंग लिअरचे रूपांतर 'राजा लिअर' या नावाने केले. तर वि.वा. शिरवाडकरांचे 'नटसम्राट' हे किंग लिअरच्याच धर्तीवरील पण केवळ प्रेरणा घेऊन लिहिलेले नाटक आहे. सतीश आळेकरांच्या 'महानिर्वाण' नाटकाचे इंग्रजी भाषांतर गौरी देशपांडे यांनी 'The Dread Departure – Mahanirvan' या नावाने केले. पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे 'चंद्र नभीचा ढळला' हे नाटक म्हणजे काम्युच्या कॅलिग्युलाचा अनुवाद समजला जातो. "ड्रायडन या कवीच्या अलेक्झांडर फिस्ट (पॉवर ऑफ म्युझिक) या कवितेचे केशवसुतांनी सतारीचे बोल या कवितेत अनुभवांतर आल्याचे म्हटले आहे."[४] एस.एल. भैरप्पा यांच्या अनेक कादंबऱ्यांचे अनुवाद उमा कुलकर्णी यांनी केले तर सुधा मूर्ती यांच्या कादंबऱ्यांचे आजही अनुवाद होत आहेत. पु.ल. देशपांडे, गौरी देशपांडे, लीना सोहोनी, उमा कुलकर्णी, अपर्णा वेलणकर, करूणा गोखले, अशा अनेकांनी अनेकविध पाश्चात्य तसेच

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

दक्षिणेकडील भाषेतील कादंबऱ्या मराठी भाषेत आणल्या आहेत.

**इंग्रजी कादंबरीचा मराठीत अनुवाद - द ओल्ड मॅन अँड द सी**

प्रख्यात अमेरिकन लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे यांची द ओल्ड मॅन अँड द सी ही गाजलेली कादंबरी. स्वतः हेमिंग्वेला मासेमारीची विशेषतः समुद्रातील मासेमारीची आवड असल्याने या कादंबरीत त्याने या मासेमारी जगतातीलच प्रसंगांचे वर्णन केले आहे. एका सामान्य मच्छीमाराच्या संघर्षावर ही कादंबरी बेतलेली आहे. एका म्हाताऱ्या मच्छीमाराची एकाकी मुशाफिरी आणि प्रचंड माशांशी झालेली लढाई या कादंबरीत येते. सलग ८४ दिवस एकही मासा (शिकार) या सॅंटियागो नामक वृद्धाला मिळत नाही. त्याच्या बरोबर एक मुलगा ४० दिवस मासेमारीसाठी जात असतो पण त्यालाही नंतर त्याच्या बापानं या मच्छीमाराबरोबर जायला बंदी घातलेली असते. तो ज्या होडीवर जास्त मासे मिळतात तिथे जायला लागतो. पंच्याऐंशीव्या दिवशी या म्हाताऱ्याला एक ताडमासा मिळतो, मात्र त्याला वर काढण्यासाठी त्याला नाना प्रकारचे प्रयत्न करावे लागतात. शेवटी तिसऱ्या दिवशी हा म्हातारा त्याला बर्चीच्या साहाय्याने ठार करतो व ही लढाई संपते मात्र कादंबरी संपत नाही. कारण तो मारलेला मासा जिथे तो म्हातारा टांगून ठेवतो त्या माशाला खायला इतर मासे तिकडे धाव घेतात. शार्क मासे त्याच्यावर हल्ला करतात. या माशांशी आता म्हातारा झुंज देतो. अखेर एक दिवस त्या ताडमाश्याचा सांगाडाच केवळ उरतो. एका किरकोळ मच्छीमार असलेल्या म्हाताऱ्याचा हा केवळ संघर्ष नव्हे तर मच्छीमाराच्या जीवनातील नियती व मानव यांच्या झुंजीचा हा विराट खेळ म्हणावा लागेल. विशाल समुद्रात बहात्तर तास एकटा असलेला म्हातारा स्वतःशी बोलतो, पाखराशी बोलतो, डाव्या हाताशी बोलतो, स्वतःला धीर देतो आणि धीर खचू लागला की देवाची प्रार्थना करतो. या हेमिंग्वेच्या पुस्तकाचे (कादंबरी) तीन अनुवाद झाले आहेत. पहिला पु.ल. देशपांडे यांनी केला (१९६५) ज्यास त्यांनी एका कोळियाने असे नाव दिले. दुसरा अनुवाद हा भारती पांडे यांनी (२०२२) केला तर तिसरा अनुवाद डॉ. कमलेश सोमण यांनी (२०२३) केला आहे. सर्वांनीच आपापल्या परीने या अनुवादाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

अनुवादामध्ये व्यक्तिगणिक शैली, वाक्यरचना यांत कसा बदल होत यासाठी उदाहरणादाखल काही ओळी बघू या.

**मूळ साहित्यकृती – हेमिंग्वे चे The Old Man and the Sea**

“He took all his pain and what was left of his strength and his long gone pride and he put it against the fish’s agony and the fish came over onto his side and swam gently on his side, his bill almost touching the planking of the skiff and started to pass the boat, long, deep, wide, silver and barred with purple and interminable in the water.” [५]

**पु.ल. देशपांडे – एका कोळियाने**

“आपली सारी दुखी आणि उरलीसुरली शक्ति आणि केव्हाच गळलेला स्वाभिमान ह्या साऱ्यानिशी तो त्या माशाच्या यातनांसमोर ठाकला आणि तो मासा त्याच्या बाजूला आला. कलत्या अंगाने शांतपणे पोहायला लागला. त्याचं नाकाड फळीला जवळजवळ लागत होतं आणि लांब, गहिरा, रूंद,

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

रूपेरी, जांभळ्या पट्ट्यांचा आणि पाण्यात संपता संपत नाही असा तो मासा होडीच्या पुढे जायला निघाला".[६]

**द ओल्ड मॅन ॲंड द सी – भारती पांडे (भाषांतर)**

"त्यानं त्याचं सगळं दुखणं, उरलीसुरली शक्ती आणि केव्हाच संपलेला त्याचा अभिमान हे सारं एकत्र केलं आणि माशाच्या यातनेविरूद्ध ते उभं केलं आणि तो मासा त्याच्या होडीच्या शेजारून सावकाश पोहत राहिला. त्याची चोच होडीच्या लाकडाला स्पर्श करत होती. हळूहळू तो होडीच्या पुढे जायला लागला. लांबलचक. रूंद आणि खोल – पाण्यातल्या त्याच्या न संपणाऱ्या चंदेरी जांभळ्या पट्ट्या"[७] –

**द ओल्ड मॅन ॲंड द सी – अथांग सागर आणि एक वयस्क थकलेला कोळी - डॉ. कमलेश सोमण (संपादन आणि अनुवाद)**

"एके क्षणी तो म्हातारा चवताळला ! त्याने आपली सारी शक्ती पणाला लावली. अभिमानाची झालेल्या फजितीसह सर्व काही त्याच्यापाशी टाकलं ! माणसाची जेव्हा खऱ्या अर्थानं जिरते आणि त्याच्या अहंकाराला जेव्हा ठेच लागते, तेव्हा माणूस खऱ्या अर्थाने नम्र होतो. त्याला 'काही नाही' पणाचं भान येतं तसं म्हाताऱ्याला आलं होतं.

होडीजवळून एका दिशेला कललेला मासा पोहत होता. काही वेळा त्याच्या धक्क्यानं होडी हलत होती. तो रूपेरी, जांभळ्या पट्ट्याचा तो मासा होडीच्या पुढे जायला लागला."[८]

या तीनही भाषांतरीत (भाषांतर, अनुवाद व संपादनासह अनुवाद) या पुस्तकांतील एकाच परिच्छेदाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, जिथे भारती पांडे यांनी भाषांतर केले आहे तिथे त्यांनी मूळ साहित्यकृतीस मुळाबरहुकूम भाषांतर करण्याकडे भर दिला आहे. तर पु. ल. देशपांडे यांचा अनुवाद बराचसा ओघवता झाला आहे आणि नंतर कमलेश सोमण यांनी केलेले संपादन व अनुवाद असल्याने पदरची वाक्ये घालत, स्पष्टीकरण देत त्यांनी अनुवाद करण्यावर भर दिला आहे. परिणामी सर्वात जास्त वाचनीय अनुवाद हा पु.ल. देशपांडे यांचा वाटतो. अर्थात हे एका परिच्छेदापुरते प्रस्तुत ठिकाणी नोंदवले आहे. मात्र साहित्यकृतीचा अनुवाद, भाषांतर करणे हे सोपे काम निश्चित नाही तेव्हा हे मोठे आव्हान पेलताना भाषांतरकाराला भाषाशैली, निवेदन, वाक्यरचना, मूळ ओळींचे आपापल्या परीने आकलन करून घेणे अशा अनेक बाबींचा विचार करावा लागतो. त्यामुळे प्रत्येक अनुवादकाची स्वत:ची अशी वेगळी शैली निर्माण होत असते. म्हणूनच भाषांतरप्रक्रियेला आजच्या काळात विशेष महत्त्व आले आहे. कारण अनुवादाकडे आजच्या काळात अनुसर्जन म्हणूनही पाहिले जाते. अनुवाद ही एकप्रकारे त्या त्या अनुवादकाची नवनिर्मितीच असते. परंतु मूळ साहित्यकृतीशी प्रामाणिक राहून त्याला हे आव्हान पेलावे लागते.

**समारोप :**

भाषांतर प्रक्रियेमुळे विविध भाषेतील समर्थ आशय, शैली, संस्कृती, रीतिरिवाज, परंपरा यांचे ज्ञान दुसऱ्या भाषेपर्यंत, त्या भाषिक गटापर्यंत जाऊन पोहचते. भाषांतर, अनुवाद, रूपांतर या सर्व प्रक्रियांचे आजच्या काळात म्हणूनच वेगळे महत्त्व आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक ग्रंथांची, काव्यांची भाषांतरे झाली. संस्कृती, रीतिरिवाज लक्षात घेऊन अनेक अनुवादकांनी, भाषांतरकारांनी ग्रंथांची रूपांतरेही केली. नाटकाचे रूपांतर कादंबरीत, कथेचे रूपांतर नाटकात या पद्धतीनेही प्रकारांतर झाले. हळूहळू साहित्यकृतीवर आधारित

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

चित्रपट, टीव्ही मालिका सध्याच्या काळात वेब सीरीज निघू लागले या प्रक्रियेला माध्यमांतर म्हटले जाऊ लागले. अशाप्रकारे एका साहित्यकृतीचा आशय भिन्न भाषेत, प्रकारात, माध्यमात समर्थपणे नेऊन तो अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा हेतू या प्रक्रियेमागे आढळतो. कृष्णशास्त्री चिपळूणकरांपासून ते आजच्या लीना सोहोनी, करूणा गोखले यांच्यापर्यंत असंख्य भाषांतरकार किंवा अनुवादकांनी साहित्यात मैलाचे ठरलेले दगड (विशेष गाजलेल्या साहित्यकृती) आपल्या अनोख्या शैलीने लक्ष्य भाषेत, माध्यमात समर्थपणे पोहचविल्या आहेत. आधुनिक काळात असे भाषांतर, अनुवादादी प्रकार होणे गरजेचेच आहे. जागतिक साहित्यात या भाषांतरप्रक्रियेचे अमाप योगदान आहे. कारण जागतिकीकरणानंतर जसे देश जोडले गेले तसेच्या त्या त्या देशाची ओळख असणारे, संस्कृती, साहित्य हेही इतर देशांतील लोकांपर्यंत पोहचण्यासाठी या प्रक्रियेचा उपयोग होतो. थोडक्यात भाषांतर-अनुवाद व रूपांतर या प्रक्रियांमुळे जागतिक साहित्यप्रकारांच्या प्रसारास चालना मिळते.

**निष्कर्ष:**

- भाषांतर प्रक्रियेमुळे एका भाषेतील महत्त्वाचा मजकूर दुसऱ्या भाषेत सहजपणे जाऊन पोहचतो.
- या प्रक्रियेमुळे एकापेक्षा अधिक भाषा बोलणारे समूह कोणत्या ना कोणत्या पद्धतीने जोडले जातात.
- भाषांतरप्रक्रियेमुळे परभाषा समजून घेण्यातील अडथळे दूर होतात.
- भाषांतरप्रक्रियेमुळे तरूण पिढीला रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत.
- भाषांतर, अनुवाद, रूपांतर, भावानुवाद आदी प्रक्रियांमुळे विविध साहित्यकृतींमधील दुर्मीळ आशय जास्तीत जास्त लोकांपर्यंत जाऊन पोहचतो आहे. जागतिक पातळीवर हे भाषांतराचे मोठे योगदान आहे.

**संदर्भ :**

१. *देशपांडे, ल.स. साहित्यकृतीचे भाषांतर : एक प्रवर्त रूप, भाषा आणि जीवन, पावसाळा, १९९१, पृ. ३३*

२. *कऱ्हाडे, सदा, भाषांतर, लोकवाङ्मय गृह, मुंबई, तिसरी, मार्च २००७, पृ. ५*

३. *मोकाशी, मधुकर, भाषांतर चिकित्सा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २३ फेब्रुवारी २०१२, पृ. ८*

४. *तत्रैव, पृष्ठ १५*

५. *Ernest Hemingway, The Old Man and the Sea, Arushi Book Enterprises, 2021, pg. no. 71*

६. *देशपांडे, पु.ल., एका कोळियाने, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, सातवी, २०२१, पृ. ११०-१११*

७. *पांडे, भारती, द ओल्ड मॅन अॅड द सी, मधुश्री प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर २०२२, पृ. ११४*

८. *द ओल्ड मॅन अॅड द सी – अथांग सागर आणि एक वयस्क थकलेला कोळी - डॉ. कमलेश सोमण (संपा. आणि अनु.), गोयल प्रकाशन, पुणे, जानेवारी २०२३, पृ. ९५*

*Cite This Article:* *डॉ. आचार्य सा. (2025). भाषांतर-अनुवाद-रूपांतराने जागतिक साहित्यप्रसारास चालना.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 155–161).

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

# भाषांतरकार: आवश्यक गुण आणि आव्हाने

*प्रो . डॉ. सुभाष दिनकर आहेर

*प्र. प्राचार्य, श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ, खंडाळा जि . सातारा

**उद्देश :**

*१) भाषांतर ही संकल्पना समजावून घेणे.*

*२) भाषांतराचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्व अभ्यासणे.*

*३) भाषांतर व नोकरी व्यवसाय संधी यांचा अनुबंध अभ्यासणे.*

*४) भाषांतर प्रक्रियेतील आवश्यक गुणांचे महत्त्व लक्षात घेणे.*

*५) भाषांतरकारापुढील आव्हाने अधोरेखित करणे.*

*संशोधन पद्धती- समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती, तुलनात्मक संशोधन पद्धती , भाषिक संशोधन पद्धती*

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रास्ताविक** :

भाषांतरामुळे भाषाभाषांतील वैचारिक, साहित्यिक, भावनिक, कलात्मक देवाणघेवाण होते. एखाद्या भाषेचे ज्ञान म्हणजे तिचे व्याकरण, रचना, वाक्प्रचार, म्हणी, शब्दसंग्रह, भाषेतील सांस्कृतिक ,सामाजिक संकेत, वाड्मयीन संकेत, त्या भाषेची जडणघडण इ. विषयक माहिती हवी. १९ व्या शतकाच्या पहिल्या पाऊणशे वर्षांच्या कालखंडाला 'भाषांतरयुग' असे म्हटले गेले. एका भाषेच्या आशयाला अन्य भाषेत आणणे म्हणजे भाषांतर. परंतु एवढाच सीमित अर्थ घेता येणार नाही. संस्कृत भाषेमध्ये भाषांतराला 'छाया' असे म्हणतात. मराठीतून लिहिल्या गेलेल्या साहित्याचे जसे अन्य भाषांत भाषांतर झाले तसेच आज मराठीत विविध भाषांमधून भाषांतराच्या मार्गाने आलेले वाड्मय विपुल प्रमाणात आहे. जग जवळ येत असल्याचा प्रत्यय या भाषांतराच्या स्वरुपात अनुभवता येत आहे.

**संकल्पना** :

'अनुवाद मुलभाषा की सामग्री के भावों की रक्षा करते हुए उसे दुसरी भाषा में बदल देना है'[१] To Translate is to change into another language retaining the sense. अनुवादाच्या माध्यमातून भिन्न संस्कृती, देश, समाज याचे आकलन होते. जगातील महान ग्रंथाचा परिचय अनुवादातूनच होतो. भारतीय पंचतंत्र कथा प्रथम फारसीमध्ये अनुवादित झाल्या त्यानंतर अरबीमध्ये, अरबीमधून फ्रेंच भाषेत व फ्रेंच भाषेतून इतर युरोपीय भाषांमध्ये अनुवादित झाल्या.

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

अनुवाद हा शब्द संस्कृत आहे. यामध्ये अनुर हे उपसर्ग आहे. वाद म्हणजे कथन. अनुवाद या शब्दाचा अर्थ पुनःकथन. 'स्त्रोतभाषा के साहित्य की सौन्दर्य चेतना, कलापूर्ण प्रयोग आदि को समझना तथा उसका प्रभावशाली ढंग से लक्ष्यभाषा में प्रतिस्थापना करना कला-मर्मज्ञ अनुवादक द्वारा ही सम्भव है।'[२] साहित्यकृतीच्या अनुवादास एजरा पाउंड यांनी साहित्यिक पुनर्जीवन म्हटलेले आहे. काही अभ्यासक 'साहित्यिक पुनःसृष्टी' असेही म्हणतात.

**भाषांतर स्वरूप** :

भारतात हिंदी व इंग्रजी या भाषांचे स्थान अन्य भारतीय भाषांपेक्षा भाषांतराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण समजले जाते. हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा आहे, तर इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे. १८१८ पासून सुरु झालेल्या ब्रिटिश सत्तेमुळे मराठीचा इंग्रजीशी संपर्क आला. इंग्रजीतील लेखनाचे मराठीत विपुलतेने भाषांतर होऊ लागले. १८०० ते १८७४ या कालखंडास 'भाषांतर युग' म्हटले गेले. मूळ लेखक व भाषांतरकार हे सामान्यतः एक व्यक्ती नसतात. ते भिन्न व्यक्तिमत्त्व असलेली दोन माणसे असतात. मूळ लेखनाकडे पाहण्याची भाषांतरकाराची दृष्टीही वेगळी असू शकते आणि ज्या भाषेमध्ये तो भाषांतर करीत असतो. त्या भाषेची प्रकृती, प्रवृत्ती, संस्कृती इत्यादींचा विचारही भाषांतरामध्ये लक्षात घेतलेला असतो. 'भाषाभाषांतील वैचारिक, साहित्यिक, भावनिक, कलात्मक पूल जोडण्याचे कार्य भाषांतरामुळे साधले जात असते'[३] भाषेला पुष्कळदा सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक जीवनाचे संदर्भ असतात त्याचाही अभ्यास अनुवादकाचा असला पाहिजे. प्रत्येक भाषेची सांस्कृतिक व वैचारिक अंगाने जडणघडण झालेली असते. शब्दांच्या विविध अर्थच्छटा व भावच्छटा यांचाही बारकावा माहीत असणे आवश्यक आहे. उदा. Father, Mother हे शब्द इंग्रजीत आहेत. मराठीत त्यांचे पर्यायी शब्द वडील, बाप, पिता, बाबा, पिताजी, जनक, बा, आई, माय, माता, जननी, जन्मदात्री इ. असल्याने त्यापैकी कोणता शब्द निवडायचा हे मूळ उताऱ्यातील भाषिक वातावरणावर अवलंबून असते.

**भाषांतरकार आवश्यक गुण** :

भाषांतराचा मूळ उद्देश ज्ञानप्रसार, विचारसंवर्धन, ज्ञानसंवर्धन, अन्य संस्कृती व समाजजीवनाचे आकलन हे आहेत. म्हणूनच अनुवादकाजवळ पुढील गुण असणे आवश्यक आहेत.

१. दोन्ही भाषांचे, दोन्ही भाषा बोलणाऱ्या समाजसंस्कृतीचे पुरेसे आकलन
२. मूळ भाषेतील वाङ्मय / साहित्य अभ्यास, वाचन इ.
३. लक्ष्य भाषेतील वाङ्मय / साहित्य अभ्यास वाचन इ.
४. व्याकरणिक रचना, प्रतीके, प्रतिमा, आलंकारिक रचना, शब्दच्छटा आदींची जाण
५. लेखातील विचाराचे आकलन, त्या लेखनाच्या ज्ञानक्षेत्राचा परिचय इ.

भाषाआकलन व भाषाउपयोजनाचे कौशल्य अनुवादकाजवळ असणे आवश्यक आहे.

**भाषांतरकारापुढील आव्हाने** :

१. अनुवादक हा लेखक असलाच पाहिजे. मूळ लेखकाने त्याला जे भावलेले असते ते लिहिलेले असते ते त्याला जसे भावले तसेच्या तसे त्याच आशयासह परभाषिक वाचकांपर्यंत पोहोचवणे म्हणजे अनुवाद. लेखनाप्रमाणेच अनुवाद ही सुध्दा मेंदूला थकवणारी,

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025
OPEN ACCESS Original Research Article

कष्टप्रद तरीही आनंद देणारी प्रक्रिया आहे. अनुवादकाची दोन्ही भाषांबरोबर म्हणजे ज्या भाषेत अनुवाद करायचा त्या (लक्ष्यभाषा) व ज्या भाषेतून करायचा त्या (स्त्रोतभाषा) जवळीक असली पाहिजे. बंगाली भाषेत ‘अमिष दाखवले’ असे म्हणताना 'मुळा दाखवला' असे म्हणतात. मराठीत मात्र मुळा दाखवला असे न म्हणता गाजर दाखविले असे म्हणावे लागेल.

२. साहित्याचा जसा समाजजीवनाशी संबंध असतो, त्याचप्रमाणे साहित्याचा संबंध संस्कृतीशी असतो. समाजसापेक्ष सर्जनशील आविष्कार म्हणजे साहित्य होय. साहित्याचे लेखन करणारा लेखक व वाचन करणारा वाचक यांची जडणघडण सांस्कृतिक पार्श्वभूमीतच होत असते.

३. लेखक जी भाषा वापरतो ती भाषा एका अर्थाने समाजाची निर्मिती असते. आपण ज्या समाजात जन्माला येतो त्या समाजाची भाषा, जीवनपद्धती, संस्कृती, सामाजिक परंपरा, रुढी, रीतिरिवाज, विधीनिषेध या सर्वांचाच परिणाम वाचक व लेखकावर होत असतो.

४. साहित्याची निर्मिती समाज व संस्कृतीच्या अनुषंगाने होत असते म्हणून अनुवादकाने सांस्कृतिक अभ्यास करणे गरजेचे आहे. समाज कधीही स्थिर नसतो.. त्यात वेगवेगळ्या स्तरावर अनेक परिवर्तने होत असतात. या सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाचा परिणाम मानवी जीवनावर होत असतो. लेखक ज्या परिसरात राहतो तेथील वाङ्मयीन, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक पर्यावरणाचा परिणाम लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो व त्याचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यकृतीत उमटत असते. तेव्हा अनुवादकाने ह्याही गोष्टीचे भान ठेवले पाहिजे.

५. अनुवादकाला भाषेचे आणि कलाकृतीचे अंतर्दर्शी आकलन व सांस्कृतिक भिन्नतेचे आकलन असणे आवश्यक आहे.

६. भाषेच्या विविध अंत:स्तराचे ज्ञान, शब्दबंध, अर्थविज्ञान, वाक्यविन्यास, बहुअर्थता, समाजभाषा, संस्कृती, सामाजिक, धार्मिक व पारंपरिक स्वरूपाचे संदर्भ या बाबींचीही माहिती असणे आवश्यक आहे.

७. लेखक, साहित्यकृती व वाचक या सर्वांच्या संदर्भातील सामाजिकता अनुवादकास माहीत असणे आवश्यक आहे.साहित्यास एक सामाजिक अंग असते.

८. समाजपरंपरा, समाजगटानुसार जीवनपद्धतीतील विविधता, विविध जाती, अर्थस्तर, भाषिक गट यांचे परस्परसंबंध, लेखकाच्या जडणघडणीस कारणीभूत असणारे घटक या संदर्भातही अनुवादकाचा अभ्यास असावा. फक्त कलाकृती अनुवादित करणे हे योग्य नाही तर वरील सर्व घटकांचा विचार त्या अनुषंगाने होणे आवश्यक आहे.

९. अनुवादकाने कोणत्याही कलाकृतीचा अभ्यास करताना कलाकृतीच्या निर्मितीचा कालखंड, त्या कालखंडातील समाजजीवन, सांस्कृतिक जीवन,समाजजीवनातील महत्त्वपूर्ण घटना ,राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक स्थिती यांचा परस्पर संबंध लक्षात घेणे आवश्यक आहे.

१०.समाजजीवनात धार्मिक ,राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक घटना घडत असतात त्याचाही परिणाम

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-XIV, Special Issues – III (b) Nov – Dec, 2025

OPEN ACCESS Original Research Article

साहित्य निर्मितीवर होतो. साहित्य, समाज व संस्कृती यांचा अतिशय जवळून संबंध असतो.

**भाषांतरकार महत्त्व** :

आधुनिक युगामध्ये अनुवादास फार महत्त्व प्राप्त झाले आहे. संत ज्ञानेश्वरांनीही भगवद्गीतेचा मराठीत 'ज्ञानेश्वरी' हा अनुवाद केला. संस्कृतमधील रामायण, महाभारत आणि पंचतंत्र इ. ग्रंथ जगातील अनेक भाषांमध्ये अनुवादित झालेले आहेत. होमर, सॉक्रेटीस, शेक्सपीयर आदींची रचना जगभरात अनुवादाच्या माध्यमातून पोहोचलेल्या आहेत. विलीयम जोन्स यांनी अतिशय कष्टपूर्वक संस्कृत भाषा अवगत करुन कालिदासाचे 'अभिज्ञान शाकुंतल' नाटकाचा इंग्रजी अनुवाद १७८९ मध्ये केला. त्यामुळे सर्व जगाला नाटकाची ओळख झाली. १७९२ मध्ये जोन्सने गीतगोविंदचा अनुवाद केला.

'३० सप्टेंबर हा जागतिक भाषांतर दिन म्हणून ओळखला जातो. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ट्रान्सलेटर्स (FIT) या संस्थेने बायबलचे लॅटीनमध्ये भाषांतर करणाऱ्या St. Jerome या भाषांतरकाराच्या स्मरणार्थ १९९१ सालापासून हा दिन साजरा करण्यास प्रारंभ केला. तुलनेने दुर्लक्षित असलेल्या भाषांतर व्यवसायाचा विविध देशांमध्ये जास्तीत जास्त प्रसार करणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. तसेच सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगातील भाषांतर व्यवसायाची वाढती मागणी व महत्त्व लक्षात घेऊन त्यानुसार या व्यवसायास सन्मान व प्रतिष्ठा मिळवून देणे हा देखील यामागील एक विचार आहे. या निमित्ताने प्रोझ डॉट कॉम (www.proz.com) या इंटरनेटवरील भाषांतरकाराच्या सर्वात मोठया समुदायाने व्हर्चुअल स्वरुपाची Translation 3 ही कॉन्फरन्स आयोजित केलेल्या आहेत. आपली भाषांतराची कामे करुन घेण्यासाठी The world bank, IBM, Honda, Ebay, Bloomberg अशासारख्या दिग्गज कंपन्या जिथे येतात, त्या प्रोझ डॉट कॉमपवर ३०० हून अधिक भाषांमध्ये काम करणारे सुमारे ३,५०,००० नोंदणीकृत भाषांतरकार व दुभाषी आहेत आणि १५,००० नोंदणीकृत कंपन्या आहेत."[४] व्हर्चुअल कॉन्फरन्स ही एका ठरावीक दिवशी, ठरावीक वेळी इंटरनेच्या माध्यमाद्वारे आयोजित केली जाते व जगभरातील भाषांतरकार त्या कॉन्फरन्सच्या पेजवर लॉग इन करुन तेथील मार्गदर्शनपर व्याख्याने, प्रात्यक्षिके, प्रश्नोत्तरे, नेटवर्कींग इत्यादींमध्ये प्रत्यक्ष सहभागी होतात. यामुळे प्रवासखर्च व वेळ या दोन्हींची बचत होते. यामधूनच विविध विषयासंदर्भात चर्चा होते. उदा. भाषांतराचे दर, दुभाषी होताना, मुक्त भाषांतरकारांनी मार्केटींग कसे करावे? भाषांतरकाराचे प्रकल्प व्यवस्थापन, भाषांतरासंबंधी ग्राहकाच्या अपेक्षा, भाषांतर उद्योगाचे भविष्य इ.

**निष्कर्ष** :

१) आधुनिक युगामध्ये भाषांतरास फार महत्त्व प्राप्त झाले आहे.

२) लेखनाप्रमाणेच भाषांतर ही एक महत्वपूर्ण अशी सर्जनशील प्रक्रिया आहे .

३) भाषेला सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक जीवनाचे संदर्भ असतात. अनुवादकाने हे संदर्भ अभ्यासले पाहिजे.

४) भाषांतरात शब्दांच्या विविध अर्थच्छटा व भावच्छटा यांना महत्त्वाचे स्थान असते हे अनुवादकाने लक्षात घ्यावे.

५) साहित्याचा अभ्यास करताना सांस्कृतिक परंपरेबरोबरच सामाजिक पर्यावरणाचेही महत्त्व लक्षात घ्यावे.

६) भाषांतर ही आव्हानात्मक व अभ्यासपूर्ण अशी बाब आहे.

**समारोप** :

भाषांतर करणे ही तशी सोपी गोष्ट नाही तर अभ्यासपूर्ण बाब आहे. वरवर भाषांतर न करता मूळभाषा व लक्ष्यभाषेतील सर्व घटकांचा अनुवादकाचा अभ्यास असला पाहिजे. विभिन्न, सांस्कृतिक, सामाजिक, भाषिक गटातील लोकांचे साहित्य, भाषा, संस्कृती आदीबाबत ज्ञान व माहिती अनुवादामुळे मिळू शकते. कवितेचा अनुवाद ही आव्हानात्मक व अभ्यासपूर्ण अशी बाब आहे. २१ व्या शतकात अनुवादाचे महत्त्व निश्चितच वृध्दिगंत होईल अशी खात्री आहे.

**संदर्भ** :

*१. अय्यर डॉ. एन. ई. विश्वनाथ, 'अनुवाद भाषाएँ-समस्याएँ', ज्ञानगंगा प्रकाशन, प्र.आ., दिल्ली, १९९२, पृ. १४.*

*२. अय्यर डॉ. एन. ई. विश्वनाथ, 'अनुवाद कला, प्रभात प्रकाशन, प्र.आ., दिल्ली, १९९८, पृ. ३८.*

*३. गोविलकर, पाटणकर 'व्यावहारिक मराठी' स्नेहवर्धन प्रकाशन, प्र.आ., पुणे, २००४, पृ. १३२.*

*४. दै. लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, रविवार १२ सप्टेंबर २०१०, पृ. ४.*

*Cite This Article:*

*प्रो . डॉ. आहेर सु. दि. (2025). भाषांतरकार: आवश्यक गुण आणि आव्हाने.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number VI, pp. 162–166).

**Aarhat Publication & Aarhat Journals,Mumbai**
158 , Hastpushpam Building, Bora Bazar St,Borabazar Precinct,
Ballard Estate, Fort,Mumbai, Maharashtra 400001
Email ID: aarhatpublication@gmail.com M-8850069281